# १

# १८४८ पूर्वीचा महाराष्ट्र
# अ) महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

**घटक रचना :**


१.० उदिष्टये

१.१ प्रस्तावना

१.२ महाराष्ट्राची व्युत्पती व अर्थ

१.३ प्राचीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.४ मध्ययुगीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.५ आधुनिक महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.६ एलफिन्स्टनची कामगिरी

१.७ १८१८ ते १८४८ या कालखंडातील इंग्रज राजवटी विरुध्दचे उठाव

१.८ सारांश

१.९ दिर्घोत्तरी प्रश्न

१.१० इतर संदर्भसूची


## १.० उदिष्टये :

- महाराष्ट्राची व्युत्पती व अर्थ या बाबतची माहिती जाणून घेणे.
- प्राचीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
- मध्ययुगीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
- आधुनिक महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
- एल्फिन्स्टनच्या कामगिरीबाबतची माहिती जाणून घेणे.
- इंग्रज राजवटी विरोधात झालेल्या १८१८ ते १८४८ या कालखंडातील उठावांची माहिती जाणून घेणे.

## १.१ प्रस्तावना :

भारतीय संघराज्यप्रणालीतील एक महत्वपूर्ण राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. महाराष्ट्राला प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक ऐतिहासिक वारसा तर आहेच पण त्यापेक्षा महत्वाचे

म्हणजे महाराष्ट्राला इतर राज्यांपेक्षा सांस्कृतिक वेगळेपण आहे. तसेच महाराष्ट्राला भौगोलिक वैशिष्टयांच्या आधारे स्वतंत्र अस्तित्वही प्राप्त झाले आहे. १मे १९६० रोजी महाराष्ट्रराज्याची निर्मिती झाली.

या प्रकरणात आपण महाराष्ट्राची व्युत्पती, प्राचीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी, मध्ययुगीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी, आधुनिक महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी, एल्फिन्स्टनची कामगिरी व १८१८ ते १८४८ या कालखंड इंग्रज सत्तेविरुध्दचे उठाव या बाबतची माहिती पाहणार आहोत.

## १.२ महाराष्ट्राची व्युत्पती व अर्थ :

महाराष्ट्राची व्युत्पती प्राचीन कालखंडात झाली असे मत इतिहास अभ्यासक चि.वि. वैद्य यांनी मांडले आहे. इ.स.पूर्व सहाव्या शतकात आर्य लोक दक्षिण भारतात आले व दक्षिण भारतात त्यांनी गोपराष्ट्र, पाडुराष्ट्र व मल्लराष्ट्र या प्रकाराच्या वसाहती स्थापन केल्या यातील मल्लराष्ट्र म्हणजे महाराष्ट्र होय.

सातवाहन हे महाराष्ट्रातील पाहिले ज्ञात राजकर्ते. त्यांच्या कालखंडात नाणेघाट, भाजे, कार्ले, बेडसे येथील शिलालेखांमध्ये 'महार्रठ' महाराठिणी हे शब्द आढळतात.

वरुची, वात्सायन, भरतमुनी यांच्या ग्रंथात महाराष्ट्र हे नाव आढळते. महावंस या बौध्द ग्रंथात 'महारट्ठ' या शब्दाचा उल्लेख आहे.

रविकिर्तीच्या लेखात चालुक्य वंशीय दुसरा पुलकेशी हा तिन महाराष्ट्रकांवर राज्य करत होता असा उल्लेख आहे. जॉन विल्सन यांनी ' भारतवर्षातील मूळ रहिवासी' या ग्रंथात महाराष्ट्रालाच 'मल्लराष्ट्र' म्हटले आहे.

वि.का. राजवाडे यांच्या मते महाराष्ट्र शब्दाची व्यत्पती रट्ट या शब्दावरुन झाली आहे. रट्ट या शब्दांचे संस्कृत रुप म्हणजे राष्ट्रीक याचा अर्थ राष्ट्रात अधिकाराचे काम करणारा मनुष्य. हजारो वर्षापूर्वी राष्ट्रीकाहूनही उच्च दर्जाचे काम करणाऱ्या आधिकाऱ्यांना महाराष्ट्रीक म्हटले जाते.

'महार' आणि 'रट्ट' यांच्या एकीकरणाच्या कल्पनेतून महाराष्ट्र शब्दाची व्युत्पती झाली व त्यातूनच महाराष्ट्र शब्द बनला असे मत महाराष्ट्र ज्ञानकोशकार केतकरांनी मांडले आहे.

महानराष्ट्र म्हणजे महाराष्ट्र  या शब्दावरुन महाराष्ट्र शब्दाची व्युत्पती झाली असावी असे मत महामहोपाध्याय पा. वा. काणे यांनी मांडले आहे.

'महाराष्ट्र म्हणजे मंहत राष्ट्र, म्हणोन महाराष्ट्र' असा संदर्भ महानुभवी ग्रंथकाराच्या आचार – महाभाष्यातही मिळतो.

## १.३ प्राचीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी:

प्राचीन महाराष्ट्राला प्रभावी व कार्यक्षम राजकीय वारसा लाभल्याने प्राचीन महाराष्ट्र, राजकीय, प्रशासकीय आर्थिक व सांस्कृतिक दृष्टया समृध्द होता असे उपलब्ध माहितीवरुन दिसते. प्राचीन महाराष्ट्राच्या समृध्द वारसाचे जैविक पुरावे मोठया प्रमाणात सापडले आहेत. या पुराव्यावरुन महाराष्ट्रात १३लक्ष वर्षापूर्वी मानवी जीवन अस्तित्वात होते हे सिध्द होते. कुकडी नदीच्या परिसरात सापडलेले पुरावे, दायमाबाद व इनामगाव परिसरात सापडलेले पुरावे, तसेच नेवासा येथे सापडलेले पुरावे प्राचीन कालखंडातील महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारसांची उत्तम उदाहरणे आहेत.

**१.३.१ सातवाहन राजवंश :** प्राचीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेत असताना सर्वप्रथम आपणास सातवाहन राजवंशाचा विचार करावा लागेल. कारण सातवाहन हे महाराष्ट्रातील पहिले ज्ञात राज्यकर्ते होय. त्यांच्या राजवटीपासूनच महाराष्ट्रात स्थानिक राज्यव्यवस्थेचा उदय झाला. त्यांचा कालखंड इ.स.पूर्व २३० ते इ.स. २३० असा आहे. त्याची राजवट महाराष्ट्रवर जवळ जवळ ४०० वर्ष होती. डॉ.वा.वि. मिराशी, डॉ प्रभाकर देव या इतिहासकारानी सातवाहन हे मूळचे महाराष्ट्रातील राजकर्ते आहेत असे म्हटले आहे.

मौर्य सत्तेच्या अस्तानंतर या सत्तेची स्थापना झाली. सिमुख हा या सत्तेचा संस्थापक. श्री सातकर्णी पहिला, सातकर्णी दुसरा, राजा हाल, गौतमीपुत्र सातकर्णी, वशिष्टपुत्र पुल्लुमावी, यज्ञश्री सातकर्णी हे या वंशातील महत्वपूर्ण राजकर्ते होय.

प्रभावशाली राजकर्ते, साम्राज्य विभागणीची परंपरा, एकत्र कुटुंब पध्दतीचा प्रभाव, देशांतर्गत व देशबाहय व्यापाराचा विकास कृषी विकास, कराड, भोकरदन, तेरे, पैठण शहरांचा झालेला विकास, चोल, सोपारा, भडोच, कल्याण या बंदराचा झालेला विकास, कार्ले, भाने अजंठा, पितळखोर ही स्थापत्य कलेच्या विकासाची उदाहरणे प्राचीन महाराष्ट्राची वैभव संपन्नता सांगणारी आहेत.

**१.३.२.वाकाटक राजवंश :** सातवाहन राजवटी नंतर प्राचीन महाराष्ट्रात उदयास आलेला दुसरा महत्वपूर्ण राजवंश म्हणजे वाकाटक राजवंश होय. विंध्यशक्तीने या राजवंशाची स्थापना केली. सांतवाहन सत्ता नष्ट करुन विंधशक्तीने वाकाटकांची सत्ता स्थापन केली होती.

विद्यशक्तीनंतर प्रवसेन, रुद्रसेन, सर्वसेन, हरिसेन या वाकटक राजवंशातील सत्ताधीशानी महाराष्ट्रावर राज्य केले.

राजपदाचे महत्व, मंत्री परिषदेची निर्मिती, प्रांतवार रचना, नगर रचना, ग्राम रचना, वैदिक धर्म पुरस्कार, संस्कृत – प्राकृत भाषा राजाश्रय, प्रवरेश्वर मंदिर निर्मिती, पावनारच्या श्रीराम मंदिराची निर्मिती रामगिरी मंदिराची निर्मिती ही महाराष्ट्राला लाभलेली वारसा संपदा आहेत.

**१.३.३.चालुक्य राजवंश :** चालुक्य हे सामंत होते. त्यांची सत्ता उत्तर भारतात होती मात्र त्यांच्या सत्तेचा संदर्भ महाराष्ट्राबरोबर आला होता. प्राचीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

समजून घेत असताना या राजवंशाचा संदर्भ घेणे गरजेचे आहे. चालुक्यांचा महाराष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक जीवनावर चांगला प्रभाव जाणवतो.

किर्तीवर्मन, पुलकेशी दुसरा, व्रिकमादित्य पहिला व दुसरा, किर्तीवर्मन दुसरा हे राजे या राजवंशीय सत्तेत होते.

चालुक्यांनी जवळ जवळ चारशेवर्ष राज्य केले. या राजवटीत त्यांनी साहित्य, नृत्य, संगीत धर्म, अर्थ, राजप्रणाली, प्रशासन आदीबाबत महत्वपूर्ण योगदान दिले. त्यांचा संदर्भ महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाला आल्याने महाराष्ट्राला त्यांची अनमोल अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली.

**१.३.४ राष्ट्रकुट राजवंश :** प्राचीन महाराष्ट्रातील शेवटचा राजवंश राष्ट्रकुंटाचा होता. चालुक्य सत्तेचा शेवट करुन त्यांनी महाराष्ट्रात आपली सत्ता निर्माण केली होती. उत्तरेच्या राजकरणात त्यांचा सक्रीय सहभाग होता. असे जरी असले तरी महाराष्ट्रातील गौरवशाली अशी कलाकृती त्यांनी महाराष्ट्रात निर्माण केली. त्यामुळेच राष्ट्रकुटांच्या काळातील महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी आज ही महत्वपूर्ण ठरली आहे.

दंतीदुर्गने या सत्तेची स्थापना केली. दंतीदुर्गनंतर कृष्ण पहिला,ध्रुव, तिसरा गोविंद, अमोघवर्ष, कृष्ण तिसरा आदी या वंशाचे राजकर्ते होवून गेले.

राष्ट्रकुटाने उत्तम प्रशासन, कला, स्थापत्य, विद्या, कृषी, व्यापार आदीबाबत प्रगती केली होती.

**१.३.५. शिलाहर राजवंश:** प्राचीन महाराष्ट्रातील शेवटचा राजवंश राष्ट्रकुटांचा मात्र काही ठिकाणी शिलाहार राजवंश शेवटचा राजवंश मानला जातो. शिलहार राजवंशाच्या तिन शाखा महाराष्ट्रात राज्य करत होत्या.

उत्तर कोकणातील शाखेतील पहिला कपर्दिन, पुल्लशक्ती, दुसरा कपर्दिन, वप्पुवन्न, झंझ, अपराजित, छितराज,नागार्जुन, मुम्मन अनंतपाल, हरिणलदेव, अपराजित दुसरा हे राजकर्ते होते.

दक्षिण कोकणातील शाखेतील सणकुल, धामिय्यार, अय्यपराज, पहिला अवसर, हे राजकर्ते होते.

दक्षिण महाराष्ट्र शाखेत जातिग, नाईवर्मन चंद्र, जातिग दुसरा, गोड्क, मारसिंह, दुसरा गुहक, पहिला भोज, बल्लाळ, गष्ठरादित्य, विजयादित्य, दुसरा भोज हे राजकर्ते होवून गेले.

शिलाहर राजवंशाच्या कारकिर्दीत शहरांचा व बंदराचा विकास मोठया प्रमाणात झाला होता. या राजकर्त्यानी आपल्या कारकिर्दित कला व स्थापत्य केलेला उत्तेजन दिले होते. आपल्या कारकिर्दीत त्यांनी स्वतंत्र नाणी पाडली होती. धार्मिक स्वातंत्र्य, व्रत, दान या गोष्टींना त्यांच्या कारकिर्दीत महत्व आले होते.

**आपली प्रगती तपासा**

१. प्राचीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घ्या.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## १.४ मध्ययुगीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

मध्ययुगीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेत असताना आपणास महाराष्ट्रातील देवगीरीच्या यादवांची राजवट, खिलजी घराण्यातील अल्लाउद्दीन खिलजीची राजवट, तुघलक घराण्यातील मंहमदबिन तुघलकाची राजवट बहामनी शाही सत्तांची राजवट व मराठयांची राजवट आदी राजवटीचा संदर्भ घेवून ही पार्श्वभूमी स्पष्ट करावी लागेल.

**१.४.१ देवगिरीचे यादव :** मध्ययुगीन महाराष्ट्राला देवगीरीच्या यादवांच्या रुपाने प्रभावी अशी राजसत्ता लाभली होती. या सत्तेचा संस्थापक दृढप्रहार होता. राष्ट्रकुट सत्तेमध्ये निर्माण झालेल्या आराजकतेचा फायदा घेवून त्यांनी यादवांची सत्ता स्थापन केली होती. यादववंशीय राजकर्ते स्वतःस श्रीकृष्णाचे वंशज समजत असत. यादवांची राजधानी दौलताबाद (देवगीरी)या ठिकाणी होती. भिल्लम, पहिला जैतुगी, दुसरा सिंघण, कृष्ण, महादेव, रामदेव, तिसरा सिंघण, हरपालदेव हे या वंशातील राजकर्ते होय.

दक्षिणेतील एक प्रबळ हिंदू राज्य, आर्थिक दृष्टया संपन्न राज्य, समृध्द राज्य, विकसित राज्य, म्हणून या राज्याकडे पाहिले जाते. या राजवटीतील शेवटचा राजकर्ता हरपाल याचा पराभव करुन मुबारक खिलजीने या राजवटीचा शेवट केला. परिवामी पुढे महाराष्ट्राला इसलाम राजवटीला सामोरे जावे लागले.

**१.४.२ अल्लाउद्दीन खिलजी :** यादव सत्तेच्या अस्तानंतर खिलजीने महाराष्ट्रात सर्वप्रथम इस्लाम सत्ता स्थापन केली. यादव घराण्याचा शेवटचा राजा हरपाल देव याचा पराभव करुन यादव सत्ता नष्ट करण्यात आली होती. अल्लाउद्दीन खिलजी, मुबारक खिलजी हे या घराण्यातील नावारुपाला आलेले राजकर्ते होते.

**१.४.३ मोहमंद –बिन- तुघलक :** खिलजी घराण्या प्रमाणेच महाराष्ट्राला मध्ययुगीन कालखंडात तुघलक वंशातील मुसलमान राजवटीला अल्पकाळासाठी सामोरे जावे लागले. तुघलकानी अल्पकाळासाठी उत्तरेतून सुरक्षिततेसाठी आपली राजधानी दौलताबादला आणली होती. त्यामुळेच सुलतान राजवटीचा महाराष्ट्राबरोबर प्रत्यक्ष संबध आला होता. मात्र जनतेची

नाराजी व विरोधामुळे तुघलकास स्थळांतर करावे लागले. असे जरी असले तरी मध्ययुगीन महाराष्ट्राचा संदर्भ घेत असतांना ही पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे.

**१.४.४ बाहमणी राज्याचा उदय :** महमंद तुघलक राजधानी स्थळांतरीत करुन पुन्हा उत्तरेत निघून गेल्या नंतर त्याच्या अनेक सरदारानी दक्षिणेत त्याच्या सत्तेविरुध्द बंड केले. अनेक सरदारानी स्वतंत्र राज्य स्थापन केले. दक्षिणेत हसन गंगू बादशाहने अशाच प्रकारचे बंड करुन बहामनी साम्राज्य स्थापन केले. व यातूनच बहामणी सत्तेचा महाराष्ट्रात उदय झाला. या सत्तेच्या उदयातूनच महाराष्ट्रातील इस्लाम सत्तेला बळकटी आली.

हसन गंगु नंतर महमंद पहिला, फिराजशहा बहामणी अहमदशहा प्रथम, अहमद दुसरा, महमंद तिसरा हे सत्ताधिश सत्तेवर आले. पुढे हे साम्राज्य कमजोर बनले व विघटीत झाले. या विघटनातूनच दक्षिणेत पाच शाहया अस्तित्वात आल्या.या शाहया म्हणजे बिदरची- बरीदशाही, अहमदनगरची – निजामशाही, विजापूरची – आदिलशाही बेर वऱ्हाडची – इमादशाही व गोवळकोंडयाचा–कुतुबशाही होय. या पाचही शाह्यांनी महाराष्ट्राच्या वेगवेगळया भागावर राज्य केले व राज्य वाढविण्यासाठी आपापसात लढले पुढे या शाहयांचा संघर्ष विकोपाला गेला. याचाच फायदा छत्रपती शिवाजी महाराजांनी घेवून मराठा साम्राज्य स्थापन केले.

**१.४.५ मराठा साम्राज्य :** दक्षिणेत मुसलमानी शाहयांमध्य आपापसात संघर्ष सुरु होता. हा संघर्ष पुढे विकोपाला गेला. या संर्घाचा फायदा घेवून छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करुन मराठयांचे साम्राज्य नव्याने उभारले.

या साम्राज्याने महाराष्ट्राला समृध्द असा राजकीय प्रशासकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, न्याय तसेच कला स्थापत्याचा व निर्भयतेचा वारसा दिला. शिवरायांच्या कणखर नेतृत्वाने, कर्तुत्वाने अवधा महाराष्ट्रच नव्हे तर राष्ट्र नव्या उभारीचे जीवन जगण्यास प्रेरीत झाला.

शिवरायानंतर संभाजी राजे, राजाराम राजे, राणी ताराबाई, राजे शाहू या विभूतींनी मराठे साम्राज्य विस्तारीत करण्यासाठी व टिकविण्यासाठी प्रयत्न केले.

शाहू महारांजाच्या उत्तरकाळात मराठयांच्या छत्रपतींचे नेतृत्व नामधारी बनल्याने पेशवाईचा उदय झाला. पेशवाई महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर वाढविण्यासाठी बाळाजी विश्वनाथ, पहिला बाजीराव, नानासाहेब माधवराव या पेशव्यांनी अखंड प्रयत्न केले. मात्र दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या चूकीच्या निर्णयाने महाराष्ट्रात इंग्रज सत्तेचे अस्तित्व वाढले व याच इंग्रजानी तिसऱ्या इंग्रज मराठा युध्दात मराठयांचा पराभव करुन इंग्रज सत्ता महाराष्ट्रात दृढ केली.

मराठा सत्तेला स्वतंत्र अस्तित्व असल्याने या सत्तेने महाराष्ट्राला प्रभावी नेतृत्वाबरोबरच स्थिरता दिल्याने मराठयांची राजकीय पार्श्वभूमी महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून वरदान ठरली.

**आपली प्रगती तपासा**

१. मध्ययुगीन महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घ्या.

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

## १.५ आधुनिक महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

आधुनिक महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेत असताना आपणास मराठा सत्तेचा शेवट म्हणजेच पेशवाईच्या अस्ताचा कालखंड व इंग्रज सत्तेच्या उदयाचा कालखंड या दरम्यानच्या परिस्थितीचा विचार करावा लागेल या घटनाक्रमाची माहिती पुढे स्पष्ट करण्यात आली आहे.

**१.५.१ दुसऱ्या बाजीरावाचे धोरण:** शिवकाळ व पेशवेकाळ हा महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून राजकीय, प्रशासकीय व सांस्कृतिक दृष्टीकोनातून वैभवसंपन्न काळ ठरला होता. मात्र पेशवाईच्या उत्तरार्धात दुसऱ्या बाजीरावास पेशवेपद मिळाले आणि पेशव्यांची सत्ता दुर्बळ बनली. दुसऱ्या बाजीरावाचे धोरण संधीसाधू असल्याने त्यांने अनेक मराठा सरदांराना दु:खावले याहीपुढे जावून त्यांनी भ्रष्ट व चारिञ्य शुन्य माणसे आपल्या पदरी ठेवली. त्यामुळे त्याच्या साम्राज्यात भ्रष्टाचार वाढला. तसेच त्यांनी स्वत:हूनच स्वत:भोवती अनेक शत्रू निर्माण केले. तसेच मराठयांचे शत्रू असणाऱ्या इंग्रजांबरोबर मित्रत्वाचे संबध प्रस्तापित केले. त्याच्या या चूकीच्या धोरणाचा फटका केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला बसला.

**१.५.२ वसाईचा तह:** आधुनिक महाराष्ट्राच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार करत असताना वसईच्या तहाचा विचार करणे आवश्यक आहे. हा तह ३१ डिसेंबर १८०२ मध्ये इंग्रजांचा वकील कर्नल क्लोज व दुसरा बाजीराव यांच्यात झाला.या महान्वये दुसऱ्या बाजीरावने संरक्षणासाठी तसेच साम्राज्य संरक्षणासाठी इंग्रजांकडून तैनाती फौज स्विकारली या तहावर १८ मार्च १८०३ रोजी गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्लीने शिकामोर्तब केला. या तहाने प्रत्यक्षरीत्या तो इंग्रजांच्या नियंत्रणाखाली गेला.त्याचे पुढे परिणाम फक्त त्याच्यावरच झाले नाहीत तर संपूर्ण भारतावर झाले. इंग्रजाना भारतात लष्करी शक्ती वापरण्याचा अधिकार प्राप्त झाला या शक्तीच्या वापरानेच त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रासह भारत काबीज केला.

**१.५.३ सातारा गादीचा प्रश्न :** वसईच्या तहाने सुरुवातीला इंग्रज व पेशवे यांचे संबंध चांगले बनले होते. मात्र इंग्रजांनी नंतर दुसऱ्या बाजीरावाच्या अंतर्गत कारभारात जास्तीत जास्त हस्तक्षेप करण्यास सुरुवात केल्याने दोहोत दुरावा निर्माण झाला होता.अशा प्रसंगी साताऱ्याच्या छत्रपतीचा वापर करुन इंग्रज आपणास शह देतील याची जाणीव दुसऱ्या बाजीरावास झाली

होती. म्हणूनच दुसऱ्या बाजीरावांनी ९ नोव्हेंबर १८१७ रोजी साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंहाना त्याच्या सहकुटुंबासह वासोव्याच्या दुर्गम किल्ल्यात नजर कैदेत ठेवले.

लाफिन्स्टन हुशार होता. त्याला माहित होते की जसे ब्राम्हणांना जिंकने कठीण आहे तसेच मराठयांना जिंकने कठीण आहे. म्हणूनच एलफिन्स्टनने असे जाहिर केले की साताऱ्याच्या महाराजांना आम्ही बाजीरांवाच्या नजरकैदेतून मुक्त करणार आहोत व साताऱ्याच्या किल्ल्यांवर महाराजांचा झेंडा उभारणार आहोत. तसे करुन त्यांनी प्रतापसिंहला साताऱ्याच्या गादीवर बसविले.

या घटनेपाठीमागे एलफिन्स्टनचा दुष्ट हेतू होता. बाजीरावाच्या अस्तित्वाला संपुष्टात आणण्यासाठी हे त्यांचे संधीसाधू धोरण होते. पुढे बाजीरावाचे आस्तीत्व संपुष्टात आल्यानंतर साताऱ्याच्या गादीला वारसा नसल्याने ही गादी खालसा करण्याचे धोरण इंग्रजांनी अवलंबिले थोडक्यात साताऱ्याच्या गादीच्या प्रश्नाचा वापर इंग्रजांनी संधीसाधूपणे केला होता असे दिसून येते.

**१.५.४ तिसरे मराठा – इंग्रज युध्द :** इंग्रजांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे दुसरा बाजीराव अस्वस्थ झाला होता. अशाच परिस्थितीत १८११ मध्ये माऊन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा रेसिडेंट म्हणून पुण्यात आला व त्यांनी जेव्हा बाजीरावाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली तेव्हां मात्र बाजीरावाला आपली सत्ता नाममात्र आहे याची जाणीव झाली, आता इंग्रजां बरोबर लढा देणे आवश्यक आहे असे त्याला वाटू लागले. म्हणूनच त्यांनी मोजक्या विश्वासू सरदारांच्या मदतीने इंग्रजांबरोबर लढा देण्याचा प्रयत्न केला मात्र परिस्थिती बाजीरावाच्या हाताबाहेर गेला होती. शेवटी दुसरा बाजीराव व इंग्रज यांच्यामध्ये इस. १८१७-१८ मध्ये तिसरे इंग्रज- मराठा युध्द होवून या युध्दात मराठयांचा पराभव झाला.व सत्तेचे आस्तित्व संपुष्टात आले. व महाराष्ट्रात इंग्रजांची सत्ता सुरु झाली.

**१.५.५ इस्ट इंडिया कंपनीचे कार्य :** आधुनिक महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेत असतांना आपणास इस्ट इंडिया कंपनीच्या कारकिंदीचा विचार करणे आवश्यक आहे या कंपनीचा आरंभीचा उददेश हा व्यापार करणे हा होता. मात्र यात बद्ल करत नंतर कंपनीने झपाटयाने महाराष्ट्रात आपले राजकीय वर्चस्व प्रस्तापित केले. पुढे कंपनीच्या राजकीय अस्तित्वाचे तसेच नियंत्रनाचे स्वरुप १८५७ पर्यंत सुरु होते कंपनीने आपल्या कारकिर्दीत मराठयांच्या भोसले,शिंदे, होलकर, गायकवाड या सरदारांचा पराभव केला या सरदारांच्या नियंत्रणाखाली असणारे प्रदेश या लोकांच्या पराभवामुळे कंपनीला मिळाले.

**१.५.६ एल्फिन्सटनची भूमिका:** एल्फिन्स्टनचे महाराष्ट्रातील आगमन हे इंग्रज सत्तेला दिशा देणारे ठरले तो ‘ उपयुक्तवादी’दृष्टीकोनाचा होता. सुरुवातीला पेशव्यांच्या रेसीडेंट बेरी क्लोजच्या सहायक नंतर पेशव्यांचा रेसीडेंट व नंतर मुंबई प्रांताचा गर्व्हनर अशी त्यांनी कामगिरी बजावली

त्यांनी आपल्या कारकिर्दीत बेथमच्या प्रभावाला महत्व देत महाराष्ट्राचे भले करणे व इंग्रज सत्तेचे नुकसान न करणे या तत्वांचा अवलंब करुन मराठयांचा बेकार झालेल्या सैन्यांना आपल्या सैन्य व्यवस्थेत सामावून घेतले. ब्राम्हणवर्गाला सेवेमध्ये सामावून घेतले सातारागादीच्या

प्रश्नाचा वैयक्तीक फायदा करुन घेतला, डेकन कमीशनरची भूमिका व्यवस्थित निभावली, अबकारी कराबाबतची भूमिका न्याय ठेवली न्याय व्यवस्थेत सुधारणा केल्या, जहागिरदाराबाबतचे धोरण न्याय ठेवले, शिक्षण कायदेसंहितेबाबत अमुलाग्र बदल घडवून आणला ही पार्श्वभूमी विचारात घेत आधुनिक महाराष्ट्राच्या जडण घडणीत त्याची भूमिका महत्वाची मानली जाते.

**आपली प्रगती तपासा**

१. आधुनिक महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घ्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १.६ एल्फिन्स्टनची कामगिरी:

आधुनिक महाराष्ट्राचा विचार करत असताना आपणास एल्फिन्स्टनचे कार्य समजून घेणे गरजेचे आहे म्हणूनच त्याची कामगिरी स्वतंत्र मांडण्यात आली आहे.

**१.६.१ जीवन परिचय:** आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांनी महत्वाची भूमिका निभावली त्या एल्फिन्स्टनचा जन्म उमराव घराण्यात झाला होता. एल्फिन्स्टन हा उपजत हुशार होता. शिक्षण पूर्ण केल्या नंतर तो वयाच्या सतराव्या वर्षी कलकत्ता येथे कंपनीच्या मुलकी सेवेत दाखल झाला सर्व प्रथम तो महाराष्ट्रात पेशव्यांच्या रेसिडेंट बेरी क्लोजचा सहायक व नंतर तो पेशव्यांचा रेसिडंट म्हणून काम पहावू लागला. तिसऱ्या इंग्रज-मराठा युध्दातील कौशल्य व पेशवाईच्या अस्तासाठी त्यांनी केलेली कामगिरी यामुळे त्याच्या वाटयाला सर्व प्रथम मुंबई प्रांताचे गव्हर्नरपद आले. हे पद त्यांच्याकडे १८१९ ते १८२७ पर्यंत होते. या पदाच्या माध्यमातून केलेली कामगिरी खाली नमुद करण्यात आली आहे.

**१.६.२ एल्फिन्स्टनचा दृष्टीकोन :** एल्फिन्स्टन हा वस्तुनिष्ठतेने विचार करणारा असल्याने त्याचा दृष्टीकोन हा उपयुक्ततावादी होता गव्हर्नर पदाची सुत्रे हाती घेतल्या नंतर त्यांनी महाराष्ट्राचे भले करतांना इंग्रजांचे नुकसान होणार नाही. या बाबीला महत्व दिले या दृष्टीकोनाला अनुसरुनच त्यांनी आपली कामगिरी केली. त्यांच्या दृष्टीकोनावर बेथमचा प्रभाव होता.

**१.६.३ सैन्य व्यवस्थेबाबतची कामगिरी:** मराठा सत्तेच्या अस्तानंतर मराठा सैन्य बेकार झाले होते त्यांच्या वाटयाला दैनिय अवस्था आली होती, अशा सैन्यांना याच अवस्थेत ठेवले तर ते बंड करतील. इंग्रज सत्तेला सतत उपद्रव निर्माण करतील याची जाणीव एल्फिन्स्टनला होती.

म्हणूनच या सैन्याना आपलेसे केले तर इंग्रजांचे राज्य तर स्थिर होईलच पण जास्तकाळ टिकेल. म्हणूनच त्यांना शस्त्रास्त्र धारण करण्याचा अधिकार देवून त्याचा वापर इंग्रज सत्तेच्या संरक्षणासाठी करुन घेतला तर इंग्रजांचे राज्य तर स्थिर होईलच पण जास्तकाळ टिकेल म्हणूनच त्यांना शस्त्रास्त्र धारण करण्याचा अविष्कार देवून त्याचा वापर इंग्रज सत्तेच्या संरक्षणासाठी करुन घेतला. परिणामी या सैन्यांमध्ये एल्फिन्स्टन बद्‌ल अपूलकीची भावना निर्माण झाली

**१.६.४ ब्राम्हणवर्गा बाबतचे धोरण:** पेशव्यांच्या राजवटीत जास्तीत जास्त ब्राम्हण वर्ग वेगवेगळया प्रशासकीय विभागात गुंतला होता. परिणामी सैन्यव्यवस्थे बरोबरच या वर्गाची सुध्दा इंग्रजांना भीती होती. म्हणूनच एल्फिन्स्टनने जेव्हा पुणे भेटीस आले तेव्हा त्यांनी ब्राम्हणांना भेटीचे निमंत्रण दिले. सुमारे दोनशे ब्राम्हण एल्फिन्स्टनच्या भेटीस आले. भेटीस येणाऱ्या ब्राम्हणांना त्यांनी नजराणे दिले. पन्नास हजार ब्राम्हणांना वर्षासने व इनामे दिली २२,००० हजारापेक्षा जास्त पेन्शन ब्राम्हण कारकुनास दिले अनेक ब्राम्हणांना इनामे, वतने, दिली. ब्राम्हणांचा जुन्या पध्दतीचा दक्षिणा घेण्याचा कल पुढे तसाच चालू ठेवला. परिणामी ब्राम्हणवर्ग संतुष्ट झाला.

**१.६.५ सातारा गादीच्या प्रश्नाबाबत धोरण:** छत्रपती आणि पेशवे यांचे संबध दुरावले होते. याचा फायदा इंग्रज घेतील याची जाणीव बाजीरावाला झाली होती. म्हणूनच बाजीरावाने छत्रपती प्रतापसिंहाना कैद केली होती. मात्र छत्रपतीची इंग्रजानी सुटका करुन त्याना राजगादीवर बसविले यामुळे इंग्रजाच्या बद्‌ल मराठे व छत्रपती समर्थक यांच्यामध्ये आदर निर्माण झाला. तदनंतर इंग्रजानी दुसऱ्या बाजीरावास पराभूत करुन दत्तक वारस नामंजूर करुन हा प्रश्नही निकाली लावला

**१.६.६ डेक्कन कमिशनर या नात्याने भूमिका :** डेक्कन कमिशनर या नात्याने भूमिका पहात असतांना एल्फिन्स्टनची भूमीका न्याय होती.कमिशनर म्हणून काम पहात असताना त्याच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांना असे आदेश काढले की शेतकऱ्यांना लागवडीखाली असणाऱ्या जमीनीचाच शेतकऱ्यांसाठी विचार करा. जुने अन्यायी कर रद्द करा,ग्राम संस्था निट चालू ठेवा ज्या प्रमाणे पेशवेकाळात नाना फडणिसाने हे काम सुरु ठेवले होते तसेच हे काम पुढे चालू दया. या सर्व माहितीवरुन त्याची ही भूमिका न्याय होती.

**१.६.७ अबकारी कराबाबतचे धोरण:** पेशवेकाळात दारू बंदी होती. दारूच्या दुकानावर बंदी होती. त्यामुळे या कालखंडात अबकारी कराचे प्रमाण अत्याल्प होते. त्यांचा हा निर्णय योग्य समजून एल्फिन्स्टने दारु उत्पादन व विक्री या दोन्ही गोष्टींवर त्यांनी बंदी घातली त्यांची ही भूमिका न्याय होती.

**१.६.८ न्यायदानाबाबतची भूमिका :** एल्फिन्स्टनची न्यायदानाबाबतची भूमिका अत्यंत चांगली होती. पेशवेकाळात कायदयावर आधारीत न्यायपध्दती नव्हती. एल्फिन्स्टनने मात्र इंग्रजी न्याय व कायदा पध्दती सुरू करण्याचा प्रयत्न केला.चॅपलियनने रिपोर्ट तयार केला त्यात त्यांनी असे म्हटले की जुनी न्यायपध्दती मोडू नका मात्र नवीन न्यायपध्दती सुरु करा. यासाठी त्यानी फौजदारी न्यायपध्दतीतील दोष दूर केले. शिक्षा देत असताना हिंदू धर्म व धर्मपंडित यांची मदत घेतली तसेच शिक्षेबाबत जातिचा विचार करण्यास सुरवात केली.

**१.६.९ जहागीरदारांबाबत धोरण:** पेशवाईच्या अस्तानंतर जहागीरदांराचे महत्व कमी झाले होते. मात्र एल्फिन्स्टनने जाहगीरदारांच्या बाबतीत घेतलेली भूमिका न्याय होती. त्यांनी जहागिरदारांच्या हक्कावर बंधने आणली नाहीत. मोठया जहागिरदारांची वतन परंपरा कायम चालू ठेवली तर छोटया जहागीरदारांना कमिशनरच्या वर्चस्वाखाली आणली. याही पुढे जावून त्यांनी जाहगिरदांरासाठी पेश्नन योजना लागू केल्या. त्यांनी मराठा सरदांराना वर्षाकाठी ६४५०० रुपये देवून सरदारांची मने जिंकली. या पाठीमागेही एल्फिन्स्टनचा हेतू हा दुरदृष्टीचा होता, त्याला माहित होते की, जर आपण या सरदारांच्या बाबतीत असे केले तर हे सरदार पुढे आपल्या सत्तेच्या विरोधात बंड करणार नाहीत.

**१.६.१० शिक्षणाबाबतचे धोरण:** एल्फिन्स्टन जरी महाराष्ट्रात इंग्रज सत्तेचे नेतृत्व करत असला तरी त्याचा दृष्टीकोन मात्र उदारमतवादी होता. त्याला माहित होते की भारतीय लोकांना जर इंग्रजी शिक्षण दिले तर आपणास भारत लवकर सोडून जावा लागेल. हे माहित असतानाही उदारमतवादी दृष्टीकोनातून त्यांनी मराठी व इंग्रजी शिक्षण व्यवस्था सुरू केली. म्हणूनच एल्फिन्स्टनला या शिक्षण पध्द्तीचा संस्थापक मानले जाते. पुण्याच्या विश्रामबाग वाडयात संस्कृत पाठशाळा सुरु केली. शिक्षण केवळ कारकून तयार करण्यासाठी नसावे तर ते ज्ञानाच्या प्रसारासाठी असावे असे जाहिर केले. त्याचे हे धोरण महाराष्ट्राच्या आधुनिकतेच्या दृष्टीकोनातून अत्यंत उपयुक्त ठरले.

**१.६.११ कायदेसंहितेची निर्मिती :** मराठा कालखंडात समाजावर धर्मशास्त्राचा प्रभाव होता. हिंदू समाजाला लागू पडेल असा एकही कायदा अस्तित्वात नव्हता. शास्त्रीबुवा जसा धर्माचा अर्थ लावतील तशा शिक्षा दिल्या जात होत्या यामध्ये सुधारणा होणे गरजेचे होते. म्हणूनच बॉविंग्टच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीमध्ये एशास्फिन, नॉरीस हे सभासद होते व स्टील हा सेक्रेटरी होता. एल्फिन्स्टनच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील रुंढी, चालीरीती एकत्र करुन २७ कायदयांची एक संहिता तयार करण्यात आली व १ जानेवारी १८२७ रोजी ही संहिता अमलात आणली. या संहितेलाच एल्फिन्स्टनची कायदेसंहिता असे म्हटले जाते.

**१.६.१२ एल्फिन्स्टनचा मृत्य:** एल्फिन्स्टनचा मृत्य वयाच्या ऐंशीच्या वर्षी २०नोव्हेंबर १८५९ रोजी इंग्लडंमधील सरे या ठिकाणी झाला. एल्फिन्स्टनचा आधुनिक महाराष्ट्राच्या जडण घडणीत महत्वाचा वाटा आहे. एक परकीय सत्ताधीश असूनही महाराष्ट्राला व्यवस्थापकीय दृष्टीकोनातून महत्वाची दिशा दिली.

**आपली प्रगती तपासा-**

१. एल्फिन्स्टनची कामगिरी जाणून घ्या.

---

---

---

---

## १.७ १८१८ ते १८४८ या कालखंडातील इंग्रज राजवटी विरुध्दचे उठावः

पेशवाईच्या शेवटाने मुंबईत ब्रिटीशांची राजवट सुरु झाली होती. मात्र जनतेने ब्रिंटीश राजवटीला मान्यता दिली नव्हती. असे जरी असले तरी जनतेला ब्रिटीश सत्ते विरोधात संघटनात्मक विरोध करणे शक्य नव्हते. त्यामुळेच महाराष्ट्रात भिल्ल, कोळी, गौंड, मांग आणि सामोशी लोकांनी ब्रिटीश राजवटीस प्रतिकार करण्यास सुरुवात केली.ऐतिहासिक पार्श्वभूतीचा विचार करत असतांना आपण या ठिकाणी १८१८ ते १८४८ या कालखंडात असे कोणते विरोधात्मक उठाव झाले होते. याची माहिती या घटकामध्ये पाहाणार आहोत.

**१.७.१ रामोंशाचे उठाव :** ब्रिटीशांची जेव्हा महाराष्ट्रात सत्ता प्रस्तापित झाली होती तेव्हा महाराष्ट्रात रामोश्यांची संख्या अठरा हजार होती. ही एक वन्य जमात असून या जमातीतील उमाजी नाईक हा ब्रिटीशांना विरोध करणारा पहिला शूरवीर होय. कोतवालाचे केलेले तुकडे, पोंलिसांमध्ये निर्माण केलेली दहशत,सरकारचा लुटकेला खजीना, जेजुरी पोलिस चौकीवरील हल्ला, कोकणातील कुलाबा (सध्याचा रायगड)किल्ल्यात काढलेला जाहिरनामा ही त्याची इंग्रजा विरुदधची महत्वपूर्ण कामगिरी पंरतु एका हिदू फितरामुळे १८३१ च्या डिसेंबर महिन्यात पकडला गेला व १फेब्रुवारी १८३२ मध्ये इंग्रजानी त्यास फासावर लटकवले.

सासवड प्रमाणेच पुण्यात १८२६ पासून रामोशी लोंकाचे ब्रिटीश सरकार विरुध्द उठाव सुरु होते. इंग्रजानी त्यांना आमिष दाखवून जाळयात अडकवण्याचा प्रयत्न केला. भुजबा, पांडया, येसानी या रामोशीनी सरकारला जंग जंग पछाडले होते.

१८४४ पर्यंत अहमदनगर भागात रामोशांनी आपले स्वतंत्र अस्तित्च टिकविण्याचा प्रयत्न केला. २० सप्टेंबर १८४४ रोजी राघू भांग्रे या रामोशाने एक पोलिस अधिकारी व ७ पोलिसाना ठार केले. ब्रिटीश सरकारला सहकार्य करणाऱ्या पाटलांची नाके कापली.

चतुरंगसिंग नाईक हा सातारा जिल्हयातील रामोंशाचा नेता होता. त्याच्याच नेतृत्व व मार्गदर्शनाखाली सातारा, वाई, भोर व कोल्हापूर परिसरात इंग्रजिविरुध्द उठाव केले.

**१.७.२ भिल्लांचे उठाव :**१८१८ मध्ये इंग्रजानी खानदिरा ताब्यात घेतला. त्यामुळे इंग्रजांना भिल्लाबद्‌ल द्वेश वाटु लागला या देशातूनच सातपुडा सातमाळा, अंजिठा कुशीत वावरणाऱ्या भिल्लांची एकजूट केली. तलवारी हातात घेतल्या व ब्रिटीशा विरुध्द लढा उभारला.

त्रिबंकजी डेंगळे हा दुसऱ्या बाजीरावाचा मित्र व मराठा सरदार होता. त्याला ठाणे येथे तुरुगांत डांबण्यात आले होते. तेथून तो निसटला व भिल्ल जमातीत घुसला व भिल्लांना इंग्रजां विरुध्द चिथावले.

इंग्रजानी भिल्लांना नोकऱ्या व पेन्शन देण्यास सुरुवात केली होती मात्र इंग्रजांच्या सवलतींना भिक न घालता त्यांच्याशी लढा चालूच ठेवला या लढयाचे नेतृत्व सातमाळयाचा भिल्ल नाईक करत होता. त्यास १८१९ मध्ये इंग्रजानी पकडून फासावर चढविले.

डसरत व धानजी हे लातूरचे भिल्ल प्रमुख होते. त्यांनी इंग्रजांविरुध्द दहशत निर्माण केली होती. मात्र मेजर मेरिन यांनी शंभर मैलवरील प्रदेशातील महत्वाच्या जागा जिंकल्याने दक्षिण भिल्लांच्या शरण येण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहिला नाही.

नहाल व हरिया या भिल्लांनी १८२२मध्ये उठाव केला या उठावाचा फायदा घेवून असंख्य भिल्लांना सर्वत्र लुटालुटा सुरू केली. या लुटालुटीने पाटील, कुलकर्णी व मामलेदार घाबरले. कॅप्टन रॉबिन्सन यांनी भिल्लांचा उठाव दडपण्यासाठी त्यांची धरपकडव हल्या करण्यास सुरूवात केली. त्यांना कठोर शिक्षा केल्या.

सेवाराम सोनार यांनी सातारा राज्याच्या नावाने बनावट पत्रे तयार करून ती भिल्लांना वाटली.ही पत्रे तयार करुन ती या संदर्भात होती. या पत्रकाला अनुसरुन ८०० भिल्लांनी लुटालुट सुरू केली. नंतर सेवाराम व त्यांच्या हस्तकांना पकडून ठार मारण्यात आले.

भिलांच्या उठावाला लक्षात घेवून त्यांना जमीनी, तगाई, शेतमजूरी अशा सुविधा इंग्रजांनी त्यांना देणे सुरू केले मात्र,पंडया, बंदी,सखा या भिल्लांनी त्यांच्या विरोधात लढा सुरुच ठेवला.

लोहार भिल्लांचा उपद्रव कमी व्हावा म्हणून त्यांना जमीनी, शिक्षा माफी, तगाई, गुन्हे माफी, सैन्य भरतीत सहभाग या संधी देण्यात आल्या. स्वत:इंग्रज अधिकारी औटरॅम त्यांच्या सोबत वावक लागला. परंतू डांगचे प्रमुख व लोहार भिल्ल यांनी पुन्हा त्यांच्या विरुध्द लुटालुट सुरु केली. या भिल्लांचा लेप्टनंट ऑटरॅम यांने बंदोबस्त केला १८२८ नंतर भिल्लांचे उठाव कमी झाले.

उचेतसिंग पवाराने १८३१मध्ये धार संस्थानातील खेडयापाडयांवर हल्ले केले आणि धारच्या पवार राजविरुध्द उठाव केला. परंतू त्यामध्ये भिल्लांना यश आले नाही.

मराठवाडयात कोनारराव याच्या नेतृत्वाखाली इंग्रजाविरुध्द बंड केला. मात्र संघटनात्मक हा बंड नसल्याने इंग्रजाने हा बंड मोडून काढला. १८२२ ते १८५७ पर्यंत मराठवाडयात अनेक भिल्लांनी इंग्रज सत्तेविरुध्द बंड केले. या काळात कजरसिंह नाईक, भीमा नाईक, भागोजी नाईक, नेंवश्या नाईक, काल्लबाबा, दौलत नाईक व तंटया भिल्ल इत्यादी भिल्लाच्या पुढाऱ्यांनी इंग्रजाशी झुंज दिली.

**१.७.३ गौड जमातीचा उठाव:** महाराष्ट्रातील गौंड ही आदिवासी जमात होती या जमातीच्या सहकार्याने १८१७ -१८ या कालखंडात नागपूरच्या राजेसाहेब आप्पासाहेब भोसल्यांनी इंग्रजाच्या विरुध्द बंड केला होता. इंग्रजांनी या कृत्याबदद्ल त्यांना पकडले मात्र ते निसटले व त्यांनी सातपुडा पर्वताचा आश्रय घेतला.

**१.७.४ हटकरांचा उठाव :** मराठवाडा हैद्राबादच्या निजामाच्या ताब्यात होता. निझाम इंग्रजांचा मांडलिक होता. मात्र असे असून ही मराठवाडयात नांदेड जिल्हयात हंसानी हटकर यांनी लहानसे राज्य निर्माण केले होते व ते स्वतंत्रपणे तो चालवत होता. हंसाजीने १८१९ -२० मध्य उठाव केला. उठावाला शह देण्यासाठी मेजर पिटमन, कॅप्टन इव्हान्स, डेव्हीड व

कॅप्टन मेडोन टेलर यांनी चार हंजारपेक्षा अधिक सैन्यासह हसाजीवर हल्ला केला. हंसाजीने २५ दिवस इंग्रजांबरोबर झुंज दिली. मात्र इंग्रजानी त्याचा पराभव केला.

**१.७.५ धर्माजी प्रतापरावाचा उठाव:** मराठवाडयातील बीड येथील धर्मजी प्रतापराव यांनी १८१८ मध्ये निजाम सरकार विरूध्द उठाव केला. सरकांरने उठाव मोडण्यासाठी धर्मांजीने दिबे गावात तळ ठोकला होता त्या ठिकाण्याला वेढा दिला. शेवटी धर्माजीला  माघार घ्यावी लागली. शेवटी धर्माजी व त्याच्या भावास कंपनी सरकारने अटक केली.

**१.७.६ सावंतवाडी संस्थानचा उठाव:** इंग्रजांनी सावंतवाडीत आपले राजकीय वर्चस्व प्रस्तापित करण्याच्या उदिद्शाने १८१३ मध्ये वकिलात उघडली होती व सावंतवाडीकरांना त्रास देण्यास सुरुवात केली होती.१८२३ मध्ये खेमसावंत उर्फ बापूसाहेब गादीवर आला. त्यांनी आपल्या सत्तेविरुध्द सुरू असणाऱ्या बंडाला मोडण्यासाठी इंग्रजांची मदत घेतली. इंग्रजांनी पुढे सावंतवाडीस  लष्कर वाढविले. पुढे सावंतवाडीच्या अण्णासांहेबाचा संस्थानावरील हक्क काढून घेतला. पुढे सावंतवाडीतील बंडाचा विभोड करण्यात इंग्रजांना यश आले.

**१.७.७ कोल्हापूरच्या गडकऱ्यांचा उठाव:** मराठा राज्यात गडकरी किल्ल्याची व्यवस्था पहात होते. त्यांना या कालखंडात किल्ल्याच्या जवळपासच्या जमीनी तनख्यासाठी लावून दिल्या जात असत. मात्र इंग्रजांचे राज्य आल्यानंतर गडकऱ्यांनी त्यांना गरज नव्हती. तसे त्यांना कळविण्यात आले. सामान गडावर असणाऱ्या  गडकऱ्यांना हा गड खाली करण्यास मात्र गडकऱ्यांनी नकार दिला. कंपनी सरकारने कॅप्टन औटरॅम नैतृत्वखाली १२०० लष्करासह सामनगडावर हल्ला केला. नंतर गडकरी इंग्रजांना शरण आले. नंतर गडकरी कामावर रुजू झाले.

**१.७.८ कोळयाचे उठाव :** इंग्रज राजवटीत कोळयांनी इंग्रजांविरुध्द सतत उठाव केले होते. १८२८, १८३९,१८४४,१८४८ या कालखंडात हे उठाव झाले होते. भाऊ खेर, चिमणाजी जाधव, नान दरबारे यांनी या उठावाचे नेतृत्व केले. हे पेशंव्याचे अधिकारी असल्याने यांचा उठावाना राजकिय स्वरुप प्राप्त झाले होते. इंग्रजांनी मात्र कोळयांचे हे उठाव मोडून काढले. धरपकड करुन त्यांना कैद केले. ५४ कोळयांवर खटले भरले व २८ कोळयांना शिक्षा केल्या.

**आपली प्रगती तपासा**

१. १८४८ पूर्वीचे इंग्रज राजवटी विरुध्दचे उठाव कोणते झाले त्याची माहिती जाणून घ्या.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १.८ सारांश :

भारतीय संघराज्य प्रणालीतील महाराष्ट्र हे एक महत्वपूर्ण राज्य असून या राज्याला प्राचीन व मध्ययुगीन राजवट काळात समृध्द वारसा लाभला आहे. प्राचीन कालखंडात मौर्य, सातवाहन,वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट राजवंशीय रार्जकर्त्यानी महाराष्ट्रावर राज्य करुन महाराष्ट्राला स्मृध्द वारसा दिला. मध्ययुगीन महाराष्ट्राला इस्लाम व मराठे या राज्यकर्त्यांची पार्श्वभूमी लाभली. देवगिरीचे यादव, अल्लाउद्दीने खिलजी मोहमंद-बिन-तुघलक बहामणी राज्य, छत्रपतींचे राज्य, या राजवटी महाराष्ट्राला मध्ययुगीन काळात लाभल्या. या दोन्ही कालखंडातील राजवटीनी महाराष्ट्राला राजकीय प्रशासकीय, सांस्कृतिक व सामाजिक परिवर्तने दिली. मात्र दुसऱ्या बाजीरावाच्या राजवटीपासून या सर्वच बाबीमध्ये बदल दिसू लागला त्यांच्यामुळे असणाऱ्या कमजोरीचा फायदा इंग्रजानी घेतला व आपली सत्ता प्रस्तापिक केली. या सत्तेला १८१८-ते १८४८ या कालखंडात भिल्ल, कोळी, रामोशी, गौड,हटकर या जमातीनी तसेच धर्माजी प्रतापरावजी व सावंतवाडीत लोकांनी विरोध केला. कोल्हापूरकरानेही विरोध केला. ही सर्व पार्श्वभूमी प्रस्तुत प्रकरणात आपण सविस्तर पाहिली आहे.

## १.९ दिर्घोत्तरी प्रश्न

१. महाराष्ट्राच्या प्राचीन पार्श्वभूमीचा संक्षिप्त आढावा घ्या
२. महाराष्ट्राच्या मध्ययुगीन परिस्थितीचा आढावा घ्या.
३. महाराष्ट्राच्या आधुनिक पार्श्वभूमीला स्पष्ट करा.
४. एल्फिस्टनचे कार्य स्पष्ट करा.

## १.१० संदर्भसूची

१. महाराष्ट्राच्या परिवर्तनाचा इतिहास प्रा. राऊत
२. महाराष्ट्राचा सर्वागीण इतिहास – पाटील व्ही. बी.
३. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स. १८१८-१९६०) – कठारे अनिल

❖❖❖❖

# २

# १८४८ पूर्वीचा महाराष्ट्र
# ब) मुंबईची ऐतिहासिक पार्श्वभूमी

**घटक रचना :**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ मुंबईची व्यत्पती व अर्थ
२.३ मुंबईची प्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी
२.४ मुंबईची मध्ययुगीन ऐतिहासिक पार्श्वभूमी
२.५ मुंबईची आधुनिक ऐतिहासिक पार्श्वभूमी
२.६ मुंबईची स्थापत्यकला
२.७ मुंबईतील महत्त्वाची स्थळे
२.८ मुंबईची संस्कृती
२.९ सारांश
२.१० दिर्घोत्तरी प्रश्न
२.११ संदर्भ सूची

## २.० उद्दिष्ट्ये

- मुंबईच्या व्युत्पत्तीबाबत माहिती जाणून घेणे.
- प्राचीन मुंबईची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
- मध्ययुगीन मुंबईची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
- आधुनिक मुंबईची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
- मुंबईच्या स्थापत्य कलेची माहिती जाणून घेणे.
- मुंबईच्या महत्त्वपूर्ण स्थळांची माहिती जाणून घेणे.
- मुंबईच्या संस्कृतिवर एक संक्षिप्त दृष्टीक्षेप टाकणे.

## २.१ प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्राचा अभ्यास करत असताना आपणास मुंबईचा स्वतंत्र अभ्यास करणे गरजेचे आहे. महाराष्ट्राच्या राजधानीचे ठिकाण. भारताचे सर्वोत्तम व्यापारी केंद्र, भारताचे प्रवेशद्वार, जगातील सर्वश्रेष्ठ दहा व्यापारी केंद्रापैकी पाचव्या क्रमांकाचे व्यापारी केंद्र, भारताच्या आर्थिक राजधानीचे शहर, भारतातील सर्वात जास्त श्रीमंत शहर, दक्षिण, पश्चिम आणि मध्य आशियातील सर्वात वार्षिक सकल उत्पन्न देणारे शहर अशी मुंबईची ख्याती आहे.

या प्रकरणात आपण मुंबईची व्युत्पत्ती कशी झाली. मुंबईला प्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी कशी लाभली होती. मध्ययुगीन पार्श्वभूमी कशी लाभली होती. आधुनिक कालखंडात मुंबईचे स्वरुप कसे होते व आहेत. मुंबईची महत्त्वाची स्थळे कोणती आहेत. मुंबईची स्थापत्यकला कशी आहे. मुंबईची आधुनिक संस्कृति कशी आहे, या बाबतची माहिती पाहणार आहोत.

## २.२ मुंबईची व्युत्पत्ती व अर्थ

मुंबईला मुंबई हे नाव मुंबादेवीच्या नावावरुन पडले ्हे. मुंबई हे नाव दोन शब्द मिळून बनला आहे. मुंबा म्हणजे महा-आंबा आणि देवी म्हणजे आई. सर्वप्रथम पोर्तुगीजाने या बंदराबरोबर आपले संबंध आल्या नंतर या बंदराला ज्या वेगवेगळ्या नावाने संबोधले आहे ती नावे अशी आहेत. बेनजनम्बु, तेन-माइयाम्बु, माईयाम्बु नंतर या नावात बदल झाला. मोबेएम असे नाव पुढे आले व नंतर शेवटी पोर्तुगीजाने 'बोम बाहीया' असे नाव निश्चित केले. याची माहिती 'अेटायमोलॉनी' अथवा 'ओनोमॅस्टिक्स' पोर्तुगाल शब्दकोषात आहे. यावरुन असे सिद्ध होते की बॉम्बे हे नाव पोर्तुगाल शब्दावरुन आला आहे.

बॉम या पोर्तुगाल शब्दाचा अर्थ सुंदर खाडी असा आहे. बॉम हा शब्द इंग्रजी शब्दाशी संबधीत आहे. मुंबई शब्दाच्या निर्मिती पाठीमागील पोर्तुगाली शब्दांची पार्श्वभूमी समजून घेतल्या नंतर इंग्रजानी  या नावात बदल करुन बॉम्बे हे नाव केले आहे. असे समजते. नंतर १९९५ मध्ये बॉम्बेचे मुंबई हे पुन्हा नाव करण्यात आले.

आजची मुंबई ही कुलाबा, फोर्ट, भायकला, परेल, वरली, माटुंगा, माहिम या बेटानी पूर्वी बनलेली होती.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या प्रखर विरोधानंतर, लढ्या नंतर, १०५ हुतात्मांच्या बलीदानानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व मुंबईला महाराष्ट्राची राजधानी बनवले.

**आपली प्रगती तपासा :**

१. मुंबईची व्यत्यतीबाबतची माहिती जाणून घ्या.

______________________________

______________________________

______________________________

## २.३ मुंबईची प्राचीन ऐतिहासिक पाश्‍र्वभूमी

मुंबईची प्राचीन ऐतिहासिक पाश्‍र्वभूमी समजून घेत असताना आपणास इ.स. पूर्व २५० या कालखंडाचा विचार करावा लागेल. कारण या कालखंडात मुंबई बेटावर मानवी वस्ती असल्याचे पुरावे सापडले आहेत. मुंबई शहर प्राचीन कालखंडात अस्तित्वात होते असा उल्लेख ग्रीकांनी केला आहे. तेव्हा त्यांनी या शहरास ‘Heptanesia’ असे म्हटले होते. या माहितीवरुन असे सिद्ध होते की मुंबई हे शहर पाषाण युगापासून वसलेले आहे. प्राचीन कालखंडापासून आधुनिक कालखंडापर्यंत मुंबईवर अनेक राजकर्त्यांनी व अनेक सत्तानी राज्य केले. त्यांच्या या सत्ता प्रणालीतूनच आपणास मुंबईच्या ऐतिहासिक पाश्‍र्वभूमीची माहिती समजते.

मुंबईच्या प्राचीन पाश्‍र्वभूमी समजून घेत असतांना सर्व प्रथम आपण, पाषाण युगाचा विचार केला. नंतर ग्रीकांचे संबध मुंबई बरोबर होते हे जाणून घेतले. नंतर आपण तिसऱ्या शतकात मुंबई बेट मौर्यांच्या ताब्यात होते या बाबतची माहिती जाणून घेणार आहोत. तिसऱ्या शतकात मौर्य राजवट कालखंडात सम्राट अशोकाच्या नियंत्रणाखाली हे बेट होते. या कालखंडातील काही माहिती उपलब्ध आहे. नंतर हे बेट सात वाहनांच्या ताब्यात होत असे म्हटले जाते. मात्र या बाबत वाद आहे. कारण सात वाहनांच्या ताब्यात होते की इतरांच्या ताब्यात होते या बाबत वाद आहे. नंतर १३४३ पर्यंत सिलाहार या हिंदू राजकर्त्यांनी मुंबईवर राज्य केले. या सर्व प्राप्त माहितीच्या आधारे प्राचीन कालखंडात मुंबई हे बेट, शहर बंदर अस्तित्वात होते हे सिद्ध होते तसेच मुंबईला प्राचीन ऐतिहासिके पाश्‍र्वभूमी होती असे ही वरिल माहितीच्या आधारे स्पष्ट होते.

**आपली प्रगती तपासा :**

१. मुंबईची प्राचीन ऐतिहासिक पाश्‍र्वभूमी तपासून घ्या.

___

___

___

२. मुंबईवर प्राचिन कालखंडात कोणकोणत्या राजकर्त्यांनी सत्ता निर्माण केली होती त्याची माहिती तपासा.

___

___

___

## २.४ मुंबईची मध्ययुगीन ऐतिहासिक पाश्‍र्वभूमी :

मुंबईची मध्ययुगीन ऐतिहासिक पाश्‍र्वभूमी जाणून घेत असताना सर्व प्रथम आपणास परकीय सत्तांचा विचार करावा लागेल. वास्को-द-गामाच्या रुपाने पोर्तुगीज सर्व प्रथम भारतात आले. उत्तरेत मोगल सत्ता बाबराने प्रस्थापित केली होती. मात्र दख्खन त्याच्या ताब्यात नव्हता.

हे प्रदेश बहादूरशहाच्या ताब्यात होते. सर्व प्रथम पोर्तुगीजांनी गुजरातच्या सुलतान बहादूरशहाकडून वसई प्रांत मिळविला. नंतर पोर्तुगीजानी गुजरातच्या सुलतानाकडून ठाणे, तारापूर, बांद्रा, माहिम, मुंबई बेट काबीज केले. म्हणजेच मुंबईवर मध्ययुगीन कालखंडात सर्व प्रथम पोर्तुगीज या परकीय सत्ताधीशांची सत्ता होती.

पुढे हेच बेट पोर्तुगीज राजाने आपली कन्या कॅथेरिन ब्रँगाझा हिला आंदण म्हणून दिले. कॅथेरिन ब्रँगाझाच्या विवाह इंग्लडंचा राजा दुसरा चार्लस याच्याबरोबर ठरला होता. आणि त्या नुसारच इ.स. १६६५ मध्ये मुंबई बेट पोर्तुगीजांनी इंग्रजांच्या स्वाधीन केले. या घटनेमुळे मुंबईमध्ये इंग्रजाना कायदेशीररीत्या प्रवेश झाला. दुसऱ्या चार्लसने हे बेट केवळ वर्षाला १० पौड या नाममात्र भाड्यापोटी ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीला दिले. या प्रक्रियेने हे बेट कंपनीकडे आले. कंपनीने मराठ्यांच्या सर्व सरदारांचा पराभव करुन १८१८ नंतर मुंबई रेसीडेन्सीची निर्मिती केली यालाच मुंबई इलाख्यात खानदेश, बेळगाव, रत्नागिरी, कुलाबा, धारवाड, एडन सिंध, वैजापूर, पंचमहाल, गुजरातचा काही भाग, संपूर्ण पश्चिम दख्खन (सातारा व कोल्हापूर वगळून) ऐवढा प्रदेश येत होता. ईस्ट इंडिया कंपनीने १६८७ रोजी ्पले कार्यालय सुरतहून मुंबईला आणले त्यामुळेच पुढे हे शहर मुंबई इलाख्याच्या राजधानीचे शहर बनले. बहादूरशहा, पोर्तुगीज व इंग्रज अशा तिन सत्ताधिशांचा संबध या कालखंडात आला होता असे स्पष्ट होते.

**आपली प्रगती तपासा :**

१. मुंबईची मध्युगीन ऐतिहासिक पाश्‍र्वभूमी जाणून घ्या.

२. मध्ययुगीन कालखंडात कोणत्या सत्ताधिशांचे मुंबई बरोबर संबध आले होते ते तपासा.

## २.५ मुंबईची आधुनिक ऐतिहासिक पाश्‍र्वभूमी :

आधुनिक मुंबईची ऐतिहासिक पाश्‍र्वभूमी जाणून घेत असताना आपणास आरंभी मुंबई ईलाका, मुंबई राज्य, ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी, एल्फिन्स्टन, जगन्नाथ शंकरशेठ, राष्ट्रीय क्राँग्रेस, चले जाव चळवळ आदी घटना व व्यक्तींच्या सहसंबधांचा व कार्याचा आढावा घ्यावा लागेल. या प्रत्येक घटनेचा व व्यक्ती कार्याचा आढावा खाली देण्यात आला आहे.

### २.५.१ मुंबई इलाका :

भारतात सर्वप्रथम युरोपीय लोक पोर्तुगीजांच्या रुपाने आले. सर्वप्रथम त्यांनी गोव्यात सत्ता सुरु केली. नंतर त्यांचे संबध मुंबईबरोबर आले. पोर्तुगीज गव्हर्नर लोपो वाझ सॅपियो यांने आपला सेनापती हेटर सिल्वेस यास ३०० सैन्य देवून मुंबईवर हल्ला करण्यास सांगितले. मात्र

दरम्यानच्या काळात पोर्तुगीज व गुजरातचा सुलतान यांच्यात तह झाला व सुलतानाने या तहान्वाचे पोर्तुगीजांना वसई व वसईच्या आजूबाजूचा प्रदेश दिला. पुढे संधीचा फायदा घेवून पोर्तुगीजाने मुंबई ताब्यात घेतली व पोर्तुगीजाचे मुंबईवर राज्य सुरु झाले.

पुढे इंग्लडच्या राजा दुसरा चार्लस याचा विवाह पोर्तुगालची राजकन्या कॅथेरिन ब्रॅगाझा हिच्याशी झाला. व पोर्तुगीजानी हुंड्यादाखल मुंबई इंग्रजाना दिली. मुंबईवरील ही मालकी दुसरा चार्लस व त्याचे वारस यांना कायम देण्यात आली होती. पुढे राजा दुसरा चार्लस याला पैशाची अत्यंत गरज पडली. म्हणून त्याने ईस्ट इंडिया कंपनीकडून ५०,००० पौंड कर्ज घेतले या कर्जाच्या मोबदल्यात कंपनीला हे बेट सर्व हक्कानिशी वर्षाला १० पौंड या नाममात्र भाड्याने मिळाले. त्यामुळेच अप्रत्यक्ष रुपाने मुंबईवर कंपनीची सत्ता प्रस्थापित झाली.

१६६१ ते १८६१ या काळात कंपनीचे वर्चस्व वाढत गेले दत्तक वारस नामंजूरीचा फायदा ही इंग्रजांना झाला. मुंबई व सभोवतालच्या प्रदेशांवर कंपनीचे वर्चस्व वाढत गेले व मुंबई इलाख्याचे स्वरुप विस्ताराने वाढले. मुंबई इलाख्यात या काळात गुजरातच्या काही भाग, संपूर्ण पश्चिम दख्खन, (सातारा व कोल्हापूर कडील राजांचा भाग वगळून) खानदेश, बेळगाव, रत्नागिरी, कुलाबा, धारवड, एडन, सिंध, पंचमहाल या भागांचा समावेश होता.

### २.५.२ मुंबई स्वतंत्र राज्य :

आपण आधुनिक मुंबईची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेत असताना स्वतंत्र महाराष्ट्र राज्याआगोदर मुंबई स्वतंत्र राज्य होते हे विसरुन चालणार नाही.

आपण या ठिकाणी १८४८ पूर्वीच्या महाराष्ट्राच्या व मुंबईच्या ऐतिहासिक पार्श्वभूमी चा विचार करत असताना ही घटना जरी नंतर घडलेली आसली तरी या घटनेचे ऐतिहासिक अस्तित्व स्वतंत्र आहे. हे नाकारु शकत नाही.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर भाषिक राज्यांच्या प्रश्नांचा फेर विचार सुरु झाला. यासाठी पंडित जवाहरलाल नेहरुनी सर्वोच्य न्यायालयाचे न्यायाधीश फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले या कमिशनला 'राज्य पुनर्रचना आयोग' किंवा 'फजल अली कमिशन' म्हणतात. हदयनाथ कुंझरु व एस. के पण्णीकर या कमिशनचे सदस्य होते. १० ऑक्टोबर १९५५ रोजी आयोगाने आपला अहवाल सादर केला. या अहवालास विरोध होऊन ठिकठिकाणी सत्याग्रह झाले. मात्र १ नोव्हेंबर १९५६ रोजी मुंबई द्विभाषिक राज्य निर्माण झाले. व यशवंतराव चव्हाण हे द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. म्हणजेच महाराष्ट्र राज्य निर्मितीपूर्वी मुंबईस स्वतंत्र्य राज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी होती हे आपणास वरिल माहितीवरुन दिसून येते.

### २.५.३ राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेचे ठिकाण :

मुंबईच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीला समजून घेत असताना या घटकाला महत्त्व द्यावे लागेल. ब्रिटीशांची भारतातील राजवट अन्यायकारक व दडपशाहीची होती व ती उलथून टाकण्यासाठी भारतीयांनी १८५७ च्या उठावाच्या प्रतिकाराने प्रयत्न केला होता मात्र हा प्रयत्न फसला. यातूनच एकसंघ व संघटनात्मक विरोधांची भारतीयांना गरज वाटू लागली. या गरजेतूनच सर ॲलन ह्यूम यांच्या मार्गदर्शनाने व प्रेरणेने १८८५ भारतीय राष्ट्रीय सभा म्हणजे भारतीय राष्ट्रीय क्राँग्रेसची स्थापना झाली. राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन पुण्याला घेण्याचे

निश्चित झाले होते. मात्र पुण्यात कॉलऱ्याची साथ सुरु झाली होती. त्यामुळे हे अधिवेशन पुण्या ऐवजी मुंबइला घेण्यात आले. या अधिवेशनाच्या यजमानपदाची जबाबदारी बॉबे प्रेसिडेन्सी असोसियनशनने स्विकारली होती. हे अधिवेशन मुंबईच्या गोकूळदास तेजपाल संस्कृत कॉलेजमध्ये घेण्यात आले. या अधिवेशनाचे अध्यक्षपद मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड रे यांना देण्यात आले होते. मात्र त्यांनी नकार दिला. नंतर या अधिवेशनाचे अध्यक्षपद उमेशचंद्र बॅनर्जी यांनी स्विकारले. याच अधिवेशनात काँग्रेसची स्थापना झाली. म्हणजेच राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेचे ठिकाण म्हणून मुंबईकडे पाहिले. राष्ट्रीय काँग्रेस स्थापनेमध्ये एकूण राष्ट्रभरातील ७२ प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यापैकी ३८ प्रतिनिधी मुंबई प्रांतातील होते. तर काँग्रेसच्या स्थापनेत महाराष्ट्रातील महत्त्वपूर्ण असा १६ पुढाऱ्यांचा समावेश होता. काँग्रेस स्थापनेचे ठिकाण या नात्याने मुंबईची ऐतिहासिक पार्श्वभूमी महत्त्वाची मानली गेली आहे.

### २.५.४ १९४२ च्या छोडो भारत आंदोलनाचे ठिकाण :

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने जे छोडो भारत आंदोलन महात्मा गांधीजीच्या नेतृत्त्वाखाली सुरु केले होते त्याचा आरंभ मुंबईतून झाला होता. ९ ऑगस्ट १९४२ मध्ये हे आंदोलन सुरु झाले होते. या अंदोलनात जनतेचा सहभाग उत्स्फूत होता. या आंदोलनात महात्मा गांधीने जनतेला 'करा अथवा मरा' हा सल्ला दिला. पुढे हे आंदोलन संपूर्ण भारतभर पसरले. या ऐतिहासिक घटनेचा आरंभ म्हणून या ठिकाणी हा घटक नमुद करण्यात आला आहे.

### २.५.५ मुंबईच्या जडण घडणीतील महत्त्वपूर्ण व्यक्ती :

आजच्या आधुनिक मुंबईचे सर्वानांच आकर्षण आहे. मात्र या मुंबईच्या जडण-घडणीत केवळ एकाच व्यक्तीच्या हात लाभलेला नाही तर अनेक ज्ञात व अज्ञात व्यक्तींनी मुंबईच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका निभावली आहे. या ठिकाणी आपण त्यांच्या भूमिकेला संक्षिप्त स्वरुपात समजून घेणार आहोत.

#### अ) रुस्तमजी दोराबजी :

रुस्तमजी दोराबजी हे पारशी होते. रुस्तमजी पारश्याने मुंबईतील तरुण कोळ्यांना एकत्रीत करुन जंजीऱ्याच्या सिद्धीबरोबर लढाई केली होती. तेव्हा मुंबई ही इंग्रजांच्या ताब्यात होती. इंग्रजांना त्याने केलेल्या मदतीबद्दल त्याला इंग्रजाकडून मोबदला मिळाला होता. तसेच त्याचे इंग्रजाशी आभारही मानले होते. तसेच त्याला वंशपरंपरागत चालणारे पटेलपदही दिले होते. त्यामुळेच मुंबईच्या जडणघडणीत त्यांचे नाव घेतले जाते.

#### ब) जेराल्ड ऑजिअर :

जेराल्ड ऑजिअरला मुंबईचे शिल्पकार, मुंबईचे जनक असे म्हटले जाते. मुंबईतील कुलाबा, फोर्ट, भायकला, परेल, वरली, माटुंगा, माहिम या सात बेटांना एकत्रीत करण्याच्या कामात जेराल्ड ऑजिअरचे योगदान महत्त्वाचे आहे. ब्रिटीशांचे सुरतमध्ये प्रचलीत असणारे ठाणे त्यांनी मुंबईला आणले. त्याचा दृष्टीकोन हा सुधारणावादी होता. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्यांनी केलेल्या सुधारणांची माहिती खाली नमुद करण्यात आली आहे.

- कायदे व न्यायव्यवस्थे बाबतच्या सुधारणा.
- टांकसाळ व्यवस्थापनाबाबतच्या सुधारणा.

- रुग्णालय व्यवस्थापना बाबतच्या सुधारणा.
- छापखाना व्यवस्थापना बाबतच्या सुधारणा.
- नगर रचने बाबतच्या सुधारणा.
- स्थानिक समाज पंचायत व्यवस्थापना बाबतच्या सुधारणा
- गुजराती, बनीया या व्यापारी समाजात दिलेले प्रोत्साहान.
- जमीनीचे प्रश्न सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न.

वरील सर्व माहिती जर विचारात घेतली तर जेराल्ड ऑजिअर यांनी मुंबईच्या संघटीतपणासाठी व विकासात्मक कार्यासाठी दिलेले योगदान निश्चितच महत्त्वपूर्ण असे आहे.

**क) माउंट स्टुअर्ट एल्फिन्सटन :**

माउंट स्टुअर्ट एल्फिन्सटन हा सन १८११-१८२७ या कालखंडात मुंबई प्रांताचा गव्हर्नर होता. तो वस्तुनिष्ठ विचार करणारा असल्याने त्याचा दृष्टीकोन उपयुक्तावादी होता. त्यांनी मुंबईच्या शिक्षण, वहातूक व व्यापार धंद्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असे कार्य केले. त्याचे न्याय व शिक्षण व्यवस्थेबाबतचे धोरण मुंबईच्या दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण असे ठरले. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत जसा त्याच्या कार्यप्रणालीचा वाटा महत्त्वाचा आहे, तसाच वाटा मुंबईच्या जडणघडणीतही आहे. हे आपण नाकारु शकत नाही. आपण युनिट एक मध्ये माउंट एल्फिन्सटन यांची कामगिरी सविस्तर दिली आहे.

**ड) इतर व्यक्तींचे योगदान :**

मुंबईच्या जडणघडणीत ज्या प्रमाणे रुस्तमजी दोराबजी, जेराल्ड ऑजिअर, एल्फिन्स्टन या व्यक्तींचे योगदान महत्त्वाचे आहे त्याच प्रमाणे मुंबईत त्या कालखंडात राहणाऱ्या कोळी, भंडारी, पाचकळशी, पाठारे प्रभू, भाटीया व बनिया, शेणवी, सोनार, दैवज्ञ, जैन, मारवाडी, कोकणी मुसलमान, अरब, सईद, बोहरा, खोजा, मेमण, पठाण, शेक, सुन्नी पंथीय बोहरा, पारशी, ईस्ट इंडियन, शेमन कॅथालिक, आणि प्रोटेस्टंट, बेने इस्त्रायली (ज्यु) तसेच कोकणातून व पश्चिम महाराष्ट्रातून आलेली माणस या सर्वांनी मुंबईच्या उदय, विकास व उत्कर्षासाठी महत्त्वपूर्ण असे कार्य केले आहे.

**इ) नानासाहेब उर्फ जगन्नाथ शंकर सेठ :**

नानासाहेब उर्फ जगन्नाथ शंकर सेठ यांना खऱ्या अर्थाने आधुनिक मुंबईचे शिल्पकार मानले जाते. स्वतःचा व्यक्तीगत व्यवसाय सांभाळून त्यांनी मुंबईच्या सार्वजनिक जीवनात तन, मन व धनाने भाग घेतला. सामाजिक प्रबोधन करुन त्यांनी मुंबईच्या सार्वजनिक जीवनात महत्त्वाची भर घातली. मुंबईच्य सार्वजनिक, शैक्षणिक, धार्मिक सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळेच त्यांच्या कार्याचि संक्षिप्त माहिती या ठिकाणी नमुद करण्यात येत आहे.

१. **जीवन परिचय :** आधुनिक मुंबईचे शिल्पकार समजल्या जाणाऱ्या जगन्नाथ शंकरशेठ यांचा जन्म ठाणे जिल्ह्यातील मुरबाड या ठिकाणी १० फेब्रुवारी १८०३ रोजी झाला. मुर्कटे हे त्याचे उपनाव होते. त्यांचे घराणे दैवज्ञ ब्राम्हण (सोनार) होते. त्यांचे वडिल शंकर शेठ हे जवाहिऱ्यांचे व्यावसायिक होते. त्यांनी या व्यवसायाचा चांगला विकास केला होता.

नानासाहेब उर्फ जगन्नाथ लहान असतानाच त्यांच्या आईचा मृत्यु झाला. तसेच ते अठरा वर्षाचे असताना त्यांच्या वडिलांचा मृत्यु झाला. त्यामुळे कमी वयातच त्यांच्यावर व्यवसायांची जबाबदारी पडली.

२. **उत्तम व्यवसायिक :** जगन्नाथ शंकर शेठांच्या जड जवाहिऱ्यांचा व्यवसाय वंश परंपरागत असल्याने वडिलांच्या मृत्युनंतर या व्यवसायाची जबाबदारी त्यांच्यावर पडली. चिकाटी, सचोटीने त्यांनी हा व्यवसाय करत त्यांनी या व्यवसायातून भरपूर संपत्ती कमाविली. मात्र भरपूर संपत्ती मिळवूनही ते चैन विलासाचे जीवन जगले नाहीत उलट या संपत्तीचा विनियोग त्यांनी मुंबईच्या जनकल्याणासाठी केला.

३. **सामाजिक जागृतीला प्रोत्साहन :** जगन्नाथ शंकर शेठ हे बुद्धी, विद्वता व कर्तत्त्वाचे महाभेरु होते. त्यांनी मराठी, इंग्रजी व संस्कृत भाषेवर प्राविण्य मिळविले होते. त्यांनी मुंबईच्या सामाजिक जीवनपद्धतीत परिवर्तन करण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यामुळेच ते सार्वजनिक कार्यकर्ते, स्वयंभू नेते ठरले. प्राप्त ज्ञानाचा उपयोग मुंबईतील समाज जागृतीसाठी केला.

४. **दातृत्त्वाचे पुरस्कर्ते :** जगन्नाथ शंकर शेठांना दान, धर्म, विद्या या बाबत प्रेम होते. म्हणून त्यांनी मुंबईच्या सार्वजनिक जीवन कार्याच्या उन्नतीसाठी तन, मन, धन अर्पण करत कार्य केले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुंबईतील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गोर-गरीबांना दानधर्म करुन मदत केली. तसेच समाज विकास करणाऱ्या अनेक संस्थांना आर्थिक मदत केली.

५. **आधुनिक मुंबईचे शिल्पकार :** जगन्नाथ शंकर शेठअनी मुंबईच्या सार्वजनिक, शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक व राजकीय जीवनात महत्त्वपूर्ण असे योगदान दिले. ब्रिटीश सरकारने त्यांना 'जस्टिस ऑफ दी पीस' हा सन्मान दिला. याचा अर्थ जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी राजाने नेमलेला प्रतिनिधी असा होतो. त्यांच्या सर्वागीण कार्याचा जर विचार केला तर खरोखरच ते मुंबईतील जनतेला व मुंबईला न्याय मिळवून देणारे प्रतिनिधी होते हे आपण नाकारु शकत नाही. त्यांच्या या कार्यामुळेच ते आधुनिक मुंबईचे शिल्पकार ठरले.

६. **शैक्षणिक कार्य :** जगन्नाथ शंकर शेठांनी शैक्षणिक क्षेत्रात अविस्मरणीय कार्य केले आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती खाली नमुद करण्यात आली आहे.

- मुंबई प्रांताची शैक्षणिक योजना तयार करण्यासाठी एल्फिन्स्टनला मदत.
- बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना.
- बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मुंबई व मुंबई बाहेर शाळा सुरु केल्या.
- अनेक शिक्षण संस्थांना आर्थिक मदत केली.
- एल्फिन्स्टनने मुंबईच्या शिक्षण कार्यात महत्त्वाची भूमिका निभावल्याने त्याचे स्मारक उभारले. तसेच स्मारक उभारणीचे विश्वस्त म्हणून काम पाहिले.
- १८२४ मध्ये मुंबईत एल्फिन्स्टन हायस्कूल उभे केले.
- १८३४ मध्ये याच हायस्कूलचे रुपांतर एल्फिन्स्टन महाविद्यालयात केले.
- १८४५ मध्ये सर रॉबर्ट ग्रँटच्या स्मृती प्रित्यार्थ मुंबईत ग्रँट मेडिकल कॉलेज सुरु केले.

- स्त्रियांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले.
- मुंबईत १८४८ मध्ये जगन्नाथ शंकरशेठ या नावाने मुलींची शाळा सुरु केली.
- मुंबई विद्यापीठाचे पहिले फेला म्हणून नियुक्ती.

७. **सामाजिक कार्य :** शैक्षणिक कार्या प्रमाणेच जगन्नाथ शंकरशेठांचे सामाजिक कार्य सुद्धा महान होते. सरकार व जनता यांचा त्यांच्यावर विश्वास होता. म्हणूनच अखंड आयुष्यभर त्यांनी जनसेवा केली त्यांच्या या कार्याची माहिती खाली नमुद करण्यात आली आहे.

- स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न व प्रत्यक्ष अमलबजावणीसह कार्य.
- स्त्रीयांच्या बाबतीत सुरु असणाऱ्या सती पद्धतीस विरोध
- म्युनसिपल अॅक्ट पास होण्यासाठी प्रयत्न
- मुंबईच्या आरोग्यासाठी व सुखसोयींसाठी कार्य.
- मुंबईच्या नागरी जीवनाची मुहूर्तमेढ रोवण्यामध्ये महत्त्वपूर्ण भुमिका.
- मुंबईच्या सांस्कृतिक व बौद्धिक जीवनात बदल घडवून आणण्यासाठी विभिन्न संस्थांची स्थापना केली.
- ऐशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयाला विज्ञानावरील अनेक ग्रंथ स्वतः विकत घेवून दिले.
- अॅग्री हॉर्टिकल्चर सोसायटी व जॉग्राफिकल सोसायटी स्थापनेत महत्त्वपूर्ण भूमिका.
- राणीच्या बागेतील पदार्थ संग्राहलयास मदत.
- १८३७ च्या हिंदू- मुस्लीम दंगलीला यशस्वीपणे मिटविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका.
- मुंबईच्या पाणी प्रश्नाला सोडविण्यासाठी विहीर व तलावांची योजना तयार केली.
- मुंबईत नाट्यगृह, दवाखाने, धर्मशाळा, मंदिरे निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले.
- चिंचपोकळी येथे गॅस कंपनी सुरु होण्यासाठी प्रयत्न केले.

८. **मृत्यु :** जगन्नाथ शंकर शेठ यांचा मृत्यु ३१ जुलै १८६५ रोजी झाला. जगन्नाथ शंकर शेठ हे लोकांच्या वतीने सरकारशी बोलणारे आणि मध्यस्ती करणारे मुंबई शहरातील पहिले पुढारी होते. मुंबईचे 'अनभिषिक्त सम्राट' ही पदवी देवून आचार्य अत्रे यांनी त्यांचा गौरव केला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) मुंबईची आधुनिक पार्श्वभूमी जाणून घ्या.

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

२) आधुनिक मुंबईच्या जडणघडणीतील जगन्नाथ शंकरशेठांचे योगदान जाणून घ्या.

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

## २.६ मुंबईची स्थापत्यकला :

मुंबईची स्थापत्य कलेचा विचार करत असताना आपणांस या ठिकाणाच्या स्थापत्य कलेत ब्रिटीश राजवटीच्या सांस्कृतिक व व्यावसायिक आत्मविश्वासाचे सुरेख प्रतिबिंब उमटल्याचे दिसते. ही स्थापत्यकला सर्व प्रथम गव्हर्नर सर बार्टली फ्रीअर यांच्या कुशल नेतृत्त्वाने व मार्गदर्शनाने मुंबईत सुरु झाली. यातूनच मुंबईत 'हाय व्हिक्टेरियन गॉथीक' पद्धतीच्या सामान्य सौदर्याने आणि लक्षणीय संस्काराने नटलेल्या इमारती मुंबईत तयार झाल्या. या स्थापत्यकलेसाठी त्यांनी भारतीय पाथखटांच्या व शिल्पकारांच्या उत्कृष्ट कला कौशल्यांचा वापर करुन घेतला. मुंबईतील स्थापत्य कलेची माहिती पहात असतांना या कलेच्या माध्यमातून मुंबईत साकारलेल्या वेगवेगळ्या वास्तूंची माहिती नमुद करत आहोत.

### २.६.१ बंगला :

मुंबईतील आरंभीच्या स्थापत्व कलेतील महत्वपूर्ण वास्तु म्हणजे बंगला. या बंगल्यांचे आकार प्रमाणबद्ध, भक्कम व दर्जेदार आहेत. सर्वसाधारण मुंबईतील बंगले हे जोत्यांवर उच्च भिंती उभारुन कौलांच्या छपराने बनविलेले आहेत. या बंगल्यावर प्रादेशीक शैलीचा विकास जाणवतो मुंबईतील या स्थापत्य कलेचे उत्तम उदाहरण म्हणजे मलबार हिलवरील राजभवनांतर्गत असणारा बॅक्केट हॉल हा एक रमणीय बंगला होय. मुंबईतील काही खाजगी बंगले 'ओल्ड गव्हरमेंट हाऊस' म्हणून ओळखले जावू लागले.

### २.६.२ चर्च :

मुंबईतील स्थापत्य कलेचे दुसरे उत्तम उदाहरण म्हणजे चर्च, चर्च स्थापत्य कलेतून अभिजात प्रेरणेचा प्रत्यय येतो. मुंबईतील चर्च स्थापत्य कलेची उत्तम उदाहरणे म्हणजे सध्याच्या डॉकयार्ड समोरचे सेंट ऍण्ड्र्यूज चर्च, भाखखळ्यांचे ख्राइस्ट चर्च होय. या चर्चच्या बांधकामावर जॉर्जियन शैलीचा प्रभा जाणवतो. मुंबईतील सर्वात जुने चर्च म्हणून सेंट थॉमस चर्च प्रसिद्ध आहे. कुलाबा कॅन्टोनमेंटमधील शंभर वर्षाहून जास्त काळ समुद्रकाठी उभे असलेले सेंट जॉन्स आफगाण मेमोरियल चर्च आजही स्थापत्यकलेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले आहे.

### २.६.३ व्हिक्टोरीया टर्मिनस (छत्रपती शिवाजी टर्मिनस) :

मुंबई स्थापत्य कलेतील एक विश्वमान्य स्थापत्य कला म्हणून व्हिक्टोरीया टर्मिनसकडे पाहिले जाते. या इमारतीची रचना एफ. डब्ल्यू. स्टीव्हसन यांनी केली. ही इमारत सन १८७८ मध्ये पूर्ण झाली. सध्या ही इमारत छत्रपती शिवाजी टर्मिनस या नावाने ओळखली जाते. या इमारतीची निर्मिती प्युगीन, बर्जेस, बटरफिल्ड, स्कॉट, स्ट्रीट या ब्रिटीश स्थापत्य विशारदांनी केली ्हे. समप्रममाणबद्ध असणाऱ्या या इमारतीची रचना एका उत्तुंग चिरेबंदी घुमटात उत्कर्षीत पावली आहे. ही इमारत स्थानिक गॉथिक अलंकाराने व तपशिला सजवलेली असून या इमारतीच्या निर्मितीमध्ये भारतीय गवंड्यानीही महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे.

### २.६.४ म्युन्सिपल कार्पोरेशन बिल्डींग :

एफ. डब्लु. स्टिव्हसन यांनी रचना केलेली मुंबईतील दुसरी एक महत्त्वपूर्ण इमारत म्हणजे म्युन्सिपल कार्पोरेशनची बिल्डींग होय. ही इमारत सध्याच्या छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर असून य इमारतीचे बांधकाम १८९३ मध्ये पूर्ण झाले. या इमारतीच्या निर्मितीसाठी केलेला त्रीकोणी कोपऱ्यांचा वापर व गोपुरांच्या व घुमटांच्या रचनेतील वैशिष्ट्यपूर्णता या मुळे ही इमारत अत्यंत आकर्षक बनली आहे.

### २.६.५ आर्लेक्ड स्त्रेलर्स होम :

एफ. डब्लु. स्टिव्हसन यांच्या रचनेतील तिसरी महत्वपूर्ण इमारत म्हणजे आर्लेक्ड स्त्रेलर्स होमची इमारत होय. या इमारतीस काटेकोर व शिस्तबध रचनेतून बनविण्यात आले आहे.

### २.६.६ मुंबई विद्यापीठ व विद्यापीठ ग्रंथालय :

सर बार्टल फ्रीअर पुरस्कृत गॉथिक शैलीच्या इमारतीपैकी एकत्र असणाऱ्या या दोन इमारती आहेत. विद्यापीठ सिनेट व विद्यापीठ ग्रंथालय या शिरोभागी देखणा राजाबाई मनोरा असणाऱ्या दोन्ही इमारती गौरवपूर्ण मान्यता मिळविण्यासाठी जणू एकमेकांशी स्पर्धार करत आहेत. अशा वाटतात या इमारती अनुक्रमे १८७४ व १८७८ मध्ये पूर्ण झाल्या. नागमोडी जिने, प्रशस्त व्हरांडे, सुक्ष्म अलंकारीक कोरीव काम, हे या इमारतीच्या बांधकामाचे खास वैशिष्ट्ये ठरले आहे. या इमारतीचे कोरीव काम मुकुंद रामचंद्र यांच्या देखरेखीखाली व जे.एल. किपालिंग आणि जे.जे. स्कूल आॉफ आर्टच्या विद्यार्थ्यांच्या निरिक्षणाखाली झाले.

### २.६.७ मुंबई उच्च न्यायालय :

जे.जे. फुल्टर यांनी रेखाटलेली मुंबईतील आणखीन एक महत्त्वपूर्ण इमारत म्हणजे मुंबई उच्च न्यायालयाची इमारत होय. ही इमारत कर्नल विल्किन्स यांनी बांधली. या इमारतीचे बांधकाम १८७८ मध्ये पूर्ण झाले.

### २.६.८ क्रॉफर्ड मार्केट :

नामंवत व्हिक्टोरियन स्थापत्य विशारद विल्यम बर्जेस यांचा शिष्य विल्यम इमर्सन यांच्या कलेतून साकारलेली पहिली इमारत म्हणजे क्रॉपर्ड मार्केट होय. क्रॉफर्ड मार्केट म्हणजे आताची महात्मा फुले मंडईची इमारत होय. या इमारतीसाठी वापरण्यात आलेल्या ओतीव लोखंडाचा तुळ्या आणि उष्णतावर्धक उतरत्या पंख्याची छप्परे ही या इमारतीच्या बांधकामाची खास वैशिष्ट्ये आहेत. १८६९ मध्ये ही इमारत बांधण्यात आली. हे मुंबईतील सर्वात मोठे मार्केट आहे.

### २.६.९ गेट वे ऑफ इंडिया :

ज्या स्मारकासाठी मुंबई प्रख्यात आहे ते स्मारक म्हणजे गेट वे ऑफ इंडिया होय. हे स्मारक समुद्राच्या किनाऱ्यावर पाण्याकडे तोंड करुन दिमाखदार पद्धतीने उभे आहे. ब्रिटीश राजा जार्ज पाचवा व महाराणी मेरी संस्मरणीय आठवण रहावी या उद्देशाने हे स्मारक उभे करण्यात आले होते. या स्मारकाच्या निर्मितीची सुरुवात (१९१३) मध्ये झाली व हे स्मारक १९२७ बांधून पूर्ण झाले. हे स्मारक सरकारी वास्तुशास्त्रज्ञ जार्ज विटेट निर्मित आहे. हे स्मारक मध्ययुगीन कालखंडातील गुजरात मथील उत्तर-इंडो-ऍंग्लियन सॅरोसेनिक शैलीवर आधारीत आहे.

### २.६.१०एशियाटीक लायब्ररी :

मुंबईतील सर्वात जुनी लायब्ररी म्हणून या लायब्ररीकडे पाहिले जाते. ही लायब्ररी १८३३ मध्ये निर्माण करण्यात आली होती. ही लायब्ररी म्हणजे स्थापत्य कलेचे उत्तम उदाहरण आहे. या लायब्ररीत प्राचीन असंख्य पुस्तके आहेत. तसेच प्रसिद्ध व्यक्तीची प्रसिद्ध धांतुपासून व संगमरवरी दगडापासून बनविलेली चित्र आहेत.

**२.६.११प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम :**

प्रिन्स ऑफ वेल्स हे मुंबईतील सर्वोत्कृष्ट म्युझियम आहे. या म्युझियमची इमारत मॉरिसेस पद्धतीची आहे. पिवळ्या व निळ्या रंगछटेने ही इमारत आकर्षक बनली असून या इमारतीच्या सभोवताली बगीचा आहे. या म्युझिममध्ये प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील भारतीय इतिहासाशी संबधीत असणाऱ्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व कलात्मक अविष्काराशी संबधीत असणाऱ्या अनमोल वस्तुंचा संग्रह आहे. ऐतिहासिक वारसाचे दर्शन देणारे हे महत्वपूर्ण ठिकाण असल्या कारणे हे ठिकाण पहाण्यासाठी पर्यटकांची व अभ्यासकांची मोठी गर्दी असते.

**२.६.१२हुतात्मा चौक :**

महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी ज्या १०६ हुतात्माने आपल्या प्राणाचे बलीदान दिले त्यांचे स्मरण आपणा सर्वांनाच रहावे म्हणून हे महत्वपूर्ण शिल्प तयार करण्यात आले आहे. याच शिल्पाच्या जवळ मुंबईच्या निर्मितीसाठी ज्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. अशा दादाभाई नौरोजीचाही प्रतिमा आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) मुंबईच्या स्थापत्य कले विषयी माहिती जाणून घ्या.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## २.७ मुंबईतील महत्त्वाची स्थळे

आधुनिक मुंबई ही दक्षिण मुंबई, मध्य मुंबई व उत्तर मुंबई या तीन भागात विभागली आहे. आरंभीपासूनच मुंबईला राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक समृद्धता लाभली ्हे. गिलीयन टिन्डल यांनी मुंबईला (if yuf Gold) ही उपाधी दिली आहे. भारताच्या आर्थिक राजधानीचे ठिकाण, महाराष्ट्राच्या राजधानीचे ठिकाण, भारताचे प्रवेशद्वार, भारतातील सर्वात जास्त श्रीमंत शहर अशी मुंबईची प्रसिद्धी आहे. अशा या मुंबईला महत्त्वाच्या अशा समृद्ध स्थळांचाही वारसा लाभला आहे. अशा या मुंबईतील स्थळांची माहिती संक्षिप्त पद्धतीने मांडली आहे.

**२.७.१ दक्षिण मुंबईतील स्थळे :**

दक्षिण मुंबईत अफगान चर्च, छत्रपती शिवाजी टर्मिनस, गिरगाव चौपाटी, मत्सालय, चर्चगेट, केंद्रीय तार कार्यालय, जनरल पोस्ट ऑफिस, गेट वे ऑफ इंडिया, अपोलो बंदर, हुतात्मा चौक, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ॲन्ड आर्किटेक्चर, जहांगिर आर्ट गॅलरी, मरीन ड्राइव, छत्रपती शिवाजी वस्तुसंग्राहलय, ऐशियाटीक लायब्ररी, उच्च न्यायालय, मुंबई विश्वविद्यालय, विदेश संचार भवन, विधानसभा, नरीमन पॉईन्ट, म्युन्सिपल कॉर्पोरेशन बिल्डींग, टाईम्स बिल्डींग ही स्थळे व इमारती आहेत, तसेच महात्मा ज्योतीबा फुले (क्राफोर्ड मार्केट) ्हे.

**२.७.२ मध्य मुंबईतील स्थळे :**

मध्य मुंबईत भुलेश्वर मंदिर, सर फिरोजशहा उद्यान (हैगिंग गार्डन) कमला नेहरु पार्क, बाबुलनाथ मंदिर, महालक्ष्मी मंदिर, हाजी अली दर्गा, मनीभवन, क्रांती मैदान, वालकेश्वर मंदिर, मुंबादेवी मंदिर, नेहरु तारांगण, जामा मस्जिद, सिद्धीविनायक मंदिर, राजभवन, जिजामाता उद्यान (व्हिक्टोरिया गार्डन) ही स्थळे आहेत.

**२.७.३ उत्तर मुंबईतील स्थळे :**

उत्तर मुंबईत आरे मिल्क कॉलीनी, समुद्र किनारा, (वर्सोवा, गोराई, अक्सा, मढ). जुहू बीच, मोर्वे बीच, नॅशनल पार्क, कान्हेरी गुंफाऐ, इंरागल समुद्र किनारा, पवई, तानसा तलाव, माऊंट मेरी चर्च, सेंट ऐन्ड्रयू चर्च, वर्जेश्वरी, एसेल वर्ड, वसई किल्ला, घोडा बंदर ही स्थळे आहेत.

मुंबईतील या स्थळांना राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक असा वारसा लाभला आहे. परिणामी ही ठिकाणे पहाण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. त्यामुळे मुंबईच्या आर्थिक समृद्धतेत वाढ होत आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) मुंबईच्या स्थळांबाबतची माहिती जाणून घ्या.

___

___

___

## २.८ मुंबईची संस्कृती

मुंबईची संस्कृती नाविन्यपूर्ण आहे. या संस्कृतीमध्ये परंपरागत सण-उत्सव, आहार-विहार, जात, धर्म, पंथ, यामध्ये एकसंघता विविधता आहे अपवाद वगळता हे लोक एकसंघतेने संघटीत होतात. एकमेकांच्या सुख-दुखःात सहभागी होतात भाषीक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक एकसंघता टिकविण्यासाठी प्रयत्न करतात. ही संस्कृती आजही टिकून आहे. सांस्कृतिक विविधता व एकसंघता हे मुंबईचे खास वैशिष्ट्ये आहे.

## २.९ सारांश

या प्रकरणात सर्व प्रथम आपण मुंबई हे मुंबईस नाव कसे पडले व या शहराची रचनात्मक निर्मिती कशी झाली हे जाणून घेतले.

मुंबईची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेत असताना सर्व प्रथम आपण मुंबईची प्राचीन पार्श्वभूमी जाणून घेतली. पाषाण युग, ग्रीक राजवट सहसंबध, मौर्य राजवट, सातवाहन राजवट, शीलाहर राजवट या कालखंडात मुंबई अस्तित्वात होती याचे पुरावे उपलब्ध आहेत.

मध्ययुगीन कालखंडात मुंबईवर पोर्तुगीजांची सत्ता होती. ही सत्ता बहादूरशहाकडून पोर्तुगीजाना मिळाली होती या कालखंडात पोर्तुगीजाने मुंबईतील ठाणे, तारापुर, बांद्रा, माहिम, बेटे काबीज केली होती

पुढे पोर्तुगीजांनी इंग्रजांना मुंबई आंदण दिली. पुढे मुंबईवर इस्ट इंडिया कंपनीचे वर्चस्व प्रस्तापित झाले. व इंग्रजांच्या राजवटीत मुंबईला आधुनिकतेचे स्वरुप प्राप्त झाले.

स्वातंत्र्या नंतर सर्व प्रथम स्वतंत्र राज्याच्या दर्जा, राष्टीय काँग्रेसच्या स्थापनेचे ठिकाण, छोडो भारत आंदोलनाचे ठिकाण, महाराष्ट्राच्या राजधानीचे ठिकाण, भारताच्या आर्थिक राजधानीचे ठिकाण या अंगाने मुंबईचे महत्व आधुनिक कालखंडात वाढले.

मुंबईच्या रचनेत, जडण घडणीत ज्या महान व्यक्तीने योगदान दिले त्या रुस्तमजी दोराब, जेराल्ड ऑजिअर, माऊन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टन, नानासाहेब उर्फ जगन्नाथ शंकर शेठ तसेच वेगवेगळ्या जाती-जमातीतील लोकांचे कार्य काय होते याची माहिती पाहिली.

या व्यतिरिक्त चालू स्थितीतील मुंबईतील स्थळे व संस्कृती यांचा थोडक्यात आढावा घेतला वरिल सर्व माहितीच्या आधारे या प्रकरणात आपण मुंबईबद्दलची संक्षिप्त माहिती जाणून घेतली.

## २.१० दिर्घोत्तरी प्रश्न

१. प्राचीन मुंबईच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा थोडक्यात आढावा घ्या.
२. मध्ययुगीन मुंबईची पार्श्वभूमी थोडक्यात स्पष्ट करा.
३. आधुनिक मुंबईची पार्श्वभूमी अचूक सांगा.
४. मुंबईच्या जडण घडणीसाठी ज्या व्यक्तीने कार्य केले आहे त्या व्यक्तींच्या कार्याचा आढावा घ्या.
५. आधुनिक मुंबईचे शिल्पकार या नात्याने जगन्नाथ शंकर शेंठांच्या कामगिरीचे परिक्षण करा.
६. मुंबईच्या स्थापत्य कलेचा आढावा घ्या.
७. मुंबईतील स्थंळाची संक्षिप्त माहिती नमुद करा.

## २.११ संदर्भ सूची


१. एम. डी. डेव्हीड - ऐक मुंबई तुझी कहाणी
२. न. रा. फाटक - मुंबई नगरी
३. यशवंत रायकर - मुंबई : ज्ञात व अज्ञात.
४. M.D. David - Bombay the city of Dreams


❖❖❖❖

# ३

# मुंबईचा एक बंदर म्हणून उदय व विकास

**घटक रचना :**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ मुंबई एक बंदर

३.३ मुंबई बंदर व कापूस व्यवसाय

३.४ मुंबई बंदर व अफूचा व्यवसाय

३.५ मुंबईतील वहातूक व्यवस्था

३.६ मुंबईतील रस्ते वहातूक व या वहातूक व्यवस्थेशी संबंधीत साधने

३.७ मुंबईतील रेल्वे वहातूक व मार्ग

३.८ मुंबई बंदराशी संबधीत जलमार्ग व साधने

३.९ मुंबई बंदराचा विकास

३.१० मुंबई बंदराचे मुंबईच्या आर्थिक विकासातील योगदान

३.११ सारांश

३.१२ दिर्घोत्तरी प्रश्न

३.१३ संदर्भ सूची

## ३.० उद्दिष्ट्ये

- मुंबई हे एक महत्त्वपूर्ण बंदर कसे आहे हे जाणून घेणे.
- मुंबई बंदराशी संबधीत कापूस व्यवसायाची माहिती जाणून घेणे.
- मुंबई बंदराशी संबधीत अफू व्यवसायाची माहिती जाणून घेणे.
- मुंबईच्या वहातूक व्यवस्थेचे स्वरुप जाणून घेणे.
- मुंबईतील रस्ते वहातूक व या वहातूक व्यवस्थेशी संबधीत साधने या बाबतची माहिती जाणून घेणे.
- मुंबईतील रेल्वे वहातूक व रेल्वे मार्ग या बाबतची माहिती जाणून घेणे.
- मुंबई बंदराशी संबधीत जलमार्ग व वहातूक साधने या बाबतची माहिती जाणून घेणे.
- मुंबई बंदराच्या विकासा बाबतची माहिती जाणून घेणे.
- मुंबई बंदराचे मुंबईच्या आर्थिक विकासातील योगदान जाणून घेणे.

## ३.१ प्रस्तावना

मुंबई हे भारतातील सर्वश्रेष्ठ बंदर आहे. प्राकृतिक रचनेच्या सुरक्षतेमुळे या बंदराला महत्त्व प्राप्त झाले होते. मुंबई हे भारतातील पहिले भारतीय व्यापारी केंद्र मानले जाते. या बदराला प्राचीन व मध्ययुगीन ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. पोर्तुगीजानंतर या बंदरावर आधुनिक कालखंडात ब्रिटीशांचे वर्चस्व प्राप्त झाले. आधुनिक कालखंडात मुंबई भारताचे प्रवेशद्वार तसेच महाराष्ट्राच्या राजधानीचे ठिकाण बनले आहे.

आज भारताच्या एकुण औद्योगिक उत्पादनापैकी २५% उत्पादन मुंबईत होते. भारताच्या एकुण आयात निर्यातीच्या ४०ज्ञ आयात निर्यात मुंबईतून जलवाहतूकीच्या माध्यमातून होते. आज मुंबई जगातील दहा महत्त्वपूर्ण व्यापारी केंद्रापैकी एक व्यापारी केंद्र बनले आहे. या दहा व्यापारी केंद्रामध्ये मुंबईच्या पाचवा क्रमांक आहे.

या घटकात आपण मुंबई एक बंदर, मुंबई बंदरातील कापूस व्यवसाय, मुंबई बंदरातील अफू व्यवसाय, मुंबईतील वहातूक व्यवस्था, मुंबईतील वहातूकीचे मार्ग, साधने, मुंबई बंदराचा विकास, तसेच मुंबईचे आर्थिक विकासातील योगदान या घटकांची माहिती पाहणार आहोत.

## ३.२ मुंबई एक बंदर

मुंबई हे एक आंतरराष्ट्रीय सागरी मार्गावरील एक महत्त्वपूर्ण बंदर आहे. पोर्तुगीजांची सत्ता संपुष्टात आल्या नंतर या बंदरावर इंग्रजांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. नंतर हे बंदर इस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आले. कंपनीने हे बंदर ताब्यात घेतल्यानंतर या बंदरातून मोठ्या प्रमाणात आयात - निर्यात होवू लागली. या बंदरातून २ कोटी ते २५ कोटी मेट्रीक टन मालाची वहातूक होवू लागली. ३ लाख लोक या बंदरातून प्रवास करु लागले. या बंदरात जहाजांच्या दुरुस्तीची सोय आहे. ससून, इंदिरा, व्हिक्टोरिया, प्रिन्सेस अशा अनेक गोद्या (डॉक्स) मुंबई बंदरात आहेत. मुंबई बंदराची व्यवस्था पाहण्यासाठी बॉम्बे पोर्ट ट्रस्ट (बी.पी.टी.) ही संस्था कार्यरत आहे. मुंबई बंदराच्या गोद्यांच्या भागासाठी बी.पी.पी. ही स्वतंत्र रेल्वेही आहे. आता मुंबईपासून १० कि.मी. अंतरावर असणारे 'न्हावाशेवा' हे अत्याधुनिक सोयीने युक्त असणारे बंदर उभारण्यात आल्याने मुंबई बंदरावरील ताण कमी झाला आहे. मुरुड, रत्नागिरी, दाभोळ, विजयदुर्ग, देवगड व रेडी ही बारमाही बंदरे आहेत. या बंदराचे व्यापारी व आर्थिक कार्यप्रणालीला अनुसरुन सहसंबंध आहेत. मालवाहतूक व प्रवासी वहातूकीमुळे या बंदराचे महत्त्व आजही टिकून आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) मुंबई बंदराबाबतची माहिती थोडक्यात जाणून घ्या.

___

___

___

## ३.३ मुंबई बंदर व कापूस व्यवसाय

मुंबईतील सुती वस्त्रोद्योगाला सुमारे दिडशे वर्षाची परंपरा असल्याने मुंबईत कापूस व्यवसायाला पुरक वातारवण निर्माण झाले होते. मुंबईतील नायगांव, परळ, लालबाग, भायखळा, वरळी, कुर्ला चिंचपोकळी, शिवडी या भागात कापड गिरण्या होत्या. म्हणूनच या भागाला गिरणगांव असे म्हटले जात होते. या कापड गिरण्यांना कापड निर्मितीसाठी कापूस लागत असे, या गरजेतून कापूस व्यवसायाचा मुंबईत विकास झाला होता.

### ३.३.१ कापड गिरण्या :

सुती वस्त्रोद्योग हा महाराष्ट्रातील महत्त्वाच्या कृषी उत्पादनावर आधारीत असा उद्योग आहे. या उद्योगाचा विचार करता या उद्योगाशी संबधीत असणाऱ्या कापड गिरण्या महत्त्वाच्या आहे. संपूर्ण भारतात ६६१ कापड गिरण्या होत्या त्या पैकी महाराष्ट्रात १०४ कापड गिरण्या आहेत. भारतात पहिली कापड बंगालमध्ये कलकत्याजवळ चुरसी येथे १८१८ मध्ये स्थापन झाली. त्यानंतर ३३ वर्षानंतर म्हणजेच सन १८५१ मध्ये श्री कावसाजी नानाभॉय दावर यांनी मुंबई येथे बॉबे स्पिनिंग ॲण्ड विव्हींग कंपनी ही पहिली कापड गिरणी काढली. पुढील विस वर्षात कापड उद्योगाची झपाट्यांने प्रगती झाली. सन १८६९ मध्ये सुवेझ कालव्याचे उद्घाटन झाल्यानंतर मुंबई आणि लंडन मधील अंतर ६४०० कि.मी. कमी झाले. तसेच याच काळात मुंबई आणि कलकत्ता ही शहरे देशांतर्गत लोहमार्गाशी जोडल्याने भारतात १६ कापड गिरण्या होत्या त्यापैकी एकट्या मुंबईत ९ होत्या. १९१३ पर्यंत मुंबई हे केवळ भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील एक महत्त्वपूर्ण केंद्र बनले. सन १९१३ पर्यंत मुंबईत भारतातील ७० टक्के उद्योग केंद्रित झाले होते. पुढे मुंबईतील कापड गिरण्यांची संख्या ही संख्या ८२ वर गेली. त्यापैकी १९९५ पर्यंत ५४ कापड गिरण्या शिल्लक होत्या.

### ३.३.२ कापूस निर्यातीचे केंद्र :

१८६० पूर्वी मुंबईतून कापसाची निर्यात मोठ्या प्रमाणात होत होती. त्यामुळे मुंबई हे कापूस निर्यातीचे केंद्र बनले होते. कापडासाठी आवश्यक असणारा कच्चा माल म्हणजे कापूस. त्या काळात भारतात कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असे हा कच्चा माल देशातील विविध भागातून मुंबई बंदरात आणून टाकला जात असे. सुरवातील कापूस वहातुकीसाठी बैलगाड्यांचा वापर केला जात होता नंतर बदलच्या परिस्थितीनुसार कापूस वहातुकीसाठी जहाजांचा वापर होू लागला. पश्चिम किनारपट्टीवरील मलबार, कोकण, गुजरात, सिंध, कच्छ, मध्य भारत इत्यादी ठिकाणाहून जमा केलेला कापूस पुढे मुंबईला येऊ लागला. परिणामी मुंबई कापूस निर्यातीबाबत प्रसिद्ध झाली. पुढे युगांडा आणि मोबासा यासारख्या दूरच्या देशातून सुद्धा मुंबईत कापूस निर्यातीसाठी येऊ लागला. भारतातील कापूस निर्यातीत पुढे मुंबई अग्रस्थानी आला. १८३४ ते १८३६ या कालखंडात निर्यात झालेल्या भारतातील ८० टक्के कापूस व ९२ टक्के कापूस बिया या मुंबईहून निर्यात  झालेल्या होत्या. वरील सर्व माहिती मुंबईच्या कापूस निर्यातीच्या अस्तित्वाला स्पष्ट करण्यास उपयुक्त ठरते.

### ३.३.३ दळणवळण साधनांचा विकास :

भारतात ब्रिटिश राजवट स्थिर झाल्या नंतर ब्रिटिशांनी औद्योगिक विकासास पुरक अशा भारतात सेवा उपलब्ध करण्यास सुरुवात केली. लॉर्ड डलहौसीच्या कारकिर्दीत दळणवळण व वाहतुकीच्या कामाना विशेष गती मिळाली. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या माध्यमातून पक्क्या रस्त्यांची बांधकामे सुरू झाली. रेल्वे मार्ग टाकण्याचे काम सुरू झाले. १६ एप्रिल १८५३ रोजी भारतातील पहिली रेल्वे मुंबई ते ठाणे सुरू झाली. बोरघाट सुरू झाल्यानंतर १८६० पर्यंत रेल्वे बोरघाटाच्या पलीकडे विस्तारीत झाली. पुढे रेल्वे मुंबईपासून सुरतपर्यंत व सुरतपासून मुंबईपर्यंत धावू लागली. मुंबई व सुरत ही कापसाची केंद्र असल्याने या प्रक्रियेमुळे कापूस व्यवसायाच्या विकासास चालना मिळाली.

### ३.३.४ हायड्रॉलिक प्रोसेस केंद्राची निर्मिती :

कापूस व्यवसायाच्या प्रगतीच्या उद्देशाने दळणवळणाच्या मार्गाची व साधनांची निर्मती सुरू झाली होती. दळणवळणाच्या साधनातील रेल्वेच्या उपलब्धतेने या व्यवसायात अमुलाग्र बदल घडवून आणला होता. मात्र रेल्वेचे टर्मिनस हे ग्रॉंडरोड येथपर्यंत पोहचले होते. रेल्वेतून आलेला कापूस जसाच्या तसा जहाजांवर चढविणे शक्य नव्हते. जहाजावर चढविण्यापूर्वी कापूस दाबून गठ्याच्या आकाराचा बनविणे आवश्यक होते. यासाठीच हायड्रॉलिक प्रोसेसची गरज होती. ही प्रोसेस कुलाब्याला सुरु झाली पुढे हे काम कुलाब्यात पूर्ण होऊ लागले. त्यामुळे कापूस गलबतांवर चढविणे सोपे होऊन बसले. पुढे या प्रक्रियेमुळेच रेल्वे कुलाब्यापर्यंत पोहचली.

### ३.३.५ साठवणूकीसाठी जागेची उपलब्धता :

दळणवळणाच्या साधनातील व मार्गातील सुधारणांमुळे तसेच कुलाब्यात सुरू झालेल्या कापूस दाबण्याच्या यंत्र प्रक्रियेमुळे भारताच्या सर्व ठिकाणातून कापसाचे गट्ठे मुंबईच्या बाजारात येऊ लागले. मुंबईत कापसाची आवक वाढल्याने कापूस साठवणूकीसाठी प्रचलीत असणारी कॉटन ग्रीनची जागा अपुरी पडू लागली. म्हणूनच कुलाबा कॉजवेजवळील जागा उपयोगात आणली गेली. इंग्रजांनीसुद्धा कापसाच्या वाढत्या निर्मितीला अनुसरून तसेच मुंबईत येणाऱ्या मालाचा विचार करून ८९,००० रूपये खर्च करुन अपोलो बंदराचा विकास केला. साठवणूकीयच्या जागेची उपलब्धता झाल्याने कापसाच्या व्यापारास चालना मिळाली.

### ३.३.६ इतर देशांबरोबरच्या मालाबरोबर स्पर्धा करण्यात यश :

मुंबईतून युरोपीय देशात कापसाची निर्यात होत असे. मात्र तेव्हा मुंबईतील निर्यात होणाऱ्या कापसाला युरेपीय देशात अमेरिकन कापसाबरोबर स्पर्धा करावी लागत होती. य स्पर्धेत मुंबईतून निर्यात होणाऱ्या मालाला टिकणे कठीण होऊन बसले होते. मात्र जेव्हा दळणवळणाच्या साधनात व मार्गात सुधारणा झाल्यामुळे तसेच साठवणूकीच्या केंद्रामध्ये वाढ झाल्यामुळे येणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया होऊ लागली व योग्य माल युरोपीय बाजारपेठांमध्ये जावू लागला. परिणामी मुंबईतील कापसाला मागणी वाढली. म्हणजेच मुंबईतील कापूस व्यापाराला इतर देशांबरोबर स्पर्धा करण्यात यश आले.

### ३.३.७ बक्षीस देण्याची पद्धत :

मुंबईत निर्यातीसाठी साठवल्या जाणाऱ्या कापसाला मागणी वाढल्याने हा कापूस उत्तम प्रतिचा उपलब्ध व्हावा यासाठी शेतकऱ्यांना आवहान करण्यात येऊ लागले. तसेच उत्तम पद्धतीचा कापूस उत्पादीत करणाऱ्या शेतकऱ्याला दहा हजाराचे बक्षिस देण्याचेही घोषीत करण्यात आले. परिणामी मुंबईत उत्तम प्रतिचा कापूस येण्यास सुरुवात झाली व कापूस व्यवसायाचा दर्जा उंचावण्यास मदत झाली.

### ३.३.८ भेसळ प्रतिबंध कायदा :

उत्तम कापसाच्या उपलब्धतेसाठी ज्या प्रमाणे बक्षिस ठेवले होते त्याचप्रमाणे निकृष्ट दर्जाचा कापूस साठवणूकीसाठी व निर्यातीसाठी येऊ नये म्हणून भेसळ प्रतिबंधक कायदाही अमलात आणला होता. या कायद्याच्या बंधनामुळे मुंबई बंदरात उत्तम प्रतिचा कापूस येऊ लागला. परिणामी मुंबईच्या निर्यात प्रक्रियेचा विकास होण्यास मदत झाली.

### ३.३.९ अमेरिकन यादी युद्धाचा फायदा :

अमेरिकन यादवी युद्धाचा फायदा मुंबईतील कापूस व्यवसायाला झाला ही बाब पूर्णपणे सत्य आहे. अमेरिकेतील गुलामगिरीची चाल हे या युद्धाचे मुख्य कारण. दक्षिण अमेरिका गुलामगिरीची चाल असावी यासाठी प्रयत्नशील होती तर उत्तर अमेरिका ही चाल नष्ट करण्यासाठी प्रयत्नशील होती. या यादवी युद्धामुळे इंग्लंडमधील या कापड गिरण्या बंद पाडल्या. पुढे या गिरण्यांना भारतीय कापसाने मदत केली. मुंबईतून या गिरण्यांसाठी कापसाची निर्यात होऊ लागल्याने मुंबईतील कापसाला मागणी वाढत गेली.

### ३.३.१० इतर उद्योगांना चालना :

कापूस निर्यात प्रक्रियेमुळे कापूस पिंजणे, कापसाचे पेंळू करणे, सूत कातणे, सूत रंगवणे, रंगविलेल्या सूतावर प्रक्रिया करणे, सूत योग्य आकारात गुंडाळणे, कापड विणणे, छपाई करणे, तयार कापडावर प्रक्रिया करणे या सर्व क्रियांना या कापूस व्यवसायामुळे चालना मिळाली.

### ३.३.११ मुंबई आर्थिकदृष्ट्या श्रीमंत :

कापूस व्यवसाय मुंबईच्या दृष्टीने वरदान ठरला. मुंबईत निर्माण झालेल्या कापड गिरण्यांना याचा फायदा झाला, गरजेतून या व्यवसायासाठी आवश्यक असणारी दळणवळणाची साधने निर्माण झाली. मुंबईत निर्यातीसाठी आवश्यक असणाऱ्या कापसाची आवक सतत वाढू लागल्याने मुंबई कापूस निर्यातीचे केंद्र बनले. हायड्रॉलीक प्रोसेसमुळे जास्त कापूस निर्यात होऊ लागला. उत्तम प्रतिच्या कापसाच्या उपलब्धतेमुळे इतर देशांच्या मालाबरोबर स्पर्धा करण्यात यश येवू लागले. बक्षिस व्यवस्थेमुळे उत्तम प्रतिचा माल येऊ लागला, भेसळ प्रतिबंधात्मक कायद्याचा परिणामही उत्तम प्रतिचा कापूस उपलब्धतेसाठी होऊ लागला. अमेरिकन यादवी युद्धाचा फायदाही या व्यापारास झाला. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे कापूस व्यवसायाशी संबंधीत इतर उद्योगही विकसीत अवस्थेला पोहचले परिणामी मुंबई आर्थिक दृष्ट्या श्रीमंत झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) मुंबई बंदरातील कापूस व्यवसायाबाबतची माहिती जाणून घ्या.

## ३.४ मुंबई बंदर व अफूचा व्यापार :

ज्याप्रमाणे मुंबई बंदरातून कापसाचा व्यापार होत होता त्याच प्रमाणे या बंदरातून अफूचा व्यापारसुद्धा होत होता. मुंबई बंदरातून १९ व्या शतकात अफूचा व्यापार मोठ्याप्रमाणात झाल्याने या व्यापारानेसुद्धा मुंबई आर्थिकदृष्ट्या सधन बनली होती या उपघटकात आपण अफूच्या वनस्पतीबद्दल, निर्यात केंद्राबद्दल व तत्कालीन कालखंडातील व्यापाराच्या मोलाबद्दलची माहिती जाणून घेणार आहोत.

### ३.४.१ अफूची वनस्पती :

अफू ही एक वनस्पती आहे. या वनस्पतीच्या प्रत्येक भागातून एक प्रकारचा चीक येतो. मात्र या वनस्पतीच्या कच्च्या बोंडापासून जो चीक येतो त्या चीकाचा वापर फक्तं अफूची पावडर बनविण्यासाठी केला जातो. प्रत्येक झाडापासून साधारणतः पाच ग्रॅम अफूची पावडर मिळते. ही पावडर तपकीरी किंवा काळ्या रंगाच्या दाण्यापासून केली जाते. या पावडरमध्ये मॉर्फिन, नारकोटीन व कोडेनं ही रासायनिक द्रव्य असतात. हेरॉईन देखील अफूपासून बनविली जाते.

### ३.४.२ अफूची लागवड :

अफूच्या लागवडीसाठी त्या वेळेला परवाना लागत असे. हा परवाना सरकारी असे. पूर्वी परवाना असणारे लोक अफूचा अधिकृत व्यापार करत असत. ठराविक लोकच अफूच लागवड या काळात पिढ्यांन्पिढ्या करत होते. आज मात्र अफूच्या व्यापाराला, निर्यातीला व व्यसनाला बंदी आहे. आज अफूचा अधिकृत उपयोग औषधी रसायने बनविण्यासाठी केला जातो.

### ३.४.३ अफूचे सेवन :

अफू हा अमली पदार्थ आहे. या पदार्थाचे सेवन ११ व्या शतकात जास्त प्रमाणात श्रीमंत वर्गातील तरुण करत होते. पुढे या अमली पदार्थाच्या सेवनात इतर वर्गातील तरुणही गुंतले. परिणामी अफूचे सेवन करणाऱ्यांची संख्या वाढली. गुंगी येणे, भ्रम येणे या प्रकारच्या अनुभवासाठी पुढे लोक या सेवनाकडे आकर्षित झाले. याचे सेवन करणारा वर्ग वेगवेगळ्या देशांमध्ये निर्माण होऊ लागला परिणामी अफूच्या मागणीत दिवसेन्दिवस वाढ होत गेली.

### ३.४.४ मुंबई अफूच्या निर्यातीचे केंद्र बनली :

मुंबई अगोदर दमन हे बंदर अफूच्या निर्यातीचे केंद्र होते. या बंदरातून तेव्हा मालवा नावाची लोकप्रिय अफू निर्यात होत असे. मात्र मुंबई सरकारने अफूच्या निर्यात नियमात सुधारणा करून ही अफूची निर्यात दमन बंदराऐवजी मुंबई बंदराकडे बळवीली. यासाठी त्यांनी १४० पौंड वजनाच्या अफूवर १७५ रुपये मार्गस्थ कर आकारण्यास सुरूवात केली. त्यामुळे मुंबई बंदरातून जवळ जवळ ९० टक्के अफूची निर्यात होऊ लागली. मुंबई बंदरातून होणाऱ्या अफूची निर्यात वाढू लागल्याने मुंबई बंदराला एकाच वर्षात दोन लाख पौंड उत्पन्न मिळाले.

### ३.४.५ इस्ट इंडिया कंपनीचा अफूचा व्यापार :

इस्ट इंडिया कंपनीने चीनमध्ये अफूचा व्यापार सुरू केला होता. कंपनी भारतात अफूच्या लागवडीला प्रोत्साहान देत होती व लागवडीतून निर्माण होणारी अफूची बोंडे समुद्रमार्गे चीनला पाठवत होती. चीनमधल्या अफूच्या अनैतिक व्यापारात कंपनीचा हात होता. मात्र कंपनीच्या या व्यापाराची मक्तेदारी १८३३ मध्ये संपुष्टात आली. कंपनीच्या अफूचा व्यापार संपुष्टात आल्यानंतर कंपनीने या व्यापारा बाबतचे व्यापारी परवाने ब्रिटीश व भारतीय व्यापाऱ्यांना दिले व या व्यापाराची जबाबदारी त्यांच्यावर सोपवून दिली. या बदलामुळे सरकारच्या तिजोरीत दर १४० पौंड अफूमागे आकराशे पौंडाची भर पडली. या काळात चीनी तरुण मोठ्या प्रमाणात अफू सेवनाच्या आहारी गेला होता. मात्र पुढे चीनमध्ये अफूचा चांगला व्यापार होण्याऐवजी वाईट व्यापार होऊ लागला. त्यामुळे चीनने अफूच्या आयातीवर बंदी घातली.

### ३.४.६ अफूचे युद्ध व व्यापार संधी :

ब्रिटिश इंडिया कंपनीचा हा चीनमधील व्यापार जरी संपुष्टात आला असला तरी इंग्राजानी पुढे चीनमध्ये अफूचा चोरटा व बेकायदेशीर व्यापार सुरूच ठेवला. या व्यापारातून प्रचंड नफा मिळवीला. इंग्रजांचे ह्या व्यापाराचे प्रमाण वाढू लागल्याने तत्कालीन मांचू सत्तेने इंग्रजांच्या या धोरणास विरोध केला व यातूनच पहिले अफूचे युद्ध झाले. या युद्धात चीनचा पराभव झाला. १८४२ मध्ये पराभवानंतर चीनने नानकींग तहाला मान्यता दिली. यामुळे परकीयांसाठ चीनमधील पाच बंदरे खुली झाली.

दुसऱ्या अफूच्या युद्धानेही चीनचा पराभव झाल्या नंतर चीनमध्ये अफूच्या व्यापारास कायदेशीर मान्यता मिळाली.

### ३.४.७ चीनमध्ये अफूच्या व्यापाराची संधी :

चीनचे दरवाजे जागतिक व्यापारासाठी खुले झाल्यानंतर मुंबईतील व्यापारी बहुतेक अफू आग्नेयकडील व पूर्वेकडील देशात निर्यात करू लागले. या व्यापारासाठी फारशी लोकांचा सहभाग वाढला होता. या काळात चीनच्या कॅंटन शहरात या व्यापाऱ्यांच्या चौदा कंपन्या किफायतशीर धंद्यांत गुंतल्या होत्या. ऐवढेच नव्हे, तर मुंबईतील काही व्यापारी या शहरात स्थाईक होऊन याच धंद्यात गुंतले होते. मुंबईमध्ये या काळात जमशेटजी जीजाभाई आणि कंपनी, दादीशेट यांच्यासारखे ख्यातनाम व्यापारी, डेव्हीड ससून कंपनी, या व्यक्तीने व कंपन्यानी या धंद्यात भरपूर गुंतवणूक गेली होती. कँटनमधील फारशी कंपन्यापैकी काही प्रमुख कंपन्या म्हणजे बेहरामजी भाभा, एदलजी फामजी आणि कंपनी व ई ॲण्ड जे. डी. लालकाका आणि कंपनी या कंपन्यानी या धंद्यामध्ये हाँगकाँगमध्ये आपले बस्तान बसविले होते.

### ३.४.८ अफूच्या निर्यातीतील महत्त्व :

मुंबईतून या काळात निर्यात होणाऱ्या अफूला महत्त्व प्राप्त झाले होते. मुंबईतील एकूण निर्याती पैकी ४२ टक्के निर्यात ही अफूची होत असे. मुंबईला दरवर्षी सरासरी या व्यापारातून एक ते तीन कोटी रुपयाचा फायदा होत असे. हाच फायद पुढे प्रतीवर्षी साडेसहा कोटीवर गेला. पुढे या व्यापाराला उतरतीकळा लागली व हा व्यापार बंद पडला. असे जरी असले तरी या व्यापाराने मुंबईचा मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा झाला. या व्यापारातून झालेल्या आर्थिक फायद्याचा वापर त्या काळात ब्रिटिशांनी मुंबईतील स्थापत्यकलेच्या विकासासाठी वापरला. या व्यापारातून मुंबईच्या आर्थिक जडण-घडणीला चालना मिळाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) मुंबईच्या अफूच्या व्यापारा बाबतची माहिती जाणून घ्या.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## ३.५ मुंबईतील वाहतूक व्यवस्था :

मुंबईतील वहातूक व्यवस्थेचा विचार करता ही वाहतुक व्यवस्था खऱ्या अर्थाने इंग्रजांच्या अगमनानंतर विकसीत झाली असे दिसून येते. तेव्हांचे मुंबई शहर निसर्गसौदर्याने नटलेले होते. हे शहर फक्त साडेचार चौरस मैल परिघाच्या किल्ल्याच्या आतील बाजूस वसलेले होते. किल्ल्याच्या तटबंदी बाहेर एक हजार यार्डाबाहेर कोणतेही बांधकाम करण्यास कोणालाही परवानगी नव्हती. मात्र तत्कालीन गव्हर्नरने आपल्या राहण्याचे ठिकाण परळला हलविण्याचे ठरवीले, तेव्हापासूनच मुंबईच्या विकासास चालना मिळाली.

मुंबईच्या वहातुक व्यवस्थेचा विचार करतांना आपणास वहातुकीचे मार्ग, वहातुकीची साधने व वहातुक व्यवस्थेचे व्यवस्थापन करणाऱ्या संस्था अथवा कंपन्या या घटकांचा आपल्याला विचार करावा लागेल. सर्वसाधारण वहातुकीचे रस्ते, रेल्वे व जलवाहतुक हे प्रकार त्या कालखंडात प्रचलीत होते. तर साधनांचा जर विचार केला तर टांगा, ट्राम, बस, रेल्वे, जहाज ही साधने प्रचलीत होती. यासर्व घटकांची माहिती आपण पुढील घटकांमध्ये सविस्तर पाहणार आहोत.

## ३.६ मुंबईतील रस्ते वाहतुक व या वाहतुक व्यवस्थेशी संबंधीत साधने :

मुंबईच्या रस्ते निर्मितीची प्रक्रिया १९ व्या शतकापासून सुरू झाली. या शतकाच्या आरंभापासून मुंबई व मुंबईच्या आजूबाजूच्या प्रदेशात कोणते रस्ते निर्माण झाले होते व या रस्त्यांना कोणत्या प्रकारची नावे देण्यात आली होती याची माहिती खाली नमुद करण्यात येणार

आहे. तसेच या कालखंडात कोणत्या प्रकारची वहातुकीची साधने प्रचलीत होती याचीही माहिती नमुद करण्यात येणार आहे.

### ३.६.१ मुंबईतील रस्ते :

- **ग्रँटरोड :** गव्हर्नर रॉबर्ट ग्रॅन्ट यांच्या स्मरणार्थ हा रस्ता बांधला. म्हणूनच या रस्त्याला ग्रॅन्टरोड असे नाव देण्यात आले. हा रस्ता उंचावर असल्याने या रस्त्याच्या दोन्ही बाजूस कठडा बांधण्यात आला होतो.
- **कुलाबा कॉजवे :** कुलाबा कॉजवे हा गव्हर्नर रॉबर्ट ग्रॅन्ट यांच्या आदेशावरून बांधण्यात आला होता. हा रस्ता १८३८ मध्ये बांधण्यात आला होता. हा रस्ता बनविण्यापूर्वी मुंबईहून कुलाब्याला जातांना लोकांना खाडीतून जीव धोक्यात घालून जावे लागत होते. मात्र या रस्त्याच्या निर्मितीने हा धोका टळला.
- **बोरघाटातील रस्ता :** गव्हर्नर माल्कम यांनी आपल्या कारकिर्दीत खोपोलीकडील बोरघाटातील रस्त्याचे उद्घाटन केल्याने व तयार रस्ता जनतेच्या रहदारीसाठी तबल दहा वर्षांनी खुला केला. या रस्त्याच्या निर्मितीने मुंबई व सह्याद्री पर्वत यांच्यामधील अडसर दूर झाला. त्यामुळेच मुंबई हे जगाच्या नकाशावरील एक लक्षवेधी शहर बनले. मुंबईतील कापूस उद्योग तेजीत आला. मुंबईत अनेक नवीन उद्योग उदयाला आले. या रस्ते निर्मितीचे श्रेय माल्कम व माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांना द्यावे लागले.

### ३.६.२ मुंबईतील वहातुकीची साधने :

मुंबईतील रस्ते वाहतुकीच्या साधनांचा विचार करतांना आपणास गरजेतून योजनेतून ही साधने निर्माण झाल्याची माहिती उपलब्ध आहे. घोडा ट्राम, विजेवर चालणारी ट्राम व पुढे बस असा या साधनांचा प्रवास आहे.

- **घोडा ट्राम :** घोड्याचा वापर करुन जी ट्राम चालवली जात होती त्या ट्रामला घोडा ट्राम असे म्हटले जात होते. घोड्याची ट्राम एखाद्या मोठ्या खेळण्यासारखी दिसत असे. घोड्याचा वापर करून चालवली जाणारी ही ट्राम १८७४ मध्ये मुंबईत सर्व प्रथम आली. मुंबईकरांनी या ट्रामला 'व्हिक्टोरिया'हे भारदस्त नाव दिले होते. काही मुंबईकर या ट्रामला मराठीत टांगा असे म्हणत होते. रस्त्यावरून जेव्हा ही ट्राम धावू लागली तेव्हा लोक आाश्चर्याने थक्क झाले. तीन आण्यात कुलाबा ते पायधुणी व अर्ध्या आण्यात पायधुणी ते बोरीबंदर असा प्रवास करता येत असे. सुरवातीच्या पहिल्या पाच महिन्यात घोड्याच्या ट्रामला तिकीट हा प्रकार नव्हता.
- **विजेवर चालणारी ट्राम :** घोडा ट्राम नंतर ७ मे १९०७ रोजी मुंबईत दुसरी महत्त्वपूर्ण ट्राम चालू लागली ती ट्राम म्हणजे विजेवर चालणारी ट्राम होय. पहिली विजेवर चालणारी ट्राम मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य कचेरीपासून क्रॉफर्ड मार्केटपर्यंत सुरू झाली आणि मुंबईत विजेवर चालणाऱ्या ट्रामचे युग अवतरले. पुढे ही विजेवर चालणारी ट्राम किंग्ज सर्कलपर्यंत धावू लागली.
- **बस :** विजेवर चालणाऱ्या ट्राम नंतर मुंबईच्या वाढत्या शहरीकरणामुळे विजेवर चालणाऱ्या ट्रामला रजा देण्यात आली. जुलै १९२६ पासून मुंबईत बस वहातुक सुरू झाली. मुंबईतील

पहिली बस कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट ह्या मार्गावरून सुरू झाली. प्रवासी वहातुकीबरोबरच सुरूवातीला पोस्ट साहित्याच्या वहातुकीसाठीसुद्धा बसचा वापर होऊ लागला. नंतर बदलत्या परिस्थितीनुसार बसने पोस्ट साहित्याची वहातुक बंद केली. पुढे १९३७ मध्ये बसच्या रचनेत परिवर्तन होऊन दुमजली बसगाड्या सुरू झाल्या. वहातुकीसाठी बसचा वापर जास्त होऊ लागल्याने बसच्या संख्येतही वाढ झाली. स्वातंत्र्यानंतर मुंबई महानगरपालिकेने ही कंपनी ताब्यात घेतली व कंपनीचे नवीन नाव बॉम्बे इलेक्ट्रीकल सप्लाय ॲण्ड ट्रान्सपोर्ट कंपनी असे ठेवले.

**आपली प्रगती तपासा :**

१) मुंबईतील रस्त्यांची माहिती जाणून घ्या.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

२) मुंबईतील वाहतुकीच्या साधनांची माहिती जाणून घ्या.

______________________________

______________________________

______________________________

## ३.७ मुंबईतील रेल्वे वाहतूक व मार्ग :

मुंबईतील वहातूक व्यवस्थेचा विचार करत असतांना सर्वप्रथम आपण रस्ते वहातुक व रस्ते वाहतुकीशी संबंधीत साधनांचा विचार केला. या घटकात मुंबईतील रेल्वे वहातुकीचा आरंभ रेल्वे वहातुक व रेल्वे मार्ग या बाबतची माहिती जाणून घेणार आहोत.

### ३.७.१ मुंबई येथे वहातुक निर्मितीचा इतिहास :

मुंबईत रेल्वे सुरू व्हावी यासाठी सर्वप्रथम भारतीयाने प्रयत्न सुरू केले. याचा आरंभ मुंबईतून झाला. नाना शंकर सेठ, जमशेदजी जीजीभाई या लोकांनी यासाठी सर्वप्रथम प्रयत्न केले व मुंबईत १८४३ मध्ये ग्रेट ब्रेस्टन रेल्वे कंपनी स्थापन झाली. या लोकांनी रेल्वे योजना हाती घेऊन परवानगी मागणारा अर्ज सरकारकडे रवाना केला. त्यानंतर इस्ट इंडिया कंपनीने या योजनेची पहाणी करण्यासाठी एक समिती नेमणे या योजनेच्या प्रयत्नांचा शुभारंभ केला. ग्रॅप क्लार्क हा इंजिनिअर या कामासाठी भारतात आला.

भारतीयांनी जेव्हा रेल्वेसाठी प्रयत्न सुरू केले तेव्हाच ब्रिटीशांचे प्रयत्नसुद्धा भारतीय रेल्वेसाठी होते. मात्र या बाबतची माहिती एकमेकांना नव्हती. ब्रिटीशांची ग्रेट इंडियन पेनेनसुला कंपनी जेव्हा भारतात आली तेव्हा त्यांना भारतातील ग्रेट ब्रेस्टन रेल्वे कंपनीची व कंपनीच्या योजनेची माहिती झाली. परिणामी या दोन कंपन्यामध्ये सर्वप्रथम या गोष्टीवरून संघर्ष झाला. नंतर विचार मंथनातून या दोन्ही कंपन्यानी भारतीय रेल्वेसाठी एकत्र काम करण्याचे ठरविले.

दोन्ही कंपन्यांनी १८४५ मध्ये मुंबई, ठाणे, कल्याण लोहमार्गासाठी अनुमती मिळविली. कंपन्यांनी समाज प्रबोधन व जनजागृतीसाठी ''मुंबईसाठी रेल्वेची आवश्यकता'' नावाची पुस्तीका प्रकाशित केली. स्थानिक वर्तमानपत्रातूनही रेल्वेच्या आवश्यकतेबाबत माहिती प्रकाशित होऊ लागली. कंपनी कार्य व जनजागृतीला मिळालेला प्रतिसाद या जोरावरच या कार्याला प्रोत्साहन मिळाले.

सुरुवातीला मुंबई व ठाणे मार्गाचे काम आटोपल्यानंतर १६ एप्रिल १८५३ या दिवशी दुपारी ३.३० वाजता ५०० पाहुण्यांना बसून तोफांची सलामी घेत, बॅण्डच्या आवाजात आशिया खंडातील पहिली रेल्वेगाडी मुंबईहून ठाण्याला रवाना झाली. भारताच्या दळणवळणाच्या इतिहासात १६ एप्रिल हा दिवस महत्त्वाचा मानला जातो.

### ३.७.२ वाहतूक :

मुंबईत रेल्वे वाहतुकीचा आरंभ झाल्या नंतर या रेल्वेमधून माल वहातूक, प्रवासी वहातूक, टपाल वहातुक सुरू झाली तसेच रेल्वे प्रकल्पाच्या दृढीकरणासाठीसुद्धा या वाहतूक व्यवस्थेचा फायदा झाला.

### ३.७.३ मार्ग :

मुंबई शहराच्या विकासाबरोबरच रेल्वेच्या विकासाची प्रक्रियाही झपाट्याने सुरू झाली आणि रेल्वेमार्ग विस्तारीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. या कार्यातून निर्माण झालेल्या मार्गांची माहिती खाली देण्यात आली आहे.

- **मुंबई ते ठाणे :** सर्व प्रथम रेल्वमार्ग म्हणून या मार्गाकडे पाहिले जाते. ह्रेट ब्रेस्टन रेल्वे कंपनी व ग्रेट इंडियन पेनेनसुला कंपनी या कंपन्यांच्या संयुक्त कार्यातून हा मार्ग तयार झाला होता.
- **मुंबई ते कल्याण :** मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड एल्फिन्स्टन यांनी मुंबई ते कल्याण रेल्वे बांधणी प्रकल्पास सुरुवात केली. या रेल्वेच्या बांधकाम प्रसंगी अनेक समस्या आल्या होत्या. या कार्यामध्ये जॉन बर्कल यांचे योगदान महत्त्वाचे आहे. कारण बर्कलने ठाण्याच्या खाडीवर प्रशस्त पुल बांधला व कळव्याचा डोंगर पोखरून बोगदा खोदून काढला. त्यामुळे मुंबई - कल्याण रेल्वे वहातूक १ मे १८५४ पासून सुरू झाली.
- **मुंबई ते पुणे :** मुंबई ते पुणे हा रेल्वे मार्ग नियमित करण्यासाठी इंग्रज अधिकाऱ्यांना दोन महत्त्वाचे घाट पूर्ण करावयाचे होते. या कामीही जॉन बर्कलने महत्त्वपूर्ण कामगिरी करत बोरघाट व खंडाळा घाट तसेच नाशिकमधील थळगाटामध्ये महत्त्वपूर्ण बोगदे तयार करून या मार्गाचे काम पूर्णत्त्वाला नेले. या मार्गाचा शुभारंभ तत्कालीन गव्हर्नर बाईल फ्रिअर यांनी २१ एप्रिल १८५३ मध्ये केला.

- **मुंबई ते गुजारत :** हा भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण मार्ग मानला जातो. मुंबईला गुजरात बरोबर जोडण्यासाठी हा मार्ग तयार करण्यात आला होता. यासाठी बॉम्बे बडोदा ॲण्ड सेंट्रल इंडिया कंपनीची स्थापना करण्यात आली होती. या कंपनीने हा मार्ग बनविला. परिणामी या मार्गामुळे मुंबई व गुजरात ही दोन औद्योगिक शहरे एकमेकांना जोडली गेली. या मार्गाचा फायदा असंख्य लोकांना झाला.

**आपली प्रगती तपासा.**

१) मुंबईच्या रेल्वे इतिहासाची माहिती जाणून घ्या.

---

---

---

२) मुंबईतील रेल्वे वाहतूक व मार्गाबद्दलची माहिती जाणून घ्या

---

---

---

## ३.८ मुंबई बंदराशी संबंधीत जलमार्ग व साधने :

मुंबई बंदराला लाभलेला विस्तृत व खोल समुद्र या गोष्टीमुळे या बंदरातून मोठ्या प्रमाणात त्या कालखंडात जलवाहतुक होत होती. या बंदराच्या भूभागावर धक्के, गोद्या, गोदाम बसल्याने या बंदराला व्यापारी व आर्थिक दृष्टीकोनातून महत्त्व प्राप्त झाले होते. या बंदरापासून जे जलमार्ग सुरू होते व या जलमार्गातून वाहतूक करण्यासाठी जी साधने वापरली जात होती. त्याची माहिती या घटकात नमुद करण्यात आली आहे.

**३.८.१ जलमार्ग :** जलमार्गाचा विचार करता सर्वप्रथम मुंबई युरोप या जलमार्गातून वहातुक सुरू झाली. जे. एच विल्सन या जहाजाने ही सफर सुरू झाली व मुंबई युरोप या जलवहातुक क्षेत्रात अमुलाग्र क्रांती घडून आली. पुढे सुवेझ कालव्याच्या निर्मितीने या मार्गामध्ये परिवर्तन होऊन सुधारणा झाल्या.

**३.८.२ जहाज :** या कालखंडात जहाज हे जलवाहतुकीचे महत्त्वाचे साधन होते. प्रवासी व मालवाहतुक जहाजांमधून होत असे. मुंबईतील जलवाहतुक प्रक्रियेमुळे जहाज बांधणी उद्योगास चालना मिळाली होती. १७३६ ते १८८५ पर्यंत वाडीयाच्या नऊ पिढ्यांनी चारशेच्यावर जहाजे बांधून नाव प्रस्तापित केले होते. नंतर या उद्योगावर इंग्रजांचे वर्चस्व प्रस्तापित झाले.

**३.८.३ इतर साधने :** या कालखंडात परंपरागत वहातूकीसाठी मचवा, होडी, तराफा, बोट ही वाहतुकीची साधनेही उपलब्ध होती. मात्र यांचा वापर जवळच्या प्रवास वाहतूकीसाठी केला जात होता.

**आपली प्रगती तपासा.**

१) मुंबईतील जलवाहतूक व जलवाहतूकीच्या साधनांची माहिती जाणून घ्या.

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

## ३.९ मुंबई बंदराचा विकास :

ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीने मुंबईचा राजकीय वर्चस्वाबरोबरच आर्थिक वर्चस्वालाही महत्त्व दिले. यासाठी त्यांनी रस्ते, रेल्वे व जलवाहतुकीला महत्त्व दिले. आयातीपेक्षा मालाच्या निर्यातीला महत्त्व दिले. त्यामुळे आपोआपच मुंबई व्यापार उलाढालीचे केंद्र बनले व मुंबईला स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले. कर्नाक बंदर, क्लेअर बंदर, आपोलो बंदर, पहिली ड्राय डॉक्स गोदी, पहिली ओली गोदी, प्रिन्सेस डॉकची उभारणी आदी गोदी ठिकाणाने व बंदराने मुंबईच्या व्यापारी उलाढालीना महत्त्व दिले. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे कापूस व अफू निर्यातीने मुंबईला आर्थिकदृष्ट्या समृद्ध बनवले. त्यामुळेच मुंबईचा आर्थिक विकास होण्यास मदत झाली.

## ३.१० मुंबई बंदराचे मुंबईच्या आर्थिक विकासातील योगदान :

मुंबईच्या बंदरांचे मुंबई शहराच्या आर्थिक विकासातील योगदान लक्षात घेता आपणास पुढील घटकांच्या बाबतीत मुंबईचा विकास झाला आहे असे दिसते. कर रुपाने उपलब्ध होणारे उत्पन्न वाढले, भांडवल गुंतवणूकीचे प्रमाण वाढले. उद्योगांच्या निर्मितीमध्ये वाढ झाली, व्यापारी पेठा वाढल्या, दळणवळणाच्या साधनात सुधारणा झाल्या, असंख्य लोकांना रोजगार उपलब्ध झाले. कच्च्या मालाच्या आयात-निर्यातीच्या उलाढाली वाढल्या. त्यामुळेच मुंबई आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाली.

## ३.११ सारांश :

मुंबई बंदराचा उदय व विकास हे दोन घटक जाणून घेत असतांना आपण सर्वप्रथम मुंबई बंदराचे स्वरूप कसे आहे हे जाणून घेतले. त्यानंतर मुंबई बंदरातून निर्यात होणारा कापूस व त्याचा या बंदराला झालेला आर्थिक फायदा व त्यामुळे बंदराला प्राप्त झालेले महत्त्व आदी माहिती जाणून घेतली.

त्या नंतर अफूच्या व्यापाराने मुंबईची तत्कालीन कालखंडात भरभराट कशी केली व या व्यापाराचा मुंबईला फायदा कसा झाला या बाबतची माहिती जाणून घेतली.

मुंबईतील वहातूक व्यवस्थेचा विचार करता मुंबईतील रस्ते वाहतुक, रेल्वे वाहतुक व जलवाहतूक या बाबतची माहिती जाणून घेतली. तसेच या वाहतुक व्यवस्थेशी संबंधीत साधने यांची माहिती पाहिली. त्यानंतर यासर्व व्यवस्थेचा मुंबई बंदराच्या आर्थिक विकासास काय फायदा झाला याची माहिती जाणून घेतली. तसेच या घटकात मुंबई बंदराचा विकास व या बंदराचे आर्थिक विकासातील योगदान या बाबतची माहिती जाणून घेतली.

## ३.१२ दिर्घोत्तरी प्रश्न :

१) मुंबई बंदरातील कापूस व्यवसायाची माहिती लिहा.
२) मुंबई बंदरातील अफू व्यवसायाची माहिती लिहा.
३) मुंबईच्या वाहतुक व्यवस्थेचा संक्षिप्त आढावा घ्या.
४) मुंबई बंदराची माहिती सांगून या बंदराचे आर्थिक विकासातील योगदान स्पष्ट करा.

## ३.१३ संदर्भ सूची :

१) एम. डी. डेव्हीड - ऐक मुंबई तुझी कहाणी
२) न. र. फाटक - मुंबई नगरी
३) यशवंत रायकर - मुंबई ज्ञात व अज्ञात

❖❖❖❖

# ४

# सुधारणा चळवळीचे प्रवाह

**घटक रचना :**

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ प्रार्थना समाज
४.३ सत्यशोधक समाज
४.४ भारतीय सामाजिक परिषद
४.५ स्त्री उद्धाराचे कार्य
४.६ समारोप
४.७ प्रश्न

## ४.० उद्दिष्ट्ये :

- प्रार्थना समाजाची शिकवण / तत्त्वज्ञान समजून घेणे.
- प्रार्थना समाजाचे कार्य अभ्यासणे.
- सत्यशोधक समाजाची तत्त्वे अभ्यासणे.
- सत्यशोधक समाजाचे कार्य समजून घेणे.
- भारतीय सामाजिक परिषदेचे कार्य अभ्यासणे.
- स्त्री उद्धाराची चळवळ समजून घेणे.

## ४.१ प्रस्तावना :

महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकात एक नवसुशिक्षितांची पिढी उदयास आली होती. त्यांनी पाश्चात्य राष्ट्रातील सामाजिक संस्थांचे व विचार प्रणालीचे आकलन केले होते. ब्रिटिशांच्या येथील सत्तेचे स्वरुप त्यांना जाणवू लागले होते. त्यामुळे ब्रिटिशांचा साम्राज्यवाद, त्यांची आर्थिक धोरणे, पारतंत्र्यातील समाजाचे जीवन, स्वातंत्र्याची आवश्यकता व परकीय सत्ता दूर करण्यासाठी सामाजिक एकता, समानता इत्यादींची जाणीव त्यांना झाली. त्यामुळेच दादोबा पांडुरंग, रामकृष्ण परमहंस, बाबा पद्मनजी, भाऊ महाजन इत्यादी समाज सुधारकांनी पुढाकार घेऊन सामाजिक सुधारणा चळवळीचे कार्य प्रारंभ केले. त्यानंतर महाराष्ट्रात ज्या धार्मिक संघटनांची स्थापना झाली त्यापैकीचं एक म्हणजे प्रार्थना समाज होय.

महाराष्ट्राच्या समाज सेवेच्या ध्येयाने भारावून जाऊन सर्व जीवन समाजसेवेसाठी समर्पित करणारे महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केलेली होती.

प्रार्थना समाज व सत्यशोधक समाज या सामाजिक संस्थाचे कार्य व विचारप्रणाली याचा सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

त्याचबरोबर सामाजिक सुधारणेच्या कार्यात भारतीय सामाजिक परिषदेद्वारे देखील अतिशय मोलाचे सहकार्य झाल्याचे आढळते. यामध्ये विशेषतः महादेव गोविंद रानडे यांनी राजकीय सुधारणाबरोबर सामाजिक सुधारणांचा जोरदार पुरस्कार केला होता.

स्त्रियांच्या उद्धारासाठी या काळात अनेक समाजसुधारकांनी व सामाजिक संस्थानी आपापल्या परीने प्रयत्न केल्याचे आढळते. त्यामुळेच स्त्रियांना शिक्षण देणे, हुंडाबंदी, केशवपन, बालविवाह, सतीप्रथा इत्यादी स्त्रीविषयक प्रश्नांची समर्थपणे उकल झाली आणि भारतीय स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य सफल झालेले आढळते.

या सर्व सामाजिक सुधारणांचा व त्यात मोलाचे सहकार्य करणाऱ्या प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, भारतीय सामाजिक परिषद यांचा व त्याचबरोबर स्त्री उद्धाराच्या कार्याचा खालीलप्रमाणे सखोल अभ्यास केला गेला आहे.

## ४.२ प्रार्थना समाज :

परमहंस सभेतील काही विचारवंतांना व इतरांना हिंदू धर्मातील वाईट प्रथा गेल्या पाहिजेत असे वाटत होते. धर्मसुधारणेच्या चळवळीला गती दिली पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. अशा वातावरणाच्या वेळीच म्हणजे इ. स. १८६४ मध्ये ब्राम्हो समाजाचे प्रवर्तक केशवचंद्रसेन मुंबईत आले. त्यांनी धर्मसुधारणेविषयी व्याख्याने दिली. त्यांच्या व्याख्यानाचा व कार्याचा प्रभाव दादोबा पांडुरंग व त्यांचे बंधू डॉ. आत्माराम पांडूरंग यांच्यावर पडला. त्यानंतर दादोबा पांडूरंग व डॉ. आत्माराम पांडूरंग यांच्या पुढाकारानेच ३१ मार्च १८६७ मध्ये मुंबई येथे प्रार्थना समाजाची स्थापना झाली.

**प्रार्थना समाजाचे तत्त्वज्ञान :**

प्रार्थना समाजाचे तत्त्वज्ञान पुढीलप्रमाणे होते.

१) परमेश्वर एक असून तो विश्वाचा निर्माता आहे. तो निराकार आहे. तो दयाळू आहे. तो सर्वांवर प्रेम करतो.
२) सत्य, सदाचार व भक्ती हे परमेश्वराच्या उपासनेचे खरे मार्ग आहेत. या मार्गानेच गेल्यानंतर तो प्रसन्न होतो.
३) प्रार्थनेमुळे भौतिक फलप्राप्ती होत नाही, मात्र प्रार्थनेमुळे आध्यात्मिक उन्नति होते.
४) परमेश्वर अवतार घेत नाही. त्याने कोणताही धर्मग्रंथ लिहिला नाही.
५) मूर्तिपूजा परमेश्वरास मान्य नाही.

६) सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. म्हणूनच सर्वांनी बंधुत्त्वाच्या भावनेने एकमेकांशी व्यवहार करावा.

**प्रार्थना समाजाचे कार्य :**

प्रार्थना समाजाने अस्पृश्यता निर्मूलन, स्त्रीशिक्षण, विधवा विवाह, आंतरजातीय विवाह इत्यादी क्षेत्रात बहुमोल कामगिरी केली. श्री. आर. जी. भांडारकर व न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे हे प्रार्थना समाजाचे मुख्य आधारस्तंभ होते. न्या. रानडे यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करुन भारतीय जनतेत राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार केला. त्यांनी विधवा विवाह मंडळ स्थापन केले. ना. म. जोशी यांनी "सोशल सर्व्हिस लीग" स्थापून मजुरांची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न केले. देशसेवेसाठी चांगले कार्यकर्ते निर्माण करण्याच्या उद्देशाने नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी "सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी" ही संस्था स्थापन केली. या संघटनेने अस्पृश्यता निर्मूलनच्या क्षेत्रात फार मोलाचे कार्य केले.

अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लास मिशन" ही संस्था स्थापन केली. या संघटनेने अस्पृश्यता निवारणाच्या क्षेत्रात फार मोलाचे कार्य केले.

प्रार्थना समाजाच्या वतीने पंढरपूर येथे "अनाथ बालकाश्रम" काढण्यात आला. समाजाच्या गरजेच्या दृष्टीने ही भरीव कामगिरी होती. मुलींच्यासाठी स्वतंत्र शाळा सुरु केल्या. "आर्य महिला समाज" ही स्त्रियांसाठी कार्य करणारी संस्था चालू करण्यात आली. ४ मे १८७३ रोजी प्रार्थना समाजाने "सुबोध पत्रिका" हे त्यांचे मुखपत्र सुरु केले होते. या मुखपत्रातून सामाजिक व राजकीय विचार मांडले जात होते. मजुरांच्यासाठी पहिली रात्रशाळा मुंबईमधील चेऊलवाडी येथे भिकोबा लक्ष्मण चव्हाण यांच्या पुढाकाराने इ. स. १८७६ मध्ये काढण्यात आली होती. त्यानंतर मुंबईच्या इतर भागात देखील रात्रशाळा काढण्यात आल्या. इ. स. १८९० रोजी मुंबईतील मदनपुरा येथे अस्पृश्यांसाठी शाळा काढण्यात आली. इ. स. १८७६-७७ च्या दुष्काळाच्या वर्षी प्रार्थना समाजाने दुष्काळ पीडितांसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले होते. अशा रीतीने प्रार्थना समाजाने एक भरीव सामाजिक कार्य केल्याचे आढळते. प्रार्थना समाजाची तत्वे पटवून देण्यासाठी, या समाजाबद्दल लोकांना असलेल्या निरनिराळ्या शंकाचे निरसन करण्यासाठी न्या. रानडे यांनी "Theist's Confesion of faith" हा विचार प्रवर्तक ग्रंथ लिहीला.

**प्रार्थना समाजाच्या कार्याचे मूल्यमापन :**

प्रार्थना समाजाला विचारवंत आणि स्वार्थत्यागी नेतृत्व लाभूनही ठराविक शहरापुरतेच त्याचे कार्य पोहचू शकले. त्याचे कारण म्हणजे त्यातील सुधारक मिशनऱ्यांचे अनुकरण करीत होते. त्यामुळे हिंदूना त्यांच्या कार्याविषयी कधीच आपुलकी वाटली नाही. त्याचबरोबर प्रार्थना समाजाच्या प्रवर्तकांच्या विचारात आणि कृतीत बऱ्याच वेळी विसंगती दिसून येई. हा समाज ब्रिटीश सत्तेचे समर्थन करी. त्यामुळे त्याची व्याप्ती वाढती नाही. मात्र त्यांच्या कार्यामुळे धर्मपरिवर्तन चळवळ हळूहळू महाराष्ट्रात वाढत होती. प्रार्थना समाजाचे नेतृत्व बुद्धीजीवी लोकांकडे होते. बहुजन समाजासाठी त्यांनी कार्य केले, पण ते बहुजन समाजाशी एकरूप झाले नाहीत.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रार्थना समाजाची स्थापना कोठे व कधी झाली ?
२) प्रार्थना समाजाची तत्त्वे सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ४.३ सत्यशोधक समाज :

**मा. ज्योतिबा फुले यांचा अल्प परिचय :**

महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे अग्रणी व “महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर” म्हणून मा ज्योतिबा फुले यांना ओळखले जाते. ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे त्यांचा जन्म झाला. मा. फुले यांचे संपूर्ण नाव जोतीराव गोविंदराव फुले असे होते. त्यांचे मूळ अडनाव गोऱ्हे असून ते क्षत्रिय माळी समाजाचे होते. ज्योतिबा यांनावयाच्या सातव्या वर्षी शाळेत घातले होते. मात्र गोविंदरावाचा इतरांनी बुद्धभ्रम केल्यामुळे जोतिबांना शाळेतून काढून टाकले परंतु नंतर मात्र त्यांच्या शेजारी राहणारे उर्दू शिक्षक गफार बेग मुनशी आणि धर्मोपेशक लिटीलसाहेब यांच्या आग्रहामुळे गोविंदरावांनी ज्योतिबांना पुन्हा शाळेत टाकले. त्यानंतर ज्योतिबांनी शिक्षणाच्या बाबतीत माघार घेतली नाही.

सामाजिक क्रांतीच्या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी अमूल्य असे सामाजिक कार्य केले. या सामाजिक कार्यासाठी त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधन समाजाचा अभ्यास खालीलप्रमाणे करता येईल.

सामाजिक विषमतेबद्दल महात्मा ज्योतिबा फुले यांचे मन पेटून उठले होते. ब्राम्हण वर्गास मिळणाऱ्या सवलती, अधिकार, सत्ता, दर्जा ते सहजासहजी सोडणार नाहीत. त्यामुळे त्यांच्या वर्चस्वाविरुद्ध संघर्ष केला पाहिजे असे त्यांचे मत होते. समाजाला अज्ञान, अंधःकाराच्या महानिद्रेतून जागे करणयासाठी, सत्यशोधण्यासाठी व मानवधर्म स्थापण्यासाठी व आपल्या विचारसरणीला संघटनेच्या माध्यमातून मूर्त स्वरुप देण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे बैठक बोलवली. संपूर्ण महाराष्ट्रातून ६० प्रतिनिधी या सभेला आले. या सर्वांसमोर फुले यांनी आपले विचार मांडले. अत्यंत तळमळीने भाषण करुन संस्थेच्या स्थापनेची पार्श्वभूमी कार्यकर्त्यांसमोर विशद केली. विचार-विमर्श होऊन त्याच दिवशी ‘सत्यशोधक समाजाची’ स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रात सर्वसामान्यासाठी आणि त्यांच्यामार्फत व त्यांच्यासाठी पोहोचलेली ही पहिलीच चळवळ होती. सर्वानुमते जोतीराव फुले अध्यक्ष व कोषाध्यक्ष तर श्री. नारायण गोविंदराव कडलक यांची कार्यवाह म्हणून निवड झाली.

**सत्यशोधक समाजाची तत्त्वे :**

महात्मा जोतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची तत्त्वे पुढीलप्रमाणे होती.

१) ईश्वर एकच असून तो निर्गुण, निराकार आहे.

२) सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत.

३) सर्व शक्तिमान अशा परमेश्वराची भक्ति किंवा प्रार्थना करण्याचा प्रत्येक मानवाला अधिकार आहे.

४) परमेश्वराची भक्ती करण्यासाठी कोणत्याही मध्यस्थांची गरज नाही; म्हणून कोणत्याही व्यक्तिला पुरोहित किंवा धर्मगुरु यांच्या मध्यस्थीशिवाय आपल्या प्रिय परमेश्वराची उपासना किंवा भक्ती करता येते.

५) मानवाला जातीने नव्हे तर गुणाने श्रेष्ठत्त्व प्राप्त होते.

६) पुनर्जन्म, कर्मकांड, जपजाप्य इत्यादी गोष्टी अज्ञानमूलक आहेत. तसेच त्या कनिष्ठ वर्गाच्या पिळवणूकीचे कारण आहेत.

७) कोणताही धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित नाही. सर्व धर्मग्रंथांची निर्मिती मानवानेच केली आहे.

सत्यशोधक समाजाची चळवळ कोणत्या एका खास समाजाच्या वर्गाविरुद्ध नव्हती. बहुजन समाजात जागृती करणे हेच या समाजाचे उद्दिष्टे होते. ब्राह्मणांचे सामाजिक वर्चस्व या चळवळीमुळे हळुहळु कमी झाले. या समाजाने लोकशिक्षण, तमाशे, लावण्या, सवाल जबाबी, कीर्तने या माध्यमातून दिले.

सत्यशोधक समाजाच्या सभासदाने घ्यावयाची शपथ सत्यशोधक समाजाच्या प्रत्येक सभासदाने पुढीलप्रमाणे शपथ घ्यावी लागत असे.

“सर्व मानवप्राणी एकाच देवाची लेकरे आहेत; अशा बुद्धीने मी त्यांच्याशी वागेन. परमेश्वराची पूजा, भक्ती अगर ध्यानसाधना करतेवेळी अगर धार्मिक विधीच्यावेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही. दुसऱ्यांनाही तसेच वागण्याबद्दल मी उपदेश करीन. सत्यरुपी परमेश्वरास साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे. या प्रतिज्ञेप्रमाणे वागण्यास मला सामर्थ्य येईल, अशा प्रकारे आयुष्यक्रम गुजारण्यास योग्य प्रकारे तो मला मदत करो.”

**सत्यशोधक समाजाचे कार्य :**

१) ज्या गावी सत्यशोधक समाजाच्या शाखा सुरु करण्यात आल्या होत्या त्या गावात दर आठवड्यातून एकदा सभा घेतल्या जात असत. या सभांमधून बहुजन समाजाच्या जिव्हाळ्याचा प्रश्नांचा उहापोह केला जात असे. त्यामध्ये इथल्या कनिष्ठ जातीच्या लोकांत शिक्षणाचा प्रसार घडवून आणणे, सर्व प्रकारचे धार्मिक विधी भटभिक्षकांच्या पौरोहित्याशिवाय पार पाडणे, बहुजन समाजातील सामान्य लोकांना ज्योतिष, भूतपिशाच्च, जादूटोणा या सारख्या गोष्टींच्या भितीपासून मुक्त करणे इत्यादी बाबींना चालना देण्याविषयी चर्चा होत असे. या खेरीज, समाजातील जातिभेद, उच्चनिचता मूर्तिपूजा याविरुद्ध जोरदार प्रचार सत्यशोधक समाजाच्या सभामधून केला जात असे.

२) सत्यशोधक समाजाने शिक्षणावर बराच भर दिला होता. बहुजन समाजाच्या दारिद्र्याचे आणि मागासलेपणाचे एक महत्त्वाचे कारण त्यास शिक्षणापासून वंचित ठेवले गेले होते हे होय, असे महात्मा जोतिबा फुल्यांचे प्रतिपादन होते. त्यांनी बहुजन समाजाच्या मुलांमुलीत शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न चालविले. त्यासाठी गरजू व लायक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था केली. विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना उत्तेजन देण्यासाठी समाजाने वक्तृत्त्व स्पर्धा व निबंध स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

३) सत्यशोधक समाजाने ब्राम्हण-पुरोहिताशिवाय विवाह लावण्याचा उपक्रम सुरु केला. काही सत्यशोधक कार्यकर्त्यांनी आपल्या मुलामुलींचे आणि नातेवाईकांचे विवाह ब्राह्मण-पुरोहिताशिवाय लावून दिले. ही त्या काळातील अत्यंत क्रांतीकारक अशी घटना होती.

४) सन १८७७ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला असताना; दुष्काळ पीडितांच्या मुलांची सोय करण्यासाठी सत्यशोधक समाजाच्या वतीने एक बालाश्रम उघडला होता. त्याच्या मदतीसाठी समाजाच्या सभासदांना विनंती करणारे निवेदन सत्यशोधक समाजाचे चिटणीस या नात्याने स्वतः महात्मा फुले यांनी काढले होते.

५) पुणे जिल्ह्यातील जुन्नरच्या शेतकऱ्यांनी सावकार व जमीनदार यांच्याकडून होत असलेली जुलूम जबरदस्ती व पिळवणूक या विरुद्ध चळवळ सुरु केली. त्यांनी सावकार व जमीनदार यांच्या जमिनी कसण्यास नकार दिला. शेतकऱ्यांच्या या चळवळीचे नेतृत्त्व महात्मा फुल्यांनी केले आणि त्यांनी गरीब शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला.

६) इंग्लंडच्या महाराणीचे चिरंजीव व 'ड्यूक ऑफ कनॉट' यांच्या भारतभेटीच्या वेळी मा. फुले शेतकऱ्यांच्या वेशात म्हणजे, डोक्यास मुंडासे, साधा अंगरखा, खांद्यावर घोंगडी, हातात काठी व पायात फाटक्या वहाणा घालून भेटीला गेले व तेथे त्यांनी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून निर्भिडपणे सांगितले, "येथील जनतेचे आपणास हित करावयाचे असेल तर त्यांचे अज्ञान घालवा. त्यांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळण्याची सोय करा."

७) मा. ज्योतिबा फुले यांनी मजूरांच्या स्थितीचे सुक्ष्म अवलोकन केले होते. अधिकारी व ठेकेदार त्यांचे कसे शोषण करतात हे त्यांच्या लक्षात आले. त्यांच्यावरील अन्यायाला मा. ज्योतिबा फुले यांनी वाचा फोडली व सत्यशोधक समाजाचे खंदे पुरस्कर्ते नारायण लोखंडे यांनी मा. फुले व सत्यशोधक समाजाच्या प्रेरणेने मुंबईच्या गिरणी कामगारांची मिल हॅंड असोसिएशन सोसायटी" नावाची संघटना स्थापन करून कामगारांचे प्रश्न सरकारच्या निदर्शनास आणून दिले. आठ वर्षाच्या आतील मुलांना कामावर घेऊ नये, स्त्रियांना विशेष सवलती द्याव्यात, कामगारांना मध्यांतरी विश्रांतीसाठी सुट्टी इत्यादी बाबतीत त्यांनी सरकारला निवेदन सादर केले.

**आपली प्रगती तपासा :**

१) सत्यशोधक समाजाची स्थापना कोणी केली ?
२) सत्यशोधक समाजाचे सभासद कोणती शपथ घेत असत ?

## ४.४ भारतीय सामाजिक परिषद :

एकोणिसाव्या शतकात न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात सुरु केलेली एक चळवळ म्हणजे भारतीय सामाजिक परिषद होय. १८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर काँग्रेस ही पूर्णतः राजकीय संस्था असावी असा निर्णय काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनात घेतला गेल्याने समाज सुधारण्यासाठी व त्या सुधारण्याच्या प्रचारासाठी स्वतंत्र मंच उभा करण्याची गरज न्या. रानडे यांना वाटली. डिसेंबर १८८५ मध्ये मुंबईला काँग्रेसची बैठक झाली आणि त्या बैठकीतच सामाजिक परिषदेचा पाया घातला गेला. दि. ब. रघुनाथराव, काशिनाथ त्रिंबक तेलंग यांची सामाजिक सुधारणेवर अत्यंत परिणामकारक भाषणे झाली. या बैठकीत न्या. रानडे यांनी संस्कृत धर्मग्रंथातील अनेक वचनांच्या आधारे प्राचीनकाळी बालविवाहाची पद्धत नव्हती, बालविवाहाला पुष्टी देणारी शास्त्रवचने नंतर जोडलेली आहेत हे त्यांनी दाखवून दिले. न्या. रानडे यांनी भारतात ठिकठिकाणी पत्रे लिहून सुधारणेच्या संस्था काढण्यासाठी लोकांमध्ये उत्साह निर्माण केला. या परिषदेचे चिटणीस दि. ब. रघुनाथराव असले तरी न्या. रानडे यांनाच सर्व काम पहावे लागे. या चळवळीत रानडेंच्या प्रोत्साहनामुळे इनामदार, जहागिरदार, दक्षिणेचे संस्थानिक, बडोदा व इंदूरच्या महाराजांनी सदस्यत्त्व व आश्रयदाते पद स्वीकारले. मिरजेच्या श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांनी या संस्थेचे अध्यक्षपद स्वीकारले. हिंदूप्रमाणे मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन हे ही या परिषदेचे सदस्य झाले. मद्यपान निषेध, मुलींना शिक्षण देणे, हुंड्याची चाल मोडून काढणे, विधवा विवाहाला संमती असणे, मुलामुलींचे विवाह लहानपणी न करणे इत्यादी अटींच्या शपथपत्रावर सभासदांना सही करावी लागे. सुरुवातीलाच एकूण ५४९ सभासदांनी या शपथपत्रावर स्वाक्षरी करुन सभासदत्त्व स्वीकारले.

न्या. रानडे यांनी प्रारंभपासूनच सामाजिक परिषदेच्या कार्याला गती दिली. देशाच्या निरनिराळ्या भागांचे प्रतिनिधी काँग्रेस अधिवेशनासाठी एकत्र येतात. त्याचा फायदा घेऊन काँग्रेसच्या अधिवेशनाच्या कालावधीत काँग्रेसच्या मंडपातच सामाजिक परिषद घ्यावी व उपस्थित सभासदांनी समाजसुधारणेचा ऊहापोह करावा असा विचार रानड्यांनी मांडला होता. त्याला सर्वांचा पाठिंबा मिळावा व १८८७ पासून काँग्रेसच्या मंडपातच सामाजिक परिषदेची अधिवेशने होऊ लागली. मात्र या दोन्ही संघटना स्वतंत्र मानलेल्या होत्या. एका संघटनेच्या सदस्याने दुसऱ्या संघटनेचे सभासदत्त्व स्वीकारावे असे बंधन नव्हते. राजकीय व सामाजिक सुधारणा ही एकाच सुधारणा चळवळीची परस्परपूरक दोन अंगे आहेत असे. न्या. रानडे यांचे प्रामाणिक मत होते. देशातील निरनिराळ्या भागातून येणारे सभासद परिषदेत भाग घेत व आपल्या भागातील सामाजिक समस्यांची भाषणाद्वारे माहिती देत. त्यावर उपाय योजना सुचविली जाई. त्यामुळेच भारतात सामाजिक सुधारणेच्या प्रयत्नांना गतिमानता मिळत होती.

तथापि, सामाजिक परिषदेच्या अधिवेशनाविषयी सर्व सभासदांमध्ये एक वाक्यता नव्हती. न्या. रानडे यांच्या सुचनेनुसार काँग्रेसच्या अधिवेशन काळात व त्या मंडपातच सामाजिक परिषद घेण्याची प्रथा काही सभासदांना योग्य वाटत नव्हती. त्यामुळे सामाजिक परिषद हे काँग्रेसचेच एक अंग आहे असा समज निर्माण होतो. सामाजिक परिषदेत समाजातील सामाजिक व धार्मिक परंपरा व आचारांवर होणाऱ्या प्रखर टीकेमुळे परंपरानिष्ठ मंडळीची मने दुखावली जातात व ते काँग्रेसपासून दुरावतात, असे मत मांडले गेले. राजकीय सुधारणेचा वेग वाढवण्यासाठी समाजातील सर्व वर्गाचा पाठिंबा मिळवणे काँग्रेसला आवश्यक वाटत होते. म्हणूनच सामाजिक परिषदेमुळे एका गटाचा पाठिंबा काँग्रेसने घालवून बसणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने

परवडणारे नाही असे या गटाचे मत होते. सामाजिक परिषदेला त्यांचा विरोध नसला तरी काँग्रेसच्या मंडपात ती भरवू नये असे त्यांचे मत होते.

### ४.४.१ सामाजिक परिषदेचे कार्य :

न्यायमूर्ति रानडे यांना सामाजिक परिषदेद्वारे भारतीय सामाजिक व धार्मिक जीवनात निर्माण झालेल्या अंधश्रद्धा, अपप्रवृत्ती, अयोग्य चालीरीती व परंपरा दूर कराव्यात असे वाटत होते. त्यांनी हिंदू धर्मग्रंथांच्या आधशरे बालविवाह, केशवपन, विधवाविवाहाची अमान्यता, इत्यादी परंपरा प्रारंभीच्या समाजात प्रचलित नव्हत्या; नंतरच्या काळातच त्यांचा समावेश केला गेला हे दाखविले. भारतात स्वातंत्र्यापेक्षाही सामाजिक सुधारणेच्या प्रश्नाला व त्या संदर्भात करावयाच्या कार्याला प्राधान्य द्यावे, असे न्या. रानडे यांचे मत होते. समाजात सुधारणा झाल्यास हा प्रगत समाज भारतीय स्वातंत्र्याचा योग्य उपभोग घेऊ शकेल. समानता निर्माण होईल असे त्यांना वाटत होते.

इ. स. १८९० मध्ये संमती वयाचे बिल विधान परिषदेत आणले गेले व त्यामुळे सनातनी व सुधारक यांच्यातील वाद वाढला. सनातनवाद्यांच्या मते, सामाजिक सुधारणा सरकारने लादण्याऐवजी लोकांनी समाज परिवर्तनाद्वारे सुधारणांचा स्वीकार केला पाहिजे, तर सुधारकांच्या मते स्थितीशील समाजात सुधारणांचा स्वीकार नियंत्रणाशिवाय केला जाणार नाही. अखेर इ. स. १८९१ मध्ये संमती वयाचा कायदा पास झाला. इ. स. १८९६ मध्ये कलकत्ता, इ. स. १८९७ मध्ये अमरावती, इ. स. १८९८ मध्ये मद्रास, १८९९ मध्ये लखनौ व १९०० मध्ये लाहोर येथे सामाजिक परिषदेने अधिवेशने भरवून समाज जागृतीचे कार्य केले होते.

राजकीय स्वातंत्र्याअगोदर सामाजिक सुधारणा व्हाव्या, प्रबुद्ध समाजच राजकीय हक्कांचा उपभोग घेऊ शकेल असे मानणाऱ्या रानड्यांनी सामाजिक परिषदेच्या निर्मितीपासून अतिशय कष्ट घेतले. सामाजिक अन्याय, परंपरागत अनिष्ट रुढी व चालीरीती यांवर त्यांनी प्रखर टीका केली. या सामाजिक अपप्रवृत्तींना धार्मिक आधार नाहीत हे दाखविले. विधवाविवाह, बालविवाह बंदी, मद्यपान निषेध, शेतकऱ्यांची सुधारणा यासारख्या विषयावर भिन्नभिन्न सभा, बैठका व परिषदांमधून त्यांनी विचार मांडले. सुधारकातील लेखांच्याद्वारे या सामाजिक सुधारणेचे महत्त्व पटवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तसेच या सुधारणाच्या महत्त्वावर होणाऱ्या टीकेला उत्तरे दिली. लोकमत जागृत करण्याचे व जागृतीच्या आधारे समाजसुधारणा घडवून आणण्याचे कार्य या परिषदेने केले. समाज परिवर्तनाच्या दृष्टीने ही महत्त्वपूर्ण कामगिरी होती.

### आपली प्रगती तपासा :

१) भारतीय सामाजिक परिषदेची स्थापना कोणी केली ?
२) सामाजिक परिषदेच्या शपथपत्रावर कोणकोणत्या अटी होत्या ?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ४.५ स्त्री उद्धाराचे कार्य :

प्राचीन कालखंडशत स्त्रियांची स्थिती सन्मानजनक होती. स्त्रियांना समाजात पुरुषाइतकेच महत्त्व होते. तिला वेदाध्यन करण्याचा अधिकार होता. तसेच स्वयंवराचे स्वातंत्र्यदेखील होते. परंतु नंतरच्या काळात विशेषतः मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांची स्थिती दयनीय होती. स्त्रियांना चूल आणि मूल यासाठीच महत्त्व दिले जात होते. तिला एक उपभोगाची वस्तू म्हणून मानले जात होते. बालविवाह, सतीप्रथा, विधवा विवाहास विरोध इत्यादी मुळे स्त्रियांची स्थिती अतिशय दयनीय झाली होती. शुद्रांसारखीच समाजात स्त्रीला वागणूक मिळत होती. पुरुषप्रधान समाज संस्कृतीमुळे स्त्रियांचे स्वातंत्र्य संकुचित झालेले होते. स्त्रियांचे संपूर्ण जीवन घराच्या चार भिंतीत बंदिस्त झालेले होते. तिला शिक्षणाचा अधिकार नव्हता. आर्थिकदृष्ट्या ती संपूर्णपणे पुरुषांवर अवलंबून असे. आर्थिक उत्पन्नाच्या साधनांमध्ये तिचा समावेश करुन घेतला जात नव्हता. जन्मापासून ते तिच्या मृत्यूपर्यंत तिचे जीवन पुरुषी वर्चस्वाखाली नियंत्रित केले जात होते.

### ४.५.१ ब्रिटिशांनी स्त्रीविषयक केलेल्या सुधारणा व कायदे :

सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी ब्रिटीशांनी वेगवेगळे कायदे संमत केलेले होते. इ. स. १८०२ मध्ये त्यांनी बालहत्या प्रतिबंधक कायदा केलेला होता. त्याचबरोबर सतीप्रथा प्रतिबंधक कायदा इ. स. १८२९ मध्ये संमत केला. गुलामांच्या व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी इ. स. १८३४ मध्ये कायदा लागू केला. गुलामगिरीची प्रथा पूर्णपणे बंद होण्यासाठी त्यानंतर १८४३ मध्ये सुद्धा कायदा केला गेला. त्यानंतर हिंदू विधवाविवाह पुर्नविवाहास मान्यता देणारा कायदा इ. स. १८५६ मध्ये लागू करण्यात आला. अशा रीतीने ब्रिटिशांनी वेगवेगळ्या कायद्यांच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता हे स्पष्ट होते. परंतु या सर्व कायद्यामार्फतच समाजसुधारणा होणे शक्य नव्हते. तसेच हे सर्व कायदे भारतीयांना आपल्या सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठीचे आहेत हे पटले पाहिजे व त्यांनीच यात प्रामुख्याने पुढाकार घेतला तरच खऱ्या अर्थाने समाज सुधारणा होणे शक्य होते. त्या दृष्टीने अनेक भारतीय समाज सुधारकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि त्यामुळेच सामाजिक सुधारणा घडू शकल्या होत्या हे स्पष्ट होते.

### ४.५.२ स्त्री उद्धारासाठी समाज सुधारकांचे योगदान :

इंग्रजांनी संपूर्ण भारतात इंग्रजी शिक्षण सुरु केले. या इंग्रजी शिक्षणामुळे व आधुनिक विचारसरणीमुळे भारतात एक सक्षम अशी समाजसुधारकांची पिढी निर्माण झाली. या सर्वांनी समाजसुधारणेचे एक महत्त्वपूर्ण अंग म्हणून स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतलेले होते. त्यांच्या अथक प्रयत्नामुळेच भारतीय स्त्री उद्धाराचे कार्य पूर्ण होऊ शकले असे म्हणता येईल. या स्त्री उद्धारक समाजसुधारकांचे कार्य विस्तृतपणे पुढीलप्रमाणे अभ्यासता येईल.

#### ४.५.२.१ राजाराम मोहनरॉय यांचे स्त्री उद्धाराचे कार्य :

हिंदू धर्मातील पहिली सुधारणा चळवळ करणारे व थोर समाज सुधारक व त्यातही स्त्रियांच्या उद्‌धारासाठी महत्त्वपूर्ण कार्य राजाराम मोहन रॉय यांनी केलेले होते. राजाराम मोहन रॉय यांनी ''ब्राम्होसमाज'' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून स्त्रियांच्या उद्‌धाराचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले होते.

राजाराम मोहन रॉय यांचा जन्म बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील राधानगर येथे २२ मे १७७२ मध्ये झाला. प्रतिभाशाली असलेल्या राजाराम मोहन रॉय यांनी धर्मसुधारणा व सामाजिक सुधारणा चळवळीसाठी १८२८ मध्ये ब्राम्होसमाजाची स्थापना केली. समाजसुधारणा चळवळीचे कार्य करीत असतानाच अत्यंत महत्त्वपूर्ण व त्यांच्या मनाला अतिशय वेदना देणारी घटना घडली. राजाराम मोहन रॉय यांचे मोठे बंधू जगमोहन यांचे निधन झाल्यानंतर त्यांची पत्नी अलकमंजिरी सती गेली. 'सती' पद्धतीचा बळी त्यांच्या वहिनीच्या रूपाने प्रत्यक्ष अनुभवला त्यानंतर या प्रथेच्या विरोधात त्यांनी प्रखरपणे आपली भूमिका मांडली. इंग्रज शासन कर्त्यांना ही पद्धत किती अमानुष आहे हे पटवून दिले व त्यानंतर गव्हर्नर जनरल बेंटिग यांनी सती पद्धतीच्या विरोधात कायदा केला. राजाराम मोहन रॉय यांनी स्त्रियांना देखील पुरुषांइतकाच शिक्षणाचा अधिकार बहाल करावा अशी भूमिका मांडली. त्याचबरोबर स्त्रियांना देखील वडीलांच्या संपत्तीमध्ये वाटा मिळाला पाहिजे असे त्यांनी ठणकावून सांगितले.

## ४.५.२.२ मा. ज्योतिबा फुले यांचे स्त्री उद्धाराचे कार्य :

सामाजिक क्रांतीचे जनक म्हणून मा. ज्योतिबा फुले यांना संबोधले जाते ऐवढे महत्त्वपूर्ण समाज सुधारणेचे कार्य त्यांनी केलेले होते. जातियता, अस्पृश्यता याविरुद्ध त्यांनी प्रखर लदा उभारला होता आणि तेवढाच किंबहुना त्याहीपेक्षा प्रखर लढा त्यांनी स्त्री उद्धारणेसाठी उभारला होता. कारण स्त्रियांना वगळून समाजसुधारणा होणे अशक्य हे त्यांनी जाणले होते. त्यामुळे त्यांनी स्त्री उद्धारासाठी भरीव कार्य केलेले होते. शिक्षण हे समाजसुधारणेसाठी व त्याचबरोबर स्त्री उद्धारासाठी अतिआवश्यक आहे हे ओळखून त्यांनी ऑगस्ट १९४८ मध्ये खास मुलींकरीता पुण्यात शाळा काढली. या शाळेत मुलींना शिकवण्यासाठी शिक्षिका मिळत नव्हत्या म्हणून त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षित करुन तेथे शिक्षक म्हणून नेमले. स्त्रियांना शिक्षण देणे ही गोष्ट सनातनी प्रवृत्तीच्या लोकांना रुचली नाही. मुलींचे शिक्षण म्हणजे समाजद्रोह व धर्मद्रोह असे ते मानू लागले व त्यामुळे त्यांनी सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिकवू नये म्हणून त्रास दिला. परंतु मा. ज्योतिबा फुले यांची त्यांना पूर्णतः साथ होती म्हणूनच शेवटी सनातनीच नामोहरय झाले. मा. ज्योतिबा फुले यांनी या कार्यापासूनच परावृत्त व्हावे म्हणून त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले परंतु तरीही ते आपल्या कार्यापासून तसूभरही मागे सरले नव्हते. १८४८ मधील काढलेली शाळा बंद पडली तरीही ते डगमगले नाहीत. त्यानंतर त्यांनी इ. स. १८५१ मध्ये पुण्यात बुधवारपेठेत मुलींची दुसरी शाळा काढली.

त्या काळी ब्राम्हण समाजातील व इतर उच्च जातीतील विधवा स्त्रियांचे जीवन अतिशय अंधारमय असे. त्या स्त्रियांना संपूर्ण त्यांच्या हयातीत उपेक्षितांचे जीवन कंठावे लागे, स्त्रियांचे हे हाल थांबवेत. त्यांना देखील पुरुषाप्रमाणे सन्मानाने जगता यावे म्हणून मा. ज्योतिबा फुले यांनी खंबीरपणे विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. त्यांनी इ. स. १८६४ मध्ये पुण्यातील गोखल्यांच्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला होता.

मुलींचे लहानपणीच लग्न केले जात होते. त्या काळी अनेक साथीचे आजार असत. आजच्या सारखी प्रभावी वैद्यकीय सुविधा नव्हती. अशातच मुलीचा पती मेल्यानंतर तिला संपूर्ण जीवन विधवा म्हणून कंठावे लागत होते. अशातच कधी काळी विधवेचे चुकून वाकडे पाऊल पडले तर तिला भ्रुणहत्या किंवा आत्महत्याशिवाय पर्याय नव्हता. अशा आपत्तीपासून विधवांची सुटका व्हावी म्हणून ज्योतिबांनी विधवांना गुप्तपणे येऊन बाळंतपणासाठी व आपले मुल तेथे ठेवण्यासाठी बालहत्या प्रतिबंधगृह आपल्या घराशेजारी उघडले. त्या संदर्भात सर्वत्र भित्तीपत्रके

वाटण्यात आली. त्यात असे म्हटले होते की, विधवांनो, येथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मुल न्यावे किंवा ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून आहे. त्या मुलांची काळजी हा अनाथश्रम घेईल. विधवांना आणि विशेषतः अशा संकटात सापडलेल्या विधवांना मा. ज्योतिबा फुले यांची फार मोलाची मदत मिळाली होती हे सिद्ध होते. स्त्रियांच्या उद्धारासाठी मा. ज्योतिबा फुले यांचे हे कार्य अद्वितिय असे होते.

## ४.५.२.३ महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे स्त्री उद्धाराचे कार्य :

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनीही स्त्री उद्धारासाठी विशेष कार्य केले होते. त्यांच्या वयाच्या ३५ व्या वर्षी त्यांची पत्नी राधाबाई यांचे निधन झाल्यानंतर त्यांनी आपला मित्र नरहर बाळकृष्ण जोशी यांची विधवा बहीण गोदूबाई जोशीबरोबर विवाह केला. इ. स. १८९३ मध्ये वर्धा येथे त्यांनी विधवा पुनर्विवाह मंडळ स्थापन केले. विधवांची या ठिकाणी नोंदणी करुन त्यांचे पुनर्विवाह घडवून आणण्याचे कार्य या मंडळामार्फत केले जात होते. इ. स. १४ जून १८९६ रोजी पुण्याजवळील हिंगणे या ठिकाणी अनाथ बालिकाश्रम स्थापन केला. अनाथ बालिकांचे पालनपोषण व शिक्षण या आश्रयामार्फत केले जात होते. मुलींना शिक्षण देण्यासाठी ४ मार्च १९०७ रोजी पुणे येथे मुलींसाठी खास शाळा स्थापन केली. इ. स. १९१५ च्या मुंबई येथील सामाजिक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी स्वतंत्र महिला विद्यापीठाची आवश्यकता प्रकट केली. या त्यांच्या विचारावर अनेक सनातनवाद्यांनी टीका केली. परंतु ते आपल्या विचारावर ठाम राहिले. त्यानंतर इ. स. १९१६ मध्ये अवघ्या पाच विद्यार्थ्यींनीच्या नोंदणीसह त्यांनी महिला विद्यापीठाची स्थापना केली. या विद्यापीठास आर्थिक पाठबळाची आवश्यकता होती व ते पाठबळ प्रसिद्ध उद्योगपती ठाकरसी यांनी देण्याचे मान्य केले आणि मग १५ लाख रुपयांच्या विद्यापीठाला देणगी देण्याच्या मोबदल्यात या महिला विद्यापीठास या उद्योगपतीच्या मातोश्री "श्रीमती नधीबाई दामोदर ठाकरसी (SNDT)" हे नाव देण्यात आले. स्त्रियांच्या उद्धारासाठी शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी महाराष्ट्रातील अनेक खेड्यापाड्यात शाळा काढल्या. स्त्रियांच्या उद्धारासाठी महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण होते असे म्हणता येईल.

## ४.५.२.४ पंडीता रमाबाई यांचे स्त्री उद्धाराचे कार्य :

पंडीता रमाबाई यांनी स्त्री उद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले होते. त्यांचा जन्म २२ एप्रिल १८५८ रोजी चित्तपावन ब्राम्हण कुटुंबात कर्नाटक येथे झाला होता. त्यांच्या वडीलांचे नाव अनंतशास्त्री डोंगरे होते तर आईचे नाव लक्ष्मीबाई उर्फ अंबाबाई होते. इ. स. १८७७ च्या दुष्काळात त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले. अशा खडतर प्रसंगीदेखील त्या डगमगल्या नाहीत तर त्यांनी आपला भाऊ श्रीनिवास याचे समवेत कलकत्ता येथे आल्या. त्यांच्या विद्वतेने प्रभावित होऊन त्यांना पंडिता ही पदवी तेथील बंगाली लोकांनी बहाल केली.

रमाबाई यांनी संपूर्ण भारतभर दौरे करुन भारतातील स्त्रियांच्या दयनीय अवस्थेची जवळून पाटणी केली आणि त्या अवस्थेची त्यांनी जाहीरपणे टीका करुन स्त्रियांनादेखील शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे. बालविवाह बंद पाडते पाहिजेत. विधवाविवाह घडवून आणले पाहिजेत असे विचार आपल्या भाषणातून त्यांनी मांडले होते.

स्त्रियांच्या उद्धारासाठी रमाबाई यांनी इ. स. १८८२ मध्ये पुणे येथे "आर्य महिला समिती"ची स्थापना केली. या समितीच्या शाखा मुंबई आणि इतर भागात देखील स्थापन करण्यात आल्या.

त्यांनी आपली मुलगी मनोरमा समवेत ख्रिश्चन धर्माचा स्विकार केला. इंग्लंडमध्ये त्यांनी संस्कृत विषयाची अध्यापिका म्हणून कार्य केले. नंतर त्या अमेरिकेत गेल्या. रमाबाईंनी अमेरिकेत ठिकठिकाणी व्याख्याने देऊन भारतीय स्त्रियांच्या उद्धारासाठी निधी गोळा केला. भारतात आल्यावर रमाबाईनी मुंबई येथे ११ मार्च १८८९ रोजी "शारदा सदन" नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेत निराश्रित विधवा व अनाथ स्त्रिया यांच्या राहण्या-जेवण्याची मोफत व्यवस्था करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे या स्त्रियांना शिक्षण देण्याची व्यवस्थाही शारदा सदनने केली होती. गोदुताई जोशी ही शारदा सदनमध्ये प्रवेश घेतलेली पहिली बालविधवा होती. याच गोदूबाई जोशीबरोबर महर्षी धोंडू केशव कर्वे यांनी विवाह केला होता.

त्याचबरोबर ख्रिश्चन मुलींसाठी त्यांनी "मुक्ती मिशन" नावाची संस्था स्थापन केली. समाजातील निराश्रित स्त्रियांसाठी त्यांनी कृपासदन नावाची संस्था स्थापन केली. त्याचप्रमाणे मुलांसाठी त्यांनी सदानंदसदन नावाचा अनाथाश्रम काढला होता. त्याचबरोबर प्रौढ व वृद्ध महिलांच्या संगोपनासाठी शांतीसदन नावाचा आश्रम त्यांनी स्थापन केला होता. स्त्रियांचा उद्धार करणे हेच रमाबाईचे ध्येय होते. त्यासाठी त्यांनी अथक परिश्रम केले. समाजातील बालिका, वृद्ध, निराश्रित जवळपास सर्व वयोगटाच्या व सर्व समस्यांच्या पीडित स्त्रियांच्या उद्धारासाठी रमाबाई यांनी अविरत प्रयत्न केले होते.

### ४.५.२.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी आणि त्यांच्या न्याय हक्कासाठी आयुष्यभर लढा दिला. ऑक्टोबर १९४८ मध्ये त्यांनी हिंदू संहिता तपासून आणि सुधारुन घटना समितीच्या विधिमंडळासमोर मान्यतेसाठी मांडली. हिंदू कायद्याची सुधारणा करुन ते एकाच संहितेत एकत्र आणण्याचे काम दहा वर्षापासून चालू होते. हे विधेयक लोकसभेत स्विकृत केले गेले नाही तर आपले सरकार राजीनामा देईल असे पंडित नेहरुंनी जाहिर केले. याउलट सरदार पटेल यांनी विधेयकाला विरोध केला. अशा स्थितीत ५ फेब्रुवारी १९५१ रोजी बाबासाहेबांनी हिंदू संहिता विधेयक लोकसभेत मांडले. पंडित नेहरुंनी प्रारंभी पाठिंबा दिला असला तरी शेवटी तेही आपल्या निर्णयाशी ठाम राहिले नाहीत. परिणामी हे विधेयक लोकसभेत पास झाले नाही. त्यामुळे दुःखी होऊन बाबासाहेबांनी ११ ऑक्टोबर १९५१ रोजी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. या बिलामुळे स्त्रियांना पुढीलप्रमाणे अधिकाराची तरतूद होती.

१) स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, पोटगीचा अधिकार.

२) प्रथम पत्नी असताना दुसरी पत्नी करण्यास मनाई.

३) दत्तक घेण्याचा अधिकार असणे.

४) स्वतःचा वर निश्चित करण्याचा अधिकार इत्यादी अधिकार स्त्रियांना मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी प्रयत्न केले.

**आपली प्रगती तपासा :**

१) ब्रिटिशांनी स्त्रीविषयक केलेले सुधारणा कायदे कोणकोणते होते ?

२) बालहत्या प्रतिबंधक गृहाविषयी मा. ज्योतिबा फुले यांनी काढलेल्या भित्तीपत्रकात विधवा स्त्रियांना कोणते आव्हान केले होते ?

३) एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाची स्थापना कोणी केली होती ?

४) निराश्रित व अनाथ स्त्रियांसाठी रमाबाईंनी कोणती संस्था स्थापन केली होती ?

## ४.६ समारोप :

या पाठात आपण समाज सुधारणा चळवळीचे वेगवेगळे प्रवाह अभ्यासले. समाज सुधारणा चळवळीत प्रार्थना समाज व त्याचबरोबर सत्यशोधक समाजाचे महत्त्वपूर्ण योगदान होते असे आढळते. प्रार्थना समाजाचे नेतृत्त्व हे बुद्धिजीवी लोकांकडे होते. त्यांनी बहुजन समाजासाठी कार्य केले परंतु ते बहुजन समाजाशी एकरुप झाले नाहीत. याउलट सत्यशोधक समाजाचे नेतृत्त्व हे बहुजनाकडे होते व ते बहुजनांशी एकरुप झाले. राजकीय जागृतीबरोबरच समाज जागृती होणे अत्यंत गरजेचे आहे हे लक्षात घेऊन भारतीय सामाजिक परिषदेने समाज सुधारणा चळवळीचे महत्त्वपूर्ण कार्य केले होते.

स्त्री उद्धाराशिवाय संपूर्ण समाज सुधारणा शक्य नाही हे ओळखून याच काळात मा. ज्योतिबा फुले, महर्षी धोंडू केशव कर्वे, पंडिता रमाबाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपापल्या परीने अत्यंत मोलाचे कार्य केले होते हे स्पष्ट होते. त्यांच्या अथक प्रयत्नामुळेच समाजसुधारणा घडून आली असे म्हणता येईल.

## ४.७ प्रश्न :

१) प्रार्थना समाजाचे कार्य विशद करा.

२) सत्यशोधक समाजाची तत्त्वे सांगा.

३) सत्यशोधक समाजाच्या कार्याचा आढावा घ्या.

४) भारतीय सामाजिक परिषदेचे कार्य सांगा.

५) स्त्री उद्धाराच्या कार्याचा मागोवा घ्या.

❖❖❖❖

# ५

# राष्ट्रीय चळवळीचा उदय व विकास

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ राजकीय संस्थांचा उदय

५.३ राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना

५.४ मवाळवादी काँग्रेस

५.५ जहालवादी कालखंड

५.६ समारोप

५.७ प्रश्न

## ५.० उद्दिष्टे

- महाराष्ट्रात राष्ट्रवादाचा उदय कसा झाला त्याचा अभ्यास करुन राष्ट्रवादाची निर्मिती करणाऱ्या राजकीय संस्थांची माहिती जाणून घेणे.
- राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत महाराष्ट्राचे योगदान जाणून घेणे.
- मवाळवादी कालखंडाचा इतिहास अभ्यासणे.
- राष्ट्रीय चळवळीतील जहालवाद्यांची भूमिका समजून घेऊन टिळकांचे कार्य समजून घेणे.
- गांधीयुगातील महाराष्ट्रातील राष्ट्रीय चळवळ अभ्यासणे.

## ५.१ प्रस्तावना

ब्रिटीशांनी भारतात आपल्या राजवटीचा पाया भक्कमपणे निर्माण केल्यानंतर आधुनिक प्रशासन सुरु केले. या प्रशासनात काम करण्यासाठी इंग्रजी शिक्षण घेतलेला स्थानिक नोकरवर्ग निर्माण व्हावा या उद्देशाने पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात केली त्यामुळे संपूर्ण देशात इंग्रजी शिक्षण घेतलेला तरुणवर्ग निर्माण झाला. या तरुणांना आपल्यातील दोषांची जाणीव होऊन त्यांच्यात जागृती होण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्रात पुरोगामी विचारांचा पुरस्कार करण्याचे श्रेय सर्वप्रथम बाळशास्त्री जांभेकराना द्यावे लागेल त्यांनी दर्पण, दिग्दर्शन, प्रभाकर, ज्ञानप्रसारक, ज्ञानप्रकाशन या साप्ताहिक व नियतकालिकातून स्वातंत्र्य, समता व लोकशाहीचा प्रसार केला.

भास्कर पांडुरंग तर्खडकर यांनी इंग्रजांच्या वसाहतवादी धोरणावर टीका करुन राष्ट्रीय भावनेला चालना दिली. परंपरानिष्ठ समाजावर कठोर टीकेचे प्रहार करुन नवविचारांचा उघड पुरस्कार करण्याचे धैर्य महाराष्ट्रात सर्वप्रथम लोकहित वादींनी दाखवले. आपल्या शतपत्रातून राजकीय सत्तेच्या बळावर भारतात होणाऱ्या आर्थिक शोषणावर प्रकाश टाकला. याचकाळात दादाभाई नौरोजी व न्या. रानडे यांनी इंग्रजांनी देशाचे केलेले आर्थिक शोषण उघड केले तसेच विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या निबंधमालेतून स्वभाषा, स्वधर्म, स्वसंस्कृती व इतिहासाचा अभिमान निर्माण केला. नवविचारांच्या प्रसाराचे कार्य वैयक्तिक रित्या करण्याऐवजी संस्थात्मक पातळीवर केल्यास अधिक प्रभावी होऊ शकते हा विचार महाराष्ट्रीय तरुणांच्या मनात मूळ धरु लागला.

## ५.२ राजकीय संस्थांचा विकास

### ५.२.१ ईस्ट इंडिया असोसिएशन :

याच काळात पाश्चिमात्य विचारसरणीने प्रभावीत झालेल्या तरुणांमध्ये दादाभाई नौरोजींचा उदय झाला. इंग्लडमधील अनेक वर्षाच्या वास्तव्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्य, मानवतावाद, उपयुक्तवाद, लोकशाही या तत्त्वांवरच त्यांच्या राजकीय विचारांचे पोषण झाले. दादाभाई नौरोजींनी १ डिसेंबर १८६६ रोजी लंडनमध्ये ईस्ट इंडीया असोसिएशन ही संस्था स्थापन केली. इंग्रज व हिंदी लोकांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये एकमेकांबद्दल असलेला गैरसमज दूर करणे आणि इंग्रजांना भारतीयांच्या अडचणीची माहिती करुन देणे हे या सभेचे उद्दिष्ट होते.

या असोसिएशनच्या वतीने हिंदूस्थान संबंधी इंग्लंडची कर्तव्ये, हिंदूस्थानमधील पाटबंधारे व कालवे, सिव्हील सर्व्हिसची परिक्षा या विषयासंबंधी इंग्लंडमधील लोकांना माहिती करुन देण्यात आली. इ.स.१८६९ मध्ये दादाभाई नौरोजी हिंदूस्थानात आले. हिंदूस्थानातील राजे रजवाड्यांकडून आपल्या कार्यास द्रव्यसहाय्य मिळावे यासाठी काठेवाडातील संस्थानांचा दौरा काढून कच्छ, जुनागड, गोंडल येथून बरीच रक्कम जमा केली.

मुंबई, मद्रास, कलकत्ता येथे ईस्ट इंडीया असोसिएशनच्या शाखा उघडण्यात आल्या. मुंबई शाखेच्या कार्यकारिणीवर सर जमशेटजी जिजीभॉय, मंगलदास नथूभाई, फ्रामजी नसरवानजी पटेल, डॉ. भाऊ दाजी, फिरोजशहा मेहता, बाळ मंगेश वागळे हे कार्यकर्ते कार्यरत होते.

### ५.२.२ बॉम्बे असोसिएशन :

इ.स. १८५२ मध्ये मुंबईत पारशी व मुसलमान जमातीत दंगली झाल्या या दंगलीचे निमित्त करुन आणि देशातील एकूणच राजकीय, सामाजिक परिस्थितीचा विचार करण्यासाठी नाना शंकरशेठ यांनी १८ ऑगस्ट १८५२ रोजी आपल्या वाड्यात प्रतिष्ठित मुंबईकर नागरिकांची बैठक बोलावली त्यानंतर २६ ऑगस्ट १८५२ रोजी एलफिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये दुसरी सभा घेण्यात आली. या सभेला हिंदू, मुस्लिम, ज्यु व पारशी समाजातील नेते हजर होते. याच सभेत “बॉम्बे असोसिएशन” ही राजकीय संघटना स्थापन करण्याच्या निर्णय घेण्यात आला.

या सभेच्या कामकाजाची संपूर्ण माहिती मुंबई सरकारला देण्यात आली. या संघटनेला सरकारने सर्व तऱ्हेची मदत करावी अशी विनंती गव्हर्नरला करण्यात आली. मुंबई सरकारने या विनंतीला अनुकूल प्रतिसाद दिला. इंग्रजी वृत्तपत्रे "बॉम्बे गॅझेट" व "टेलिग्रॅाफ ॲन्ड कुरियर" या वृत्तपत्रांनी बॉम्बे असोसिएशनवर जोरदार टीका केली. या टीकेमुळे काही सभासद घाबरुन गेले. जमशेटजी जिजीभाई, महंमद अमीन, माणिकजी कर्सेटजी यांनी संघटना सोडण्याचा निर्णय घेतला असे असले तरी महाराष्ट्राने या संघटनेचे स्वागत केले.

असोसिएशनकडून आपली संघटना ही फक्त मुंबई शहरापुरती मर्यादित राहू नये यासाठी जिल्ह्याशी संपर्क साधण्यात आला. ४ मार्च १८५३ रोजी संघटनेच्यावतीने तीन हजार लोकांच्या सह्या असलेला एक अर्ज इंग्लडंच्या पार्लमेंटला सादर केला. अर्ज विनंत्यांचे राजकारण या काळात पहिल्यांदा सुरु झाले. पुणे, मुंबई, ठाणे व इतर गावातून सह्या गोळा करण्यात आल्या. या अर्जात असोसिएशनचे ईस्ट इंडीया कंपनीचे व्यापारी स्वरुप जाऊन तिला राजकीय स्वरुप कसे आले, त्याचे भारतीयांवर कोणते परिणाम झाले हे स्पष्ट केले. हिंदी जनतेविषयी सहानुभूती असणाऱ्या ब्रिटीश सनदी अधिकाऱ्यांचे "इंडीया कौन्सील" इंग्लंडमध्ये स्थापन केले जावे व त्याच्या सल्ल्याने भारताचा कारभार केला जावा. लायक हिंदी लोकांना राज्यकारभारात संधी दिली जावी, देशात दळणवळण व शिक्षण प्रसाराच्या अधिक सोई केल्या जाव्यात या मागण्या होत्या. ब्रिटीश पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहात असोसिएशनच्या मागणी अर्जाची दखल घेण्यात आली. परिणामी संसदेने त्यावर भारतातील राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी एक खास समिती नेमली. इंग्लंडमधून होणारी नोकरभरती, उच्च पातळीवरील सनदी अधिकाऱ्यांच्या नेमणूका व महसूल व्यवस्था या क्षेत्रातही बॉम्बे असोसिएशनमुळे बदल झाले.

नाना शंकरशेठसारख्या वजनदार असामीमुळेच इंग्रजांनाही या संघटनेच्या तक्रारीची दखल घेणे भाग पडले. ब्रिटीश राजवटीत अनेक प्रकरणे दडपली जात होती. अशी प्रकरणे हाती घेऊन असोसिएशनने ब्रिटीश राजवटीला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. मुंबई प्रातांत बांधकाम विभागाने पाटबंधारे, पुल, कालवे, रस्ते किंती बांधले हे प्रश्न ब्रिटीश सरकारला विचारले. इ.स. १८५५ मध्ये मुंबई सरकारने दोन कोटी रुपयांचे कर्ज उभारले. पाच टक्के व्याजदराने उभारलेले हे कर्ज रस्ते, कालवे, पाटबंधारे वगैरे बांधकामासाठी होते पण त्या कर्जाचा उपयोग ब्रम्ही युद्धासाठी करण्यात आला. या बद्दल असासिएशनने सरकारला जाब विचारला.

कायदेमंडळात जी विधेयके येतात ती जनतेच्या प्रतिक्रियेसाठी देशी भाषेत मांडावीत ही असोसिएशनची भूमिका सरकारला मान्य करावी लागली. कोर्टातील स्टॅप ड्युटीबाबत शहर व गावात भेदभाव केला जात होता. तो असोसिएशनच्या हस्तक्षेपामुळे थांबला. महाराष्ट्रातील काही महत्त्वाचा रेल्वेमार्गासंबंधी असोसिएशनने सरकारला मार्गदर्शन केले. मुंबई हायकोर्टात हिंदी लोकांची न्यायाधीशपदी नियुक्ती केली जावी असा आग्रह असोसिएशनने धरला.

नाना शंकरशेठ यांचा इ.स. १८६५ मध्ये मृत्यु झाला. त्यांच्या मृत्युमुळे बॉम्बे असोसिएशनचे कामकाज थंडावले. इ.स. १८६७ मध्ये या संस्थेच्या कामाला पुन्हा चेतना देण्यासाठी प्रयत्न सुरु झाले. पण त्यात यश आले नाही. कालांतराने विश्वनाथ नारायण मंडलीक, फिरोजशहा मेहता, काशिनाथ त्र्यंबक तेलंग, बद्रुद्दीन तय्यबजी यांच्यासारख्या नेत्यांनी या संस्थेचे रुपांतर बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन या संस्थेत केले.

**५.२.३ सार्वजनिक सभा :**

इ.स. १८७० च्या सुमारास पुण्याच्या पर्वती संस्थानाच्या कारभारात आर्थिक भ्रष्टाचार व अंदाधुंदी माजली होती. तेथील गैरकारभाराला आळा घालण्यासाठी श्री गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांनी पुढाकार घेतला. पर्वतीचा गैरकारभार सुधारणे व पुण्यातील लोकापयोगी कामे मार्गी लागावी या हेतूने त्यांनी २ एप्रिल १८७० रोजी सार्वजनिक सभेची स्थापना केली. या संघटनेच्या बहुसंख्य ब्राम्हण सभासदांमध्ये सरदार, इनामदार, सावकार व व्यापारी असले तरी सभेची सूत्रे मुख्यतः वकीलांच्या हाती होती. प्रत्येक सभासदाला किमान ५० प्रौढ नागरिकांचा लेखी पाठींबा मिळवावा लागे. प्रत्येक सभासदाला, "सभेने दिलेले कोणतेही काम स्वशक्तीनुसार, निस्पृहपणे व भेदभाव न करता पार पाडीन" अशी शपथ घ्यावी लागत असे. सन १८८० पर्यंत सार्वजनिक काका नंतर सीताराम हरी चिपळूणकर, शिवराम हरी साठे व गोपाळकृष्ण गोखले त्यानंतर न्या. रानडेंच्या तंत्राने सभा चालत होती. १८९६ मध्ये लो. टिळकांच्या ताब्यात ही संस्था गेल्याचे दिसते.

सार्वजनिक सभेने राजकीय व सार्वजनिक क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी पार पाडली. ब्रिटीश राज्यकर्त्यांना आपल्या लोकांच्या चालीरिती, परंपरा व धार्मिक समजुती याविषयी काही माहिती नव्हती त्यामुळे त्यांच्याकडून पास होणारे अनके कायदे अन्यायकारक होते त्याविरुद्ध दाद मागण्यासाठी वेगळी व्यवस्था नव्हती. सार्वजनिक सभेने ही कामगिरी अत्यंत यशस्वीपणे पार पाडली. इंग्रज शासनाचे सर्व कायदे व त्यांचे मसुदे इंग्रजी भाषेत असत त्यामुळे लोकांना ते समजत नसत त्यामुळे कायद्याचे मसुदे पास झाल्यावर ते सरकारने देशी भाषेत प्रसिद्ध करावेत अशी सार्वजनिक सभेने मागणी केली.

भारतीयांना हायकोर्टातील उच्च पदावर नेमले जात नव्हते. त्याविरुद्ध सभेने तक्रार केली. सभेच्या प्रयत्नांना यश येऊन न्या. नानाभाई हरीदास यांची मुंबई हायकोर्टाचे पहिले हिंदी न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. सन १८७१ पासून न्या. रानडे यांनी सभेच्या कार्यात लक्ष देण्यास सुरुवात केली. त्यांच्या प्रयत्नांमुळे सार्वजनिक सभा नावारुपास आली. १८७४ मध्ये सभेने इंग्लंडच्या पार्लमेंट मध्ये हिंदुस्थानातील काही प्रतिनिधींना निवडले जावे हा आग्रह धरला तसेच अशा सदस्यांच्या सल्लामसलतीनेच हिंदुस्थानविषयक राज्यकारभाराचे सर्व प्रश्न सोडविले जावेत असे सुचविले.

इ.स. १८७२ मध्ये सार्वजनिक सभेने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांची सांपत्तीकदृष्ट्या पाहणी करण्याचे ठरवून त्या पाहणीच्या आधारे सभेने एक अहवाल सरकारला व जनतेला सादर केला. सन १८७६-७७ मध्ये महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला. सार्वजनिक सभेने दुष्काळी भागात आपले विश्वासू प्रतिनिधी पाठवून तेथील वास्तव माहिती जमा केली. त्यावर रानडेंनी लेख लिहून सरकारकडे ही माहिती पाठवून मदत करण्याची विनंती केली. दुष्काळाचा वणवा अधिकच भडकल्याने त्यावर मात करण्यासाठी सभेने दुष्काळ फंड जमवून ठिकठिकाणी दुष्काळ समिती नेमल्या, इंग्लंडमधील लोकांकडूनही मदत मिळवली. या दुष्काळांच्या काळातच दख्खनमध्ये दंगे सुरु झाले होते. सार्वजनिक सभेने या दंग्याची चौकशी सार्वजनिक काकांच्या मार्फत करुन एक अहवाल तयार केला व तो सरकारकडे पाठवला.

सार्वजनिक सभेने स्वदेशीचा पुरस्कार व प्रसार करण्यात मोठे योगदान दिले. स्वदेशी हा शब्दप्रयोग प्रसिद्ध होण्यास अवकाश होता त्या काळात सार्वजनिक काकांनी स्वदेशीचा पुरस्कार करुन प्रचार व प्रसार करण्याचे कार्य हाती घेतले. न्या. रानडे व सार्वजनिक काकांनी राष्ट्राच्या आर्थिक उन्नतीसाठी स्थानीक उद्योगधंदे वाढविण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

सार्वजनिक सभेच्या प्रारंभापासून सभेला सार्वजनिक काकांसारखे धडपडे नेतृत्त्व लाभले होते. १८७९ च्या सुमारास विश्रामबाग वाड्याला आग लागली. ती विझवण्याच्या व वाड्याच्या पुनर्बांधणीच्या कामात काकांनी सहभाग घेतला. आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांचे वकीलपत्र त्यांनी घेतले. त्यांची पत्नी सरस्वतीबाईच्या पुढाकाराने पुण्यातील स्त्रियांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने "स्त्री विचारवंती सभा" ही संस्था स्थापन केली. स्वतःच्या घरीच मेणबत्ती, काडेपेटी, छत्र्या या वस्तू तयार करण्याचा कारखाना काढला. देशी हातमाग व स्वदेशी दुकानांना उत्तेजन देण्यासाठी "देशी व्यापारोत्तेजक संस्था" स्थापन केली. शेतकऱ्यांमध्ये जागृती होण्यासाठी फेमिन कोडचे (दुष्काळ संहिता) भाषांतर करवून घेतले व त्यातील तरतुदी शेतकऱ्यांना समजावून दिल्या. २५ जुलै १८८० रोजी सार्वजनिक काकांचे निधन झाले. पुढे सार्वजनिक सभा टिळक पक्षीयांनी ताब्यात घेतली त्यातील मवाळांनी म्हणजे मूळच्या सभेतील कार्यकर्त्यांनी पुण्यातच "डेक्कन सभा" काढली. १८९७ मध्ये मुंबई सरकारने 'सार्वजनिक प्रश्नावर अर्ज विनंती करणारी संस्था' हे स्वरुप टिळकांच्या काळात न राहिल्यामुळे सभेची मान्यता काढून घेतली.

### ५.२.४ आपली प्रगती तपासा

१) कोणकोणत्या इंग्रजी वृत्तपत्रांनी बॉम्बे असोसिएशनवर टीका केली.

२) मुंबई हायकोर्टाचे पहिले हिंदी न्यायाधीश म्हणुन कोणाची नेमणूक झाली ?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ५.३ राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना

### ५.३.१ काँग्रेस स्थापनेची पार्श्वभूमी

इ.स. १८३७ मध्ये द्वारकानाथ टागोर यांनी लॅन्ड होल्डर्स असोसिएशन ही संस्था जमीनदार वर्गाचे हितसंबध जोपासण्यासाठी काढली. १८५२ मध्ये मद्रासमध्ये मद्रास नेटिव्ह असोसिएशन व मुंबईत बॉम्बे असोसिएशन स्थापन झाली. १८६६ मध्ये दादाभाई नौरोजींनी व्योमेशचंद्र बॅनर्जींच्या सहकार्याने लंडनमध्ये ईस्ट इंडीया असोसिएशन संस्था स्थापन केली. १८७० मध्ये पुण्यात सार्वजनिक काकांच्या नेतृत्त्वाखाली सार्वजनिक सभा स्थापन होऊन तिने हिंदी लोकांच्या हक्कांच्या मागण्या सुरु केल्या. बंगालमध्ये सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी इंडीयन असोसिएशन ही संस्था निर्माण करुन १८८३ व १८८५ मध्ये कलकत्यास राष्ट्रीय परिषदा भरविल्या. या परिषदांना प्रतिनिधी कमी असले तरी सर्व प्रांतातील पुढारी राजकीय प्रश्नांची चर्चा करण्यासाठी एकत्र आल्याचे हे पहिलेच उदाहरण होते. १८८५ मध्ये मुंबईत न्या. तेलंग, फिरोजशहा मेहता यांनी बॉम्बे प्रेसिडन्सी असोसिएशन ही राजकीय संस्था स्थापन केली. या सर्व

राजकीय संघटनांच्या कार्यामुळे व जनजागृतीमुळे राष्ट्रीय पातळीवर सनदशीर राजकारण करण्यासाठी आखिल भारतीय स्वरुपाची संघटना स्थापन करण्याचा विचार नवशिक्षीत तरुणांमध्ये निर्माण झाला.

### ५.३.२ महाराष्ट्राचे योगदान

देशापुढील समस्यांचा विचार करण्यासाठी भारतीयांचे एखादे अधिवेशन भारतीयांनी आयोजीत करावे ही कल्पना महाराष्ट्रातील काही व्यक्तींच्या मनात भरली गेली होती. त्यात सार्वजनिक सभेचे गणेश वासुदेव जोशी आणि सदाशिव बल्लाळ गोवंड्ये या दोघांनी भारतीयांचे स्थानिक पार्लमेंट भरविण्याच्या विचार मांडला होता. राष्ट्रीय सभेची कल्पना कोठून निर्माण झाली याबद्दल विविध मते असली तरी सर ॲलन ह्यूम यांनी मुंबई व पुण्याच्या कार्यकर्त्यांशी केलेल्या वाटाघाटीतून राष्ट्रीय सभा स्थापन करण्याचा विचार निश्चित केला याबद्दल अधिक पुरावे मिळतात. राष्ट्रीय सभा स्थापन होण्यापुर्वी ह्यूमने मुंबईच्या फिरोजशहा मेहता, दिनशा वाच्छा, दादाभाई नौरोजी, न्या. तेलंग तसेच पुण्याचे न्या. रानडे, डॉ. भांडारकर यांच्याशी चर्चा केली होती.

### ५.३.३ ह्यूमचा दृष्टीकोन

सर ॲलन ह्यूम हे ब्रिटीश निवृत्त सनदी अधिकारी असून साम्राज्यनिष्ठ होते त्यामुळे ब्रिटीश साम्राज्याचे हिंसक क्रांती कारकांपासून संरक्षण करण्याचा मार्ग म्हणजे राष्ट्रीय सभेची स्थापना होय असे त्यांना वाटत होते. १८५७ च्या उठावानंतर देशात असंतोष अधिक वाढला होता. वासुदेव बळवंत फडकेंचे बंड, रामोशांचा उठाव अशा घटनांमुळे ब्रिटीश शासनाला धक्के बसू लागले. शासनविरोधी वाढलेल्या या असंतोषाला विधायक वळण दिले नाही तर १८५७ च्या उठावाची पुनरावृत्ती होण्याचा धोका ह्यूमला दिसत होता. १८८२ मध्ये निवृत्त झाल्यानंतर ह्यूमने आखिल भारतीय संघटना स्थापण्याच्या दिशेने प्रयत्न सुरु केले. १८८३ मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांसमोर भाषण करतांना त्यांनी अशा संघटनेची आवश्यकता प्रतिपादन केली.

### ५.३.४ राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना

ह्यूमच्या आवाहनाला संपूर्ण देशातून सकारात्मक प्रतिसाद मिळाला त्यामुळे सन १८८४ मध्ये गव्हर्नर जनरल, लॉर्ड डफरीनच्या संमतीनंतर ह्यूम 'इंडीयन नॅशनल युनियन' नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेचे पहिले अधिवेशन न्या. रानडेंच्य प्रेरणेने पुण्याला घेतले जावे असे ठरले. या अधिवेशनाची जबाबदारी सार्वजनिक सभेच्या वतीने सीतारामपंत चिपळूणकरांनी स्वीकारली त्याप्रमाणे डिसेंबर १८८५ मध्ये पुण्यात पहिले अधिवेशन भरविण्यासाठी परिपत्रक काढण्यात आले परंतु याच काळात पुण्यात कॉलराची साथ सुरु झाल्याने हे अधिवेशन २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबई येथे भरविण्यात आले. सोमवार, २८ डिसेंबरच्या दुपारी १२.०० वा. मुंबईच्या सर गोकुळदास तेजपाल संस्कृत विद्यालयाच्या सभागृहात इंडीयन नॅशनल काँग्रेस म्हणजेच हिंदी राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाला. या अधिवेशनात संपूर्ण देशातून ७२ प्रतिनिधी आले होते. त्यात मुंबई, पुणे, विरमगाव, सुरत, अहमदाबाद या मुंबई इलाख्यातील ३८ प्रतिनिधी होते. मुंबईचे दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशा वाच्छा, न्या. तेलंग, पुण्याहून न्या. रानडे, डॉ. भांडारकर, आगरकर, लो. टिळक, आपटे हे नेते उपस्थित होते. राष्ट्रीय सभेचे पहिले अध्यक्ष म्हणून कलकत्याचे थोर कायदेपंडीत उमेशचंद्र बॅनर्जी यांची निवड झाली. काँग्रेसची स्थापना ही घटना इंग्लंडमधील लंडन टाईम्सला मात्र धोकेदायक वाटली.

## ५.३.५ अधिवेशनातील ठराव

या अधिवेशनात एकूण नऊ ठराव पास करण्यात आले.

१. राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी एक समिती ब्रिटीश सरकारने नेमावी.

२. इंडीया कौन्सीलवर अनावश्यक खर्च होत असल्याने ते बरखास्त करावे.

३. केंद्रीय व प्रांतीक कायदेमंडळात लोकनियुक्त प्रतिनिधींची संख्या वाढवावी.

४. पंजाब व वायव्य प्रांतात विधीमंडळे स्थापन करावीत.

५. लष्करावरील खर्चात कपात केली जावी.

६. भारतीयांनी तांत्रिक व लष्करी शिक्षण दिले जावे.

७. शासकीय सेवा स्पर्धा परिक्षेसाठी उमेदवारांची निर्धारीत वयोमर्यादा वाढवावी व परिक्षा इंग्लंडप्रमाणे भारतातही घेतल्या जाव्यात.

८. न्यायदान व कार्यकारी शाखेचे अधिकार एकाच व्यक्तीच्या हाती केंद्रीत नसावे.

९. भारतीय मालासाठी संरक्षक जकातीचे कुंपण उभारले जावे आणि मिठावरील कर रद्द व्हावा.

### ५.३.६ आपली प्रगती तपासा

१) काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाची जबाबदारी कोणत्या संस्थेने स्वीकारली ?

२) महाराष्ट्रातील कोणते प्रतिनिधी काँग्रेस अधिवेशनास उपस्थित होते ?

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ५.४ मवाळवादी काँग्रेस (१८८५-१९०५)

### ५.४.१ मवाळवादी विचारसरणी :

काँग्रेस स्थापनेनंतर प्रारंभीच्या काळात काँग्रेसचे नेते उदारमतवादी विचारांचे होते. या नेमस्त किंवा मवाळ नेत्यात महाराष्ट्रातील दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनेशा वाच्छा, न्या. रानडे, व ना. गोखले यांचा समावेश होता.

इंग्लंडमधील लोकशाही परंपरेच्या प्रभावामुळे एक नवा सनदशीर मार्ग भारतीय तरुणांना आकर्षित करु लागला. आपल्या मागण्या अर्ज-विनंत्यांच्या मार्गाने मांडाव्यात, वृत्तपत्रातून लेख लिहावेत, शिष्टमंडळे पाठवून शासनाशी चर्चा करावी असे सनदशीर राजकारण करुन इंग्रजांकडून आपल्या मागण्या मान्य करुन घ्याव्यात असे मवाळवाद्यांना वाटत असे. इंग्रजांच्या संपर्काचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेऊन आपल्या समाजाला जगाच्या बरोबरीने आणावे, इंग्रजांशी संघर्ष न करता मवाळ धोरण स्वीकारुन आपल्या मागण्या मांडाव्यात ही भूमिका मवाळांनी घेतली. इंग्रज हे न्यायप्रिय असल्यामुळे आपल्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार

करतील हा दृढ विश्वास मवाळवाद्यांमध्ये होता. ब्रिटीश उदारमतवादावर त्यांनी निष्ठा असल्यामुळे ब्रिटीश जनतेला भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करुन दिल्यास ब्रिटीश लोकमताचे दडपण राज्यकर्त्यांवर येईल अशी त्यांची धारणा होती.

### ५.४.२ काँग्रेसची लंडनमधील शाखा

ब्रिटीश लोकमत भारतीय समस्यांबाबत जागृत करण्यासाठी इ.स. १८८८ मध्ये दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या पुढाकाराने काँग्रेसची लंडन येथे शाखा स्थापन करण्यात आली. या शाखेसाठी भारतीय काँग्रेस वर्षाला ३ हजार पौंड निधी खर्च करीत असे यात इंग्लंडमध्ये व्याख्याने आयोजित करणे, परिपत्रके छापणे या खर्चाबरोबरच १८८० मध्ये 'इंडीया' हे नियतकालिक सुरु झाले त्याचाही खर्च समाविष्ट होता. काँग्रेसच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये भारताविषयी सहानूभूती असणारे ११४ खासदार तयार झाले. या लंडन शाखेमुळेच दादाभाई नौरोजी "हाऊस ऑफ कॉमन्स" मध्ये निवडून आले. या शाखेच्या कार्यामुळे ब्रिटीश पार्लमेंटमध्ये १८९२ मध्ये प्रांतिक विधीमंडळाच्या सुधारणेचा कायदा केला गेला. १८९३ मध्ये इंग्लंडमध्ये भारतात मुलकी सेवा स्पर्धा परिक्षा घेण्याचे तत्वतः मान्य करण्यात आले.

### ५.४.३ मवाळ काँग्रेसची अधिवेशने

I. इ.स. १८८६ मध्ये कलकत्ता येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष मुंबईचे नेते दादाभाई नौरोजी हे होते. या अधिवेशनाला महाराष्ट्रातून ४७ प्रतिनिधी आले होते. दादाभाईंनी आपल्या भाषणात, सनदी सेवेत प्रवेश मिळवण्यासाठी भारतात स्पर्धा परिक्षा घेतली जावी, केंद्रीय व प्रांतिक विधीमंडळातील भारतीयांची संख्या वाढवली जावी तसेच भारत हा ब्रिटीश साम्राज्याचा घटक असल्यामुळे भारतीय प्रतिनिधींना ब्रिटीश पार्लमेंटमध्ये स्थान मिळणे आवश्यक आहे असे ठाम प्रतिपादन केले.

II. इ.स. १८८७ मध्ये मद्रास येथे झालेल्या अधिवेशनाचे अध्यक्षपद मुंबईचे बॅ. बद्रुद्दीन तय्यबजी यांना मिळाले. त्यांनी आपल्या भाषणातून मुसलमान हे काँग्रेस विरोधी नसल्याचे सांगून मुस्लिमांना देशहितासाठी काँग्रेसला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

III. इ.स. १८८८ मध्ये काँग्रेसचे चौथे अधिवेशन कलकत्याचे उदारमतवादी ब्रिटीश व्यापारी जॉर्ज यूल यांच्या अध्यक्षतेखाली अलाहाबाद येथे भरविण्यात आले. याच काळात सर सय्यद अहमद खान यांना ब्रिटीशांनी फितवल्याने त्यांनी काँग्रेसला विरोध करणारी संघटना अलीगडला उभारली व मुस्लिमांनी काँग्रेसच्या अधिवेशनात भाग घेऊ नये असे पत्रक काढले तरीही या अधिवेशनास २२१ मुस्लिम सदस्य उपस्थित होते. पश्चिम महाराष्ट्रातून १६३ तर वऱ्हाड, नागपूरमधून ७३ प्रतिनिधी आले होते.

IV. इ. स. १८८९ मध्ये काँग्रेसचे अधिवेशन मुंबईला झाल्याने या अधिवेशनास महाराष्ट्रातील प्रतिनिधींची संख्या सर्वात जास्त होती. या अधिवेशनाचे अध्यक्षपद सर विल्यम वेडरबर्न यांनी भूषविले. यावेळी पं. रमाबाई व काशीबाई कानीटकर यांनी महाराष्ट्रातील महिलांचे प्रतिनिधीत्व केले. या अधिवेशनात विधीमंडळातील भारतीयांची संख्या वाढवली जावी, लोकसंख्येच्या प्रमाणात समान मतदारसंघ बनविले जावेत, २१ वर्षावरील पुरुषांना मतदानाचा अधिकार असावा, मतदान गुप्त पद्धतीने व्हावे अशा विविध मागण्या करण्यात आल्या.

### ५.४.४ महाराष्ट्रातील नेते

काँग्रेसच्या मवाळवादी कालखंडावर महाराष्ट्रातील दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, फिरोजशहा मेहता व गोपाळकृष्ण गोखले या नेत्यांच्या मोठा प्रभाव होता. भारताला राजकीयदृष्ट्या जागृत करण्यात दादाभाईच्या मोठा वाटा होता. ब्रिटीशांनी भारताचे केलेले आर्थिक शोषण पुराव्यानिशी दाखवून त्यांनी आर्थिक राष्ट्रवाद निर्माण केला. महाराष्ट्राला स्वकर्तृत्ववान चैतन्य प्राप्त करुन देणारे पहिले नेतृत्व म्हणजे. न्या. महादेव गोविंद रानडे हे होते. दुष्काळाचे विश्लेषण, आर्थिक पाहणी व आकडेवारीच्या माध्यमातून करणारे ते पहिले महाराष्ट्रीय तज्ञ होते. फिरोजशहा मेहता यांचा ब्रिटीशांच्या उदारमतवादावर प्रचंड विश्वास होता त्यांनी जहाल गटाला शेवटपर्यंत विरोध केला. अत्यंत बुद्धीमान असलेल्या गोपाळकृष्ण गोखले यांनी प्रांतिक विधीमंडळ व केंद्रीय विधी मंडळात सदस्य म्हणून प्रभावी कार्य केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याची त्यांनी मागणी केली. म. गांधीच्या कार्याचे महत्त्व ओळखणारे ते पहिले महाराष्ट्रीय नेते होते.

### ५.४.५ मवाळवाद्यांची कामगिरी

इ.स. १८८५ ते १९०५ या काळातील मवाळ किंवा नेमस्त काँग्रेसने आपल्या मागण्या मान्य करुन घेण्यासाठी अर्ज, विनंत्या, ठराव या मवाळ मार्गांचा अवलंब केला असला तरी त्यामुळे प्रंचड जनजागृती झाली. काँग्रेसने राजकीय प्रश्नांसाठी जात, धर्म, प्रांत यासारखे भेदाभेद विसरुन लोकांना एकत्र येण्याचे शिक्षण दिले, आपल्या हक्कांची हिंदी लोकांना जाणीव करुन दिली.

सरकारकडून काँग्रेसच्या अनेक मागण्या मान्य केल्या जात नव्हत्या तसेच त्यांच्या जुलमी राजवटीत काहीही फरक पडत नव्हता. १९०५ च्या वाराणसी अधिवेशनात गोपाळकृष्ण गोखले यांनी काँग्रेसचे ध्येय “वसाहतीचे ध्येय” हे ठेवले.

इंग्रज पुढाऱ्यांमध्ये काँग्रेसच्या कार्याविषयी सहानुभूती निर्माण करण्याचे कार्य ह्यूम व दादाभाई नौरोजींनी केले. इंग्लडच्या पार्लमेंटमध्ये हिंदी लोकांच्या हक्कांबद्दल सहानुभूती बाळगणारे काही उदारमतवादी सभासद निर्माण झाले. त्यापैकी चार्लस ब्रॅडला या सदस्याला काँग्रसने आपल्या बाजूला वळवून घेतले. आयर्लंडमध्येही इंग्रजाविरुद्ध आयरिश स्वातंत्र्य चळवळ चालवणाऱ्या नेत्यांशी हिंदी नेत्यांनी संपर्क साधून सहकार्य मिळवले.

सरकारने मागण्या मान्य न केल्यास काँग्रेस सभांतून व वर्तमानपत्रातून त्यांना वाचा फोडत असे. १८९० मध्ये सरकारने काँग्रेसच्या अधिवेशनास सरकारी नोकरांनी उपस्थित राहू नये असा आदेश काढताच काँग्रसने त्याविरुद्ध लोकमत जागृत करुन हा आदेश रद्द करण्यास शासनाला भाग पाडले. १८९४ मध्ये वकीलांना राजकारणात भाग घेण्यास बंदी आणण्याचा विचारही सरकारला मागे घ्यावा लागला. काँग्रेसच्या दबावामुळे सरकारने १८९२ चा सुधारणा कायदा अंमलात आणला. त्यानुसार गव्हर्नर जनरलच्या कौन्सील मध्ये हिंदी सभासदांचा प्रवेश झाला. प्रशासनाचे हिंदीकरण होऊ लागले. भारतीय राष्ट्रवादाची मोठी वाढ करण्याचे कार्य काँग्रेसने या काळात केले.

**आपली प्रगती तपासा**

१) काँग्रेसची लंडन शाखा कोणाच्या पुढाकाराने स्थापन झाली ?

२) वाराणसी अधिवेशनात काँग्रेसने कोणते ध्येय स्वीकारले ?

## ५.५ जहालवादी कालखंड (१९०५-१९२०)

### ५.५.१ जहालवादाचा उदय

१८८५ ते १९०५ या काळातील नेमस्त काँग्रेसने सरकारपुढे अनेकदा मागण्या मांडल्या, अर्ज-विनंत्या केल्या पण त्याची सरकारने दखलही घेतली नाही. ब्रिटीश सरकार काँग्रेसकडे करीत असलेले दुर्लक्ष ॲलन ह्यूम यांनाही अस्वस्थ करीत होती. त्यांनी काँग्रेस जनसामान्यांपर्यंत पोहोचावी, काँग्रेसच्या मागण्यांना लोकमताचा पाठींबा मिळवावा व इंग्लंडमधील चार्टिस्ट चळवळीसारखी लोकचळवळ उभारुन सरकारवर दबाव आणावा असे परिपत्रक १८९२ मध्ये काढले पण मवाळ वाद्यांनी त्याची दखलही घेतली नाही त्यामुळे मवाळ नेते राष्ट्रीय संघटनेचे नेतृत्त्व समर्थपणे करु शकत नाही असे जहाल तरुणांना वाटू लागले. एका बाजूला मवाळ नेत्यांबद्दल असंतोष वाढलेला असताना दुसरीकडे अत्याचारी ब्रिटीश शासनाबद्दलही संताप वाढत चालला होता. ब्रिटीश शासन भारताची प्रचंड आर्थिक पिळवणूक करीत होते. १९ व्या शतकाच्या शेवटी हिंदी जनतेला भयंकर दुष्काळ व प्लेगच्या साथींना तोंड द्यावे लागले. १८९६-९७ मध्ये पडलेला दुष्काळ सर्वात भयंकर दुष्काळ होता त्यात दोन कोटी भारतीय मृत्युमुखी पडले तरीही रयतेला मदत न करता शासन उधळपट्टी करीत होते, सारावसुलीही थांबली नाही. १८९९-१९०० या काळात पुन्हा दुष्काळ पडला, प्लेगची साथही पसरली. पुण्यात कमिशनर रँडने प्लेगची साथ नष्ट करण्यासाठी कमालीची निर्दयता दाखवली त्यामुळे तरुणवर्ग जहालवादी बनत गेला.

याच काळात चिमुकल्या जपानने १९०४ मध्ये बलाढ्य रशियाचा पराभव केला. त्यामुळे युरोपियन श्रेष्ठत्वाला मोठा धक्का बसला. इ.स. १८९९ ते १९०५ या काळात गव्हर्नर जनरल म्हणून आलेल्या लॉर्ड कर्झनने अत्याचाराचा परमोच्च बिंदू गाठला. त्याच्या दडपशाहीमुळे भारतात जहालवादाला खतपाणी मिळाले. त्याने स्थानिक स्वराज्य संस्थांवर नियंत्रण आणण्यासाठी १८९९ मध्ये "कलकत्ता कार्पोरेशन ॲक्ट" पास करुन कार्पोरेशनमधून हिंदी लोकप्रतिनिधींची हकालपट्टी केली. उच्च शिक्षणाला विरोध करण्यासाठी १९०४ मध्ये "इंडीयन युनिव्हर्सिटीज ॲक्ट" पास करुन विद्यापीठांची स्वायतत्ता नष्ट केली. १९०५ मध्ये कर्झनने बंगालची फाळणी केल्याने जहालवादाचा मोठ्या प्रमाणात उदय घडून आला.

### ५.५.२ जहालवादी तत्त्वज्ञान

जहालांचा नेमस्तांच्या सनदशीर मार्गावर विश्वास नव्हता. नेमस्तांच्या विचारांना आलेले अपयश पाहून जहालांनी प्रत्यक्ष कृतीवर आधारलेले धोरण स्वीकारले. जहालांच्या मते आपले हक्क आपण भिक्षा मागून न मिळविता संघर्ष करुन मिळवले पाहिजेत, काँग्रेस संघटनेला स्वातंत्र्य चळवळीचे प्रभावी माध्यम बनवावे त्यासाठी जनतेला सहभागी करुन ती खऱ्या अर्थाने राष्ट्रीय संघटना बनवली पाहिजे. प्रखर राष्ट्रभिमान निर्माण करण्यासाठी भारतीय इतिहासातील महान व्यक्ती जनतेची स्फूर्तीस्थाने बनवावी, मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था स्थापन कराव्यात असे जहालवाद्यांना वाटत होते. देश पारतंत्र्यात असताना समाज सुधारणांना प्राधान्य देण्याऐवजी राजकीय सुधारणांना प्राधान्य दिल्यास देश लवकर स्वतंत्र होईल व देश स्वतंत्र झाल्यावर वाटेल तेवढ्या सामाजिक सुधारणा करता येतील अशी जहालांची भूमिका होती.

### ५.५.३ जहालवाद्यांचे नेते – लोकमान्य टिळक

जहाल राष्ट्रवादाचा सातत्याने प्रचार करुन राष्ट्रीय चळवळीत चैतन्य निर्माण करण्याचे कार्य टिळकांनी केले. लोकजागृती साठी टिळकांनी १८९४ साली गणपतीउत्सव व १८९५ साली शिवजंयती उत्सवाला सुरुवत केली. या उत्सवामागील हेतू धार्मिक नसून राजकीय होता. केसरी व मराठा ही टिळकांनी सुरु केलेली वृत्तपत्रे म्हणजे जहाल हत्यारेच ठरली १८८५ मध्ये मवाळांच्या ताब्यातील सार्वजनिक सभेची सूत्रे टिळकांनी आपल्या हाती घेतली व या संस्थेच्या माध्यमातून राजकीय चळवळीची वाढ केली.

लोकमान्य टिळकांना भारतभर प्रसिद्धी मिळाली ती रँड प्रकरणामुळे. १८९७-९८ मध्ये पुण्यात प्लेगच्या साथीमुळे हाहा:कार माजला असताना कमिशनर रँडने अत्याचार करुन आगीत तेल ओतले. क्रांतीकारक चाफेकर बंधूनी रँडला ठार केल्याने संपूर्ण भारत हादरला. टिळकांनी मात्र खूनाचे नैतिकदृष्ट्या समर्थन केले. केसरीमधील अग्रलेख सरकारविरुद्ध आग ओकू लागले. ब्रिटीश शासनाने रँडच्या खूनाला चिथावणी व राजद्रोहाचा आरोप ठेवून टिळकांना १८ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. टिळकांनी दाखविलेला स्वाभीमान व खंबीरपणा जनतेला आवडला आणि टिळक लोकमान्य व राष्ट्रीय नेते बनले.

### ५.५.४ काँग्रेसमधील फूट व जहालांचा विजय

१९०६ च्या कलकत्ता अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून टिळकांचे नाव बिपीनचंद्र पाल यांनी सुचविताच मवाळांनी दादाभाई नौरोजी यांचे नाव पुढे करुन त्यांना अध्यक्ष केले. त्यामुळे जहाल-मवाळ संघर्ष वाढला. १९०७ चे अधिवेशन नागपूरला भरणार होते. परंतू महाराष्ट्रातील टिळकांचे वर्चस्व लक्षात घेऊन मवाळांनी सूरत येथे अधिवेशन घेण्याचे ठरविले. कलकत्ता अधिवेशनात दादाभाई नौरोजींनी स्वराज्याची मागणी केली होती. सूरत अधिवेशनात तसा ठराव झाल्यास जहाल विरोध करणार नव्हते. पण मवाळांनी त्याकडे दुर्लक्ष करुन डॉ. रासबिहारी घोष यांचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविले याचा जहालांनी निषेध केला तरी अध्यक्षांच्या नावाची घोषणा झाल्याने टिळकांनी व्यासपीठाकडे जाण्यास सुरुवात केली, त्यांना विरोध करण्यात आला, कोणीतरी मारुन फेकलेला जोडा मेहतांना लागला. दोन्ही गटात मारामाऱ्या होऊन काँग्रेसमध्ये जहाल-मवाळ अशी फूट घडून आली.

१९०८ मध्ये टिळकांना सहा वर्षे कारावासाची शिक्षा झाली. १९१४ मध्ये त्यांची सुटका झाली. यावेळी गोपाळ कृष्ण गोखले व फिरोजशहा मेहता या प्रमुख मवाळ नेत्यांचे निधन झाले होते. त्यामुळे लवकरच जहालांचा प्रभाव वाढून काँग्रेस टिळकांच्या ताब्यात गेली.

### ५.५.५ बंगालची फाळणी व महाराष्ट्रातील चळवळ

बंगालमधील जहालवादी व क्रांतीकारी चळवळ दडपण्यासाठी तसेच हिंदु-मुस्लिमांमध्ये वितुष्ट निर्माण करण्यासाठी लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली. या फाळणी विरुद्ध संपूर्ण देशात वंगभंग आंदोलन सुरु झाले. टिळकांनी या फाळणी विरोधात मोठे जनआंदोलन उभारले. स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही त्रिसुत्री स्वीकारली.

स्वदेशीचा विचार पटलेले विद्यार्थी उत्तर पत्रिकेसाठी देशी कागद मागू लागले. कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी त्यांना दिल्या गेलेल्या विदेशी कागदावर उत्तर पत्रिका लिहीण्यास नकार दिला. ऑक्टोबर १९०५ मध्ये पुणे येथील जाहीर सभेत 'काळ' कर्ते शिवराम परांजपे यांनी केलेल्या स्फूर्तीदायक भाषणानंतर पुण्यात शिकत असलेल्या वि. दा. सावरकरांनी विदेशी वस्तूंची होळी केली. बेळगावच्या विद्यार्थ्यांची तेथील ब्रिटीश जिल्हा न्यायाधीशाने शाळेत वाटलेली मिठाई न खाता ती होळी पेटवून फेकून दिली.

नागपूर व वऱ्हाडमध्ये दादासाहेब खापर्डे, डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे या नेत्यांनी स्वदेशी व बहिष्काराचा प्रसार केला, यवतमाळमध्ये हा प्रचार बाबासाहेव परांजपे, श्यामराव देशपांडे व पृथ्वीगीर गोसावी यांनी केला. विलायती मालावरील बहीष्कारामुळे मुंबई, अहमदाबाद येथील गिरण्यात तयार होणाऱ्या स्वदेशी कापडाची मागणी एकदम वाढली.

महाराष्ट्रात लोकप्रिय झालेली स्वदेशी-बहिष्काराची चळवळ दडपून टाकण्यासाठी सरकारने भंयकर स्वरुपाचे उपाय योजले, सार्वजनिक सभांना बंदी घातली, ठिकठिकाणी गोळीबार करुन सभा उधळून लावल्या, वृत्तपत्रांवर बंधने घातली. १९०८ मध्ये टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून सहा वर्षाची शिक्षा ठोठावली. सरकारच्या दडपशाहीमुळे जहालवादाला मोठे खतपाणी मिळाले. शेवटी १२ डिसेंबर १९११ रोजी ब्रिटीश शासनाने बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा केली.

### ५.५.६ होमरुल चळवळ

इ.स. १९१६ मध्ये जहाल-मवाळ ऐक्य घडून आले. याच वर्षी टिळकांनी मुस्लिम लीगशी लखनौ करार करुन होमरुल चळवळ सुरु केली. ही चळवळ प्रथम आयर्लंडमध्ये सुरु झाली होती. तशीच चळवळ भारतातही सुरु करण्याचा विचार डॉ. अँनी बेझंट यांनी मांडला. टिळकांनी त्यास मान्यता देऊन बेळगावच्या प्रांतिक परिषदेत होमरुल लीगची स्थापना केली. लीगच्या अध्यक्षपदी बॅ. बॅप्टिस्टा व सचिव म्हणून न. चि. केळकर यांची नियुक्ती केली. लखनौ अधिवेशनानंतर टिळकांनी महाराष्ट्रात सिन्नर, संगमनेर, चिपळूण, येवला, सातारा व पुणे याठिकाणी भेटी देऊन होमरुल चळवळीचा प्रसार केला. नागपूर व वऱ्हाडच्या भागातही होमरुल चळवळीला प्रचंड पाठिंबा मिळाला. अमरावती, यवतमाळ, अकोला येथील शेकडो लोक लीगचे सदस्य बनले. बाबासाहेब परांजपे, बापुजी अणे, श्यामराव देशपांडे यांनी मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी केली. मे १९१७ मध्ये टिळकांनी नाशिकला लीगचे अधिवेशन घेतले. भारतातील जनजागृतीची ब्रिटीशांना जाणीव झाली. त्यातून २० ऑगस्ट १९१७ रोजी भारतमंत्री माँटेग्यू चेम्सफर्ड यांनी हिंदुस्थानला मिळणाऱ्या स्वराज्यात जबाबदार राज्यपद्धती देण्याची घोषणा केली.

### ५.५.७ टिळकांचा मृत्यू

माँटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा टिळकांना असमाधानकारक वाटल्याने त्यांनी देशातील राज्यपद्धती ठरविण्याचा अधिकार हिंदी लोकांना असावा असे जाहीर केले. याचवेळी सरकारने जालीयनवालाबाग हत्याकांडावरील पक्षपाती अहवाल घोषीत केला. त्यामुळे काँग्रेसचा अपेक्षाभंग झाला. याचवेळी भारतीय राजकारणात म. गांधीचा उदय झाला व त्यांनी सरकारविरुद्ध असहकार आंदोलन सुरु करण्याचा निर्णय घेतला. टिळकांनीही या चळवळीस पाठींबा दिला परंतु ज्या दिवशी हे आंदोलन सुरु होणार होते त्याच दिवशी १ ऑगस्ट १९२० रोजी टिळकांचा मुंबईत मृत्यु झाला. त्यांच्या निधनाने जहालवादाचे युग समाप्त झाले.

**आपली प्रगती तपासा**

१) लॉर्ड कर्झनने स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी कोणता कायदा पास केला ?

२) लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय आंदोलनात कोणती त्रिसूत्री स्वीकारली ?

## ५.६ समारोप

ब्रिटीशांनी भारतात निर्माण केलेल्या आधुनिक प्रशासन व शिक्षणव्यवस्थेमुळे भारतीयांना आपल्यामधील दोषांची जाणीव होऊ लागली. राजकीय जागृतीमुळे ईस्ट इंडीया असोसिएशन, बॉम्बे असोसिएशन, सार्वजनिक सभा या संस्था निर्माण झाल्या. त्यातूनच पुढे ॲलन ह्यूमच्या पुढाकाराने राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. ही काँग्रेस सुरुवातीला ब्रिटीशांच्या प्रभावाखाली असल्याने मवाळवादी बनली. १८८५ ते १९०५ या काळात राष्ट्रीय चळवळीने मोठे स्वरुप धारण केले नव्हते. ब्रिटीश शासन काँग्रेसला किंमत देत नव्हती उलट लॉर्ड कर्झन सारखे गव्हर्नर जनरल प्रचंड दडपशाही करीत होते. बंगालच्या फाळणीमुळे संपूर्ण देश पेटून उठला. त्यातून जहालवादाला खतपाणी मिळून लो. टिळकांचा उदय झाला. टिळकांनी काँग्रेसला कृतीशील बनवले. १९२० मध्ये टिळकांचा मृत्यु झाला याच वेळी भारताला म. गांधीचे नेतृत्त्व लाभले. १९२० पासून अहिंसावादी काळाला सुरुवात झाली. म. गांधींच्या नेतृत्त्वाखाली असहकार, सविनय कायदेभंग चळवळ व चलेजाव चळवळ झाली. याच काळात क्रांतीकारकांनीही रक्तरंजीत चळवळ उभारली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी तर परकीय देशांची मदत घेऊन इंग्रजांच्या मनात धडकी भरवली. या सर्वाचा एकत्रीत परिणाम होऊन १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.

## ५.७ प्रश्न

१) ईस्ट इंडीया असोसिएशन, बॉम्बे असोसिएशन व सार्वजनिक सभा या राजकीय संस्थांचे मूल्यमापन करा.

२) काँग्रेसच्या स्थापनेतील महत्त्वाचे घटक स्पष्ट करा.

३) १८८५ ते १९०५ या कालखंडातील काँग्रेसची कामगिरी लिहा.

४) जहालवादाचा उदय कसा झाला ते सांगुन लोकमान्य टिळकांची कामगिरी सांगा.

❖❖❖❖

# ६

# क्रांतिकारी चळवळ व गांधीयुग

**घटक रचना :**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ क्रांतीकारक चळवळीचा उदय व तत्त्वज्ञान

६.३ महाराष्ट्रातील क्रांतीकारी चळवळ

६.४ गांधीयुग

६.५ समारोप

६.६ प्रश्न

## ६.० उद्दिष्टे

- क्रांतीकारी चळवळीचा उदय व तत्त्वज्ञान जाणून घेणे.
- महाराष्ट्रातील क्रांतीकारकांची चळवळ अभ्यासणे
- महात्मा गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या चळवळींचा अभ्यास करणे.

## ६.१ प्रस्तावना

भारताचे आर्थिक शोषण, बंगालची फाळणी, लार्ड कर्झनची दमननिती, भारताची आर्थिक लूट, दारिद्र्य, प्लेगची साथ, दुष्काळ किंवा नैसर्गिक संकटाच्या वेळी सरकारचे दुर्लक्ष, भारतीयांना कमी लेखण्याचा इंग्रजांचा स्वभाव, काँग्रेसच्या घटनात्मक मार्गाचा अनादर या सर्व कारणांमुळे भारतात प्रखर राष्ट्रवाद आणि क्रांतीकारी राष्ट्रवाद या दोन विचार प्रवाहांचा उदय झाला.

ब्रिटीशांनी केलेल्या सुधारणांमध्ये नवीन शाळा, वृत्तपत्रे, पुस्तके, बोटी, रेल्वेसेवा यांच्यामुळे शहरी जीवनाला चांगले स्वरुप प्राप्त झाले. पण ग्रामीण भागामध्ये मात्र निष्ठूर, जुलमी जमीनदार आणि दडपशाही पद्धतीने करवसूली आणि त्याकरिता असलेले कायदे या सर्वांमुळे त्यांचे भवितव्य अगदी रसातळाला गेले. इंग्लंडहून यंत्रावर तयार होणाऱ्या वस्तूंची आयात

वाढल्याने हस्तकलेचा व्यवसाय संपूष्टात आला. ज्यांचा रोजगार नष्ट झाला. असे लोक शेतीकडे वळले. परंतु शेतीतही सततचे दुष्काळ, गरीबी, व्यापारी पिकांची मागणी, सावकारांचे अत्याचार यामुळे ते निराशेच्या खाईत लोटले गेले त्यातून प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध शेतकऱ्यांनी उठाव केले. ब्रिटीशांनी जंगलविषयक केलेल्या कायद्याविरुद्ध भिल्ल, रामोशी, कोळी या आदिवासी जमातींनीही उठाव केले. या सर्व उठावांना सुशिक्षीत वर्गाचा पाठींबा फारसा मिळू शकला नाही. हे सर्व उठाव दडपले गेले असले तरी भारताच्या इतिहासात त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे.

## ६.२ क्रांतीकारी चळवळीचा उदय व तत्त्वज्ञान

सनदशीर राजकारणाच्या अपयशाच्या पार्श्वभूमीवर देशात व महाराष्ट्रात जहाल राष्ट्रवाद उदयास आला होता. जहाल राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या वृत्तपत्रांनी क्रांतीकारी चळवळीला खतपाणी घातले. चिपळूणकरांची निंबधमाला, टिळकांचे केसरी व मराठा, परांजपेंचे काळ या वृत्तपत्रातून व नियतकालिकातून ब्रिटीशांच्या अन्याय्य धोरणावर टिका होऊ लागली. वृत्तपत्रातील जहाल लेखातून क्रांतीकारकांना प्रेरणा मिळाली. इटलीचा स्वातंत्र्ययोद्धा जोसेफ मॅझीनी या क्रांतीकारकाच्या चरित्राने भारतीय क्रांतीकारक झपाटले होते. सावरकरांनी इंग्लडंला जातांना मॅझीनीची चरित्रांची इंग्रजी प्रत नेली होती. सन १८५७ मध्ये ब्रिटीशांना भारतातून हाकलून लावण्यासाठी भारतीयांचा प्रयत्न अयशस्वी ठरला असला तरी त्याच्या स्मृती पुसल्या गेल्या नव्हत्या कंपनीच्या लष्करातील हिंदी शिपायांचे शौर्य, राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांचा पराक्रम व बलीदान यातूनही क्रांतीकारी चळवळीला प्रेरणा मिळाली. कृष्णाजी प्रल्हाद खाडीलकरांनी लिहिलेल्या किचकवध या कर्झनच्या अत्याचारी कारभारावर प्रकाश टाकणाऱ्या नाटकाने महाराष्ट्रात खळबळ माजवली. बंगालच्या फाळणीने संपूर्ण देशातच संतापाची लाट उसळली होती. अशा परिस्थितीत क्रांतीकारी चळवळीचा बंगाल, पंजाबप्रमाणे महाराष्ट्रातही उदय झाला.

क्रांतीकारी तरुण हे राष्ट्रवादाचे कट्टर पुरस्कर्ते होते. परकीयांच्या गुलामगिरीत राहून जीवन जगण्यापेक्षा या तरुणांना मातृभूमीच्या रक्षणासाठी मरण पत्करणे प्रिय वाटत होते. मायभूमीच्या रक्षणासाठी बलिदान दिल्याशिवाय देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही. अशी क्रांतीकारकांची धारणा होती. देशात अराजकता निर्माण करण्याचे क्रांतीकारकांचे ध्येय नसून देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हे त्यांचे अंतिम ध्येय होते. मूठभर ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या हत्येने देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही हे ते जाणून होते. परंतु अशा कृत्यामुळे लोकमत जागृत होईल आणि भारतीय समाज क्रियाशील बनेल असे त्यांना वाटत होते. ब्रिटीशांवर दहशत बसविण्यासाठी जुलमी ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खून करणे, रेल्वे मार्ग उखडणे, सरकारी इमारतींचा विध्वंस करणे व सरकारी तिजोरीवर दरोडे घालणे, शस्त्रे मिळवणे असे मार्ग या क्रांतीकारकांनी अवलंबिले.

## ६.३ महाराष्ट्रातील क्रांतीकारी चळवळ

### ६.३.१ वासुदेव बळवंत फडके

इ.स. १८४५ मध्ये ब्राम्हण कुटुंबात जन्मलेल्या फडकेंनी इंग्रजी शिक्षण घेतल्यानंतर रेल्वेखात्यात लिपीक म्हणून व नंतर लष्करी खात्यात नोकरी केली. या ठिकाणी मिळालेल्या

अपमानास्पद वागणुकीमुळे त्यांच्या मनात राष्ट्रीय भावना जागृत होऊन सरकारी नोकरी सोडली याच काळात संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळाने थैमान घातले होते. याबद्दल ब्रिटीशांची उदासीनता पाहून फडकेंच्या मनात क्रांतीवादी विचार घोळू लागले. त्यासाठी सुशिक्षीतांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला पण त्यास प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी मांग व रामोशांचे सैन्य उभारले.

इ.स. १८७९ पासून फडकेंनी ब्रिटीशांविरुद्ध क्रांतीयुद्ध पुकारले. पश्चिम महाराष्ट्रात फडकेंची मोठी दहशत निर्माण झाली. फडकेंनी क्रांतीकारकांचे सशस्त्र गट तयार करुन त्यांच्या द्वारे दळणवळणाचे मार्ग उध्वस्त करणे, फोनच्या तारा तोडणे, कारागृहांवर हल्ला करुन कैद्यांना मुक्त करणे, सरकारी खजीने लुटणे असा उठाव सुरु केला. धनिकांच्या घरातील लुटलेला पैसा व धान्य त्यांनी दुष्काळग्रस्त भागातील लोकांना वाटल्यामुळे फडके लोकांचे दैवत बनले. ब्रिटीश शासनाने फडकेंच्या उठावाची गांभीर्याने दखल घेऊन त्यांना पकडण्यासाठी मेजर डॅनियलची नियुक्त केली तसेच मोठ्या बक्षिसाची रक्कमही जाहीर केली. २७ जुलै १८७९ रोजी गाणगापूरजवळील एका मंदिरात तापाने फणफणलेले फडके डॅनियलच्या हाती लागले. फडकेंवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. फडकेंच्या वतीने सार्वजनिक काकांनी व नंतर सत्र न्यायालयात महादेव चिमणाजी आपटे या वकीलांनी खटला लढवला परंतु ब्रिटीश न्यायालयाने फडकेंना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. एडनच्या तुरुंगात १७ फेब्रुवारी १८८३ रोजी या महान क्रांतीकारकाचा मृत्यु झाला.

### ६.३.२ बाल समाज व समर्थ शिवाजी समाज

पांडुरंग खानखोजे, गजानन पाठक व लक्ष्मण शर्मा या टिळकभक्त विद्यार्थ्यांनी वर्धा व नागपुर येथे स्थापन केलेली आर्य बांधव समाज ही संस्था वर्ध्याला बाल समाज या नावाने आणि नागपूरला समर्थ शिवाजी समाज या नावाने गुप्तपणे क्रांतीकार्य करीत होती. व्यायाम करण्यासाठी तालमीत जमायचे, कुस्ती व कसरतीचे खेळ शिकवायचे, गणेशोत्सव, शिवजंयती उत्सव साजरे करुन देशभक्त तरुणांना देश मुक्त करण्याच्या प्रयत्नात सामील करुन घ्यायचे असे या संघटनेचे सूत्र होते.

### ६.३.३ चाफेकर बंधूचे क्रांतीकार्य

इ.स. १८९६ मध्ये दामोदर, बाळकृष्ण, वासुदेव हे चाफेकर बंधू तसेच दामुअण्णा भिडे, महादेव विनायक रानडे या तरुणांनी चाफेकर क्लबची स्थापना केली. याच काळात महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला होता. पाठोपाठ प्लेगची भंयकर साथ आली. प्रथम मुंबईत या रोगाची लागण झाली आणि तेथून ती अन्य शहरात पसरली. प्लेगच्या साथीला आळा घालण्यासाठी ४ फेब्रुवारी १८९७ रोजी मंजुर झालेल्या एका कायद्यानुसार प्रांतिक सरकारला विशेष अधिकार देण्यात आले. प्लेगची लागण झालेल्या रोग्यास निरोगी माणसापासून वेगळे करणे व त्यास खास इस्पीतळात दाखल करणे आवश्यक होते पण रोगाचा नायनाट करण्याच्या बहाण्याने इंग्रज पोलीसांनी जनतेवर अत्याचार सुरु केले. पुण्यात प्लेगला आळा घालण्याची खास कामगिरी कॅप्टन रँड या कडक वर्तन असलेल्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली. त्याच्या सैनिकांनी प्लेगचा रोगी शोधण्याचा धडाका लावला. देवघरात घुसून देव्हाऱ्यासह सर्व भांडीकुंडी फेकून देत, बिछाने-कपडे जाळून टाकत. अनेक ठिकाणी किंमती ऐवज चोरीस गेला, स्त्रियांची विटंबना झाली.

या अत्याचारामुळे क्रांतीकारक पेटून ऊठले. चाफेकर बंधुंनी रँडच्या खूनाचा कट रचला. २२ जून १८९७ रोजी दामोदर चाफेकर व त्यांच्या बंधूंनी मध्यरात्री गव्हर्नर सोबत मेजवानी आटोपून घोडागाडीतून शहरात परतणाऱ्या कॅप्टन रँड व लेप्टनंट आयर्स्टवर गोळ्या झाडल्या. आयर्स्ट ताबडतोब मृत्यु पावला तर रँड दोन दिवसांनी मरण पावला. या खूनाची चौकशी सुरु झाली. गणेश शंकर द्रवीड व रामचंद्र शंकर द्रवीड हे बंधू फितूर झाल्याने १७ डिसेंबर १८९८ रोजी बाळकृष्ण चाफेकर पकडले गेले. याचा बदला घेण्यासाठी ८ फेब्रुवारी रोजी वासुदेव चाफेकर व महादेव विनायक रानडे यांनी द्रवीड बंधूना गोळ्या झाडून ठार केले. अखेर सर्वजण पकडले गेले. दामोदर, बाळकृष्ण, वासुदेव हे चाफेकर बंधू व महादेव रानडे या सर्वांना फाशीची शिक्षा झाली.

## ६.३.४ विनायक दामोदर सावरकर

नोव्हेंबर १८९९ मध्ये सावरकर, राजबापू म्हसकर, रावजी कृष्णा या तिघांनी नाशिकमध्ये “राष्ट्रभक्तसमुह” ही गुप्तमंडळी स्थापन केली. १ जानेवारी १९०० रोजी स्थापन झालेल्या “मित्रमेळा” हे त्या गुप्तमंडळीचे प्रकट रुप होते. याच संस्थेतून निर्भय व धाडसी राष्ट्रभक्त तरुणांची निवड करुन १९०४ मध्ये “अभिनव भारत” या क्रांतीकारी संघटनेची स्थापना करण्यात आली. देशाचे संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करणे हे अभिनव भारत या संघटनेचे ध्येय असून त्यासाठी सशस्त्र क्रांतीचे धोरण स्वीकारले.

पं. श्यामजी कृष्ण वर्मा यांनी हिंदी विद्यार्थ्यांसाठी शिवाजी शिष्यवृत्ती देण्याचे जाहीर केले. टिळकांच्या प्रयत्नांमुळे ही शिष्यवूती सावरकरांना दिली गेली. त्यामुळे इ.स.१२०६ साली वि. दा. सावरकर हे बॅरिस्टर बनण्यासाठी इंग्लंडला गेले. यानंतर अभिनव भारताचे कार्य त्यांचे बंधू गणेश दामोदर सावरकर यांनी पाहिले. सावरकर लंडनला पोहोचल्यानंतर त्यांनी त्याठिकाणी हिंदी लोकांना एकत्रित केले तसेच लंडनहून पिस्तुले व काडतुसे नाशिकला पाठवली. सेनापती बापट व बंगालचे हेमचंद्र दास यांना रशियन क्रांतीकारकांकडून बाँब तयार करण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी सावरकरांनी पॅरीसला पाठवले होते. या काळात अभिनव भारतचे क्रांतीकारक संपूर्ण देशात प्रसिद्ध होऊ लागले. अभिनव भारताच्या सदस्या मॅडम मादाम कामा यांनी १९०७ मध्ये जर्मनीत भरलेल्या इंटरनॅशनल सोशॅलिस्ट कॉन्फरन्समध्ये स्वतः तयार केलेला तिरंगा ध्वज स्वतंत्र भारताचा ध्वज म्हणून फडकवला व भारतीयांच्या स्वातंत्र्याची आकांक्षा जगापुढे मांडली.

सावकरांच्या लंडन येथील क्रांतीकार्याची सरकारला माहिती लागल्यामुळे जून १९०८ साली नाशिक येथे गणेश दामोदर सावरकर यांच्या घराची झडती घेतली. काही गुप्त कागदपत्रे सरकारच्या हाती लागल्याने गणेश सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा झाली. याचा बदला घेण्यासाठी पंजाबच्या मदनलाल धिंग्रांने १ जुलै १९०९ रोजी कर्झन वायलीचा खून केला. १७ ऑगस्ट रोजी त्याला फाशी देण्यात आली. तसेच अभिनव भारतने नाशिकच्या जिल्हाधिकारी ऑर्थर जॅक्सनचा खून करण्याचा कट रचला. २१ डिसेंबर १९०९ रोजी नाशिकच्या विजयानंद नाट्यगृहात १८ वर्षे वयाचा अनंत लक्ष्मण कान्हेरेने जॅक्सनवर गोळ्या झाडून त्याची हत्या केली. १९ एप्रिल १९१० रोजी कान्हेरेला फाशी देण्यात आली. जॅक्सनच्या खुनानंतर सरकारने अनेकांची धरपकड सुरु केली. अभिनव भारतच्या शाखेवर छापे टाकून ती नेस्तनाबुत केली. जॅक्सनच्या वधाचा संबंध सावरकरांशी जोडण्यात येऊन त्यांना ३१ मार्च १९१० रोजी बोटीने निघाले. ७ जुलैला त्यांची बोट मार्सेलीस बंदराजवळ थांबली असता सावरकरांनी बोटीच्या संडासातील

छिद्रातून समुद्रात ऐतिहासिक उडी घेतली आणि गोळ्यांच्या वर्षावात फ्रान्सचा किनारा गाठला. पण पलायनाचा प्रयत्न अपयशी ठरुन त्यांना अटक झाली. २४ डिसेंबर १९१० रोजी सावरकरांना जन्मठेप व ५० वर्षे काळया पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. अंदमानच्या भयंकर तुरुंगात १० ते ११ वर्षे सावरकरांनी तुरुंगवास भोगला. ६ जानेवारी १९२४ रोजी त्यांची सुटका झाली.

### ६.३.५ सेनापती बापट

पांडुरंग महादेव बापट उर्फ सेनापती बापट हे मुंबई विद्यापीठाच्या मंगळदास नथुबाई टेक्निकल स्कॉलरशिप तर्फे इंग्लडंला मेकॅनिकल इंजिनिरिंगचे शिक्षण घेण्यासाठी गेले असता, त्यांची भेट क्रांतीकारकांना मदत करणाऱ्या श्यामजी कृष्ण वर्मा यांच्याशी झाल्याने ते क्रांतीकार्याकडे खेचले गेले. इंग्लंडमध्ये त्यांनी आपल्या भाषणातून त्यांची इंग्रज राजवटीचे सत्य स्वरुप उघड केल्याने त्यांची शिष्यवृत्ती बंद करण्यात आली त्यामुळे ते इंडीया हाऊसमध्ये रहायला गेले. तेथेच सावरकर, मदनलाल धिंग्रा यांचा सहवास लाभला. सावरकरांच्या प्रभावाने बापट बॉंबविद्या शिकण्यासाठी पॅरीसला गेले तेथे त्यांना रशियन भाषेतील बॉंब तयार करण्याची कागदपत्रे मिळाली. अन्या खोस या रशियन महिलेच्या मदतीने त्यांचे भाषांतर करुन भारतीय क्रांतीकारकांना त्याच्या प्रती पाठवल्या. १९०८ मध्ये ते भारतात परतले. ३० एप्रिल १९०८ रोजी खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी या क्रांतीकारकांनी कलकत्त्याचे मॅजीस्ट्रेट किंग्जफोर्ड यांच्या गाडीवर बॉंब टाकला. यात किंग्जफोर्ड बचावला. पण दोन स्त्रिया ठार झाल्या. खुदीरामला फाशी झाली तर प्रफूल्ल चाकीने आत्महत्या केली. यानंतर ३६ क्रांतीकारकांना अटक होऊन त्यांच्यावर खटले भरले हे माणिकतोळा प्रकरण खूप गाजले. माणिकतोळा बागेतील सर्व बॉंबसाठा सरकारने जप्त केला. यामागील सूत्रधार म्हणून पोलीस बापटांना शोधू लागले. २८ डिसेंबर १९१२ रोजी त्यांना अटक झाली. पुराव्याअभावी त्यांची सुटका झाली. मुळशी सत्याग्रह, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत बापटांनी मोठे योगदान दिले. २८ नोव्हेंबर १९६७ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

### ६.३.६ शिवराम हरि राजगुरु

पुणे जिल्ह्यातील खेड येथे १९०८ मध्ये राजगुरुचा जन्म झाला. डॉ. हर्डीकर यांच्या सेवादलात असतांनाच त्यांचा संबंध 'हिंदूस्थान रिपब्लीकन पार्टी' या क्रांतीकारी संघटनेशी आला. चंद्रशेखर आझाद, भगतसिंह, सुखदेव अशा क्रांतीकारकांच्या सहवासात आल्याने ते सशस्त्र उठाव करण्यास प्रेरित झाले. लाला लजपतरायांवर सॉंडर्स नावाच्या पोलीस अधिकाऱ्यांने लाठीहल्ला केला. त्यात जखमी होऊन लजपतराय मरण पावले. त्याचा बदला घेण्यासाठी १७ फेब्रुवारी १९२८ रोजी राजगुरु व भगतसिंहने लाहोर येथे सॉंडर्सवर गोळ्या घालून त्याची हत्या केली. या हत्येबरोबरच नॅशनल बॅंकेची लूट, क्रांतीकारक जोगेशचंद्र चटर्जींची सुटका यांतही राजगुरुंचा सहभाग होता. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंह व सुखदेवसह राजगुरुलाही फाशी देण्यात आली.

### ६.३.७ क्रांतीकारी चळवळीचे अपयश

१८५७ नंतरच्या काळात इंग्रजी राजवटीला सशस्त्र प्रतिकार करण्याच्या प्रयत्नात मराठी भाषीक आघाडीवर होते. ते अग्रस्थान १९०८ पासून बंगालने पटकावले. पुढील काळात बंगाल, पंजाब, संयुक्त प्रांत, बिहार येथील तरुणांनी सशस्त्र लढ्यात जितका सहभाग घेतला

तितका महाराष्ट्रातील तरुणांनी घेतला नाही. जॅक्सनच्या खूनानंतर कोणत्याही इंग्रज अधिकाऱ्याचा खून महाराष्ट्रात झाल्याचे दिसत नाही. ही क्रांतीकारी चळवळ अपयशी ठरण्याचे अनेक कारणे होती. सरकारने प्रचंड दडपशाही करुन ही चळवळ दडपून टाकली. क्रांतीकारकांना जनतेचाही पाहिजे तेवढा पाठिंबा मिळाला नाही. क्रांतीकारी चळवळ दडपून टाकण्यासाठी आपल्याच बांधवांनी सरकारला गुप्त माहिती पूरवून मदत केली. क्रांतीकारकांना राष्ट्रीय नेतृत्त्व नसून काही प्रांतातच या चळवळीचा प्रसार झाला. वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या या चळवळीस दडपणे शासनाला सहज शक्य होते. सरकारविरुद्ध सशस्त्र लढा देण्यासाठी आवश्यक मोठा शस्त्रसाठा क्रांतीकारकांकडे नव्हता. १९२० नंतर महात्मा गांधींचा भारतीय राजकारणात प्रवेश झाला. भारतीय जनतेला अहिंसेच्या मार्गाने जाणे योग्य वाटले.

### ६.३.८ आपली प्रगती तपासा

१. कृष्णाजी प्रल्हाद खाडीलकरांच्या कोणत्या नाटकामुळे खळबळ माजली ?
२. वासुदेव बळवंत फडकेंना कोणी अटक केली ?
३. अभिनव भारत ही संघटना कशाप्रकारे स्थापन झाली ?

---

---

---

---

## ६.४ महात्मा गांधी युग

### ६.४.१ गांधीयुगाला प्रारंभ

लोकमान्य टिळकांचा १ऑगस्ट १९२० मध्ये मृत्यू झाला त्याचवेळी देशाला व काँग्रेसला मोहनदास करमचंद गांधी यांच्या रुपाने नवे नेतृत्त्व मिळाले. गांधीचा जन्म इ.स. १८६९ मध्ये काठेवाडमधील पोरबंदर या ठिकाणी झाला. १८८८ मध्ये कायद्याची पदवी मिळविण्यासाठी ते विलायतेस गेले व बॅरीस्टर बनून भारतात परतले. वकीलीच्या व्यवसाया निमित्त एका खटल्यासंदर्भात १८९३ मध्ये ते दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटीश वसाहत नाताळ येथे गेले असता तेथे आंदोलन करण्याची वेळ त्यांच्यावर आली. तेथील ब्रिटीश राजवटीने हिंदी लोकांचा मतदानाचा हक्क हिरावून घेण्याचा कायदा केला तसेच चोर-दरोडेखोरां प्रमाणे हिंदी लोकांचे बोटाचे ठसे सरकारजमा करण्याचे आदेश दिले त्यामुळे गांधीजींनी अन्यायी कायद्याविरुद्ध सत्याग्रह व अहिंसात्मक लढा सुरु केला. १९०६ ते १९१४ या काळात द. आफ्रिकेतील सरकारला नमवून अनेक कर व कायदे रद्द करुन घेतले. गोपाळकृष्ण गोखले यांच्या आग्रहामुळे १९१५ मध्ये ते मायदेशी परतले. याचकाळात पहिले महायुद्ध सुरु होते. या युद्धात गांधीजींनी ब्रिटीश सरकारला मदत करण्याचे जाहीर केले.

फिजी बेटावरील गुलामगिरीची पद्धत, बिहारमधील चंपारण्यात निळीच्या मळ्यांवर काम करणाऱ्या मजूरांवरील अत्याचार, अहमदाबादमधील कापडगिरणी कामगारांवरील अन्याय तसेच गुजरातमधील खेड जिल्ह्यात शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेले सत्याग्रह पूर्ण यशस्वी झाले.

### ६.४.२ असहकार चळवळ

ब्रिटीश सरकारने १९१९ मध्ये रौलेट ॲक्ट हा अत्याचारी कायदा पास केला. या कायद्याने राजद्रोही व्यक्तींवरील खटले चालविण्यासाठी तीन न्यायाधिशांचे खास न्यायालय स्थापन केले जावे, या न्यायालयाचा निर्णय अंतीम असेल, संशयीत व्यक्तीला कारण न सांगता अटक करण्याचा व खटला भरण्याचा अमर्याद अधिकार पोलीसांना मिळाला. या कायद्याविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रह सुरु केला. पोलीसांची दडपशाही वाढली असतांनाच १३ एप्रिल १९१९ रोजी रौलेट कायद्याचा निषेध करण्यासाठी जमलेल्या जमावावर पंजाबमधील जालीयनवाला बाग येथे जनरल डायरने प्रचंड गोळीबार करुन भयानक हत्याकांड घडवले.

या सर्व घटनांमुळे म. गांधींचा सरकारवरील विश्वास उडाला व त्यांनी १ ऑगस्ट १९२० रोजी अहकाराची घोषणा २६ डिसेंबर १९२० रोजी नागपुर अधिवेशनात असहकाराचा ठराव मांडला गेला. महाराष्ट्रातील जहाल नेते काकासाहेब खाडीलकर, शिवरामपंत परांजपे, गंगाधरराव देशपांडे यांनी गांधीजींना पाठींबा दिला. परंतु टिळक पक्षातील न. चिं. केळकर, दादासाहेब खापर्डे, अण्णासाहेब भोपटकर, बॅ. जयकर अणे, मुंजे यांनी विरोध केला तरीही बहूमताने असहकाराचा ठराव मंजूर झाला. त्यानुसार पदव्या, मानाच्या जागा व सरकार नियुक्त जागांचा त्याग करणे, सरकारी सभा-समारंभावर बहिष्कार घालून राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापन करणे, ब्रिटीश न्यायालये, निवडणूका तसेच परदेशी मालावर बहिष्कार टाकणे व स्वदेशीला उत्तेजन देणे असा कार्यक्रम ठरविण्यात आला. स्वदेशीला उत्तेजन देण्यासाठी एक कोटीचा फंड जमा करण्याचा निर्णय घेऊन गांधीजींनी या फंडास "टिळक स्वराज्य फंड" असे नाव दिले.

### ६.४.३ महाराष्ट्रातील असहकार

म. गांधीजींच्या असहकार चळवळीला भक्कम प्रवाह देण्याचे काम महाराष्ट्रात काकासाहेब खाडीलकर, गंगाधरराव देशपांडे, सेनापती बापट, काकासाहेब गाडगीळ, भाऊसाहेब रानडे, शि. म. परांजपे, हरिभाऊ फाटक, विनोबा भावे, लोकनायक अणे, अभ्यंकर, अच्युतराव कोल्हटकर, वामनराव जोशी यांनी केले असहकार चळवळीचा एक भाग म्हणून महाराष्ट्रात काहींनी वर्षभर वकीली सोडली तर काहींनी खटले चालविण्यास नकार दिला. वेंगुर्ला, मालवण, रत्नागिरी, सातारा, अहमदनगर, येवला, अंमळनेर व चिंचवड येथे राष्ट्रीय शाळा काढण्यात आल्या. या शाळात शिक्षक म्हणून काम करणाऱ्या स. का. पाटील, अप्पासाहेब पटवर्धन, नाथ घाणेकर, दादा चौधरी व आपटे गुरुजींनी अनेकदा कारावास भोगला.

३१ जुलै १९२१ रोजी गांधीजींनी मुंबई येथे एलफिन्स्टन मिलच्या आवारात परदेशी कापडांची होळी पहिल्यांदा पेटवली. ९ ऑक्टोबरला दुसरी होळी येथेच पेटली यानंतर महाराष्ट्रात ठिकठिकाणी परदेशी कापडाच्या होळया होऊ लागल्या.

कायदेमंडळावर बहिष्कार टाकून १९२१ च्या निवडणूकीत मुंबईचे बॅ. बॅप्टिस्टा, डॉ. साठे, डॉ. वेलकर, डॉ. पवार, बॅ. मेया, पुण्याचे न. चि. केळकर, सातारचे सोमण देशपांडे, करंदीकर, वऱ्हाडचे अणे, काळे, नागपुरचे डॉ. मुंजे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले मद्यपान निषेध चळवळीला गांधींनी पाठींबा दिला. ३ जून १९२१ रोजी काही स्वयंसेवकांनी दादरच्या पाच दारु गुत्यांसमोर निर्दशने केली. सर्वत्र हे आंदोलन शांततेने चालले असताना धारवाडचे जिल्हाधिकारी पेंटर यांनी दडपशाही करुन दारू गुत्यासमोर निदर्शने करणाऱ्या जमावावर गोळीबार केला त्यात तीनजण ठार व वीस जखमी झाले.

नोव्हेंबर १९२१ मध्ये इंग्लंडच्या गादीचा वारस प्रिन्स ऑफ वेल्स याचे मुंबईत आगमन झाले. त्याच्या स्वागतसमारंभावर लोकांनी बहिष्कार घातला. त्याचदिवशी चौपाटीवर गांधीची भव्य सभा झाली. सभेनंतर शहरात दंगली झाल्या. सर्व देशात अहकार आंदोलनाने वेग घेतलेला असतानांच मालेगाव व उत्तरप्रदेशातील चौरीचौरा येथे झालेल्या हिसांचाराने मं. गांधी व्यथीत झाले व त्यांनी १८ फेब्रुवारी १९२२ रोजी असहकार आंदोलन मागे घेतले. या आंदोलनामुळे जनतेची प्रतिकारशक्ती वाढली, महाराष्ट्रात नवे नेतृत्त्व उदयास आले, टिळकवाद्यांचे महत्त्व कमी होऊन महाराष्ट्रात मं. गांधींचा प्रभाव वाढला.

### ६.४.४ सविनय कायदेभंग चळवळ

असहकार चळवळ अचानक बंद पडल्याने स्वातंत्र्य चळवळीला धोका निर्माण झाला. ही चळवळ बंद पडू नये म्हणून चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरु यांनी १९२३ मध्ये स्वराज्य पक्षाची स्थापना केली. या पक्षाने कायदेमंडळात प्रवेश करुन शासनाला असहकार करण्याची चळवळ सुरु केली. १९२६ मध्ये या पक्षाचे अस्तित्व संपुष्टात आले. इंग्लंडच्या पंतप्रधानांनी १९२७ मध्ये भारताच्या शासकीय कारभाराची चौकशी करण्यासाठी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमीशन भारतात पाठवले. सात सदस्यीय या कमीशनमध्ये एकही भारतीय प्रतिनिधी नव्हता. त्यामुळे भारतीयांनी त्यास विरोध केला. मुंबईत हजारो कामगारांनी डांगे यांच्या नेतृत्त्वाखाली मोर्चा काढला. पजांबमध्ये लाला लजपतराय सायमन कमिशनविरुद्ध काढलेल्या मोर्चात लाठीमारामुळे प्रचंड जखमी झाले, लखनौत नेहरुंना लाठ्या खाव्या लागल्या.

इंग्लंडमध्ये उदारमतवादी मजूर पक्ष सत्तेवर येऊनही भारताच्या स्वराज्याचा प्रश्न सोडविण्यास तो तयार नव्हता. म. गांधींना अजुनही तडजोडीची आशा होती म्हणून त्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विनला सादर केले त्यात मीठावरील कर रद्द करावा, जमीन महसूलात ५० टक्के कपात करावी. संरक्षण खर्चात ५० टक्के कपात, परदेशी कापडावर आयात कर लावावा या मागण्या केल्या पण त्या मागण्या मान्य न झाल्याने १४ फेब्रुवारी १९३० रोजी गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु करण्याची घोषणा केली.

### ६.४.५ मीठाचा सत्याग्रह

महात्मा गांधींनी मीठाचा कायदा मोडून कायदेभंग चळवळ सुरु करण्याचे ठरविले. सुरत जिल्ह्यातील दांडी या गावी मिठाचा कायदा मोडण्यासाठी साबरमती आश्रमातून ७९ अनुयायांची पहिली तुकडी निघाली. या तुकडीत गणपतराव गोडसे, विनायकराव आपटे, पंडीत खरे व गोविंद हरकारे वगैरे १३ मराठी भाषिक होते. ५ एप्रिल १९३० रोजी गांधींची दांडीयात्रा पूर्ण झाली. ७ एप्रिलपासून मुंबईत कायदा मोडून गोळा केलेल्या मिठाची विक्री सुरु झाली यावेळी

जमनालाल बजाज, युसूफ मेहरअली, सादीक अहमद, कोळ्यांचे नेते पोशा गोविंद नाखवा यांना अटक झाली. ४ मे ची मध्यरात्र उलटल्यानंतर गांधीजींना अटक करुन येरवड्याच्या तुरुंगात ठेवण्यात आले.

मुंबईजवळील वडाळा येतील मीठागरावर हजारो लोकांनी इंग्रजांना न जुमानता सत्याग्रह केला. त्यांना साथ देण्यासाठी मुंबईतील रेल्वे कामगारांनी रुईकर व कांदळकर यांच्या नेतृत्त्वाखाली संप सुरु केला. जेथे समुद्र नाही अशा अकोला जिल्हयात दहीहंडा गावी खाऱ्या पाण्याच्या विहीरी जवळ सत्याग्रह झाला.

## ६.४.६ सोलापूरचा सत्याग्रह

सोलापुरमध्ये ७ मे रोजी गिरणी कामगारांनी काम थांबविले. कामगारांचा जमाव दारुचे गुत्ते उध्वस्त करीत, परदेशी मालाच्या होळ्या पेटवीत रस्त्यावर निघाला. त्यांच्यावर ब्रिटीश प्रशासनाने गोळीबार केला यात ९ माणसे ठार व २० जखमी झाली. सोलापुरात लष्करी कायदा लागू करण्यात आला. सोलापूरच्या नगरपालिकेत काँग्रेसचे बहूमत असल्याने नगरपालिकेच्या इमारतीवर तिरंगा झेंडा फडकवण्याचा ठराव पास केला गेला. ६ एप्रिल १९३० रोजी तिंरगा फडकवताच कर्नल पेजने नगराध्यक्ष माणिकचंद शहांना धमकी देऊन झेंडा उतरवण्यास सांगितले. पण शहानी नकार दिला चिडलेल्या कर्नल पेजने जबरदस्तीने झेंडा उतरविला या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात झेंडा सत्याग्रह सुरु झाले. या आंदोलनातील आंदोलकांना हद्दपार करण्यात आले, पुण्याचे वासुदेव साठे, अनंत काळे वगैरे २५ जणांना कारावासाची शिक्षा झाली. तिरंग्या झेंड्याला मनाई केल्याने लोकांनी गांधी टोपीचा प्रसार सुरु केला. ब्रिटीश सैनिकानी लोकांच्या डोक्यावरील गांधी टोप्या काढण्याचा धडाका लावला पण हे आंदोलन वाढतच गेले. मुंबई प्रांतात वारुबाई दास्ताने, पार्वतीबाई ठकार, राधाबाई आपटे, आनंदीबाई जोगळेकर, विमल गुप्ते, प्रेमा कंटक, अवंतिका गोखले या स्त्रियांनीही कायदेभंग चळवळीत भाग घेतला.

## ६.४.७ जंगल सत्याग्रह

सन १८६६ च्या कायद्याने जंगलाबाबत अनेक निर्बंध लादण्यात आले होते. या कायद्याबद्दल आदिवासींच्या मनातील असंतोष लक्षात घेऊन जंगलासंबंधीचे कायदे मोडून सत्याग्रह करण्याचा निर्णय जुलै १९३० मध्ये घेण्यात आला. २२ जुलै १९३० रोजी संगमनेर व अकोला तालुक्यात एकाचवेळी २०-२२ ठिकाणी सत्याग्रह करण्यात आले. त्यात तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, लालजी पेंडसे, श्रीनिवास देसाई यांनी भाग घेतला. नाशिक जिल्ह्यात सटाणा, बागलाण व कळवण तालुक्यात जंगल सत्याग्रह जोरात होता.

सातारा जिल्ह्यातील बिशाळी गावात शेतकऱ्यांनी कायदाभंग करुन जंगलातून झाड तोडून आणले आणि भर चौकात उभे करुन त्याच्यावर व देवळावर राष्ट्रध्वज फडकवला १० जुलै १९३० रोजी पुसदजवळच्या आरक्षित जंगलातील गवत कापून बापुजी अणेंच्या नेतृत्त्वाखाली ११ स्वयंसेवकानी जंगलचा कायदा मोडला. त्याबद्दल अणेंना सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली. पुणे जिल्ह्यातील मिठाचा कायदेभंगाचा खेडोपाड्यात प्रचार करण्याचे कार्य विठ्ठल रामजी शिंदे, हरिभाऊ तुळपुळे, वासुकाका जोशी, धर्मानंद कोसंबी, केशवराव जेधे यांनी केले. पुणे जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या बाबू गेनूने १२ डिसेंबर १९३० रोजी मुंबईत परदेशी कापडाने भरलेल्या लॉरीपुढे आडवे होऊन बलीदान केले.

### ६.४.८ चले जाव चळवळीला प्रारंभ

ब्रिटीश सरकारने १९३० मध्ये गोलमेज परिषद भरवली. पण काँग्रेसने बहिष्कार घातल्याने ती अपयशी ठरली. सरकारने काँग्रेसच्या सर्व नेत्यांची सुटका केली. ५ मार्च १९३१ रोजी गांधी-आयर्विन करार झाला त्यानुसार काही काळ कायदेभंग चळवळ स्थगीत करुन गांधीजी लंडनला दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेले. या परिषदेत जातीय प्रश्न गुंतागुंतीचा बनल्याने कोणताही निर्णय होऊ शकला नाही. भारतात परतताच गांधीजींनी पुन्हा कायदेभंग चळवळ सुरु केली. ब्रिटीशांनी प्रचंड दडपशाही केली. सरकारने श्वेतपत्रिका प्रसिद्ध करुन भारताला अंतर्गत स्वायतत्ता देण्याची घोषणा केल्याने १९३४ मध्ये कायदेभंग चळवळ मागे घेण्यात आली.

१९३५ मध्ये भारत सरकारचा कायदा पास करण्यात आला. या कायद्यानुसार निवडणूका घोषीत केल्या त्यात काँग्रेसला भव्य यश मिळाले. ७ जुलै १९३७ रोजी संयुक्त प्रांत, बिहार, ओरिसा, मुंबई, मद्रास, मध्य प्रांत येथे व सप्टेंबरमध्ये सरहद्द प्रांतात काँग्रेसची मंत्रीमंडळे सत्तारुढ झाली. १९३७ ते १९३९ या काळात काँग्रेस मंत्री मंडळांनी आपल्या प्रांतात विधायक व जनकल्याणाची कामे करुन प्रसिद्धी मिळवली.

१९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरु झाले. इंग्लंडचे पंतप्रधान चर्चीलने ८ ऑगस्ट १९४० रोजी ऑगस्ट घोषणा प्रसिद्ध केली. त्यानुसार युद्धानंतर हिंदूस्थानला वसाहतीचे स्वराज्य देण्यात येईल असे म्हटले. भारतीयांनी या घोषणेला विरोध केला. मं. गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा केली. या चळवळीचा अर्थ सर्वांनी एकदम कायदा न मोडता गांधीजी सांगतील त्या व्यक्तीनेच कायदा मोडायचा. विनोबा भावे हे पहिले सत्याग्रही होते. २३ मार्च १९४२ रोजी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांची योजना काँग्रेसला पटली नाही कारण त्यात भारताला पूर्ण स्वातंत्र्य देण्याबाबतचे आश्वासन नव्हते. ६ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे काँग्रेसने चले जावचा ठराव पास केला. कारण काँग्रेसच्या मते, भारताच्या सरहद्दीवर येऊन ठेपलेल्या जपानचे शत्रूत्व भारताशी नसून ब्रिटीशांशी आहे. त्यामुळे ब्रिटीशांनी भारत सोडल्यास जपानी आक्रमणाचा धोका आपोआप टळेल. ५ ऑगस्ट रोजी मुंबईला म. गांधींनी जनतेला "करेंगे या मरेंगे" असा संदेश दिला व संपूर्ण देशात चले जावची चळवळ सुरु झाली

### ६.४.९ महाराष्ट्रातील चळवळ

९ ऑगस्ट १९४२ रोजी पहाटेच सरकारने गांधीजींवर सर्व काँग्रेसी नेत्यांना अटक केली. सभा, मोर्चे, हरताळ, निदर्शने, वृत्तपत्र यावर बंदी घातली. भारतीय जनतेने मात्र एकही मार्गदर्शक नेता नसताना मनाला वाटेल तशी चळवळ सुरु केली. मुंबई येथील गोवालिया टँक मैदानावर सभेसाठी जमलेल्या लोकांना पांगविण्यासाठी पोलीसांनी लाठीमार व गोळीबार केला त्यात ८ माणसे ठार व ४४ जखमी झाली. ९ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट या चार दिवसात पुण्यात शंकरराव देव, जेधे व गाडगीळ यांच्या अटकेचा निषेध करण्यासाठी लोकांनी मिरवणूका काढल्या. यावेळी पोलीसांनी केलेल्या गोळीबारात ७ जण मरण पावले. नारायण दाभाडे हा सतरा वर्षाचा युवक पोलीसांच्या गोळीबारात बळी पडल्याने महाविद्यालयीन हजारो विद्यार्थ्यांनी मिरवणूक काढून चले जावच्या घोषणा सुरु केल्या पोलीसांनी त्यांच्या वर जबरदस्त लाठीहल्ला सुरु केला, गोळीबार केला त्यात तीन जण मरण पावले.

खानदेशात साने गुरुजींच्या प्रेरणेने डॉ. उत्तमराव पाटील, त्यांच्या पत्नी लीलाताई, बंधू शिवाजी व दशरथ या संपूर्ण कुटुंबाने चळवळीत भाग घेतला. १५ ऑगस्ट १९४१ रोजी अंमळनेरला निघालेल्या विद्यार्थी मोर्चावर पोलीसांनी लाठीमार केला यावेळी लीलाताई पाटील हातात तिरंगा घेऊन पुढे धावल्या त्यामुळे विखूरलेला जमाव पुन्हा एकत्र आला. खानदेशात शेदूर्णी, आडगाव, चाळीसगाव, जळगाव येथेही मोर्चे निघाले. खेड्यापाड्यात रात्रीबेरात्री भुमिगत कार्यकर्ते सभा घेत व पसार होत. भुमिगत चळवळीला मार्गदर्शन करण्यासाठी साने गुरुजींनी मधू लिमये या समाजवादी युवकाची निवड केली. ९ ऑक्टोबरला नंदुरबारमध्ये विद्यार्थ्यांचा मोर्चा निघाला त्यावर पोलीसांनी गोळीबार केला. या मोर्चाच्या अग्रभागी असलेला १५ वर्षाचा शिरीषकुमार मेहता व इतर सहाजण हुतात्मा झाले.

१० ऑगस्टला नागपूर शहरात कडकडीत हरताळ पाळण्यात आला. रामटेक येथे सरकारी कार्यालये, रेल्वे स्टेशन व रेल्वेचे डबे पेटवून देण्यात आले. रामटेकच्या सरकारी खजीन्यातून सुमारे साडेतीन लाख रुपयांची रक्कम लांबविण्यात आली. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालूक्यात भाई कोतवाल यांनी स्वस्त धान्य योजना सरकारला व व्यापाऱ्यांना न जुमानता सुरु केली. त्यांच्या प्रेरणेतून वीस जणांचा आझाद गट क्रांतीकार्यासाठी सिद्ध झाला. १९४३ मध्ये वीज बंद पाडण्याची कामे या गटाने केली ब्रिटीशांशी झालेल्या संघर्षात भाई कोतवाल व त्याचे साथीदार हुतात्मा झाले. याच काळात संपूण देशात साताऱ्यातील पत्रीसरकार प्रसिद्ध झाले. क्रांतीसिंह नाना पाटील यांनी पत्रीसरकर किंवा प्रतिसरकार स्थापन केले. शस्त्रास्त्रे, काठ्या, बंदुका, खजीना गोळा करण्यात आला. नाना पाटील यांनी तुफानी सेना उभारुन गुंडांच्या तळपायावर लाठ्या मारायला सुरुवात केली. भूमिगत आंदोलकांनी तारा तोडणे, रेल्वे पाडणे, स्टेशन जाळणे, सरकारी विश्रामगृहे जाळणे यावर लक्ष केंद्रीत केले. साताऱ्यातील भूमिगतांच्या गटात किसन वीर, पांडुरंग तात्या बोराटे, बापू कचरे ही मंडळी होती. कऱ्हाड गटाचे नेतृत्त्व यशवंतराव चव्हाणांनी केले तर सांगली गटाचे नेतृत्त्व वसंतदादा पाटील यांनी केले.

## ६.४.१० भारताला स्वातंत्र्य व गांधीयुगाची समाप्ती

संपूर्ण देशात चलेजावची चळवळ सुरु असतांना नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी जपानमध्ये आझाद हिंद सेनेची सूत्रे हाती घेऊन जपानच्या मदतीने हिंदूस्थानला स्वतंत्र करण्यासाठी ब्रिटीशांविरुद्ध युद्ध पुकारले. परंतु दुसऱ्या महायुद्धात जर्मनी, जपानचा पराभव झाला. त्यामुळे सुभाषचंद्र बोस यांनाही माघार घ्यावी लागली. हिंदूस्थानात परततांना १८ ऑगस्ट १९४५ रोजी विमान अपघातात त्यांचा मृत्यु झाला. याचवेळी देशात निवडणूका होऊन आठ प्रांतात काँग्रेसची मंत्रीमंडळे सत्तेवर आली. २० जानेवारी १९४६ रोजी सैन्यात अंसतोष निर्माण होऊन मुंबईत नौदलाने उठाव केला. ब्रिटीशांनी त्रिमंत्री योजना जाहीर केली. मुस्लिम लीग व काँग्रेस यांच्यात एकमत अवघड झाले. पाकीस्तान निर्मितीसाठी मुस्लिम लीगने बॅ. जीनांच्या नेतृत्त्वाखाली देशभर दंगली सुरु केल्या. शेवटी माऊंटबॅटन योजनेनुसार देशाच्या फाळणीला मान्यता दिली गेली १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री पुण्यात शनिवारवाड्यावर तिरंगा फडकविण्यात आला व भारताला स्वातंत्र्य मिळाले. फाळणीनंतर भारताच्या खजीन्यातून पाकीस्तानला ७५ कोटी रुपये मिळणार होते त्यातील २० कोटी रक्कम दिली गेली होती. उरलेली ५५ कोटी रुपये पाकीस्तानने काश्मीरवर हल्ला केल्याने भारत सरकारने देण्यास नकार दिला पण माणूसकीच्या भावनेतून महात्मा गांधींनी भारत सरकारला ५५ कोटी रुपये पाकला

देण्यास भाग पाडले. त्यामुळे चिडलेल्या नथूराम गोडसे या माथेफिरुने ३० जानेवारी १९४८ रोजी म. गांधींची हत्या केली. या घटनेने संपूर्ण जगाला धक्का बसला.

### ६.४.११ आपली प्रगती तपासा

१) असहकार चळवळीला कोणकोणत्या टिळकवाद्यांनी विरोध केला ?

२) दांडीयात्रेत म. गांधीसमवेत महाराष्ट्रअतील कोणकोणते मराठी भाषिक सामील होते ?

## ६.५ समारोप

हिंदूस्थानच्या इतिहासात स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास करतांना काँग्रेसचा उदय, मवाळवादी कालखंड, जहालवादी कालखंड तसेच अहिंसावादी किंवा म. गांधींचा कालखंड यांचा अधिक विचार केला जातो. परंतू या सर्व कालखंडाचे देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व असीम त्याग व बलीदान केलेल्या क्रांतीकारकांच्या कार्यालाही आहे. क्रांतीकारी चळवळ देशात फार काळ तग धरु शकली नसली तरी भयंकर कष्ट सोसून आक्रमक राष्ट्रवादाचा पाया रचून, स्वातंत्र्यासाठी हसत हसत बलीदान करणाऱ्या क्रांतीकारकांचे महत्त्व भारतीय स्वातंत्र्य चळवळीत कमी होऊ शकत नाही असे निश्चित म्हणावे लागेल. हिंदूस्थानातील सशस्त्र क्रांतीचे प्रेरणास्थान म्हणून वासुदेव बळवंत फडके यांचे नाव सर्वप्रथम घेतले जाते. इतिहासात त्यांनी केलेले कार्य, त्याग हा न विसरण्यासारखा आहे. परंतु त्यांच्यापूर्वी ५० वर्षे ब्रिटीश राजवटीला सशस्त्र उठाव करुन धडा शिकवणारे अनेक क्रांतीकारी महाराष्ट्रात उदयास आले होते. दक्षिण महाराष्ट्र, खानदेश व नगर परिसरात या अशिक्षीतांनी जमेल त्या साधनानिशी, सुचेल त्या पद्धतीने लढे दिले. हे लढे सुसंघटीत किंवा रोमहर्षक नसले तरी परकीय सत्तेला नामोहरम करण्यासाठी, अत्याचाराला प्रतिकार करण्यासाठी अशिक्षीत आदिवासींनी स्वयंस्फूर्तीने जे लढे दिले त्यावर अधिक संशोधन होणे ही काळाची गरज आहे.

## ६.६ प्रश्न

१. महाराष्ट्रातील क्रांतीकारी चळवळीचे स्वरुप स्पष्ट करा.

२. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या असंतोषाची कारणे सांगून या चळवळीतील महत्त्वाचे टप्पे लिहा.

३. आदिवासींनी ब्रिटीशांविरुद्ध केलेल्या उठावांचे मूल्यमापन करा.

४. म. गांधी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या विविध चळवळीचे मुल्यांकन करा.

❖❖❖❖

# ७

# मुंबई - आर्थिक राजधानी
# अ) कापड गिरण्या, बँकींग सेवा व शेअरबाजार

**घटक रचना :**


७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ मुंबईतील कापड गिरणी उद्योग
७.२.१ मुंबईत कापड गिरण्यांच्या निर्मितीची कारणे
७.२.२ अमेरिकन यादवी युद्धाचा गिरणी उद्योगावरील परिणाम
७.२.३ पहिल्या महायुद्धादरम्यानचा कापड गिरणी उद्योग
७.२.४ स्वदेशी चळवळ व कापड गिरणी उद्योग
७.२.५ आर्थिक महामंदीचे परिणाम
७.२.६ मुंबई बाहेरील कापड उद्योग
७.३ बँकिंग सेवा
७.४ शेअर बाजार
७.५ सारांश
७.६ विद्यापीठीय स्वरुपाचे प्रश्न
७.७ संदर्भसूची


## ७.० उद्दिष्ट्ये

- मुंबईतील कापड गिरणी उद्योगाचा विकास जाणून घेणे.
- कापड गिरणी उद्योगामूळे मुंबईचा आर्थिक विकास कसा झाला ते पाहणे.
- मुंबईतील बँकिग सेवेचा आढावा घेणे.
- मुंबईतील शेअर बाजाराचा अभ्यास करणे.

## ७.२ प्रस्तावना

एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये औद्योगिकरणास सुरवात झाली. या औद्योगिक विकासाचे केंद्र मुंबई होते. या ठिकाणी अनेक कारणांमुळे कापड उद्योग व त्यानंतर कापडगिरणी उद्योग मोठ्या प्रमाणात भरभराटीस आला होता. भारतामध्ये कापसाचे उत्पादन अनेक भागात होत होते. कापसाच्या गाठींची निर्यात भारताबाहेर अनेक देशात प्रारंभीपासूनच होत होती. इंग्रजानी संपूर्ण भारतात आपला प्रत्यक्ष अंमल सुरु केल्यावर भारतातील मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणारा कापूस व त्याची निर्यात करण्यावर अधिक भर दिला या कापसाच्या व अफूच्या निर्यातीमुळे इग्रंजांची भरभराट झाली व मुंबईचाही विकास झाला. त्यांनी मुंबईमध्ये निर्यातीला पोषक वातावरण देण्यासाठी अनेक सोयी-सुविधा निर्माण केल्या. लॉर्ड डलहौसीने दळणवळण व वाहतुकीच्या सोयीकडे लक्ष दिले. त्यांनी अनेक रेल्वेमार्ग आगबोटी व रस्ते निर्माण करून कापसाची केंद्रे जोडली. मुंबई व सुरत ही दोन्ही कापसाची केंद्रे असल्यामुळे ती रेल्वेमार्गाने जोडली. १८६९ साली सुएझ कालवा खोदण्याचे काम पूर्ण झाल्यावर युरोप व भारत अधिक जवळ आले. युरोप आणि आशियातील व्यापारासाठी मुंबई हे बंदर सोयीचे बनले. मुंबईमध्ये कापडगिरण्या, शेअर बाजार व बँका यांचे जाळे पसरल्यामुळे मुंबई भारताची आर्थिक राजधानी बनली.

## ७.२ मुंबईत कापड गिरणी उद्योग

कापसाच्या व्यापारामुळे इंग्लंडमध्ये या काळात अनेक कापड गिरण्या सुरु झाल्या. कापसाचे उत्पादन व व्यापार मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे भारतामध्ये कापडगिरणी उभारण्यात यावे असा विचार सर्वप्रथम डॉ. भाऊ दाजी लाड यांनी मांडला. या दृष्टिकोनातून १८ व्या शतकापासून कापड उद्योगात अग्रेसर असण्याचा पारशी व्यापाऱ्यांनी कापड गिरणी स्थापत्यासाठी पुढाकार घेतला. मुंबईमध्ये पहिली कापडगिरणी श्री. कावसणी नानाभाई दावर यांनी सुरु केली आणि आधुनिक उद्योगाची मुहुर्तमेढ रोवली. इंग्लंडमधील प्लॅट ब्रदर्सच्या मदतीने आणि ५० व्यापारांच्या साहय्याने पाच लाख रुपयांचे भागभांडवल निर्माण करून मुंबईतील पहिली कापडगिरणी “बॉम्बे स्पिनींग ॲन्ड बीव्हिंग कंपनी” ७ जुलै १८५४ रोजी ताडदेव येथे सुरु केली. या गिरणीचे बांधकाम ब्रिटनच्या तज्ञांच्या देखरेखीखाली झाले. याचे स्वागत तत्कालीन वृत्तपत्रांनी जाहिररित्या केली. कापसणीच्या या पहिल्या गिरणीला अल्पावधीतच चांगले यश लाभले आणि त्यामुळे त्यांनी १८५७ मध्ये दुसरी गिरणी काढली. तिचे नाव “थ्रोस्टल मिल” असे होते. माणेकजी पेटिट यांनी मुंबई येथे ऑगस्ट १८५४ मध्ये “ओरिएंटल स्पिनींग आणि विव्हिंग कंपनी” ही दुसरी कापडगिरणी सुरु केली. या गिरणीने सुध्दा कमी वेळात खूप नफा कमविला. या दोहोंच्या यशामुळे मुंबईतील इतर व्यापारी कापडगिरणी उद्योगाकडे वळले. शेठ मंगलदास नथुबाई यांनी “बॉम्बे युनायटेड स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग कंपनी” नावाची गिरणी फेब्रुवारी १८६० मध्ये सुरु केली. भोमनजी होरमसजी वाडिया यांनीसुध्दा ऑगस्ट १८६० मध्ये त्यांच्याच नावाने गिरणी सुरु केली. काही दिवसातच अनेक उद्योजक याकडे आकर्षित झाले. अनेक मिल सुरु झाल्या. १८७५ साली मुंबईत गिरणी मालक संघाची स्थापना झाली. अशा प्रकारे मुंबईत १८९२ पर्यंत अनेक कापड गिरण्या सुरु झाल्या व

मुंबईची भरभराट होत गेली. पण एक गोष्ट महत्त्वाची होती की मुंबईत सुरु झालेल्या कापडगिरण्यांचे मालक इंग्रज, पारशी, भाटिया, खोजा, मारवाडी, सिंधी हे लोक होते तर कामगार मोठ्या प्रमाणात मराठी होते.

### ७.२.१ मुंबईत कापड गिरण्यांच्या निर्मितीची कारणे :

कापड उद्योगधंद्यात महाराष्ट्राचा अग्रकम बराच वरचा आहे. महाराष्ट्रात एकूण १०४ कापड गिरण्या आहेत, या पैकी ५९ कापड गिरण्या एकट्या मुंबई शहरात आहेत. मुंबईत कापड गिरण्या उभारण्यास अनेक भौगोलिक व आर्थिक कारणे जबाबदारी होती.

**मुंबईत कापड गिरण्यांच्या निर्मितीची कारणे :**

१. **भौगोलिक स्थान :** भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील नैसर्गिक बंदर मुंबई असल्याने कापड गिरण्याच्या उभारणीस सुरुवातीच्या काळात भारतात रसायन आणि इंजिनिअरींग कारखाने नसल्यामुळे आवश्यक यंत्रसामग्री इंग्लंडमधून आयात करणे सहज शक्य झाले. बंदरामुळे भारतीय कापडाची निर्यात करता आली.

२. **हवामान :** कापसाच्या सुतापासून धागा न तूटता तयार करण्यासाठी दमट हवामानाची जरुरी असते. अशा प्रकारचे हवामान मुंबईत असल्याने कापड गिरण्या निर्माण झाल्या. आता अशा प्रकारचे हवामान एखाद्या प्रदेशात नसले तरी गिरणीत कृत्रिम तऱ्हेने निर्माण करता येते. अर्थात सुरुवातीस मुंबईच्या हवामानाच्या फायदा गिरण्या उभारण्यास मिळाला.

३. **कच्चा माल :** कापड गिरण्यांना आवश्यक असणारा कापूस मुंबईच्या रेल्वे वाहतुकीमुळे स्वस्तात उपलब्ध झाला. कापड गिरण्यांना वऱ्हाड, खानदेश, कर्नाटकचे पठार, गुजरातचा मैदानी प्रदेश आणि मध्य प्रदेशातूनही कापसाचा पुरवठा होतो.

४. **भांडवल :** मुंबईमधील पारशी, भाटिया यांनी कापड गिरण्यास आवश्यक भांडवल मिळविले. चीन बरोबर कापूस आणि अफूचा व्यापार त्याचप्रमाणे अमेरिकेच्या यादवी युद्धात केलेल्या कापसाच्या निर्यातीमुळे उपलब्ध झालेला पैसा हा भांडवल म्हणून वापरला. कापूस वापरामधील त्याचे सखोल ज्ञान आणि इंग्लंडमधील यंत्रसामग्रीचे तांत्रिक ज्ञान मिळवून कापड गिरण्या उभारल्या.

५. **मजूर पुरवठा व तंत्रज्ञ :** कोकणामधून रायगड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि देशावरुन सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातून मजुरांना पुरवठा प्रथम झाला. त्यानंतर राजस्थान, उत्तरप्रदेश, व मध्यप्रदेशामधूनही मजूरवर्ग उपलब्ध झाला. कापड गिरण्यास आवश्यक असणारे कुशल तंत्रज्ञ सुरुवातीस इंग्लंडमधील लॅकेशायरमधून आणले आणि त्यांच्या देखरेखीखाली कापड गिरण्या सुरु झाल्या.

६. **शक्तिसाधने :** कापड गिरण्यास आवश्यक असणारे कोळसा हे इंधन पश्चिम बंगाल व बिहारच्या खाणीमधून कोलकत्ता बंदरातून बोटींनी आणि काही प्रमाणात परदेशातूनही उपलब्ध केला. यानंतर खोपोली, आंध्र व्हॅली आणि पश्चिम घाटात वीजनिर्मीतीची केंद्र

उभारुन कापड गिरण्यांना वीज पुरविण्यास सुरुवात झाली. कोयनेची वीज निर्माण झाल्याने तिचाही पुरवठा मुंबईच्या कापड गिरण्यांना झाला.

७. **वाहतूक :** रेल्वेची उत्कृष्ट सोय होऊन देशातून अंतर्गत भागात कापड पाठविणे आणि त्याचप्रमाणे कच्चा माल पुरविणे शक्य झाले.

८. **बाजारपेठ :** मुंबईच्या कापडास देशाची मोठी बाजारपेठ आणि जागतिक बाजारपेठ मोठ्या प्रमाणात खुली आहे. मुंबईला मॅचेस्टरचे कापड गिरण्यांचे प्राविण्य व लिव्हरपूलचे व्यापारी आणि बंदराचे वैशिष्ट्य आहे. मुंबई शहरात प्रामुख्याने परळ, लालबाग, भायखळा व दादर भागात कापड गिरण्यांचे केंद्रीकरण झालेले आहे.

### ७.२.२ अमेरिकन यादवी युध्दाचा गिरणी उद्योगावरील परिणाम

अमेरिकेच्या संयुक्त संस्थानामध्ये दक्षिण संस्थाने व उत्तर संस्थानामध्ये गुलामगिरीची अमानुष चाल नष्ट करण्यासाठी यादवी युध्द सुरु झाले. यामुळे भारतातील कापड उद्योगाला व गिरणी व्यवसायाला अप्रत्यक्ष मदत झाली व भारतातील औद्योगिक विकासाचा पाया अधिक भक्कम झाला. मुंबईतील अनेक कापड गिरण्यांना अमेरिकन यादवी युध्दाचा फायदा झाला व गिरणी उद्योग तेजीस आले.

अमेरिकेत यादवी युध्द १८६० पासून सुरु झाल्यामुळे इंग्लंडच्या कापड गिरण्यांना कापूस मिळेनासे झाले. मॅचेस्टर व लँकेशायर येथील कापड गिरण्यांना कापसाचा मोठ्या प्रमाणात तुटवडा झाला. त्यामुळे मँचेस्टर व लॅकेशायर येथील काही कापड गिरण्या कापसाअभावी बंद पडल्या. इंग्लंडमध्ये गिरण्यातील अनेक लोक बेकार झाले व त्यांना या संकटातून वाचविण्यासाठी भारताने मोठ्या प्रमाणात हातभार लावला. भारतातून इंग्लंडला निर्यात होणाऱ्या कापसांच्या गाठीची संख्या १८६० साली जी चार लाख बावीस हजार होती ती १८६६ साली सोळा लाख एकोणीस हजारापर्यंत वाढली. १८६५ पर्यंत १० कापड गिरण्या निर्माण झाल्या त्यामुळे अनेक लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मुंबईच्या कापूस निर्यातीला विशेष महत्त्व आले.

स्वस्त मजूर, कोरडे हवामान, कच्चा कापसासाठी मुबलक उपलब्धता कोळशाचा पुरवठा, वाहतुकीची सोय आणि भांडवलांची उभारणी यामुळे अतिशय कमी खर्चात उत्पादन आणि भरपूर नफा होत असल्याने कापड गिरण्यांची वाढ झपाट्याने झाली आणि मुंबई हे बंदर भारतातील सर्वात श्रीमंत बंदर म्हणून उदयास आले. मुंबईतील गिरणी उद्योगातील रोजगाराची संधी उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण भागातील हजारो शेतमजूर आणि अल्पभूधारक शेतकरी मुंबईकडे स्थलांतरीत झाल्यामुळे मुंबई हे गिरणगाव म्हणून अस्तित्वात आले.

कापड व्यवसायाबाबतची आंतरराष्ट्रीय मागणी, कापसाचे विपुल उत्पादन, दळणवळणाच्या सुविधा आणि स्वस्त मजूर यामुळे मुंबइचे गिरणी उद्योग अल्पावधीतच भरभराटीला आले या काळात गिरण्यांनी भरमसाठ नफेबाजी केली.

### ७.२.३ पहिल्या महायुध्दादरम्यानचा कापड गिरणी उद्योग

इ.स. १९१४ या दरम्यान पहिले महायुध्द लढले गेले. या महायुध्दात युरोपीय राष्ट्रे प्रत्यक्षरित्या आणि आशिया व आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रे अप्रत्यक्षरित्या सहभागी झाले

होते. या युध्दात इंग्लंड हे राष्ट्र अग्रेसर असल्यामुळे याचा फायदा मुंबईला मोठ्या प्रमाणात झाला व मुंबईच्या कापडगिरणी उद्योगास चालना मिळाली. पहिल्या महायुध्दामुळे जर्मनीची कापडगिरणी व तेथील मालावर आधारित असलेल्या आफ्रिका व पश्चिम आशियाच्या बाजारपेठा मुंबईसाठी खुल्या झाल्या. मुंबईच्या कापड उद्योगास आफ्रिका व पश्चिम आशियातील सर्वात मोठ्या बाजारपेठा उपलब्ध झाल्यामुळे मुंबईचा कापडगिरणी उद्योग तेजीस आला. मुंबईच्या कापडगिरणी उद्योगाने युध्दात सहभागी असलेल्या युरोपची व वरील नवीन बाजारपेठांची मागणी पूर्ण केल्यामुळे मुंबई अधिकच श्रीमंत झाली व येथील व्यापाऱ्यांची आर्थिकदृष्ट्या भरभराट झाली.

१९१५ मध्ये मुंबईची निर्यात ८० लाख होती ही वाढून १९१७ पर्यत ती ३ करोड ८० लाखापर्यंत गेली. पुढे यामध्ये अधिक वाढ होऊन १९१९ पर्यंत केवळ गिरणी उद्योगाने १९ करोडएवढा नफा कमविला. यावरूनच पहिल्या महायुध्दा दरम्यान मुंबईने किती पैसा कमविला याची प्रचिती येते. मिलमालक याकाळात खूप श्रीमंत झाले परंतु त्यांनी या नफ्यातील काही भाग किंवा हिस्सा मिलमधील कामगारांना दिला नाही याउलट त्यांचे पैशाच्या हव्यासापोटी शोषण सुरु केले. भाववाढीमुळे कामगारांचे जीवन व्यथित झाले. त्यांना आरोग्याच्या व इतर कोणत्याही सोयीसुविधा कामाच्या ठिकाणी किंवा त्यांच्या राहत्या ठिकाणी मिळाल्या नाहीत. मिलमालकांना भरघोस नफा झाला असला तरी कामगारांच्या वेतनात जरासुध्दा वाढ झाली नाही. याउलट दैनंदिन जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत जवळजवळ तिपटीने वाढ झाली. याच पार्श्वभूमीवर वेतनवाढीसाठी दीड लाख मिलकामगारांनी १९१९ मध्ये पहिला मोठा मिल हरताल किंवा संप केला. पारशी, मुस्लीम आणि भाटिया मिलमालकांशी अनेक दिवसाच्या तडजोडी नंतर कामगारांच्या वेतनात ३० टक्के एवढी वाढ करण्यात आली.

### ७.२.४ स्वदेशी चळवळ व कापड गिरणी उद्योग :

मुंबई मधील कापड गिरणी उद्योग पहिल्या महायुध्दाच्या शेवटी खूप तेजीत आला. अनेक गिरण्या या कालखंडात सुरु करण्यात आल्या. मुंबईच्या अर्थव्यवस्थेस समृध्द करण्याचे काम मुंबईतील कापड गिरणी उद्योगाने केले. मुंबईतील १६० कारखान्यापैकी जवळजवळ ९० या कापड गिरण्या होत्या. त्यामुळे मुंबईच्या आर्थिक भरभराटीत कापडगिरणी उद्योगाचा खूप वाटा मोठा आहे. यातच देशामध्ये सुरु झालेल्या परदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशीचा स्विकार या चळवळीमुळे मुंबईतील कापड व्यवसाय तेजीत आला. या चळवळीच्या दरम्यान (१९०६-१९१०) जवळजवळ ६६ नवीन मिल सुरु झाल्या. या चळवळीचे पुनरुज्जीवन पुढे १९१९ मध्ये झाले. १९२१ पर्यंत अनेक कापडगिरण्या मुंबईमध्ये सुरु झाल्या व अनेकांना रोजगार उपलब्ध झाला. मुंबईतील कापडगिरणी उद्योगाच्या विकासामुळे मुंबईला भारतातील कापडगिरणी उद्योगाची राजधानी मानली जाऊ लागली व तिचे रुपांतर पुढच्या काळात भारताच्या आर्थिक राजधानीत झाले.

### ७.२.५ आर्थिक महामंदीचे परिणाम :-

अमेरिकेतील १९२९ च्या आर्थिक महामंदीचे पडसाद मुंबईतही उमटले. महामंदीच्या मुंबईच्या विकासावर परिणाम झाला व मुंबईतील कापड गिरणी उद्योगास उतरती कळा आली. १९३३ पर्यंत ९ मील बंद पडल्या व १९ मिल बंद होण्याच्या मार्गावर होत्या. १७ मिलंना जवळजवळ ३९ लाख रुपयांचा तोटा झाला. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीस मुंबई ने चांगला प्रतिसाद देत मुंबईच्या मिलमधील कापडांची मागणी कमी केली. बहिष्काराच्या चळवळीमुळे १५ मिलवर बंदी घालण्यात आली ज्यामध्ये ३४००० भारतीय काम करत होते.

हीच स्थिती पुढे दुसऱ्या महायुध्दाच्या दरम्यानसुध्दा होती. युध्दादरम्यान कापड गिरण्यांचे महत्त्व कमी होऊन इतर उद्योगांचे महत्त्व वाढले. तरीसुध्दा दुसऱ्या महायुध्दाच्या शेवटी मुंबईचा एक प्रमुख आर्थिक केंद्र म्हणून उदयास आली. १९४५ मध्ये मुंबईमध्ये जवळजवळ १८४ कापडगिरण्या कार्यरत होत्या. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत मुंबईतील कापड गिरण्यांनी भारताचा भरपूर विकास केला.

## ७.२.६ मुंबई बाहेरील कापड उद्योग

पहिल्या महायुध्दाच्या काळात हळूहळू मुंबईबाहेर गिरणीउद्योग पसरण्यास सुरवात झाली. मुंबईसह सोलापूर हे कापड व्यवसायाचे प्रमुख केंद्र बनले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अनेक कापड गिरण्या सुरु झाल्या त्यामध्ये प्रामुख्याने जळगाव, नागपूर, औरंगाबाद, चाळीसगाव, धुळे, अमळनेर, नाशिक इत्यादी शहरांचा समावेश होतो. या ठिकाणीसुध्दा कापड उद्योग भरभराटीस आला. कापड गिरण्यासाठी कोळशाऐवजी विजेचा वापर सुरु झाल्यामुळे गिरण्याचा उत्पादन खर्च कमी झाला व याचा फायदा मोठ्या प्रमाणात मिलमालकांना झाला.

## कापड गिरणी उद्योगावर आधारित इतर उद्योग

कापडगिरणी उद्योगामुळे मुंबई मध्ये व महाराष्ट्राच्या इतर भागात या उद्योगावर आधारित इतर अनेक उद्योग सुरु होण्यास मदत झाली. या काळात गिरणी उद्योगांशी संबंधित अनेक कारखाने सुरु झाले. रंग, दोरे, चाव्या, रिळे, खळ गिरण्यांना लागणाऱ्या तारा व सुतकाड्यांचे अनेक कारखाने मुंबई व इतर ठिकाणी सुरु झाले. तसेच कापसाची सरकी काढण्याचे कारखाने औरंगाबाद, खानदेश, वऱ्हाड या भागात सुरु झाले. कापड गिरणी उद्योगासाठी महत्त्वाचे असणाऱ्या सुतगिरणी महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी स्वातंत्र्यानंतर सुरु झाल्या. महाराष्ट्रामध्ये १९६० मध्ये पहिली सुतगिरणी इचलकंरजी येथे सुरु करण्यात आली. त्यानंतर महारष्ट्राच्या इतर सर्व प्रशासकिय विभागात अनेक सुतगिरण्या स्थापन झाल्या.

## कामगार चळवळीचा उदय

१८७९ सालापर्यंत १० गिरण्यांमध्ये ८५३३ माणसे काम करीत होती. पुढे १८८१ साली ३२ गिरण्यामध्ये ३१,३५१ माणसे काम करू लागली तर १८९६ मध्ये हे प्रमाण ७१ गिरण्या आणि ७८,४५५ कामगार एवढे वाढले.

मजुर स्वस्त व भरपूर असल्यामुळे मुंबईच्या गिरण्यांनी यांत्रिकीकरणावर पैसे घालण्याची गरज भासली नाही. त्यांच्या उत्पादनात व नफ्यात भरपूर वाढ झाली असतानासुध्दा कामगारांच्या अडचणींकडे व स्वास्थाकडे गिरणी मालकांनी लक्ष दिले नाही. याउलट त्यांचे शोषण करायला सुरुवात केली. त्यामुळे पुढच्या काळात मुंबईमध्ये अनेक कामगार संघटना निर्माण झाल्या व याचे नेतृत्व नारायण मेघाजी लोखंडे यांनी बॉम्बे मिल हॅण्डस असोसिएशन स्थापन करून केले म्हणून त्यांना भारतीय कामगार चळवळीचे जनक म्हणून ओळखले जाते.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की महाराष्ट्राला आधुनिक बनविण्यामध्ये कापडगिरणी उद्योगाचा खूप मोठा वाटा आहे. मुंबईमध्ये कापड गिरणी उद्योग सुरु झाल्यावर मुंबईची भरभराट मोठ्या प्रमाणात झाली व मुंबई हे कापड व्यवसायाचे प्रमुख केंद्र बनले. या उद्योगामध्ये सहभागी असलेले सर्व मालक व व्यापारी भरपूर श्रीमंत झाले. मुंबईतील कापडगिरणी उद्योगामुळे महाराष्ट्राच्या इतर भागातही गिरण्या सुरु झाल्या. लोकांना रोजगार उपलब्ध झाला.

कापडगिरण्यावर आधारित इतर उद्योग व कारखाने सुरु झाले. यामुळे सुरुवातीचा मुंबई व कालौघात महाराष्ट्र भरभराटीस आला आणि १९६० पर्यंत आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती झाली. एम.डी. डेव्हिड यांच्या मते मुंबई ही भारतीय वस्त्रोद्योगाचे माहेरघर मानली जाते व या उद्योगामुळे मुंबईची भरभराट झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१) मुंबईच्या कापड गिरणी उद्योगाची माहिती द्या.

___

___

___

## ७.३ बँकींग सेवा

भारतात फार पूर्वीपासून बँकिंग सेवेचा वापर होत होता असे दिसून येते. त्याला आजच्या काळासारखे स्वरुप नसले तरी रक्कम जमा करणे किंवा कर्ज देणे या बाबी फार पूर्वीपासून होत होत्या. या काळामध्ये बँकेच्या सारखी प्रचलित पध्दत म्हणजे हुंडी होय. पैशाच्या व्यवहारामध्ये हुंडीचा वापर होत असे. अशा प्रकारच्या हुंडी श्रीमंत सावकार, सराफ, साहु किंवा महापन देत असत त्याचे पुरावे आपल्याला संपूर्ण भारतामध्ये सापडले आहे.

**प्रेसिडेन्सी बँकांचा उदय :-**

मुंबईमध्ये १९ व्या शतकात काही शेटिया मंडळीनी बँकेच्या व्यवसायामध्ये सहभाग घेतला होता. इस्ट इंडिया कंपनीच्या राज्य स्थापनेनंतर यासंबधी व्यवहारात थोडे बदल झाले. या कालखंडात परदेशी व्यापार त्यामानाने कमी असल्यामुळे बँकाची आवश्यकता कंपनीला वाटली नाही. परंतु नंतरच्या काळात व्यापर वाढल्यामळे ईस्ट इंडिया कंपनीला युरोपियन पध्दतीची बँक असावी असे वाटले आणि कंपनी सरकारने बँक स्थापने संबंधी रस घेऊन त्यासंबंधी पावले उचलण्यास सुरुवात केली. बंगालच्या कंपनी सरकारने यामध्ये पुढाकार घेऊन पहिली बँक स्थापन केली तिचे नाव कलकत्ता बँक किंवा बँक ऑफ बेंगॉल असे देण्यात आले. त्यानंतर मुंबईमध्ये १८४० साली बँक ऑफ बॉम्बे व १८४३ साली बँक ऑफ मद्रासची स्थापना करण्यात आली. या तिन्ही बँकांना प्रेसिडेन्सी बँक असे संबोधण्यात आले.

या प्रेसिडेन्सी बँकानी आपल्या राज्यात प्रमुख व्यापारिक ठिकाणी आपल्या शाखा उघडल्या परंतु त्यांच्या बँकेच्या व्यवहारामध्ये सुसुत्रतेचा अभाव होता. या तिन्ही बँकेची एक मध्यवर्ती बँक असावी यासाठी १८९९ मध्ये प्रयत्न झाले परंतु तिन्ही बँकांनी याला सहमती दर्शवली नाही. परंतु पहिल्या महायुध्दाच्या दरम्यानची स्थिती पाहून एक मध्यवर्ती बँक असावी या हेतूने ईस्ट इंडिया कंपनीने १९२१ मध्ये इंपिरियल बँकेची स्थापना केली. इंपिरियल बँक ऑफ इंडिया या नावाने ती कार्यरत झाली आणि बँकाची बँक व मध्यवर्ती बँक या नात्याने ती काम करू लागली.

स्वातंत्र्यानंतर या बँकेचे राष्ट्रीयीकरण करुन १९५५ मध्ये तिचे नामकरण 'स्टेट बँक ऑफ इंडिया' असे करण्यात आले. या बँकाच्या अनेक शाखा संपूर्ण भारतभर काढण्यात आला. मुंबईमध्ये ही या बँकाच्या अनेक शाखा काढण्यात आला त्यामुळे मुंबईतील अनेकांना रोजगार मिळाला व मुंबईच्या आर्थिक विकास झाला. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात स्वदेशी चळवळीचे महत्त्व वाढल्यामुळे परकीय बँकांच्या विरोधातून पंजाब नॅशनल बँक, कॅनरा बँक, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकाची स्थापना १८८५ ते १९११ या कालखंडात झाली. या बँकानी आपल्या अनेक शाखा मुंबईमध्ये सुरु केल्या. यानंतर खाजगी बँकांची वाढ झाली. १८४० ते १८६५ या कालखंडात अफूच्या व कापसाच्या भरपूर निर्यातीमूळे मुंबईतील उद्योजकांनी अमाप पैसा कमविला. मुंबईतील अनेक लोक गर्भश्रीमंत झाले. अफूच्या वाढत्या व्यापारामुळे जमशेटजी जीजीभाई व डेव्हिड ससून यांसारखे मुंबईतील इतर अनेक उद्योजक खूप श्रीमंत झाले. पुढे त्यांच्या प्रयत्नांमुळे व आर्थिक सहकार्यामुळे मुंबई येथे हाँगकाँग अण्ड-शांघाय बँकिग कॉरपोरेशन या बँकेची स्थापना करण्यात आली. व्यापारातील व शेअरबाजारातील तेजीमुळे ही बँक भरपूर विकसीत झाली.

**रिझर्व्ह बँकेची स्थापना व तिचे राष्ट्रीयीकरण :**

भारतात अनेक लहान बँका १९२० पर्यंत उदयास आल्या, परंतु योग्य नियंत्रणाच्या अभावी या बँका बुडिस निघाल्या. बँकावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी भारताची मध्यवर्त्ती बँक म्हणून इ.स. १९३५ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियांची स्थापना करण्यात आली. पुढे स्वातंत्र्यानंतर १८४९ च्या बँकिग नियंत्रण कायद्यानुसार रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. रिझर्व्ह बँकेच्या अधिकारात वाढ करुन खाजगी व व्यापारी बँकावरील नियंत्रणात वाढ करण्यात आली. मुंबई हे रिझर्व्ह बँकेचे मुख्य केंद्र असल्यामुळे मुंबईला याचा भरपुर फायदा झाला.

**स्टेट बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण (१९५५) :**

स्वातंत्र्यांनतर इंपिरियल बँक ऑफ इंडिया आणि दहा इतर बँकाची मिळून स्टेट बँक ऑफ इंडियाची स्थापना व तीचे राष्ट्रीयीकरण इ.स. १९५५ मध्ये करण्यात आले. संपूर्ण भारतातील ही सर्वात मोठी बँक मानली जाते. १९६० पर्यत या बँकेच्या अनेक उपबँका स्थापण्यात आल्या. या बँकांनी मुंबईच्या प्रत्येक भागात आपल्या शाखा उघडल्या त्यामुळे मुंबईचा औद्योगिक व आर्थिक विकास होण्यास मदत झाली आणि मुंबई हे बँकिंग क्षेत्राचे प्रमुख केंद्र बनले. सध्या बँकाच्या ठेवीपैकी ७० टक्के ठेवी ह्या मुंबईच्या बँकामध्ये आहेत. सर्व मोठमोठ्या बँकाच्या प्रमुख कचेऱ्या मुंबईतच आहेत. दररोज वटवल्या जाणाऱ्या धनादेशांची संख्याही कलकत्त्याहून वटल्या जाणाऱ्या धनादेशांच्या दुप्पट आहे. बँक व्यवसायाचे मुंबईतील केंद्रीकरणामुळे मुंबईचे महत्त्व वाढले हे. सर्व प्रतिष्ठीत बँकांच्या मुंबईत तीन हजारांवरुन अधिक शाखा आहेत, यावरुन मुंबई हे बँक व्यवसायाचे प्रमुख केंद्र आहे हे समजते.

**आपली प्रगती तपासा :**

१) मुंबईतील बँकाचा विकास सांगा.

---

---

---

## ७.४ शेअर बाजार

मुंबईला भारताची औद्योगिक तसेच आर्थिक राजधानी बनविण्यास अनेक घटक जबाबदार आहेत त्यामध्ये मुंबईतील शेअर बाजाराचा प्रामुख्याने समावेश होतो. मुंबईतील अनेक उद्योग सुरु करण्यामध्ये तसेच ते पुढे वाढविण्यामध्ये शेअर बाजाराचा खूप मोठा वाटा आहे. संपूर्ण भारताच्या आढालीमध्ये मुंबईच्या शेअर मार्केटची भूमिका जास्त महत्त्वाची असते. मुंबईला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यामध्ये मुंबईच्या शेअर बाजाराचे खूप मोठे योगदान आहे. भारतीय रोखे बाजारामध्ये बॉम्बे स्टॉक एक्सचेंज ने सुरुवाती पासूनच खूप महत्त्वाची भूमिका बजावली. भारतातील अनके मोठ्या कंपन्याचे समभाग याच शेअर बाजारामधून उभारले गेले व त्यामुळे या कंपन्या खूप श्रीमंत झाल्या. अनेक भारतीय आणि परदेशी कंपन्यानी अनेक छोटे-मोठे उद्योग मुंबई तसेच आसपासच्या भागामध्ये स्थापन केले. बॉम्बे स्टॉक एक्सचेंजच्या स्थापने पासूनच मुंबईच्या आर्थिक विकासाला नवी दिशा मिळाली आणि मुंबई आर्थिकदृष्ट्या सधन झाली. मुंबईतील अनेक व्यक्ति शेअर बाजारामुळे गर्भश्रीमंत झाल्या त्यामध्ये प्रेमचंद रॉयचंद आणि त्यांच्यासारखे झर अनेक ब्रोकर व उद्योजक यांचा समावेश होतो. त्यांनी पैसा कमविण्याबरोबरच मुंबईच्या एकंदरीत विकासामध्ये हातभार लावला.

### ७.४.१ मुंबईतील शेअर बाजाराचा विकास :

संपूर्ण आशियातील सर्वात पहिला स्टॉक एक्सचेंज म्हणजे बॉम्बे स्टॉक एक्सचेंज होय. भारताच्या भांडवलशाही बाजाराच्या विकासामध्ये ँएँने खूप महत्त्वाची भूमिका बजावली आहे. बॉम्बे स्टॉक एक्सचेंजच्या स्थापने नंतर आशियातील दूसरा स्टॉक एक्सचेंज १८७८ साली टोकियो येथे सुरु झाला. स्टॉक एक्सचेंज या संस्थेद्वारे रोखे किंवा समभागाचा बाजार केला जातो ज्यातून एका व्यापाराची किंवा कंपनीची व्यापारिक मालमत्ता जनतेसाठी खुली केली जाते व त्यातून जनतेस व व्यापारिक वर्गास त्याचा मोबदला मिळतो. हा मोबदला नफा किंवा तोट्याही स्वरुपात असू शकतो. भारतातील दोन तृतीयांश पेक्षा अधिक व्यापार हा बॉम्बे स्टॉक एक्सचेंज द्वारे होतो. म्हणूनच भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचे योगदान खूप महत्त्वाचे आहे. ज्या बॉम्बे स्टॉक एक्सचेंज ने मुंबईचा विकास घडविला, त्याचा विकास कसा झाला ते पाहुया.

१८५० च्या दरम्यान टाऊन हॉलच्या समोरील वडाच्या झाडाखाली (हॉर्निमल सर्कलजवळ) ४ गुजराती व १ फारशी शेखे दलालांनी शेख्यांचा व्यापार सुरु केला. पुढे या व्यापाराकडे अनेक मध्यमवर्गीय व उद्योजक वळले. १८६० ते १८६५ च्या अमेरिकन यादवी युद्धाच्या काळात शेअर बाजारात तेजी आली. या काळात अनेक दलाल उदयास आले त्यांनी

कापसाच्या व्यापरामुळे व शेअर बाजारात तेजी आल्यामुळे भरपूर पैसा कमाविला. यामुळे पुढे १८७४ पासून हा बाजार दलाल रोडवर म्हणजेच आजच्या ठिकाणापासून व्हायला सुरुवात झाली. १८७५ मध्ये याचे नाव 'द नेटिव्ह शेअर ॲण्ड स्टॉक ब्रोकरस असोशिएसन' असे करण्यात आले. पुढे जानेवारी १८९९ मध्ये स्टॉक एक्सचेंज हे ब्रोकर हॉल येथे हलविण्यात आले. याचे उद्घाटन जेम्स मॅकलियन यांनी केले. शेवटी १९८० मध्ये मुंबई शेअर बाजार २८ मजली 'फिरोज जिजीभाई टॉवर' येथे हलविण्यात आले. येथुनच आज शेअर बाजाराचे व्यवहार चालतात. या टॉवरर्सना 'फिरोज जिजीभाई' यांचे नाव देण्यात आले कारण ते बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचे १९६६ ते १९८० या कालखंडात चेअरमन होते. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने १९५६ मध्ये 'सिकयुरिटीज कॉनटॅक्ट रेग्युलेशन ॲक्ट' नुसार मुंबई शेअर बाजारास मान्यत दिली. मुंबई शेअर मार्केट हे संपूर्ण भारतातील मान्यता मिळालेले पहिले शेअर मार्केट होते. स्वातंत्र्यानंतर मुंबई शेअर मार्केटने शेखेबाजारासाठी आपले स्वतःचे कायदे, अटी व नियम बनविले. याचा फायदा शेअर मार्केटवर योग्य नियंत्रण बसविण्यासाठी झाला.

### ७.४.२ अमेरिकन यादवी युद्धाचा मुंबईतील शेअर बाजारावरील परिणाम :

मुंबई येथे स्टॉक एक्सचेजची यशस्वीरित्या सुरुवात झाल्यावर अनेक कारणांमुळे शेअर बाजार भरपूर तेजीस आला. त्यामुळे मुंबईतील शेअर बाजारातील अनेक दलाल, मध्यमवर्ग व व्यापारी कंपन्या श्रीमंत झाल्या. मुंबईला आर्थिक दृष्ट्या सधन करण्यात अमेरिकन यादवी युद्धाचे योगदान फार मोठे आहे. या युद्धामुळे कापसाचा व्यापार व शेअर बाजार मोठ्या प्रमाणात वाढला. हे युद्ध १८६१ ते १८६५ च्या दरम्यान गुलामगिरीची अमानुष प्रथा रद्द करण्यासाठी उत्तर संस्थाने व दक्षिण संस्थानामध्ये लढले गेले. हे युद्ध जरी अमेरिकेमध्ये झाले असले तरी सुद्धा यांचा फायदा मुंबईला झाला. मुंबईची आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढली.

इ.स. १८६१ ते १८६५ हा काळ धंद्याच्या दृष्टीने फार भरभराटीचा होता. अमेरिकेतील यादवी युद्धामुळे भारताच्या कापसाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. मुंबई हे कापसाच्या निर्यातीचे प्रमुख केंद्र बनले. कापसाच्या व्यापारावर आधारित असलेल्या विविध कंपन्या व जहाज कंपन्या या काळात सुरु केल्या त्यामुळे शेअर बाजार फार तेजीस आला. कापसाच्या निर्यातीमध्ये प्रचंड वाढ झाली. या काळात दरवर्षी सरासरी २,१५,८२,८४७ पौंड एवढा कापूस इंग्लंडमध्ये निर्यात केला गेला. युरोपीय जहाज उद्योगाशी स्पर्धा करण्याच्या हेतूने भारतीय उद्योगपतींनी जवळजवळ वीसहून अधिक जहाज कंपन्या सुरु केल्या. ह्या काळात शेअर बाजार तेजीस आला. ह्या जहाज कंपन्याचे शेअर धंदा सुरु होण्यापूर्वीच दुप्पट किंमतीने विकले जात होते. प्रत्येक धाडसी उद्योजक झटकन भरभराटीला येण्याची स्वप्ने बघत होता. त्यामुळे त्यांनी या काळात अनेक कंपन्या सुरु केल्या व त्याचे शेअर किंवा समभाग जनतेसाठी खुले केले. शेअर बाजारातील तेजीमुळे मुंबईतील अनेकांनी शेअर्स विकत घेतले व अनेकांना त्यामुळे भरपूर आर्थिक फायदा झाला. अनेकजण आपले नशीब आजवण्यासाठी मुंबईत आले.

अमेरिकन यादवी युद्धाच्या काळात शेअर बाजार भरपूर तेजीस आला. या काळात सुरु झालेल्या कंपन्याचे शेअर धंदा सुरु होण्यापूर्वीच दुप्पट किंमतीने विकले जात होते. याच काळात बॅकबे रिकलेमेशनची योजना सुरु झाली. ही योजना प्रत्यक्षात आणणाऱ्या कंपनीच्या शेअर्सनी बाजारात धमाल उपवून दिली. ४००० रुपयांचा शेअर किंवा समभाग २५००० रुपयांना विकला गेला आणि त्यामुळे इतर शेअर्सच्या किंमतीही कल्पनेच्या पलीकडे जाऊन पोचल्या. या काळात शेअर दलालांनाही जबरदस्त फायदा झाला. शेअर बाजाराचा बादशहा प्रेमचंद रायचंद यांनी या

काळात भरपूर पैसा कमविला. अशाप्रकारे अमेरिकन यादवी युद्धामुळे मुंबईचा शेअर बाजार वाढला व पुढच्या काळात मुंबई आर्थिकदृष्ट्या संपन्न झाली.

### ७.४.३ प्रेमचंद रॉयचंद - शेअर बाजाराचे अनभिषिक्त सम्राट (शेअर मानिया) :

मुंबईच्या शेअर बाजारामध्ये अनेकांनी आपले नशीब आजमावले व त्यातील बऱ्याच व्यक्ति खूप श्रीमंत झाल्या. शेअर बाजाराच्या स्थापनेमुळे मुंबईमध्ये अनेकांनी नवीन कंपन्या सुरु केल्या. शेअर बाजाराचे ज्ञान असलेल्या शेअर दलालांचा एक नवा वर्ग उदयास आल्या. शेअर बाजारातील दलालांमुळे अनेक उद्योजक श्रीमंत झाले व मुंबईचा आर्थिक विकास साध्य होऊ शकला. टाऊन हॉल येथून दलालांनी शेअर्स बाजार सुरु केला व पुढे या बाजारास नवी उंची मिळवून दिली त्यामुळे त्यांचे हे श्रेय वाखाणण्याजोगे आहे. मुंबईमध्ये शेअर बाजारामुळे अनेक दलाल श्रीमंत झाले व त्यांनी मुंबईच्या एकंदर जडणघडणीत भरीव असे योगदान दिले, प्रेमचंद रॉयचंद हे त्यापैकी एक. त्यांनी मुंबईच्या शेअर बाजाराच्या विकासात खूप महत्त्वाची भूमिका बजावली.

प्रेमचंद रॉयचंद यांनी वयाच्या सोळा वर्षापासून शेअर बाजारात दलालीचा व्यवसाय सुरु केला. आपल्या बुद्धिमतेमुळे व हुशारीमुळे १८६५ पर्यंत मुंबईतील एक अग्रगण्य दलाल म्हणून नावारुपाला आले. मुंबईतील प्रत्येक व्यवसाय किंवा कंपनी सुरु करण्यामध्ये त्यांची वाटा होता. त्यांच्या मदतीशिवाय कोणतीही भारतीय किंवा युरोपियन कंपनी आपला व्यवसाय सुरु करत नसे. त्यांच्यामुळे अनेक वित्तसंस्था सधन झाला व ते सुद्धा कोट्यधीश बनत गेले.

अमेरिकन यादवी युद्धाच्या काळात (१८६०-१८६५) मुंबई शेअर बाजार कापसाच्या वाढत्या मागणीमुळे तेजीस आला. या काळात अनेक कंपन्या उदयास आल्या. त्यांनी या वेळेस सामान्य जनतेसाठी आपले शेअर खुले केले. त्या शेअर्सच्या व्यापार करण्यासाठी शेअर दलालामध्ये स्पर्धा सुरु झाली. शेअर दलाल भरपूर श्रीमंत झाले. प्रेमचंद रॉयचंद यांनीसुद्धा अमाप संपत्ती या काळात मिळविली त्यामुळे १८६५ पर्यंत ते मुंबईतील अग्रगण्य दलाल बनले. त्यांनी या तेजीच्या काळात निरनिराळ्या योजना राबवून अमर्याद संपत्ती मिळविली. ते यशाच्या शिखरावर होते आणि व्यवसायातील प्रत्येक जण त्यांचा सल्ला घेत होता. त्यांच्या जीवनात या व्यापारामुळे अनेक चढ-उतार आलेले दिसतात. अमेरिकन यादवी युद्ध फार काळ चालले आणि इंग्लंडला कापसाचा तुखडा जागवत राहील, या कल्पनेने प्रेमचंद रॉयचंद हे फारसा विचार न करता गुजरातमध्ये पूर्ण कापसाचे पीकच विकत घेतले. त्यानंतर थोड्याच दिवसांत अमेरिकेतील यादवी युद्ध संपल्यामुळे भारतीय कापसाच्या किंमती पार घसरल्या. शेअर्सचे भाव कोसळले आणि मुंबईतील हजारो सटोडियांचे बारा वाजले. अनेक कंपन्या व वित्तसंस्था बुडित निघाल्या. प्रेमचंद रॉयचंददेखील पूर्णपणे बुडाले. परंतु आपल्या मेहनतीच्या जोरावर त्यांनी काही दिवसातच आपले गेलेले वैभव परत मिळवले.

मुंबईच्या भरभराटीमध्ये प्रेमचंद रॉयचंद यांचा प्रमुख वाटा आहे. त्यांनी शेअर बाजारातील दलालीच्या व्यवसायामुळे भरपूर पैसा कमाविला. ते मुंबईतील इतर उद्योगकापेक्षा वेगळै होते. कारण त्यांनी फक्त पैसा कमाविला नाही तर त्याच्यातील मोठा हिस्सा मुंबईच्या विकासासाठी दिला ज्यामुळे मुंबई सर्वांगाने सुंदर बनली. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात जवळजवळ तीस लाख रुपयांचा दानधर्म केला. मुंबईच्या अनेक शिल्पकारांमध्ये प्रेमचंद रॉयचंद

याना मानाचे स्थान दिले जाते कारण ते स्वत: मोठे उद्योगपती बनले, तसेच त्यांच्या मदतीने अनेकजण उद्योजक बनले. त्यामुळे मुंबईत अनेक उद्योगधंदे वाढले व शहराची भरभराट झाली. शेअर बाजाराचे नियम, प्रथा व परंपरा सुरु करण्यामध्ये त्यांनी पुढाकार घेतला. ते भारतातील असे पहिले भारतीय ब्रोकर होते कि ज्यांना इंग्रजी लिहिता, बोलता आणि वाचता येत होते. त्यांच्या ज्ञानामुळे मुंबई शेअर बाजार यशाच्या शिखरावर जाऊन पोहोचला.

### ७.४.४ स्वातंत्र्यानंतरचा मुंबई शेअर बाजार :

स्वातंत्र्यानंतर सुद्धा मुंबई शेअर बाजार फार तेजीत होता. नवनवीन कंपन्या या कालखंडात सुरु झाल्या त्यामुळे या कंपन्यांचे शेअर्स घेऊन मध्यमवर्गीयसुद्धा श्रीमंत होण्याची स्वप्ने बघु लागले. समभाग खरेदी करण्यामध्ये त्यांचा अधिक भरणा होता. १९६० पर्यंत मुंबईचा शेअर बाजार खूप विकसित झाला व त्यामुळे मुंबईच्या व पर्यायाने महाराष्ट्राचा विकास झाला.

आजच्या काळात मुंबई शेअर बाजार हे आशिया खंडातील चौथे व जगातील आठव्या क्रमांकाचे सर्वात मोठे शेअर बाजार आहे. मुंबईच्या शेअर बाजारामध्ये जगातील इतर कोणत्याही राष्ट्राच्या शेअर मार्केटपेक्षा अधिक कंपन्या आहेत. मुंबईच्या शेअर बाजारामध्ये जवळजवळ ५००० च्या व भारतीय कंपन्या आहेत. १९८६ पासून भारतामध्ये मोठ्या प्रमाणात शेअर व्यापारासाठी व बाजारासाठी वापरले जाते. अशाप्रकारे मुंबईला आर्थिक राजधानी बनविण्यात शेअर बाजाराने खूप मोठे योगदान दिलेले आहे. हे वरील विवेचनावरुन स्पष्ट होते.

### ७.४.५ आपली प्रगती तपासा :

प्र. मुंबई शेअर बाजाराची थोडक्यात माहिती सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ७.५ सारांश

मुंबईतील कापडगिरणी उद्योग, जहाल उद्योग, अन्नउद्योग, चर्मोद्योग, हिऱ्यांचा व्यवसाय, तेलव्यवसाय, तंबाखू उद्योग इत्यादिमुळे मुंबईचा औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. बँक व्यवसाय, शेअर बाजार यांच्या मुंबईतील केंद्रीकरणामुळे आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, प्रमुख बँकाचे मुख्य केंद्र मुंबईत असल्यामुळे मुंबईच्या आर्थिकदृष्ट्या खूप फायदा झाला आहे. मुंबईच्या औद्योगिककरणात कापडगिरणी उद्योग, शेअर बाजार आणि बँक व्यवसायाने मोठा हातभार लावला आहे. सरकारी आणि खाजगी वित्तसंस्थाच्या मुंबईतील अफाट उत्पन्नामुळे मुंबई ही खऱ्या अर्थाने भारताची राजधानी बनली आहे.

## ७.६ विद्यापीठीय स्वरुपाचे प्रश्न

१. कापडगिरणी उद्योगामुळे मुंबईची आर्थिक भरभराट कशाप्रकारे झाली ?

२. मुंबईतील बँकिग सेवेचा आढावा घ्या.

३. मुंबई शेअर बाजारावर सविस्तर टीप लिहा.

४. टिपा लिहा -

अ) प्रेसिडेंन्सी बँका

ब) मुंबई शेअर बाजार

क) प्रेमचंद रॉयचंद

❖❖❖❖

# ८

# कामगार चळवळ

**घटक रचना :**

८.० उद्दिष्ट्ये
८.१ पार्श्वभूमी
८.२ कामगार चळवळ पहिला फॅक्टरी ॲक्ट
८.३ नारायाण मेघाजी लोखंडे
८.४ सुधारीत फॅक्टरी ॲक्ट
८.५ ना. मे. लोखंडेंचा मृत्यू
८.६ १९११ चा फॅक्टरी ॲक्ट
८.७ कामगार हितवर्धक सभा
८.८ सोशल सर्व्हिस लीग
८.९ मुंबईतील कामगारांचे संप
८.१० ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस
८.११ डॉ. आंबेडकरांचे कार्य
८.१२ कामगार संघटनांची वाढ व कम्युनिस्टांचा उदय
८.१३ स्वतंत्र भारतातील कामगार चळवळ
८.१४ सारांश
८.१५ दिर्घोत्तरी प्रश्न

## ८.० उद्दिष्ट्ये

- कामगार चळवळीचा अभ्यास करणे.
- नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार चळवळीतील योगदान अभ्यासणे.
- कामगारांच्या संदर्भात डॉ. आंबेडकराच्या कार्याचा अभ्यास करणे.

## ८.१ पार्श्वभूमी

इंग्लडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे भारतात विविध उद्योगधंद्यांची निर्मिती झाली. भारतात सुतीवस्त्र लोखंड, पोलाद, कोळसा, साखर, कागद, सिमेंट, कातडी, काच, रसायने, अवजारे अशा विविध उद्योगांचा विकास झाला. गुजरात, खानदेश, वऱ्हाड या भागात

पिकणारा कापूस खरेदी करुन त्यापासून इंग्लडंमध्ये बनलेले कापड मुंबईत विकले जाऊ लागले. हिंदूस्थानचे राज्य इंग्रज भांडवलदारांचे व व्यापाऱ्यांचे कुरण बनले. दळणवळणाच्या सोई झाल्यामुळे औद्योगिकरणात झपाट्याने वाढ झाली. मुंबईत पहिली कापडगिरणी इ.स.१८५१ मध्ये सुरु झाली.१८७२ मध्ये मुंबईत १८ गिरण्या होत्या त्या वाढत जाऊन १८८५ पर्यंत ७३ झाल्या. या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढत होती. स्वस्त दरात कामगार मिळत असूनही त्यांना कोणत्याही सुविधा दिल्या जात नव्हत्या. उलट त्यांचे शोषणच मोठ्या प्रमाणात होत होते. ठेकेदारांकडून कामगारांची भरती होई. हे ठेकेदार कामगारांकडून कमिशन घेऊन कामावर लावत. गिरणी मालक कामगारांना पुरेसा पगार देत नसत, १४ ते १८ तास काम करावे लागे, कामाच्या निश्चित वेळा नव्हत्या, पगाराची निश्चित तारीख नसे, पहाटेपासून रात्री उशीरापर्यंत काम चालत असल्यामुळे दुरुन येणाऱ्या अनेक कामगारांना रात्री गेटच्या बाहेर झोपावे लागे, काम करण्याच्या ठिकाणी, वसाहतीत कोंदट, धुराचे, उष्णतेचे वातावरण असल्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येई. कामगारांसाठी सुरक्षिततेचे कोणतेही कायदे नसल्याने कामगारांचे जीनव जनावरापेक्षाही वाईट बनले होते.

## ८.२ कामगार चळवळ – पहिला फॅक्टरी अॅक्ट

मुंबईतील गिरण्यांची स्पर्धा, कामगरांची वाईट अवस्था इंग्लंडमधील गिरणी मालकांना जाणवू लागली त्यामुळे त्यांनी हिंदुस्थानातील कारखान्याबाबत सरकारने कायदा करावा अशी मागणी केली. या घटनेने मुंबईतील गिरणी मालक सावध झाले व त्यांनी "बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन" ही गिरणी मालकांची हितसंबंध जोपासणारी संघटना स्थापन केली. या गिरणी मालकांनी कामगारांच्या स्थितीचे निरीक्षण करण्यासाठी आयोग नेमण्याची मागणी केली त्यामुळे सरकारने २३ मार्च १८७५ रोजी पहिले फॅक्टरी कमिशन नेमले. यातील बहुतेक सदस्य गिरणीमालक असल्याने त्यांनी कारखान्यासंबंधी कायदा करण्यास विरोध केला.

इ.स. १८७५ मध्ये सोराबजी शापूरजी बेंगाली यांच्या नेतृत्वाखाली कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी कायदा करावा अशी मागणी केली. सरकारने १८८१ मध्ये पहिला फॅक्टरी अॅक्ट पास केला. गिरणी मालकांच्या दबावामुळे यातील तरतुदी अत्यंत सौम्य होत्या त्यामुळे कामगारांमध्ये असंतोष पसरला.

## ८.३ नारायण मेघाजी लोखंडे (१८४८-१८९७)

ठाण्यामध्ये जन्म झालेल्या लोखंडेंनी आपल्या नोकरीची सुरुवात मुंबईच्या मांडवी मिलमध्ये स्टोअरकीपरचे काम करुन केली. या काळात कामगारांची दैन्यावस्था त्यांनी जवळून पाहिली होती. महात्मा फुलेंचे ते अनुयायी होते. लोखंडेंनी 'दीनबंधू' हे वृत्तपत्र चालवून त्यात कामगारांची बाजू सातत्याने मांडण्याचा प्रयत्न केला आणि कामगारांचे संघटन सुरु केले. १८८१ चा पहिला फॅक्टरी अॅक्ट कामगारांना मंजूर नसल्याने सुधारीत कायद्याची मागणी वाढली होती. ना. मे. लोखंडेंनी सोराबजी बेंगालीच्या सहकार्याने "बॉम्बे मिल हँडस् असोसिएशन" ही भारतातील पहिली कामगार संघटना स्थापन केली. २३ सप्टेंबर १८८४ रोजी कामगारांची पहिली सभा मुंबईतील परळमध्ये घेतली. या सभेला चार हजार कामगार उपस्थित होते. १५ ऑक्टोबर १८८४ रोजी त्यांनी ५५०० कामगारांना आठवड्यात रविवारी सुट्टी, दिवसभरात

अर्धा तास विश्रांती, कामाची वेळ सकाळी ८.३० वा. पासून सायंकाळी सुर्यास्तापर्यंत असावी, पगार महिन्याच्या १५ तारखेला मिळावा, काम करताना अपघात झाल्यास त्याची भरपाई मिळावी या मागण्या होत्या.

## ८.४ सुधारीत फॅक्टरी ॲक्ट

ना. मे. लोखंडे यांनी कामगार वर्गात जागृती करुन सरकारवर दबाव वाढवला. १८८५ मध्ये मुंबईतील दोन गिरण्यात व १८८७ मध्ये कुर्ला येथील स्वदेशी मिलमध्ये संप झाले. १८८९ मध्ये लोखंडेंनी नव्या फॅक्टरी ॲक्टची पुन्हा मागणी केली. १८९० मध्ये महालक्ष्मी रेसकोर्सवर कामगारांची भव्य सभा घेतली. या सभेला दहा हजार कामगार उपस्थित होते. कामगारांच्या वाढत्या दबावामुळे सरकारने फॅक्टरी लेबर कमीशन नेमले. यात लोखंडे, सोराबजी बेंगाली, मोहन मुखर्जी, महंमद हुसेन हे कामगार प्रतिनिधी होते. इ.स. १८९१ मध्ये नवा फॅक्टरी ॲक्ट मंजूर करण्यात आला त्यात पुढील तरतुदी होत्या.

१) स्त्री कामगारांना ११ तासाचे काम, त्यात अर्धा तास विश्रांती.
२) नऊ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना कामावर न ठेवणे.
३) आठवड्यात एक दिवस सुट्टी.
४) पन्नास किंवा त्यापेक्षा अधिक कामगार ज्या ठिकाणी किमान चार महिने काम करतात त्या ठिकाणाला फॅक्टरी म्हणावे.
५) गिरण्यात स्वच्छता, प्रकाश, हवा, पाणी या सुविधा असाव्यात.

हा कायदा पास झाला असला तरी गिरणीमालक वरील अटींचे पूर्णतः पालन करीत नव्हते परिणामी याविरुद्ध लोखंडेंनी पुन्हा आवाज ऊठवीला. कामगारांची खरी स्थिती जाणून घेण्यासाठी १८९१ मध्ये सरकारने रॉय कमिशन नेमले. या कमिशनपुढे लोखंडेंची झालेली साक्ष महत्त्वाची ठरली.

## ८.५ ना. मे. लोखंडेंचा मृत्यू

इ.स. १८९३ मध्ये मुंबईत हिंदू-मुस्लिम दंगे झाले त्यावेळी शांतता निर्माण करण्यासाठी लोखंडेंनी एक लाख कामगारांची सभा घेऊन दंगली थांबवण्याचे आवाहन केले. त्यांच्या या कार्याबद्दल शासनाने त्यांना ‘रावबहादूर’ हा किताब दिला. इ.स. १८९६ मध्ये मुंबईत प्लेगची साथ आली त्यात समाजकार्य करताना लोखंडेंनाच प्लेगची लागण होऊन ९ फेब्रुवारी १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे कामगार चळवळीचा महत्त्वाचा आधारस्तंभ कोसळला.

## ८.६ १९११ चा फॅक्टरी ॲक्ट

१९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली याचवर्षी कामगारांनी संप पुकारला. १९०७ मध्ये बॉम्बे पोस्टल युनियन स्थापन झाली. १९०८ मध्ये लो. टिळकांना सहा वर्षे कारावासाची शिक्षा झाली याचा निषेध मुंबईच्या कामगारांनी सहा दिवसाचा संप केला. कामगारांची ताकद

दिवसेंदिवस वाढत होती. कामगारांचे समाधान करण्यासाठी सरकारने १९११ मध्ये नवा फॅक्टरी ॲक्ट पास केला त्यानुसार,

१) वयाचा दाखला कामगारांसाठी अत्यावश्यक केला.
२) मुलांच्या कामाचे तास सहा केले.
३) स्त्रियांना रात्रपाळी करण्यास बंदी घातली.
४) पुरुषांच्या कामाचे तास बारा असतील.
५) अपघातात नुकसान भरपाई दिली जाईल.
६) कारखान्यात स्वच्छता, प्रकाश व इतर सुविधा असाव्यात या तरतुदी करण्यात आल्या.

## ८.७ कामगार हितवर्धक सभा

लोखंडेंच्या मृत्यूनंतर गिरणी कामगारांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न भिवाजी रामजी नरे यांनी केले. त्यांनी रावबहादूर सीताराम केशव बोले व बॅ. हरिश्चंद्र तालचेरकर यांच्या मदतीने १९०९ मध्ये कामगार हितवर्धक सभा स्थापन केली कामगारांना शिक्षण देणे, त्यांच्या मद्यपान व्यसनाला आळा घालणे, कायदेशीर सल्ला देणे, मालकाबरोबरच्या तंट्यात मदत करणे ही या सभेची उद्दिष्ट्ये होती.

## ८.८ सोशल सर्व्हिस लीग

इ.स. १९११ मध्ये नारायण मल्हार जोशी यांच्या पुढाकाराने " सोशल सर्व्हिस लीग " स्थापन झाली. कामगारांसाठी शिक्षण व आरोग्य सेवा देण्यावर या संस्थेचा भर होता, गरज पडेल तेव्हा कामगारांना आर्थिक मदतही ही संस्था करीत असे. ना. म. जोशींच्या प्रयत्नांमुळे कामगारांना शिक्षण देण्यासाठी करीमभॉय इब्राहीम व दोराब टाटा यांनी शाळा काढल्या. पहिल्या महायुद्धकाळात मुंबईत जेव्हा जेव्हा संप झाले त्यात कामगारांची बाजू घेऊन जोशींनी त्याबाबतची वस्तुस्थिती व आकडेवारी पुस्तिकेच्या रुपाने प्रसिद्ध केली त्यामुळे कामगार संघटनेचे किंवा संपाचे नेतृत्व न करताही ना. म. जोशी कामगारांचे पुढारी बनले. १९१९ मध्ये वॉशिंग्टन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेत ना. म. जोशी यांनी भारतीय कामगारांचे प्रतिनिधीत्व केले.

## ८.९ मुंबईतील कामगारांचे संप

पहिल्या महायुद्धकाळात जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्याने आणि भाववाढीच्या प्रमाणात कामगारांचे वेतन वाढलेले नसल्याने असंतुष्ट कामगारांनी संपाचे अस्त्र उपसले. मुंबई शहरात १९१७ मध्ये ४७, १९१८ मध्ये ६१, १९१९ मध्ये १८ व १९२० मध्ये ६३ संप झाले. काही महत्वाचे संप पुढीलप्रमाणे सांगता येतील. सेंच्यूरी मिलस गिरणी कंपनीचे संचालक सी. एन. वाडीया आणि व्यवस्थापक अँडरसन यांनी कामगारांच्या पगारवाढीच्या मागण्या धूडकावल्याने ३१ डिसेंबर १९१८ पासून कामगार संपावर गेले. ५ जानेवारी १९१९ पासून होमरुल चळवळीतील धनाढ्य व्यापारी लक्ष्मीदास तेरेसी यांच्या मध्यस्थीने कामगार पुन्हा

कामावर आले पण अँडरसनने कामगारांच्या मागण्या मान्य न केल्याने ८ जानेवारीला कामगार पुन्हा संपावर गेले. कामगारांचा १० जानेवारीला निघालेला मोर्चा पोलीसांनी अडविल्याने पोलीसांवर दगडफेक होऊन त्यात १ पोलीसाचा मृत्यू व २६ जखमी झाले. १४ जानेवारीस पोलीसांच्या गोळीबारात दोन कामगार ठार झाले. अखेरीस गिरणी मालकांनी १५ ते ३५ टक्के महागाईभत्ता व एक महिन्यात २० रुपये बोनस देण्याचे मान्य केल्याने हा संप मिटला.

१ जानेवारी १९२० रोजी जेकब ससून गिरणी कामगारांनी बोनसच्या प्रश्नावरुन संप पुकारला त्याच दिवशी २५ गिरण्यातील ४० हजार कामगार त्यात सामील झाले. १० जानेवारी रोजी न्या. नारायण चंदावरकर व बॅ. जोसेफ बॅप्टिस्टा यांनी मुंबई कामगार समिती स्थापन केली. त्यांनी पगारात ५० टक्के वाढ, कामाचे तास कमी करावे, रोज एक तासाची सुट्टी, दर महिन्याला १५ तारखेस पगार, अपघात नुकसान भरपाई, संप काळात पगार मिळावा या मागण्या केल्या. गिरणी मालकांनी कामाचे तास कमी करण्यास सहमती दाखवून इतर मागण्या फेटाळल्या त्यामुळे कामगार समितीच्या नेत्यांनी गव्हर्नरकडे तक्रार केली. गव्हर्नर जॉर्ज लॉयडच्या मध्यस्थी मुळे कामाचे तास बाराऐवजी दहा, बोनस, अपघातात नुकसानभरपाई, वैद्यकीय मदत, महागाई भत्ता वाढ देण्याचे मालकांनी मान्य केले.

२४ ऑगस्ट १९२० रोजी मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांनी संप सुरु केला. संपातील कामगारांना मार्गदर्शन करणारा कोणीही नेता नव्हता तेव्हा सेनापती बापट पुण्याहून मुंबईला आले सफाई कामगार मित्रमंडळ स्थापन करुन संपातील कामगारांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी निधी जमवण्यास सुरुवात केली. ३ सप्टेंबर रोजी महापालिकेने २४ रुपये पगार, दर रविवारी व सणाच्या दिवशी सुट्टी देण्याचे मान्य केल्याने हा संप मागे घेण्यात आला.

## ८.१० ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस

७ जुलै १९२० रोजी परळ येथे भरलेल्या जाहीर सभेत लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली आखिल भारतीय स्वरुपाची “ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस” (AITUC) या कामगार संघटनेची स्थापना झाली. तिचे पहिले अधिवेशन ३१ ऑक्टोबर १९२० रोजी मुंबईत एंपायर नाट्यगृहात भरले. या अधिवेशनास मोतीलाल नेहरु, ॲनी बेझंट, विठ्ठलभाई पटेल, महंमदअली जीना या नेत्यांसह इंग्लंडमधील मजूर पक्षाचे नेते कर्नल वेजबूड हे देखील हजर होते. या आधिवेशनात कामगारांना मताधिकार देण्याची मागणी करण्यात आली तसेच विधी मंडळात कामगारांचा प्रतिनिधीही निवडला जावा अशी मागणी केली. जिनेव्हा येथे भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेत लाला लजपतराय यांनी भारतीय कामगारांचे प्रतिनिधीत्व करावे असे ठरले. या आधिवेशनात १ लाख ४० हजार ८५४ सभासद असलेल्या ६४ कामगार संघटनांना संलग्न करुन घेण्यात आले.

## ८.११ डॉ. आंबेडकरांचे कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३६ मध्ये ‘स्वतंत्र मजूर पक्ष’ हा राजकीय पक्ष स्थापन केला. १९३८ मध्ये सरकारने औद्योगिक कलह विधेयक पास केले. या कायद्यानुसार कामगारांचा संप करण्याचा आधिकार सरकारने हिरावून घेतला. या कायद्या विरुद्ध डॉ. आंबेडकर जमनालाल बजाज, एस्. एम्. मेहता, अमृतराव डांगे, ना. म. जोशी यांनी आवाज ऊठवून औद्योगिक बंदचे आवाहन केले. त्यामुळे प्रमुख शहरांमध्ये बंद पाळला गेला आणि

सरकारने हे विधेयक मागे घेतले. २ जुलै १९४२ रोजी बाबासाहेबांनी विडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी विडी कामगार संघ स्थापन केला. व्हॉईसरॉय मंत्रीमंडळामध्ये मजूरमंत्री असताना १९४५ मध्ये कामगार कल्याण योजना सादर केली, सेवा योजना कार्यालयाची स्थापना केली. कामगारांना भरपगारी रजा, कामगार-मालक यांच्यातील औद्योगिक कलह मिटवण्यासाठी लवादंत्रणा, खाण कामगार फंडाची स्थापना, स्त्री कामगारांना खाणीत व रात्रपाळीत काम करण्यास बंदी, कामगारांच्या कामाचे तास दहावरुन आठ, अपघातग्रस्त कामगारांना मोबदला अशी अनेक विधेयके पास करुन घेतली तसेच स्वातंत्र्यानंतर बनविलेल्या राज्यघटनेत कामगार कल्याणाच्या अनेक गोष्टींचा समावेश केला.

## ८.१२ कामगार संघटनांची वाढ व कम्युनिस्टांचा उदय

इ.स. १९२३ मध्ये श्रीपाद अमृत डांगे व केशवराव जोगळेकर यांनी "हिंदूस्थान लेबर सोशॉलिस्ट पार्टी" स्थापन केली. साम्यवाद्यांनी कामगार चळवळीत जहाल भूमिका घेण्यास सुरुवात केली. १९२४ मध्ये मुंबईत झालेला गिरणी कामगारांचा संप चार महिने चालला. दीर्घकाळ संप करणे ना. म. जोशीं सारख्या नेत्यांना मान्य नव्हते. जहाल नेत्यांनी त्यांचे ऐकले नाही अखेर सरकारच्या दडपशाहीमुळे व उपासमारीमुळे कामगारांनी संप मागे घेतला.

२३ जानेवारी १९२६ रोजी ना. म. जोशी, रघुनाथराव बखले यांच्या नेतृत्वाखाली "बॉम्बे टेक्सटाईल लेबर युनियन" स्थापन झाली. "लाल बावटा" ही कापड गिरण्यातील सर्वात मोठी संघटना होती. १९२७ मध्ये कामगार चळवळीत फूट पडली. एस्. एन. जोशी यांच्या नेतृत्वाखाली जहाल सदस्यांनी आयटकमधून बाहेर पडून १९२९ मध्ये "आखिल भारतीय ट्रेड युनियन फेडरेशनची" स्थापना केली. साम्यवादी विचारांच्या कामगारांनी रणदिवे व देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली "ऑल इंडिया रेड ट्रेड युनियन कॉंग्रेस" स्थापन केली. १९२९-३० मध्ये कामगार संघटनांची संख्या १०४ होती आणि १९४२-४३ पर्यंत अधिकृत संघटनांची संख्या ६१३ इतकी वाढली.

## ८.१३ स्वतंत्र भारतातील कामगार चळवळ

इ.स. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र होताच कॉंग्रेसने 'ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेसचे' विलीनीकरन करुन तिच्या जागी "इंडियन नॅशनल ट्रेड युनियन कॉंग्रेस" (INTUC) ही कामगार संघटना स्थापन केली. तिचे पहिले अध्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल हे होते. १९४८ मध्ये एम्. एन. रॉय यांच्या नेतृत्वाखाली "हिंद मजदूर पंचायतीची" स्थापना झाली. सरकारने १९४८ मध्ये नवा फॅक्टरी ॲक्ट मंजूर केला. याचवर्षी किमान वेतन कायदा पास झाला, १९५२ मध्ये भविष्य निर्वाह निधीचा कायदा पास झाला, खाणकामगारांसाठी संरक्षण कायदा करण्यात आला. १९५७ मध्ये कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी केंद्रीय कामगार प्रशिक्षण मंडळ सरकारने सुरु केले. असे असले तरी कारखानदारांच्या अरेरावीमुळे कामगारांचे प्रश्न संपत नव्हते त्यामुळे कामगार चळवळ सुरुच होती.

## ८.१४ सारांश

मुंबई परिसरामध्ये गिरणी कामगारांच्या संस्थेत हळूहळू वाढ होत गेली. दिवसेंदिवस कामगारांच्या समस्येमध्ये सुद्धा भर पडू लागली. त्यामुळे कामगार संघटनांचा उदय होऊन त्यांचे रुपांतर चळवळीमध्ये झाले. नारायण मेघाजी लोखंडे यांच्या पुढाकारामुळे कामगारांचे संघटन होऊन त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

त्यानंतर वेगवेगळ्या कामगार संघटना स्थापन होऊन कामगारांच्या चळवळीमार्फत कामगारांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य झाले.

**आपली प्रगती तपासा**

१. कामगार चळवळीचे प्रणेते म्हणून ना. मे. लोखंडेंचे कार्य स्पष्ट करा.
२. मुंबईतील कामगारांनी आपल्या हक्कांसाठी कसा लढा दिला ?

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## ८.१५ दिर्घोत्तरी प्रश्न

१. नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार चळवळीतील योगदान सांगा.
२. मुंबईतील गिरणी कामगारांचे प्रश्न सोडविण्यामध्ये कामगार संघटनांचे कार्य सांगा.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारांच्या प्रश्नासंबंधीचे योगदान विशद करा.
४. कम्युनिस्टांचे कामगार संघटनांमधील योगदान सांगा.

❖❖❖❖

# १

# नवीन चळवळीचा उदय
# अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ

**घटक रचना :**


९.१ उद्दिष्ट्ये
९.१ प्रस्तावना
९.२ पाश्वभूमी
९.३ सार्वजनिक कार्याची सुरुवात
९.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय कार्य
९.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य
९.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता
९.७ डॉ. बी. आर. आंबेडकरांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान
९.८ बौद्ध धर्माचा स्विकार
९.९ डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचे महत्त्व
९.१० सारांश
९.११ विद्यापीठीय स्वरुपाचे प्रश्न
९.१२ संदर्भग्रंथ


## ९.० उद्दिष्ट्ये

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सार्वजनिक कार्याची माहिती समजून घेणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित चळवळीतील योगदान समजून घेणे.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे फलित समजून घेणे.

## ९.१ प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीला 'दलितांच्या आत्मसन्मानाची चळवळ' असे संबोधले जाते. डॉ. भीमराव आंबेडकरांनी आपले आयुष्य दलितांच्या उद्धारासाठी खर्च केले. ते खऱ्या अर्थाने दलितांचे उद्धारक ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले, त्या काळात समाजात अस्पृश्यता, जातीयता, विषमता व अंधश्रद्धा यासारख्या अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या. स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेचे चटके सहन केले होते. त्यामुळेच त्यांनी

समाजपरिवर्तन आणि दलितांच्या उद्धारासाठी आयुष्यभर लढा दिला आणि त्यामध्ये ते यशस्वी झाले. त्यांच्या स्थितीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणे, आत्मविश्वास जागृत करणे आणि संघटित करुन न्यायासाठी संघर्ष करण्यासाठी तयार करणे महत्त्वाचे होते. यासाठी प्रथम दलितांचे समाजप्रबोधन आणि संघटन कार्य बाबासाहेबांनी केले. त्यांच्या एकंदरीत समाजकार्यामूळे दलितांच्या जीवनात क्रांतीकारक बदल घडून आले.

## १.२ पार्श्वभूमी

भारतीय समाजात अस्पृश्यतेची प्रथा अगदी प्राचीन काळापासून चालत आली होती. अस्पृश्य बांधव शेकडो वर्षे सामाजिक विषमता, अन्याय व शोषण यांचे बळी ठरले होते; परंतु आपल्यावरील अन्यायाचा प्रतिकार करण्याचा विचार त्यांच्या मनात कधी आला नाही. याचे कारण असे की, त्यांना आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीवच झाली नव्हती. कित्येक वर्षाच्या धार्मिक संस्कांरातून आणि त्यासंबंधीच्या प्रभावातून अस्पृश्यांची अशी मानसिकता तयार झाली होती की, आपल्या वाट्याला आलेले जीवन आपल्या नशीबाचा, कर्माचा किंवा पूर्वसंचिताचा भाग आहे. त्याबद्दल इतरांना दोष देण्याचे कारण नाही. अस्पृश्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची व करुणाजनक होती. त्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार देण्यात आले नव्हते. त्यांची परिस्थिती पेशवाईच्या काळात अत्यंत खराब होती. त्यांचे मुलभूत हक्क सुद्धा काढून घेण्यात आले होते. त्यांच्यावर लादलेल्या अनेक निर्बंधाची त्यांना जाणीवच झाली नव्हती. परंतु दलित चळवळीच्या माध्यमातून अस्पृश्यांना त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची खरी जाणीव महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी करुन दिली.

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाला वेगळे वळण देण्यात आणि येथील समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यात दलित चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतीय समाजात शेकडो वर्षापासून उपेक्षितांचे जीवन नशिबी आलेल्या दलित जातींच्या लोकांना जागृत करुन त्यांना नवा आत्मविश्वास प्राप्त करुन देण्याचे अत्यंत कठीण असे कार्य दलित चळवळीने केले आहे. दलितांवरील अन्यायाचे निवारण केले जावे, त्यांना समाजातील इतर घटकांच्या बरोबरीने अधिकार मिळावेत, त्यांच्या समाजिक स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून बऱ्याचजणांनी प्रयत्न केले होते.

भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यानंतर इंग्रजी शिक्षणातून आधुनिक विचारांचा स्पर्श झालेली व त्या विचारांच्या संपर्कात आलेली जी नवी पिढी देशात उदयास आली त्या पिढीतील काही तरुणांनी येथील समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी समाजसुधारणेची चळवळ सुरु केली. या समाजसुधारकांपैकी काहींनी अस्पृश्यांची स्थिती सुधारण्यासाठी उपयुक्त कार्य केले होते. त्यामध्ये प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अंतर्भाव होतो. दलित चळवळीचे तीन पर्व आहेत : १) आंबेडकर पूर्व चळवळ, २) आंबेडकर चळवळ, ३) आंबेडकरानंतरची दलित चळवळ.

पहिल्या पर्वात प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम कांबळे, किशन बणसोडे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज हे होते.

दुसऱ्या पर्वात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक आघाड्यांवर विरोध नोंदविले होते. आंबेडकरांचा लढा म्हणजे खऱ्या अर्थाने मानवमुक्तीचा लढा होता. स्वाभिमान, स्वतंत्र अस्मिता, क्रांतीकारी जाणीव, प्रचंड आत्मविश्वास, पारंपारिक गोष्टी सोडून देण्याची तयारी ही या पर्वातील ठळक वैशिष्ट्ये होती.

दलित चळवळीच्या तिसऱ्या पर्वात रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर चळवळ, दलित साहित्य महासंघ, भारतीय रिपब्लिकन पक्ष, बहुजन महासंघ, बहुजन समाज पक्ष व बामसफ या पक्ष, संघटनांनी वेळोवेळी केलेल्या चळवळींचा अंतर्भाव होतो.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बालपण व शिक्षण :**

बाबासाहेब डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी अस्पृश्य समजल्या गेलेल्या महार जातीत झाला. त्यांचे संपूर्ण नाव भीमराव रामजी सकपाळ असे होते. बाबासाहेबांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण दापोली, सातारा, मुंबई अशा निरनिराळ्या गावी झाले. या काळातील भारतीय समाजावर जातीयतेचा फार मोठा पगडा होता. अस्पृश्यतेचे पालन तर अतिशय काटेकोरपणे केले जात होते. त्यामुळे बाबासाहेबांना लहान वयातच अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले होते. शाळेतही त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जात होती. अशा प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी जिद्द न सोडता आपले शिक्षण चालू ठेवले. इ.स. १९०७ मध्ये मुंबईच्या एलफिंस्टन हायस्कूलमधून ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांनी मुंबईच्या एलफिस्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. येथूनच ते १९१२ मध्ये बी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

इ.स. १९१३ मध्ये सयाजीराव गायकवाड यांच्या आर्थिक साहाय्यामुळे बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी एम.ए. आणि पी.एच.डी. या पदव्या संपादन केल्या. त्यानंतर पुढील अध्ययनासाठी ते इंग्लडला गेले; परंतु आर्थिक अडचणींमुळे इ.स. १९१७ मध्ये त्यांना भारतात परत यावे लागले. आंबेडकराना शिक्षणाची अतिशय ओढ होती, त्यामुळे इंग्लडंमधील अर्धवट अवस्थेत राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची त्यांची इच्छा कायमच होती. ही इच्छा पूर्ण होण्याचा योग छत्रपती शाहू महाराजांनी दिलेल्या आर्थिक मदतीमुळे जुळून आला. इ.स. १९२० मध्ये आंबेडकर पुन्हा इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी प्रथम अर्थशास्त्रात बी.एस.सी. ची पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांच्या 'दि प्रॉब्लेम ऑफ रुपी' या प्रबंधाबद्दल लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सने त्यांना डी.एस.सी. ही पदवी बहाल केली. इंग्लंडमधील या वेळच्या वास्तव्यात बाबासाहेब बॅरिस्टर देखील झाले. अशा प्रकारे अत्यंत हलाखीची परिस्थितीमधून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

## १.३ सार्वजनिक कार्याची सुरुवात :

इ.स. १९२० पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक जीवनात भाग घेऊ लागले होते. उच्चविद्या संपादन करुन मुंबई हायकोर्टमध्ये ते वकिलीचा व्यवसाय करु लागले. याच काळात देशातील राजकीय चळवळ गांधीजींच्या नेतृत्त्वामुळे अधिक गतिमान झाली होती. सामाजिक प्रश्नांना राजकीय प्रश्नांइतकेच महत्त्व प्राप्त होऊ लागले. या सर्व पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ अधिक महत्त्वाची ठरते. त्यांनी साऊथबरो समितीसमोर दलितांची बाजू मांडून आपल्या कार्याची सुरुवात केली.

भारतात परतल्यावर आंबेडकरांनी काही काळ बडोदा संस्थानात नोकरी केली; परंतु त्यांना अस्पृश्यतेबाबत तेथे आलेल्या कटू अनुभवामुळे त्यांनी त्या नोकरीचा त्याग केला. त्यानंतर मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स व इकॉनॉमिक्समध्ये, अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. तथापि, नोकरीत असतानाच सामाजिक कार्याकडेही त्यांचे मन ओढ घेऊ लागले. आपल्या समाजबांधवांच्या उद्धारासाठी काहीतरी करण्याच्या इच्छेतून सामाजिक कार्याचे आकर्षण त्यांच्यात निर्माण झाले होते. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांच्याकडून मिळालेल्या मदतीच्या आधारे बाबासाहेबांनी इ.स. १९२० मध्ये 'मूकनायक' नावाचे पाक्षिक सुरु केले व अस्पृश्यांच्या व्यथा मांडण्यास सुरुवात केली. शाहू महाराजांनी दिलेल्या शिष्यवृत्तीमूळे बाबासाहेब आपले अर्धवट शिक्षण पूर्ण करण्यासाठी लंडनला गेले.

इंग्लंडहून आपले शिक्षण पूर्ण करुन परत आल्यावर आंबेडकरांनी आपल्या सार्वजनिक कार्याला पुन्हा एकदा नव्या जोमाने सुरुवात केली. आपल्या अस्पृश्य बांधवांवरील अन्याय दूर करणे आणि येथील समाजव्यवस्थेत त्यांना सन्मानाचे व प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करुन देणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून त्यांनी सार्वजनिक जीवनात पदार्पण केले होते. अस्पृश्यांवर होत असलेल्या अन्यायाचा व त्यांच्या अमानुष शोषणाचा त्यांनी प्रत्यक्षच अनुभव घेतला होता; त्यामुळे अस्पृश्यतेच्या प्रश्नाची दाहकता तेच ओळखू शकत होते. त्यातूनच दलितांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण जीवन पणाला लावण्याचा निश्चय त्यांनी केला. त्याकरिता एका व्यापक सामाजिक चळवळीची पायाभरणी त्यांनी केली.

**बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांमध्ये त्यांच्या हक्कांबाबत जागृती करण्यासाठी व त्यांना संघटित करण्यासाठी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. दलित समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणणे, दलितांची सांपत्तिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्यात जागृती घडवून आणणे, ही या संस्थेची प्रमुख उद्दिष्ट होती. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी अस्पृश्यांसाठी अनेक शाळा व वस्तीगृहे सुरु केली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजमुक्तिचे लढे :**

महाराष्ट्रामध्ये सुरुवातीपासूनच अस्पृश्यतेच्या नावाखाली दलितांना अपमानास्पद वागणुक दिली जात असे. त्यांच्यावर अनेक प्रकारची बंधने लादण्यात आली होती. त्यांना शिक्षण घेण्याचा, मंदिरात प्रवेश करण्याचा संपत्ती धारण करण्याचा अधिकार नव्हता. त्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा किंवा घेण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळेच बाबासाहेबांनी दलितांना त्यांचे मुलभूत घटक मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी महाड येथे चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरविले. त्यासाठी बाबासाहेबांनी १९ व २० मार्च १९२७ रोजी महाड येथे चवदार तळ्यावर पाणी पिण्याचा हक्क प्रस्थापित केला. ही घटना स्पृश्यांना सहन झाली नाही. त्यांनी दलितांवर लाठ्या-काठ्यांने हल्ले केले व महारांनी तळे बाटविले म्हणून त्यात गोमुत्र टाकून त्याचे शुद्धीकरण केले. पाण्यासाठी महाड येथे बाबासाहेबांनी केलेला सत्याग्रह हा जगाच्या इतिहासातील पहिला सत्याग्रह ठरतो.

मनुस्मृती हा ग्रंथ जातीयव्यवस्था, अस्पृश्यता व विषमतेच्या पुरस्कर्ता असून या ग्रंथातील वचनामुळेच जातीव्यवस्था, अस्पृश्यता व जातीनिर्बंधाना बळकटी प्राप्त झाली. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथील परिषदेत मनुस्मृती या ग्रंथाचे जाहिररीत्या दहन केले. त्यामुळे मनुस्मृतीमध्ये निर्देशित केलेली हजारो वर्षाच्या गुलामगिरीचा शेवट केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जसा पाण्यासाठी सत्याग्रह करावा लागला. त्याचप्रमाणे त्यांना मंदिर प्रवेशासाठीही सत्याग्रह करावा लागला. दलितांना सार्वजनिक पाणवठ्यावर जसा प्रवेश नव्हता त्याप्रमाणे त्यांना सार्वजनिक हिंदू-मंदिरातही प्रवेश करण्यास मनाई होती. त्यामुळे त्यांनी हा न्याय हक्क मिळविण्यासाठी मंदिर प्रवेश सत्याग्रह करण्याचे ठरविले. त्यामुळे त्यांनी १३ ऑक्टोबर १९२९ रोजी पुणे येथे पर्वती मंदिर सत्याग्रह सुरु केला. नाशिक येथील काळाराम मंदिरात प्रवेश मिळविण्यासाठी ३ मार्च १९३० रोजी सत्याग्रहाला प्रारंभ झाला. या सत्याग्रहाचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले, हा लढा १९३५ पर्यंत चालू होता. अशा प्रकारे दीर्घकाळ चालू राहिलेल्या सत्याग्रह मोहिमेमुळे मंदिर प्रवेशाच्या प्रश्नावर अस्पृश्यात मोठी जागृती झाली. त्यांना आपल्या हक्कांची जाणीव होऊ लागली. पुढे अस्पृश्य आपल्या आत्मोद्धाराच्या चळवळीत सक्रिय सहभागी झाले.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सत्याग्रहांची माहिती द्या.

---

---

---

## ९.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय कार्य

इ.स. १९२० पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक व राजकीय जीवनात भाग घेऊ लागले होते. एका बाजूला चळवळ संघटित करणे, दुसऱ्या बाजूला ब्रिटीश सरकारशी लढा देणे व त्याचवेळी दलितांच्या हक्कासंबंधी मान्यता मिळविण्यासाठी वातावरण तयार करणे अशा तिहेरी पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ कार्यरत होती. समाजाची पुर्नरचना ही समतेवर आधारित असावी यासाठी जनजागृती आंदोलनाबरोबरच कायद्याने ती करुन घ्यावी असा त्यांचा प्रयत्न होता व त्यात ते यशस्वीही झाले. त्यासाठी सनदशीर मार्गावर त्यांचा जोर होता. यासाठी त्यांनी उभा केलेला संघर्ष हे जनआंदोलनाच्या रुपात होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ, त्यांचे सामाजिक-राजकीय स्वरुप, त्यावेळेच्या राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्याबरोबरचा त्यांचा संघर्ष, इंग्रजांच्या विरोधात दिलेला संघर्ष यासंबंधीची माहिती व त्याबाबतचा तपशील बघणे आवश्यक आहे.

**गोलमेज परिषदा व पुणे करार :**

इंग्लंडच्या सरकारने भारताच्या घटनात्मक प्रश्नासंबंधी विचारविनिमय करण्यासाठी इ.स. १९३० ते १९३२ च्या दरम्यान तीन गोलमेज परिषंदाचे आयोजन केले होते. या परिषदांना अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. या वेळी त्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. अस्पृश्यांसाठी वेगळे मतदारसंघ असल्याखेरीज या समाजात त्यांना कायदेमंडळावर प्रतिनिधित्व मिळणार नाही असे त्यांचे मत होते. दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या वेळी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाच्या प्रश्नावरुन बाबासाहेबांचे गांधींशी मतभेदही झाले होते.

ब्रिटीश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी १६ ऑगस्ट १९३२ रोजी आपल्या जातीय निवाडा जाहीर केला. या निर्णयानुसार मुसलमान, अस्पृश्य, शीख, ख्रिश्चन या सर्वांना अल्पसंख्याक समजून त्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याची घोषणा केली. स्वतंत्र मतदारसंघाच्या निर्णयाविरुद्ध गांधीनी २० सप्टेंबर १९३२ रोजी येरवड्याच्या कारागृहात आमरण उपोषण सुरु केले. त्यांच्या या उपोषणामुळे राजकीय परिस्थिती अस्थिर बनली. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ नाकारावा असा आग्रह गांधीजींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे धरला, परंतु बाबासाहेब आणि गांधींजी आपापल्या भूमिकेवर ठाम होते. शेवटी बाबासाहेबांनी बहूजन समाजावर होणाऱ्या दूरगामी परिणांमाच्या विचार करुन २४ सप्टेंबर १९३२ रोजी पुणे करार वर सही केली. या करारानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाचा त्याग करुन त्यांच्या मनाविरुद्ध राखीव जागांचा स्विकार केला. परंतु हा पुणे करार दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणारा ठरला. त्यामुळे बाबासाहेबांनी पुढे आपल्या हयातीतच पुणे करारास विरोध केला. पुढे गांधीनी व काँग्रेसने आपला शब्द पाळला नाही व त्यांनी पुणे करारानंतर अस्तित्त्वात आलेल्या मंत्रिमंडळात एकाही दलिताला स्थान दिले नाही. त्यामुळे पुणे कराराचा भंग काँग्रेस व गांधींनी केल्याचे दिसून येते.

**तीन गोलमेज परिषदा व पुणे करार – (१९३०-१९३२)**

**राजकीय पक्षाची स्थापना :**

अस्पृश्याच्या व पददलितांच्या उद्धारासाठी राजकीय पटलावर त्यांच्या न्याय मागण्या व हक्क मिळविण्यासाठी बाबासाहेबांनी राजकीय कार्य करायला सुरुवात केली. आधुनिक राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षांना प्राप्त झालेले मध्यवर्ती स्थान बाबासाहेब पूर्णपणे ओळखत होते. आपल्या चळवळीची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी राजकीय संघटन स्थापन करण्याच्या हेतूने त्यांनी राजकीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्ष या आपल्या पहिल्या राजकीय पक्षाची स्थापना केली. काबाडकष्ट करणाऱ्या वर्गाचे हित पाहणे हे या पक्षाचे ध्येय होते. पक्षाचे दरवाजे सर्व कष्टकरी जनतेसाठी खुले होते. इ.स. १९३७ मध्ये मुंबई कायदेमंडळात १५ पैकी ११ जागा स्वतंत्र मजूर पक्षाने जिंकल्या होत्या. इ.स. १९३७ ते १९३९ या काळात स्वतंत्र मजूर पक्षाच्या आमदारांनी मुंबई कायदे मंडळात उत्कृष्ठपणे कार्य केले. बाबासाहेबांनी १७ सप्टेंबर १९३७ रोजी खोती पद्धती व महार वतन नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक मुंबई कायदेमंडळात मांडले. शेतकरी आणि कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न स्वतंत्र मजूर पक्षाने केला. त्यांच्या या कार्यामुळेच १९४२ मध्ये बाबासाहेबांना मजूर मंत्री म्हणून

गव्हर्नर जनरलने आपल्या मंत्रीमंडळात घेतले. त्यांनी मजूरमंत्री असताना (१९४२-१९४६) समाजातील प्रत्येक स्तरातील मजूरांसाठी विविध कायदे केले व त्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आपल्या कार्याचा स्तर राष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी व संपूर्ण राष्ट्रातील अस्पृश्यांच्या समस्या अखिल भारतीय राजकारणाच्या पटलावर आणण्यासाठी १९ जुलै १९४२ रोजी 'अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' या नव्या पक्षाची स्थापना केली. या पक्षाने अस्पश्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. प्राप्त परिस्थितीत अस्पृश्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या आणि त्यांना न्याय मिळवून देण्याच्या कार्याला अग्रक्रम दिला पाहिजे, असा विचार बाबासाहेबांनी केला. अस्पृश्यांच्या प्रश्नांना सनदशीर मार्गाने वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्या रास्त मागण्या मार्गी लावण्यासाठी या पक्षाची स्थापना करणे त्यांना आवश्यक वाटते. नव्या राजकिय पक्षाने अस्पृश्यांचे अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. परंतु त्यांना हवे तसे यश मिळाले नाहीत. स्वातंत्रपूर्व काळातील १९४६ च्या निवडणूकीत, पुढे १९५२ च्या सार्वत्रिक निवडणूकीत आणि १९५४ च्या पोटनिवडणूकीत शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या उमेदवारांचा दारुण पराभव झाला. कारण शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या उमेदवारांना सनातनी हिंदूची मते मिळत नव्हती. त्यामुळे आपल्या पक्षाला भविष्यात निवडणूका जिंकणे अवघड होणार अशा प्रकारचा विचार बाबासाहेब आंबेडकरांनी केला. काँग्रेसविरोधी प्रबळ विरोधी पक्ष उभा राहण्याची आवश्यकता त्यांना वाटू लागली. लोकशाहीत विरोधी पक्षाची अत्यंत आवश्यकता असते, यावर त्यांची दृढ श्रद्धा असल्यामुळे क्राँग्रेसचे विरोधक आचार्य अत्रे आणि एस. एम. जोशी यांच्याशी डॉ. आंबेडकरांनी पत्रव्यवहार सुरु केला. बाबासाहेब आंबेडकरांना व्यापक राजकीय पक्षाची स्थापना करावयाची होती. ज्यांना दलितांविषयी सहानूभूती वाटते अशांना एकत्र करुन अन्य जातींच्या नेत्यांबरोबर काम करणे आवश्यक आहे असे आंबेडकरांना वाटु लागले. या राजकीय उर्मीतूनच बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लीकन पक्ष स्थापन करण्याचा संकल्प केलेला होता. परंतु त्यांचा हा संकल्प त्यांच्या हयातीत पूर्ण होऊ शकला नाही. त्यांच्या परिनिर्वाणानंतर १९५७ मध्ये रिपब्लीकन पक्ष अस्तित्वात आला. या पक्षाने पुढे भारतीय राजकारणावर आपला ठसा उमटविला.

## भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री होते. घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्षपद स्विकारुन स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्याचे मौलिक काम त्यांनी केले. त्यांची प्रकृती बरोबर नसतानाही त्यांनी कठोर परिश्रम घेऊन राज्यघटनेचा मसुदा अगदी कमी वेळात तयार केला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी ही राज्यघटना स्वीकृत झाली. राज्यघटनेची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून सुरु झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय मेहनत घेऊन ही घटना तयार केली. घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी बाबासाहेबांच्या कामाची स्तुती केली. त्यांच्या अहोरात्र प्रयत्नांमुळे ही घटना प्रत्यक्षात अवतरली म्हणून त्यांना त्यांनी संविधनातमार्फत लोकांना स्वातंत्र्य समता, बंधुत्व व न्याय ही तत्त्वे बहाल केली. सर्व हिंदू कायद्याचे संहितीकरण करुन सर्व हिंदूना एकच कायदा लागू करावा व त्यात हिंदू स्त्रीयांना समान हक्क देण्यात यावेत, यासाठी कायदा मंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करुन लोकसभेत मांडला. सरदार वल्लबभाई पटेल आणि राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी विधेयकाला विरोध केला. पंडित नेहरुंनी प्रारंभी विधेयकास पाठिंबा दिला असला तरी शेवटी तेही आपल्या निर्णयाशी ठाम राहिले नाहीत.

परिणामी हे विधेयक लोकसभेत मंजूर होऊ शकले नाही. बाबासाहेब आंबेडकर त्यामुळे खूप निराश झाले. अखेर त्यांनी दुःखी होऊन १९५१ मध्ये आपल्या कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. हिंदू कोड बिलांमूळे स्त्रियांना अनेक प्रकारचे अधिकार मिळणार होते. परंतु हे बिल पुढे टप्प्या टप्प्याने पारित करण्यात आले. १९५६ पर्यंत बाबासाहेब संसदेमध्ये लोकांच्या समस्या मांडत राहीले त्यांचे राजकीय कार्य वाखाणण्याजोगे आहे.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय कार्य थोडक्यात सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ९.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात शिक्षणाचा खूप महत्त्व दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हा महत्त्वाचा संदेश दिला. शिक्षणामुळे मनुष्य जागृत होतो व त्याला आपल्या हक्क व अधिकारांची जाणीव होते. त्यामुळे दलितांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असे बाबासाहेबांचे मत होते. शिक्षणामुळे दलितांची स्पृश्यांच्या सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून सुटका होण्यास मदत होणार होती त्यामुळे बाबासाहेबांनी बहिष्कृत हितकारिणी सभेच्या माध्यमातून वसतिगृहे, वाचनालये व प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा सुरु केल्या. दलित व बहुजनांच्या शिक्षणासाठी बाबासाहेबांनी इ.स. १९४५ मध्ये मुंबई येथे 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. या सोसायटीने २० जून १९४६ मध्ये मुंबईला सिद्धार्थ कॉलेज, तर १९ जून १९५० रोजी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरु केले. आज या सोसायटीच्या अनेक शाळा तसेच अनेक महाविद्यालये मुंबई, औरंगाबाद, नांदेड, आंध्रप्रदेश व कर्नाटकात आहेत. तसेच त्यांनी सोसायटीच्या माध्यमातून दलित विद्यार्थ्यासाठी अनेक वसतिगृहे सुरु केली व शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. मराठवाडा विभागासाठी स्वतंत्र विद्यापीठ असावे असे बाबासाहेबांना वाटत होते त्यामुळे त्यांनी औरंगाबादला मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात पुढाकार घेतला. पुढे इ.स.१९५८ साली औरंगाबादला मराठवाडा विद्यापीठ स्थापन झाले. अशाप्रकारे बाबासाहेबांनी शिक्षणाच्या क्षेत्रात भरीन असे कार्य केले.

## ९.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली चळवळ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वृत्तपत्र या माध्यमाचा वापर केला. त्यांनी वृत्तपत्र हे समाजप्रबोधनाचे महत्त्वाचे माध्यम मानून दलितांचे प्रबोधन व संघटन करण्यासाठी आणि त्यांच्यावर होणारे अन्याय आणि त्यांचा न्याय हक्कांची मागणी करण्यासाठी त्यांनी अनेक वृत्तपत्रे चालविली. त्यांनी इ.स. १९२० मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या आर्थिक सहाकार्यामुळे 'मूकनायक' हे पाक्षिक सुरु केले. इ.स.

१९२३ मध्ये हे पाक्षिक बंद पडले. ३ एप्रिल, १९२७ रोजी बाबासाहेबांनी 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरु केले. हे वृत्तपत्र दलित चळवळीचे मुखपत्र बनले. अस्पृश्य दलितांचा विकास हा त्यांच्या वृत्तपत्रीय लिखाणाचा हेतू होता. बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र १९३० पर्यंत चालले.

डॉ. बी.आर. आंबेडकरांनी आपली चळवळ समाजापर्यंत नेण्यासाठी 'समता', 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' हि वृत्तपत्रे सुरु केली. या वृत्तपत्रातून त्यांनी अस्पृश्यांचे राजकीय प्रश्न भारतीय राजकारणाच्या ऐरणीवर आणले. त्यांनी आपल्या पत्रकारितेतून संपूर्ण दलित समाजाला दिशा देण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकर हे निर्भीड, ध्येयनिष्ठ पत्रकार होते. त्यांनी जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, ब्राम्हणशाही, हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथांवर टीका केली. त्यांच्या या कार्यामुळेच अस्पृश्य जागृत होऊन संघटित झाले. त्यांच्या वृत्तपत्रातील लिखाणांमुळे संपूर्ण भारतात व जगात त्यांचे विचार पोहोचले त्यामुळे दलित चळवळ मजबूत झाली.

## १.७ डॉ. बी.आर. आंबेडकरांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या राजकीय व शैक्षणिक क्षेत्रांबरोबर आर्थिक क्षेत्रातही भरीव असे योगदान दिले आहे. त्यांनी शेतकऱ्यांचे, मजूरांचे, कामगारांचे प्रश्न जिव्हाळ्याने हाताळले व सोडवले. भारताच्या आर्थिक विकासात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. त्यांनी आपल्या प्रमुख पदव्या अर्थशास्त्रात घेतल्यामुळे त्यांनी भारतीय सामाजिक व आर्थिक स्थिती चांगलीच माहिती होती. त्यांनी त्यांच्या प्रंबधातून सप्रमाण सिद्ध केले की इंग्रज लोक भारतीयांचे कशाप्रकारे शोषण करत होते व आपली संपत्ती कशी लूटून नेली. त्यांच्या अर्थशास्त्रीय वाचनामूळे व त्यातून त्यांनी केलेल्या कृतीमूळे त्यांची गणना भारताच्या प्रमुख अर्थतज्ञामध्ये होते.

१९४२ ते १९४६ च्या दरम्यान व्हॉईसरॉयच्या मंत्रीमंडळात मजूरमंत्री असताना त्यांनी अनेक आर्थिक उपक्रम हाती घेतले. त्यांनी हिराकूड धरण, दामोदर धरण प्रकल्प, विजेचा प्रश्न, नद्याजोडण्याचा प्रकल्प, जलसिंचनाच्या सोयी इत्यादी अनेक प्रकल्प हाताळले. त्यांनी या काळात व नंतर आपली अर्थशास्त्रीय भूमिका नेहमीच बजावली. शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या हिताचे अनेक कायदे या काळात बनविले कारण त्यांच्या लोकशाही समाजवादावर गाढा विश्वास होता. त्यांनी मजूरामध्ये व शेतकऱ्यांमध्ये जाणीवा निर्माण केल्या. स्वातंत्र्याच्या अगोदर व नंतर भारताने सुरु केलेल्या अनेक उपक्रमांमध्ये त्यांच्या सक्रिय सहभाग होता. त्यांची दूरदृष्टी आपल्याला भारतीय संविधानातील विविध कलमांतून दिसून येते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक व आर्थिक कार्य थोडक्यात सांगा.

______________________________

______________________________

______________________________

## ९.८ बौद्ध धर्माचा स्वीकार - १९५६

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. त्यांनी अस्पृश्याच्या उद्धारासाठी आणि त्यांच्या न्याय हक्कासाठी आयुष्यभर लढा दिला, परंतु स्पृश्य हिंदू लोकांवर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. त्यामुळे ज्या हिंदू धर्मात अस्पृश्यांना समाज व माणुसकीची वागणूक दिली जात नाही, त्या धर्मात राहून अस्पृश्यता गुलामगिरी शिवाय काहीही मिळणार नव्हते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यात येवला येथे धर्मांतर करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर बाबासाहेबांच्या मनात धर्मांतराची चक्रे वेगाने फिरु लागली. त्यांनी अस्पृश्य बांधवाच्या कल्याणाकरिता उपयुक्त धर्म शोधण्यासाठी विविध धर्माचा अभ्यास केला आणि शेवटी समतेवर व वैज्ञानिक दृष्टीकोनावर आधारलेला बौद्ध धर्म स्वीकारण्याचे त्यांनी ठरविले. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बाबासाहेबांनी पत्नी डॉ. सविता व आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. समतेचा पुरस्कार करणारा बौद्ध धर्म ही बाबासाहेबांनी अस्पृश्य समाजाला दिलेली फार मोठी देणगी आहे. यानंतर काही दिवसातच ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे परिनिर्वाण झाले.

## ९.९ डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचे महत्त्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्योद्धाराच्या चळवळीला आजच्या काळातही खूप महत्त्व आहे. त्यांनी दिलेल्या मानव मुक्तिच्या लढ्यामुळे हजारो वर्षाच्या गुलाम गिरीतून अस्पृश्य बांधवाची मुक्तता झाली. त्यांच्या चळवळीने येथील दलितांना स्वाभिमानाची शिकवण दिली आणि त्यांची अस्मिता जागृत केली. वर्षोनुवर्षे जगावे लागलेले उपेक्षितांचे जिणे आणि उच्चवर्णीयांकडून झालेली अवहेलना यामुळे दलित समाज आत्मविश्वास गमावून बसला होता. बाबासाहेबांनी आपल्या चळवळीच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या कार्यामुळे, दलितांना आत्मविश्वास प्राप्त झाला. डॉ. आंबेडकराच्या चळवळीने दलितांनी संघटित केले; तसेच त्यांना संघटनेचे किंवा संघशक्तीचे महत्त्व पटवून दिले. डॉ. आंबेडकरांनी दलितांना संघटित करुन त्यांच्यामध्ये अभेद्य एकजूट निर्माण केली आणि त्याच्या जोरावर आपल्या राजकीय व सार्वजनिक जीवनातील अनेक लढे यशस्वी करुन दाखविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेल्या चळवळीने दलितांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन दिली व त्या हक्कांच्या प्राप्तीसाठी आवश्यकता भासल्यास संघर्ष करण्याचीही प्रेरणा दिली. अशाप्रकारे बाबासाहेबांनी दलितांच्या उद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहून दिले. त्यांच्या या कार्यामुळेच दलितांना समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले व त्यांनी विविध क्षेत्रात प्रगती केली त्यामुळे त्यांचे हे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे महत्त्व सांगा.

## १.१० सारांश

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक कार्य खूप महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या चळवळीच्या जोरावर या देशातील दलितांना सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. अगदी विसाव्या शतकातही भारतीय समाजातील, उच्चवर्णीयांचा अस्पृश्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन फारसा चांगला नव्हता, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेल्या चळवळीमुळे भारतीय समाजाची वृत्ती व वर्तन यात परिवर्तन होऊ लागले. अस्पृश्य समाजही आपल्या हक्कांविषयी जागरुक बनू लागला. अस्पृश्य समाजाच्या लोकांना सामाजिक जीवनात प्रतिष्ठा मिळू लागली. त्यांच्या सामाजिक दर्जा उंचावला गेला. समाजात इतर जातीच्या लोकांच्या बरोबरीचे स्थान त्यांना मिळू लागले. हळूहळू अलौघातत्यांच्याविषयी केला जाणारा भेदभाव दूर होत गेला. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीने दलितांना सामाजिक प्रतिष्ठेच्या जोडीने राजकीय प्रतिष्ठाही मिळवून दिली. बाबासाहेबांच्या शिकवणुकीमुळे दलितांना संघटनेचे महत्त्व कळून चुकले. ते संघटित होऊ लागले. त्यांच्या राजकीय जाणिवाही प्रगल्भ होत गेल्या. भारतीय राजकारणातील एक प्रभावी शक्ती म्हणून दलितांचा उदय झाला; त्यामुळे देशातील सर्व राजकीय जीवनात त्यांना प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात दलितांना प्रतिष्ठेचे स्थान मिळवून दिले. आज दलित समाज प्रत्येक्ष क्षेत्रात पुढे जाताना दिसत आहे त्याचे श्रेय केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाच जाते. त्यांच्या कार्यामुळेच दलितांना राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रतिष्ठा मिळालेली दिसून येते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आजच्या काळातही खूप महत्त्वाचे आहे. त्यांनी केवळ दलित किंवा अस्पृश्य समाजासाठी कार्य केले असे नाही तर भारताच्या विकासामध्ये त्यांनी दलितांचा विकास करुन मोठा हातभार लावला आहे. महाराष्ट्राला समृद्ध व भारताला आधुनिक करणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे फार मोठे योगदान आहे हे वरील विवेचनावरुन दिसून येते.

## १.११ विद्यापीठीय स्वरुपाचे प्रश्न

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय कार्य स्पष्ट करा.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घ्या.
३. डॉ. बी. आर. आंबेडकरांचे सामाजिक व आर्थिक कार्याचे वर्णन करा.
४. टीपा लिहा.
अ) गोलमेज परिषदा व पुणे करार
ब) डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता
क) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य
ड) आर्थिक कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरचे

❖❖❖❖

# १०

# आदिवासींचे उठाव आणि शेतकरी चळवळ

**घटक रचना :**

१०.० उद्दिष्ट्ये
१०.१ प्रास्ताविक
१०.२ रामोशांचा उठाव
१०.३ भिल्लांचा उठाव
१०.४ कोळ्यांचा उठाव
१०.५ १८५७ चा स्वातंत्र्यसमर आणि महाराष्ट्र
१०.६ शेतकरी चळवळ
१०.७ समारोप
१०.८ दिर्घोत्तरी प्रश्न
१०.९ संदर्भ सूची

## १०.० उद्दिष्ट्ये

- महाराष्ट्रातील विविध जमातीच्या उठावाचा अभ्यास करणे.
- ब्रिटीचा विरोधात विविध जमातींनी केलेल्या संघर्षाचे विवरण करणे.
- महाराष्ट्रातील विविध जमातींच्या ब्रिटीत विरोधी उठावाचे मूल्यमापन करणे

## १०.१ प्रस्तावना

महाराष्ट्रात इंग्रजी सत्ता स्थापन झाल्यानंतर या ठिकाणी त्यांना समाजातल्या वेगवेळ्या जाति-जमातींच्या उठावाला तोंड द्यावे लागले. सर्व जाति-जमातींचे उठाव हे देशभक्तीने भारावलेले होते असेही नाही. कारण त्यातील बरेचसे उठाव स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी,इंग्रजांचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी केलेले होते. इंग्रज हे परधर्मीय संस्कृतीचे असल्याने त्यांच्या राजवटीत आपले वर्चस्व गमावले आहे अशी महाराष्ट्रात भावना निर्माण झाली. महाराष्ट्रामध्ये दुसऱ्या बाजीरावाच्या काळात ही अराजकता निर्माण झाल्याने त्यातून काही लूटारू वृत्तीचे लोक पेशव्यांच्या नावाने लुटालूट करीत होते. परंतु अप्रत्यक्षपणे इंग्रजांना दोषी धरले जात होते.

## १०.२ रामोशांचा उठाव

रामोशी हे मूळचे तेलंगणातील, पण मराठ्यांच्या काळापासून त्यांचे महाराष्ट्रात वास्तव्य आहे. मराठेशाहीत त्यांना मान होता, पण इंग्रज आल्यानंतर नष्टचर्य सुरू झाले. शिक्षणाचे प्रमाण या जातीत अत्यल्प असल्यामुळे ही जात मागासलेली राहिली. शिवाजीच्या काळापासून जागल्याची, पोलिसाची व पहारेकऱ्यांची कामे त्यांना सोपविलेली होती. शिवकाळात रामोशांना स्वराज्यसाठी चांगला वापरकरूनघेण्यात आला. शिवाजी राजांनी बहिर्जी नाईकाला फार मोठ्या पदावर चढविले होते. रामोशांना राज्यव्यवस्थेत नव्हे, तर ग्रामव्यवस्थेतही चांगले समावून घेतले. म्हणून मराठेशाहीच्या अस्तापर्यंत रामोशी निष्ठेसाठी व प्रामाणिकतेसाठी महाराष्ट्राच्या इतिहासात प्रसिद्ध आहेत.

इंग्रजी राजवटीमध्ये रामोशांचे भयंकर हाल झाले. उपासमार व बेकारीमुळेही जमात गुन्हेगारी प्रवृत्तीकडे झुकू लागली. आपल्या नष्टचर्याला इंग्रजी राज्यकर्ते जबाबदार आहेत, ही भावना त्यांच्यात बळावू लागली. रामोशांनी आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात इ.स. १८२६, १८२९, १८३० व १८३१ मध्ये उठाव केले. इ.स. १८७७ मध्ये त्यांनी राष्ट्रवाद्यांना पाठिंबा म्हणून बंडात भाग घेतला व पुढे वासुदेव बळवंत फडके यांना मोलाची मदत केली.

**१. उमाजी नाईकाची दहशत :**

पुरंदरमधील ‘भिवंडी‘ गावात इ.स. १७९१ मध्ये उमाजीजा जन्म झाला. त्यांचे वडील दादाजी प्रसिद्ध दरोडेखोर होते. उमाजी अकरा वर्षाचा असतानाच दादाजीचा मृत्यू झाला. त्यामुळे पित्याकडून त्याला फारसे शिक्षण मिळाले असेल किंवा त्यांचा काही विशेष प्रभाव मुलांवर पडलेला असेल तर दिसत नाही. उमाजी वडिलांच्या काळापासूनच ‘पुरंदर‘ किल्ल्याच्या बंदोबस्तात होता.

उमाजी नाईक याने पुरंदर परिसरात दत्तु नाईक याने सासवडमध्ये इंग्रजी सत्तेला आव्हान दिले. सावकारांच्या खजिन्यांवर हल्ले करून ते लुटले. त्याबद्दल त्याला एक वर्षाची शिक्षा झाली. ती शिक्षा भोगून उमाजीचे उद्योग चालूच राहिले. इंग्रजी अंमलदारांना ठार मारण्यास त्याने मागेपुढे पाहिले नाही. सरकारी तिजोऱ्याही त्याने लुटल्या. सावकार व सरकार यांच्यासंपत्तीवर रामोशांनी आपले लक्ष केंद्रित केले होते.

उमाजीच्या अगोदर संतू नाईकाच्या नेतृत्वाखाली रामोशी समाज एकवटला होता. संतू नाईकाच्या मृत्यूनंतर सर्व रामोशांचे पुढारीपण उमाजीकडे आले. सुरुवातीच्या पहिल्या वर्षात उमाजीने सात दरोडे, आठ वाटमाऱ्या घडवून आणल्या. अनेक धनिकांना लुटले. त्यातून पटवर्धन व निंबाळकर सारखे सरदारही सुटले नाहीत. अखेर इंग्रजांनी उमाजी विरुद्ध (१८२६) पाहिला जाहिरनामा काढला. त्यामध्ये ‘उमाजी व त्याच साथीदार पांडूजी यांना धरून देणाऱ्यास १०० रुपयांचे बक्षीस जाहिर केले‘. परंतु इंग्रजांच्या या जाहिरनाम्याचा काही एक फायदा झालेला दिसत नाही. मात्र यातून एक निष्कर्ष इंग्रज अधिकाऱ्यांनी काढला की, ‘लोक उमाजीच्या बाजूने आहेत त्याला मदत करतात. सचोटी आणि गरीबांविषयी आस्था हे उमाजीचे वैशिष्ट्य असल्यामुळे रयत त्याच्याविरूद्ध बोलत नाही. म्हणून त्यांनी दुसरा जाहीरनामा काढून असे जाहिर केले की, जे कोणी दरोडेखोराला साथ देतील त्यांना ठार केले जाईल. परंतु या घोषणेचाही उपयोग झाला नाही. रामोशांच्या कारवाया अधिकच वाढत गेल्या.

**२. इंग्रजांची नीती :**

काट्याने काटा काढण्याची नीती इंग्रजांनी अवलंबिली. रामोशांच्या बंदोबस्तासाठी रामोशी शिपाई व रामोशी अंमलदार नेमण्यात आले. पण राष्ट्रवादी रामोशांची इंग्रजांच्या चाकरीतील जवाहरसिंग रामोशांला एवढी दहशत बसविली की, त्याला नोकरी सोडून घरी बसावे लागले. उमाजीच्या बंदोबस्तासाठी जे शिवनाथ महारासारखे अंमलदार नेमण्यात आले. त्यांचे तुकडे करून उमाजीने आपल्या ताकदीची जाणीव इंग्रजांना करून दिली. रामोशी उठावाबद्दल पुण्याच कलेक्टर रॉबर्टसनही हादरून गेला. तो मुंबई गव्हर्नरला लिहितो की, 'युरोपियनांविषयी असंतोष, तिरस्कार उत्पन्न करणे व नंतर त्यांना देशातून घालवून देण्यास मदत करणे असा या लोकांचा मानस दिसतो. पुण्याचे लोक उघड बोलतात की कुठे इंग्रजांचे राज्य? समरांगणावर ते लढतील पण रामोशांपुढे त्यांचा निभाव लागणार नाही. कुणी सांगावे उद्या हा उम्याच शिवाजीसारखा बंडखोर होऊन पुन्हा मराठी राज्य चालू करणार नाही कशावरून? देवाच्या मनात असेल तर काय होणार नाही?'

उमाजीचे बंड हळूहळू गंभीर वळण घेत चालले होते. लोकांचा उमाजीला असाच पाठिंबा वाढत गेला तर इंग्रजी सत्तेवर मोठा अनिष्ठ प्रसंग ओढावेल असे त्यांना वाटू लागले, म्हणून त्यांनी तिसरा जाहिरनामा काढून बक्षिसाची रक्कम १२०० रुपये केले आणि गावकभीती दाखविताना जाहीर केले की, 'जो सरकारला मदत करणार नाही त्याला बंडवाल्यांना मिलाफी समजले जाईल.' इंग्रज सरकार तिसऱ्या जाहिरनाम्यात उमाजीला 'दरोडेखोर' असा शब्द न वापरता 'बंडवाला' असे म्हणतात.

उमाजीने आपला दरारा वाढविला, प्रतिष्ठा वाढली. आपण एका राज्याचे स्वामी आहोत, अशी त्याची भावना झाली. उमाजीने पुण्याच्या कलेक्टरकडे इ.स. १८२७ मध्ये काही मागण्या केल्या, त्या अशा-

१) इंग्रजांनी अमृता रामोशी व विनोबा ब्राह्मण यांना सोडावे.
२) रामोशांची परंपरागत वतने परत करावीत.
३) पुरंदर व इतर ठिकाणी असणाऱ्या रामोशाच्या वतनाला इंग्रजांनी हात लावू नये.

येणेप्रमाणे इंग्रज न वागल्यास त्यांना रामोशाच्या विरोधाला सामोरे जावे लागेल. कलेक्टर रॉबर्टसने १५ डिसेंबर १८२७ रोजी एक जाहिरनामा काढून उमाजीला कडक उत्तर दिले.

१) चार परगण्यामध्ये रामोशी जनतेला मात देतात तेव्हा त्यांचा बंदोबस्त केला जाईल.
२) जनतेने रामोशांना पाठिंबा देऊ नये.
३) रामोशी गटात सामील झालेली एखादी व्यक्ती आजपासून २० दिवसात सरकारात हजर झाल्यास तिला संपूर्ण माफी देण्याचा विचार केला जाईल.
४) उमाजी, कुमाजी, पांडुजी व येसाजी या बंडखोरांना पकडून देणाऱ्यास प्रत्येकी रुपये ५००० चे बक्षिस दिले जाईल.
५) बंडवाल्याची माहिती देणाऱ्यास खास बक्षिसे दिले जातील.

रॉबर्टसनच्या जाहिरनाम्यामुळे उमाजी संतापला. त्याचे पाचच दिवसात पाच इंग्रजांना पकडले व त्यांची मुंडकी कापून सासवड येथील ब्रिटिश लष्कर अधिकाऱ्यांना पाठविली आणि त्यानंतर पाच दिवसांनी (२५ डिसेंबर १८२७) जाहिरनामा काढला तो असा-

१) ठाणे-रत्नागिरीमधील पाटील, मामलेदारांनी महसूल सरकारात जमा न करता उमाजीला द्यावा.
२) उमाजीची माणसे येतील तेव्हा पैसा तयार ठेवावा. अन्यथा होणाऱ्या परिणामास संबंधित ज्येष्ठ अधिकारी जबाबदार राहतील.

उमाजीच्या जाहिरनाम्यानुसार १३ गावांनी उमाजीला महसूल दिला. त्यामुळे इंग्रजांना मोठा धक्का बसला. याच वेळी उमाजीने कोल्हापूरकर छत्रपती, आंग्रे यांच्याशी हात मिळवणी केली आणि इंग्रजी प्रदेशात दहशत बसविली.

**३. उमाजी व इंग्रज यांच्यात संघर्ष :**

उमाजीने नव्याने टोळ्या जमवून इंग्रजांना हाकलून लावण्याचा एक योजनाबद्ध कार्यक्रम हाती घेतला.

१) रामोशाच्या टोळ्या वेगवेगळ्या ठिकाणी विखरून ठेवायच्या आणि सर्व क्षेत्रात एकदाच उठाव करायचे.
२) इंग्रजांबरोबर समोरासमोरच्या चकमकी टाळून गनिमी कावा तंत्र अवलंबून इंग्रजांवर दहशत निर्माण करावयाची.
३) रयतेला त्रास न देणे. पण पोटाला भाकरी मागवून घेणे.

इंग्रज सरकारने उमाजीला पकडण्याची जबाबदारी ही कॅ. अलेक्झांडर व मॅकिन्टॉशवर सोपविली आणि कॅ. बाइंडर हा मदतीला दिला. उमाजीचा पहिला संघर्ष 'पांढरदेव' च्या डोंगरावर झाला. परंतु याठिकाणी उमाजीला पकडता आले नाही. २६ जानेवारी १८३१ रोजी पुण्याचे कलेक्टर जॉर्ज जिबर्न यांनी एक जाहिरनामा काढला त्यात खालील घोषणा केली होती.

१) उमाजी, भुजाजी, येसाजी, कृष्णाजी यांना पकडून देणारास प्रत्येकी रोख ५००० रुपये व २०० बिघे जमीन दिली जाईल.
२) सरकारला बातमी देणाऱ्यास २५०० रुपये बक्षिस आणि १०० बिघे जमीन दिली जाईल.
३) प्रत्येक बंडात सामील असणाऱ्याने बातमी पुरविल्यास त्याचे सर्व गुन्हे माफ केले जातील.

वरील जाहिरनाम्याचा काही उपयोग झाला नाही. कोणत्याही व्यक्तीने उमाजीची माहिती दिली नाही. उलट उमाजीने पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, मराठवाडा आदि भागात प्रचंड धुमाकूळ घातला. प्रत्यक्ष इंग्रज अधिकारी कॅ. मॅकिन्टॉश आशर्च्यचकित झाला. त्याने ८ ऑगस्ट १८३१ रोजी पुन्हा एक जाहिरनामा काढून इनामाची रक्कम १०,००० रुपये ४०० बिघा जमीन एवढे केली. इंग्रजांनी जाहिर केलेली रक्कम व जमीन इतकी होती की, त्याला बळी पडून उमाजीचे अगदी जवळचे साथीदार बाळू व नाना आणि उमाजीचा जुना मित्र बापूसिंग परदेशी यांनी उमाजीला पकडून दिले. परंतु त्यावेळी भिवा चांभार याने मोठ्या कौशल्याने उमाजीला सोडवून आणले.

आपल्या मुत्सद्देगिरीव लढवय्येगिरीला यश येत नाही असे दिसताच इंग्रजांकडून कपटनीतीचा अवलंब करण्यात आला. मॅकिन्टॉश याने उमाजीच्या बहिणीला लालूच दाखविली आणि बहिणीनेच फितुर होऊन पुन्हा उमाजीला पकडून दिले. एका शहीराने म्हटले आहे की,

***''इंग्रज बुद्धीचे घर । करून फितूर।***
***पत्र पाठविले जिजाईला। धरून दे तुझ्या भावाला।''***

चार गावे इनाम मिळतात म्हणून जिजाईने भाऊबीजेच्या दिवाशी ओवाळणीसाठी घरी आलेल्या आपल्या भावाला इंग्रजांच्या स्वाधीन केले. त्याच्यावर खटला दाखल करून उमाजीला फाशी देण्यात आली.

उमाजी नाईक हा १९व्या शतकातील महाराष्ट्राचा लोकनायक म्हणून आजही सुविख्यात आहे. तत्कालीन लढा असमान लोकांमध्ये होता. परकीय सरकार येथून घालविण्याची त्यांची तीव्र इच्छा होती. दान करणे, गरीबांना मदत करणे, स्त्रियांना त्रास न देणे यावरून त्यांचा उद्देश केवळ लुटारुंचा होता असे वाटत नाही. साऱ्या महाराष्ट्राने ब्रिटिशांचे सार्वभौमत्व स्वीकारलेले असताना एकटा उमाजी व त्याचे काही मूठभर सहकारी जिवावर उदार होऊन लढले। त्यांनी कडवा संघर्ष दिला. त्या संघर्षाची ओजस्विता व ती उदात्त राष्ट्रभक्ती मराठी माणसाला आजही स्फूर्तीदायक ठरेल.

## १०.३ भिल्लांचा उठाव :

मराठ्यांच्या काळात रामोशी, भिल्ल यांची समस्या उग्र अशी बनली होती. ग्रामव्यवस्थेत या तळागाळाच्या लोकांनाही स्थान होते. भिल्ल हे गुजरात व राजस्थान या भागातील मूळ रहिवाशी आणि तेथील जमीनीचे मालक होते. राजपूत ही त्यांचे अधिकार मान्य करीत. राजपूत राजे गादीवर बसण्याच्या वेळी भिल्ल नायकाकडून त्यांच्या रक्ताचा टिळा आपल्या कपाली लावून घेत असत. राजस्थानातच नव्हे तर कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्रामध्ये या जमातीची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात दिसते.

भिल्लाचे उपजीविकेचे साधन म्हणजे शेती करणे, गुरे पाळणे, मासेमारी व शिकार करणे हे होते. सातपुडा व सह्याद्रीच्या पर्वतामध्ये भिल्लांची वस्ती होती. खानदेशात भिल्लांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात होती.

भिल्लांच्या मुख्य बारा जाती आहेत. त्यापैकी बरडा, डागची, माडची, वसावा, तदवी इत्यादी शुद्ध भिल्ल जमाती होत. तर काही भिल्ल राजपूत, भिल्ल कुणबी व भिल्ल मुस्लिम अशा प्रकारच्या आहेत.

उत्तर मराठेशाहीतील अराजकतेचा फायदा भिल्लांनी उचलण्याचे ठरविले. सन १८०३ साली भिल्लांनी खानदेशात लूटमार केली. सन १८१६ साली भिल्ल मंडळींनी पुन्हा उठाव केला. यावेळी पेंढारी लोकांनी पाठिंबा दिला होता. त्यामुळे हा उठाव इंग्रजांना अतिशय धोकादायक वाटला. पेशवाईच्या अस्तानंतर खानदेश इंग्रजांकडे आला. या प्रांतात शांतता निर्माण करण्याचे

कार्य कॅ. ब्रिग्जकडे आले. इ.स. १८१८ मध्ये खानदेश व बागलाणात पंचावन्न हजारांच्या आसपास भिल्ल लोक राहत होते. दुसऱ्या बाजीरावच्या काळात भिल्ल टोळ्यांवर अन्याय झाले होते. टोळीप्रमुखांची जहागिरीव गावे दुसऱ्या बाजीरावाने हिसकावून घेतली होती. खानदेशाचा कारभार कलेक्टर या नात्याने ब्रिग्जकडे सोपविण्यात आल्यावर सर्व परिस्थितीचे निरीक्षण करून या जहागिरी टोळीप्रमुखांना परत करण्या निर्णय ब्रिग्ज व एल्फिन्स्टन या दोघांनी घेतला. या प्रदेशात शांतता प्रस्थापित होण्यासाठी या जहागिरी त्यांना परत करण्याची गरज होती.

भिल्लांनी सातपुड्याच्या दक्षिणेला सातमाळा, अजिंठा या भागात एकदम उठाव केला. ३२ प्रभावी भिल्ल टोळ्यांनी उठावाचे नेतृत्व केले. इंग्रज अधिकारी ब्रिग्ज याने खानदेशाची सूत्रे हातात घेतली त्यावेळी भिल्लांची या प्रातांत जबरदस्त दहशत होती. टोळीवाले भिल्ल सातपुड्याच्या डोंगरातून जाणाऱ्या रस्त्यांवर जे व्यापारी येत त्यांच्यावर कर आकारीत. हे कर आकारण्याचा अधिकार त्यांना कोणीही दिलेला नव्हता. प्रवाशांकडून व व्यापारी लोकांकडून कर वसुल करणे हा एक नवीन व्यवसाय त्यांनी निवडलेला होता. सिंघव्याच्या घाटात गुमानी हा भिल्ल ५०० भिल्लांचे सैन्य बाळगून होता. त्याच्याकडे असलेल्या घोड्यांची संख्या पंचवीस हजार होती.

सातपुड्यातील सातमाळा रांगात चिल्या भिल्लाने उठाव केला. त्याने लुटमार करणे सोडून द्यावे म्हणून इंग्रज त्याला वर्षाला साडेसहाशे रुपये देत होते. परंतु अखेर त्याच्या उपद्रवी वर्तनामुळे इंग्रजांनी त्याला इ.स. १८१९ मध्ये फाशी दिली.

### १. भिल्लांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न अयशस्वीः

इ.स. १८१९ मध्ये सरकारने भिल्लांबाबत धोरण प्रसिद्ध केले.

१) भिल्लांना घाट, खिंडी यांचे संरक्षण करण्याचे काम दिले.
२) शरण आलेल्या भिल्लांना पेन्शन देऊन त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविला जाईल असे जाहिर केले.
३) पुनर्वसनाचे धोरण म्हणून भिल्लांना जमीनीही देण्यात आल्या.

काही काळ भिल्ल शांत राहिले. तदनंतर त्यांनी पुन्हा संघर्षाला सुरुवात केली. डोंगराच्या आश्रयाने संघर्ष करणाऱ्या भिल्लांना पकडणे मोठी अशक्य गोष्ट होती. म्हणून सरकारने दुसरा जाहिरनामा काढला.

१) शरणागती स्वीकारणाऱ्यांना पूर्ण माफी दिली जाईल.
२) भिल्लांना मिळणारे पूर्वीचे हक्क, पेन्शन चालू ठेवले जातील.

वरील जाहिरनामा भिल्लांना दिखाऊ स्वरूपाचा वाटत होता. कारण सात माळ्याच्या चिल्या भिल्याला पेन्शन मंजूर करून देखील ती नियमितपणे मिळत नसल्यामुळे त्याने पुन्हा दांडगाई सुरू केली.

इंग्रजांनी जाब विचारताच त्याने उत्तर दिले की तुम्ही पेन्शनची रक्कम देतो म्हणून कबूल केले. पण ती मला नेमाने मिळत नाही. थकलेली पेन्शन मिळाली की मी लूटमार करणे

थांबवितो. या उत्तराने इंग्रज चिडल्याने चिल्याला पकडून सर्वांसमोर फाशी दिले. त्यामुळे शरणागती लांबच राहिली, उलट त्यांच्यावरील कारवाया मोठ्या प्रमाणात वाढल्या.

## २. क्रुरकर्मी लिव्हिंगस्टन :

भिल्लांचा एक नेता 'शेख दुल्हा' याने इंग्रजांना सळो की पळो करून सोडले होते. परंतु तो पकडला गेला. त्यालाही कठोर शिक्षा देण्यात आली. 'हिरा' नावाच्या भिल्लाच्या नेतृत्वाखाली इ.स. १८२२ साली पुन्हा बंड झाले. यावेळी बंडाचे स्वरूप पूर्वीपेक्षा भिन्न होते. त्याने खानदेशातील ब्रिटिश शासन जवळ जवळ संपविले. कर्नल रॉबिन्सनला भिल्लांच्या बंदोबस्तासाठी पाठविले. त्याने दोन वर्षे कठोर परिश्रम करून भिल्लांचा बंदोबस्त केला.

इ.स. १८२४ मध्ये लेफ्ट. लिव्हिंगस्टनला भिल्लांच्या बंदोबस्तासाठी नेमण्यात आले. त्याने भिल्लांची ३५ घरे जाळून भस्मसात केली. 'चार पुरुष व दोन स्त्रियांना आपण ठार केलेले आहे, पण आपले अजून समाधान झाले नाही. आणखी काही भिल्लांचे रक्त सांडल्याशिवाय आपले समाधान होणार नाही'असे त्याने अभिमानाने नमूद केले आहे. भिल्लांची समस्या १९व्या शतकात अधूनमधून उद्‌भवतच होती. याचे कारण भिल्लांचे आडमुठे धोरण आणि इंग्रज राज्यकर्त्यांची मनमानी. सत्ताधारीव भिल्ल यांचे एकमेकांबरोबर कधीच पटले नाही. भिल्लांची 'भूमिपुत्र' ही भूमिका इंग्रजांनी कधीही स्वीकारली नाही. सातपुड्याचे आम्ही राजे आहोत. वाटा व खिंडी उडविर्याचे व तेथे कर गोळा करण्याचे अधिकार आम्ही उपभोगणार ही भिल्लांची हट्टी भूमिका दुदैवी होती. भिल्लांना सवलत देण्याइतपत इंग्रज सरकार कमकुवत नव्हते. पण म्हणून लिव्हिंगस्टनसारखे अत्याचार करणेही योग्य नव्हते. या क्रूर कृत्यामुळे भिल्लांना संघर्ष करण्याला एक प्रकारची प्रेरणाच मिळाली.

## ३. सेवाराम घिसाडी यांचे बंड :

सेवाराम घिसाडी याच्या नेतृत्वाखाली भिल्लांनी इ.स. १८२५ मध्ये उठाव केला. इंग्रजांकडील अंतापूर शहर लुटले. ले ऑट्रमनला सेवारामाच्या बंदोबस्तासाठी पाठविले होते. इ.स. १८२६ मध्ये डोंगरीमधील भिल्लांनी उठाव केला. या उठावात लोहार भिल्ल आघाडीवर होते. पुढे खानदेशात तडवींनींही उठाव केले. इंग्रज सरकार सतर्क झाले. लेफ्टनंट ऑटट्रॅम हे भिल्लांचे उठाव नष्ट करण्याचे आटोकाट प्रयत्न करीत होते. अखेर त्यांना यश आले. त्यांनीसेवारामाला पकडले आणि माफही केले. खानदेशात शांतता प्रस्थापित करण्यासाठी ऑटट्रॅमने उपाययोजना केली.

१) उठावात असणाऱ्या सर्वांचेच गुन्हा माफ केले. २) सरकारने बळकविलेल्या जमीनी त्यांना परत केल्या. ३) सरकारने बी-बियाण्यांची शासनाकडून व्यवस्था करून दिली.

ब्रिटिश सरकार इतक्या मोठ्या प्रमाणात भिल्लांना सोयीसुविधा आणि सवलती देत होते. परंतु भिल्लांना त्याचे काही विशेष वाटत नव्हते. उलट सरकारने आपली पारंपारि डोंगर, जंगले, जमीन बळकाविली आहे, आपल्या मुक्त जगण्याच्या वृत्तीला अडथळा निर्माण करत आहेत. जलसाधन संपत्तीचा उपभोग त्यांना घ्यावयाचा आहे. अशीच त्यांची भावना होती. भिल्लांनी अडचणी करून नयेत म्हणून इंग्रज लोक भिल्ल आदिवाशांना वेगवेगळ्या सवलतींची आमिषे दाखवित असत. त्यांचे भिल्लांना फारसे नवल वाटत नव्हते. जसे इंग्रज पक्के व्यापारी

होते, व्यापाराचा आड येणारी कोणतीही समस्या ते सहन करीत नव्हते, तसे भिल्लही पक्के लढाऊ वृत्तीचे होते.

इ.स. १८२८ पासून खानदेशात शांतता प्रस्थापित होऊन भिल्लांचा उठाव नेट करण्यात यश आलेले असतानाच इ.स. १८३९ मध्ये खानदेशात तडवी भिल्लांनी उठाव केला. अहमदनगर परिसरात भिल्लांनी उठाव केल्याची अनेक उदाहरणे दिसतात. जळगाव जिल्ह्यात सावदा व यावल येथेही भिल्लांनी उठाव केले. इ.स. १८४६ मध्ये 'जीवे वासवा' याने इंग्रजांशी संघर्ष सुरू केला. पुणे ते मालेगाव इतक्या विस्तारित प्रदेश रणभूमी ठरला होता. बरेच दिवस जीवेवासवाने इंग्रजांना हैराण करून सोडले होते. अखेर तो पकडला गेला. इंग्रजांनी त्याला प्रदीर्घ कारावासाची शिक्षा दिली.

राष्ट्रवाद म्हणजे काय? हे जरी भिल्लांना कळत नसले, आणि ते समजण्याइतकी त्यांची बौद्धिक व भावनिक पातळी विकसित झालेली नसली, आणि ते समजण्याइतकी त्यांची बौद्धिक व भावनिक पातळी विकसित झालेली नसली, आणि ते समजण्याइतकी त्यांची बौद्धिक व भावनिक पातळी विकसित झालेली नसली, तरी इंग्रजांना या देशावर राज्य करण्याचा अधिकार नाही, एवढे त्यांना निश्चितपणे समजत होते. सन १८५७ नंतरही त्यांनी इंग्रजी सत्तेवर अनेक वेळा हल्ला केला. आपला संघर्ष सतत चालू ठेवला. आपली भूमी व मुख्य म्हणजे आपली जंगले इंग्रजांनी आपल्यापासून हिसकावून घेतली हे ते कधी विसरले नाहीत व त्याबद्दल इंग्रजांना त्यांनी कधी क्षमाही केली नाही.

## १०.४ कोळ्यांचा उठाव :

महाराष्ट्रात कोळी जमात सर्व भिल्लांमध्ये आढळत असली तरी ती कोकण किनारपट्टीवर जास्त केंद्रित झाली आहे. सोनकोळी, महादेव कोळी हे फेरभेद आहेत. मासेमारीच्या पारंपारिक व्यवसायाशिवाय शिवकाळात त्यांना किल्ल्यावर संरक्षणाची कामे सोपविण्यात आलेली होती. पुढे आंग्रेच्या काळात नौदलात त्यांचा समावेश करण्यात आला. भिल्ल व रामोशी यांच्यावर इंग्रजी राजवटीत कशी उपासमारीची वेळ आली तशीच या कोळी लोकांवरही आली. आपल्या मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ही जमात इंग्रजांविरूद्ध संघर्षात उतरली.

इंग्रजांशी कोळ्यांचा संघर्ष निर्माण झाला अगदी त्याच काळात रामोशांचा संघर्ष मोठ्या प्रमाणात होता. रामजी भांगडियाने रामोशांचा आदर्श पुढे घेऊन इ.स. १८२८ मध्ये उठाव सुरू झाला. दोन वर्षापर्यंत हा लढा चालू होता. इंग्रजी अधिकारी अलेक्झांडर मॅकिन्टॉश याने कोळ्यांचे बंड मोडून काढण्यात यश मिळविले. शांततेच्या काळात कोळ्यांनी शस्त्रास्त्रे जमविली. यावेळी १) भाऊ खरे, २) चिमाजी जाधव, ३) नाना दरबारे या तिघांकडे कोळ्यांचे नेतृत्व आल्यामुळे बंडाला अधिक गती आली.

इ.स. १८३९ मध्ये कोळ्यांच्या उठावाने उग्र स्वरूप धारण केले. या तीन क्रांतीकारकांनी पेशवाईच्या पुर्नस्थापनेसाठी प्रयत्न केले होते. आपल्याला इंग्रजी सत्ता मान्य नाही असे त्यांनी घोषित केले होते. गनिमी काव्याचा अवलंब करून या क्रांतीवीरांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. पुणे जिल्ह्यातील घोडनदीच्या खजिन्यावर हल्ला करून त्यांनी सरकरचा

रोष ओढावून घेतला. उठावातील लोकांची संख्या मर्यादित होती. त्यामुळे पुण्याच्या असिस्टंट कलेक्टर रोझ (Roz) याने हा उठाव सहजपणे दहपून टाकला. यावेळी ५४ कोळी पकडले गेले. त्यातील काहींना कठोर शिक्षा ठोठावल्या, तर काहींना फाशी दिली. या उठावात कोळ्यांबरोबर रामचंद्र गणेश गोरे हा ब्राह्मणही होता. त्यालाही फाशी देण्यात आली.

### १. रघू भांगरे व बापू भांगरे यांचा उठाव :

इ.स. १८४४ चा रघू व बापू भांगरे या दोन भावांचा उठाव गाजला. पुण्यातील या उठावा सरकारी खजिने, कार्यालये व सरकारी बंगले यावर हल्ले करण्यात आले. पुणे, नाशिक, अहमदनगर या भागात कोळ्यांनी एकदमच उठाव केला. या उठावाचे क्षेत्र पुरंदर व साताऱ्यापर्यंत पोहोचले. इ.स. १८४५ साली कोळ्यांनी रामोशांची मदत घेतली. त्यामुळे हल्ल्याचा जोर वाढला. पोलिसांना मदत करणाऱ्या स्वकीयांवरही भांगरे बंधूंनी हल्ला केला. उमाजी नाईकचा तुक्या नावाचा मुलगाही रघु व बापू भांगरे यांच्या उठावात सामील झाला होता. घाट काबीज करून तेथे आपला अंमल कायम करण्याच्या हेतूने त्यांनी माळशेज व कात्रज घाट काबीज केला. नगर व नाशिक जिल्ह्यांमध्ये बंडाचे लोण पोहोचले. जेजुरी व जुन्नर या ठिकाणीही त्यांनी हल्ले केले.

सरकारने रघुजी भांगरेला पकडण्यासाठी पाच हजार रुपयांचे बक्षिस जाहीर केले. पण तो लोकांमध्ये लोकप्रिय असल्यामुळे कोणी पकडून देणे शक्य नव्हते. अखेर इ.स. १८४४ मध्ये इंग्रज अधिकाऱ्यांनेच त्याला पकडले आणि फासावर लटकाविले. तरीसुद्धा उठाव शमला नाही. पुरंदरच्या पाटलाला ठार करून कोळ्यांनी सावकारांना लुटण्याचा धडाका लावला. यावेळी उमाजीची दोन मुले तुक्या व माणक्याने धुमाकूळ घालून नाणेघाट, माळशेज घाट ताब्यात घेतले. कोकणात येणाऱ्या जाणाऱ्या रस्त्यांची नाकेबंदी केली. यावेळी उठाव इतका जबरदस्त होता की, वर्षभर इंग्रजांना काय करावे हे सुचलेच नाही. इ.स. १८५० मध्ये तुक्या व मणक्याच्या अटकेमुळे तर कोळ्यांची स्थिती शक्तीहीन झाली आणि कोळी कायमचे शांत झाले.

कोळ्यांच्या उठावाचे प्रकरण आधुनिक महाराष्ट्राच्या सशस्त्र क्रांतीच्या इतिहासात एक महत्त्वाची घटना मानले जाते. भिल्ल व रामोशांप्रमाणे कोळ्यांची जात त्यावेळी बरीच मागसलेली होती. १९व्या शतकाच्या प्रारंभी राजकारण वा राजकीय संस्था फारशा अस्तित्वात नव्हत्या. समाजामध्ये हे उठाव व उठावांचे नेते व त्यांची देशभक्ती, त्यांचा पराक्रम यांची चर्चा चालत असे. आपल्या मर्यादित साधनसामुग्रीची व कमी मनुष्यबळाची कल्पना असतानाही तळागळातील लोकांनी मर्दमुकी, गाजविली, इतिहास घडविला व महाराष्ट्रदेशी नवे राजकारण आकारास आणले.

## १०.५ १८५७ चा स्वातंत्र्यसमर आणि महाराष्ट्र :

इ.स. १८५७ च्या स्वातंत्र्यसमराबद्दल भातात अजूनही गैरसमज आहेत. हा उठाव उत्तर भारतात लखनौ, मीरत, कानपूर, झाशी, काल्पी, दिल्ली वगैरे शहरांपुरताच मर्यादित होता. भारताच्या इतर भागात उठावाची कोणाला फारशी कल्पनाही नव्हती. असंतुष्ट असलेल्या शिपायांनी काही काळ इंग्रजी सत्तेला अडचणीत आणले, पण लवकरच इंग्रजी सत्ता या धक्क्यातून सावरली आणि त्यांनी शिपयांचा पाडाव करून हा उठाव दडपून टाकला. पश्चिम व दक्षिण भारतात, तसेच पूर्वेकडे या उठावाचा प्रसार झाला नाही. इंग्रजी राज्यात शिपायांवर जे

काही अन्याय होत होते त्यातून हे प्रकरण जन्माला आले. इतरत्र भारतीयांनी या उठावाला फारसा प्रतिसाद दिला नाही असा गैरसमज निर्माण केला. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमार' हे पुस्तक लिहून नेमके सत्य काय आहे, हे जगापुढे मांडण्याचा प्रयत्न केला. या उठावाने महाराष्ट्रातील लोकांना इंग्रज सत्तेच्या विरुद्ध पेटून उठण्यास भाग पाडले. फरक इतकाच की, काही लोकांनी शस्त्रे उचलली तर काहींनी शाब्दिक असंतोष प्रकट केला. महाराष्ट्रात इ.स. १८५७ च्या उठावाची प्रतिक्रिया म्हणून अनेक ठिकाणी जे उठाव झाले, त्यामध्ये कोल्हापूर, नाशिक खानदेश, अहमदनगर, नागपूर, औरंगाबाद व मुंबई या शहरांचा प्रामुख्याने समावेश होतो.

### १. रंगो बापूजींचा१८५७ मधील सहभाग :

रंगो बापूजींनी साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंहाचे गेलेले राज्य पतर मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. इ.स. १८५४ साली ब्रिग्जने ब्रिटिश पार्लमेंटमध्ये उद्‌गार काढले होते की, 'मिस्टर रंगो बापूरावांना गेली चोवीस वर्षे मी ओळखत आहे. तो गेली सात वर्षे आपल्या पदच्युत राजाचा वाजवी हक्कासाठी झगडत आहे. मालकाने सोपविलेली कामगिरी इतक्या प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पार पाडणारा उमदा रंगो बापूजीशिवाय दुसरा मला आढळत नाही.'

राजे प्रतापसिंहाचे वकील या नात्याने रंगो बापूजी इंग्लंडला १५ वर्षे राहिले. परंतु काहीही उपयोग न झाल्यामुळे सन १८५४ ला भारतात परतले. त्यांनी भारतात परतताच स्वातंत्र्यासाठी जवलपास १५-२० ठिकारी गुप्त केंद्रे निर्माण केली. त्यामध्ये कोल्हापूर, पंढरपूर, फलटण, वाठार, बेळगाव, येणेवाडी, देऊर, वर्धनगड, आर्वी, कळंबी, कऱ्हाड, आरणे, अर्बुजगड, येकमुकी, जकातवाडी वगैरे ठिकाणी केंद्रे होती. रंगो बापूजीचे भोरपासून बेळगावापर्यंतच्या पट्ट्यात हिंदू, मांग,रामोशी आणि कोळी यांची भरती करून छुप्या सैन्याची निर्मिती केली. महाराष्ट्रात सर्वत्र हिंदू जनमानसात लोकप्रिय असलेल्या मित्रमंडळींशी, पाटील, देशमुख यांच्याशी त्यांनी विचारविनिमय केला होता. इंग्रजांच्या सैन्यातील हिंदी शिपायांनी आपल्याच बांधवावर प्रतिहल्ला करू नये यासाठी त्यांना तटस्थ राहण्यास सांगण्यात आले होते. तसे वचन २२ व्या रेजिमेंटच्या सैनिकांकडून घेण्यात आले होते.

सातारा, कोल्हापूर परिसरातील मातब्बरांचा या उठावाला पाठिंबा होता. सातारा आणि महाबळेश्वरला हे उठाव अगोदर घडतील, त्यात युरोपियन अधिकाऱ्यांना लक्ष करावयाचे, सरकारी खजिन्यावर हल्ले करनू ते लुटावयाचे, तुरुंगातील कैद्यांची सुटका करावयाची व सरकारी खजिन्यावर हल्ले करून ते लुटावयाचे, तुरुंगातील कैद्यांची सुटका करावयाची व त्यांचीही मदत घ्यावयाची अशी योजना तयार झाली होती. या उठावाचे वैशिष्ट्य म्हणजे बंदुकीच्या गोळ्या व तोफेचे गोळे तयार करण्याचे कौशल्य उठावात भाग घेतलेल्यांनी संपादन केले होते. साताऱ्याचे दोन्ही राजपुत्र शाहू व व्यकोजी उठावाचे नेतृत्व करणार व निजामाकडून मोठी कुमक मदतीस येणार, अशा अफवाही लोकांमध्ये उठल्या होत्या. त्यामुळे सरकारही सतर्क झाले. जून १८५७ मध्ये सरकारने धरपकडीला सुरुवात केली. अटक झालेल्या भूमिगत नेत्यांची नावे सांगितली. रंगो बापूजींचा मुलगा व मेहुणा तसेच रामोशी व मांगाचे पुढारी बाबीया व येशा मांग यांना अटक झाली. आरोपींना फाशीची शिक्षा ठोठावल्या. रंगोबापू भूमिगत झाले.

इ.स. १८५७ चा उठाव महाराष्ट्रात बराच मोठा होता. कोल्हापूरला उत्सव झाल्याबरोबर रत्नागिरीला असलेले ब्रिटिश सैन्य, अधिकारी घाबरले. शेवटी त्यांना मुंबईत

आणून ठेवावे लागले. बेळगाव, कोल्हापूर व सातारा या तीन ठिकाणी असलेल्या राजवटींचा पाठिंबा मिळवून नवी माणसे तयार करून दारुगोळा व काडतुसे बनवून रंगोजींनी मोठ्या कौशल्याने सर्व तयारी केली परंतु त्यांचा हा प्रयत्नही फसला.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. महाराष्ट्रातील भिल्लांच्या व कोळ्यांच्या उठावाचे महत्त्व थोडक्यात सांगा.

___

___

___

## १०.६ शेतकरी चळवळ

ब्रिटिश ईस्ट कंपनीने देशात व्यापार करण्यास सुरुवात केली. त्यामुळे युरोपातून आणलेला माल भारतात विकणे व भारतातील सुती व रेशमी कापड तसेच मसाल्याचे पदार्त युरोपात प्रचंड प्रमाणात घेऊन जाण्यास सुरुवात केली. कंपनीचे अधिकारी आणि व्यापारी लोक देशातील शेतकरी व मजूर तसेच जनतेची आर्थिक लूट करत असत. या लोकांकडून कमी किमतीस जबरदस्तीने माल घेत असत. मीर कासीम यांनी मे १७६२ मध्ये याविरुद्ध गव्हर्नरकडे तक्रार केली होती. परंतु त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. अनेक मार्गांनी नफा मिळवून देशाची आर्थिक लूट करून देशातील सर्व संपत्ती इंग्लंडकडे कंपनी घेऊन जात असे. ब्रिटिशांचे स्वार्थी वसाहतवादी धोरण असल्यामुळे या धोरणाचा परिणाम व्यापाराबरोबरच शेतीवरसुद्धा झाला.

**१) शेतकऱ्यांच्या समस्या:**

कंपनीची राजवट संपुष्टात येऊन त्या ठिकाणी इ.स.१८५७ साली भारताचा राज्यकारभार प्रत्यक्षपणे ब्रिटिश संसदेच्या हाती गेला. इ.स. १८५७ ते १९४७ या काळात ब्रिटिश सरकारने कंपनी सरकारपेक्षाही अधिक देशाची आर्थिक लूट केली. वसाहतीचे आर्थिक शोषण करणे एवढेच मर्यादित ध्येय सरकारचे होते. ब्रिटिश सरकारने देशावरील सत्ता हाती घेतली तेव्हा कृषी क्षेत्रात अनेक समस्या निर्माण झालेल्या होत्या. कंपनी सरकारने रयतवारी, महालवारी आणि कायमधारा पद्धतीची सुरुवात केली असल्यामुळे शेताच्या मालकीबद्दलचा हक्क शेती करणे, महसूल गोळा करण्याची पद्धत यामध्ये आमूलाग्र बदल झाले होते. सरकारने शेतकऱ्याकडून प्रचंड शेतसारा गोळा करण्याची पद्धत यामध्ये आमूलाग्र बदल झाले होते. सरकारने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याऐवजी अधिकच खालावत गेली. शेतकरी फक्त जमीनच कसू लागले. जमीनदारांची कुळे शेकतरी बनल्यामुळे जमीनदार वर्ग त्यांच्याकडून शेतसारा भरमसाट घेऊ लागला. प्रसंगी ते कुळाकडून जमीनसुद्धा काढून घेत असत. आधुनिक पद्धतीने शेती कसण्यासाठी शेतकऱ्यांकडे पैसा, भांडवल राहिले नाही. त्यासाठी त्यांना सावकाराची दारे कर्ज घेण्यासाठी ठोठावी लागली. अशा कर्जातच शेतकरी वर्ग कायमचा बुडाला.

भारतातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच होता आणि शेतीची लागवड निसर्गावरच अलंबून होती. अतिवृष्टिमुळे पिकाचे उत्पादन कमी होत असे. दुष्काळामुळेही शेतकऱ्यांचे जीवन

दारिद्री बनले होते. अशा परिस्थितीत सरकारने अनेक ठिकाणी जलसिंचनाच्या सोयी व्हाव्यात यासाठी कालवे, पाटबंधारे आवश्यक होते. परंतु सरकारने तसा प्रयत्न पेठामध्ये शेतीमालाला चांगलीच मागणी असल्यामुळे शेतकरी मागणी असलेल्या वस्तूचे सर्वाधिक उत्पादन करू लागले. परंतु शेतकऱ्याचा माल हा दलाल व व्यापारी यांच्या मार्फत विकला जात असल्यामुळे शेतीमालाला व्यापाऱ्याकडून फारशी किंमत येत नव्हती. शेतकऱ्यांनी धान्याबरोबर नीळ, ताग, रबर, चहा, आप्पु व साखर या वस्तूची मागणी असल्यामुळे या वस्तूचेही उत्पादन वाढविले. परंतु त्यामुळे धान्याचे उत्पादन घटले परिणामी काही काळातच देशाला धान्य निर्यात करण्याऐवजी आयात करण्याची वेळ आली. शेती उत्पादनात घट, लोकसंख्येची वाढ, अतिवृष्टी व दुष्काळाचे थैमान, भरमसाट जमीन महसूल आणि भांडवलाचा अभाव यामुळे शेतकऱ्यापुढे अनेक कृषीविषयक समस्या निर्माण झाल्या.

### २) शेतकऱ्यांतील असंतोष :

ब्रिटिश राजवटीत शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती खालावत गेल्यामुळे त्यांचे सामाजिक जीवन दारिद्री बनले. शेतीचे उत्पादन बनले. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी किंवा शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारने काहीच उपाय योजना केल्या नाहीत. ते उपाय केले ते अपुरे होते. त्यामुळे शेतकरीवर्गात सरकारबद्दल असंतोष पसरला. या असंतोषाचा भडका बंडाच्या स्वरूपात बाहेर पडू लागला. इ.स. १८६० मधील बंगालमधील नीळ उत्पादकांचा उठाव इ.स. १८७४ ते १८७९ च्या दरम्यातच्या काळात पुणे व अहमदनगर प्रदेशातील लोकांनी केलेला उठाव इ.स. १८७४ ते १८७९ च्या दरम्यानच्या काळात पुणे व अहमदपनगर प्रदेशातील लोकांनी केलेला उठाव, इ.स. १८७३ ते १८९० च्या दरम्यान झालेल्या मलबारमधील मोपलांचा उठाव, आसाममधील शेतकऱ्यांनी इ.स. १८९३ मध्ये केलेला उठाव उल्लेखनीय आहे.

### ३) शेतकऱ्यांचे उठाव :

ब्रिटिश राजवटीच्या काळात शेतकऱ्यांचे जीवन हलाखीचे बनले होते. सरकार व जमीनदार तसेच जहागीरदार यांना शेतसारा देऊन शेतकऱ्यांकडे त्याला पुरे होईल इतके उत्पादन राहत नव्हते. पर्यायाने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत असे. शेतकऱ्यांमधील पसरलेल्या असंतोषामुळे त्यांनी सरकार व जहागीदार, जमीनदारांविरोधी अनेक उठाव केल्याची नोंद केली आहे. या आंदोलनास त्यांनी पुनर्रस्थापनात्मक, धार्मिक, सामाजिक लूट, आतंकवादी उठाव आणि सशस्त्र बंड या पाच प्रकारात विभागले आहे. प्रारंभीच्या काळात आदिवासी लोकांनी हिंसक उठाव केले. सुरेशसिंह यांच्या मते, शेतकऱ्याबरोबरच आदिवासी लोकांनीसुद्धा सर्वाधिक उठाव केले. आदिवासींचे उठाव हिंसक होते. वासुदेव बळवंत फडके यांनी रामोशाची पलटन तयार करून दरोडे घालणे, ब्रिटिश कचेऱ्या लुटणे सुरू केले होते. मलबार येथील मोपला यानीसुद्धा परकीयांविरूद्ध उठाव केले होते.

इ.स. १८६७ नंतर शेतसाऱ्यामध्ये वाढ केली. त्यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले, शेतकरी जमीनदार, सावकार व मारवाडी यांचे भक्ष्य बनले. त्यामुळे मे ते सप्टेंबर सावकार व जीमनदाराविरोधी उठाव केले. शेतकऱ्यांनी हे उठाव गावचा प्रमुख मुखिया यांच्या (पटेल) नेतृत्वाखाली केले. त्यामुळे इ.स. १८७९ मध्ये 'डेक्कन ॲग्रीकल्चरिस्टस रिलीफ ॲक्ट' पास करून शेतसाऱ्यांना काही सवलती प्रदान केल्या. जमीनदार व सरकारविरोधी उठाव बंगालमध्येही

घडून आले. इ.स. १८७० ते १८८० या दरम्यानच्या काळात सावकार विरोधी उठावाची तीव्रता वाढली होती. बंगालमधील शेतकऱ्यांच्या उठावाचे केंद्र पबना होते. याठिकाणी इ.स. १८५९ च्या 'एक्स' कायद्यानुसार शेतकऱ्यांना संरक्षण प्राप्त झाले होते. शेतकऱ्यावरील महसुलात वाढ करण्यास जमीनदारास मनाई होती तरीही स.स. १७९३ ते १८७२ च्या दरम्यानच्या काळात जमीनदारांच्या संख्येतही वाढ झाली तसेच या जमीनदारांनी अनेक प्रकारचे महसूल वाढविले. त्यामुळे युसूफ सराय परगण्याच्या शेतकऱ्यांनी एक 'शेतकऱ्यांचा संघ' तयार केला.

**४) महात्मा फुले व शेतकरी चळवळ :**

महाराष्ट्रातील शेतकरी व कामगार वर्ग हा आर्थिकदृष्ट्या सबल नव्हता. ते अज्ञानी होते. देशाची समृद्धी व भरभराट त्यांच्याच कष्टावर अवलंबून होती. परंतु हे शेतकरी अमान व कर्जबाजारीपणामुळे आर्थिकदृष्ट्या पिळले गेले होते. फुलेंनी 'शेतकऱ्यांच्या आसूड' या ग्रंथात शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचे वर्णन केलेले आहे. महात्मा फुलेंनी स्त्री आणि अतिशुद्रांच्या केलेल्या उद्धाराच्या कार्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या स्थितीतही परिवर्तन करण्याचे कार्य केले.

महात्मा फुलेंनी सरकारकडे शेतकऱ्यांच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळण्यासाठी वसतिगृहे स्थापन करावी आणि कनिष्ठ वर्गातील शिक्षकांची नेमणूक करून या मागण्या केल्या. शेतकरी अज्ञान व अशिक्षित असल्यामुळे तो आर्थिकदृष्ट्च शोषित बनला आहे. तेव्हा त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षण हाच उपाय आहे असे महात्मा फुल्यांचे मत होते. सरकारी अधिकारी कारकून आणि सावकार हे शेतकऱ्यांचा जागोजागी अपमान करतात. त्यांची अडवणूक करतात आणि त्यांचे आर्थिक शोषण करतात. यावर बोट ठेवून महात्मा फुलेंनी सरकारव सावकारांच्या धोरणावर टीका करून शेतकऱ्यांच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी कार्य सुरू केले. त्यांनी 'दीनबंधू' या वर्तमानपत्रातून लिखाण करून शेतकऱ्यांवरील अन्यायाला वाचा फोडली. इ.स. १८७६-७७ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती हालाखीची बनली. त्यामध्ये सुधारणा होण्यासाठी महात्मा फुलेंनी महाराष्ट्र व्यापी चळपळ सुरू केली. ही चळवळ खतफोडीचे बंड म्हणून ओळखली जाते. इ.स. १८८८ मध्ये पुणे येथे इंग्लंडचा ड्युक ऑफ कॅनॉट आला होता. त्याच्या समारंभास महात्मा फुले शेतकऱ्यांच्या वेशात उपस्थित राहिले. यावेळी ड्युक ऑफ कॅनॉट यांस शेतकऱ्यांच्या वेशात उपस्थित राहिले. यावेळी ड्युक ऑफ कॅनॉट यांस शेतकऱ्यांच्या स्थितीविषयक एक निवेदन दिले व त्यामध्ये व्हिक्टोरिया राणीला शेतकऱ्यांच्या सुधारणा करण्याविषयी निरोप देण्यास सांगितले. महात्मा पुलेंनी इंग्रज सरकारकडे शेतकऱ्यांना संरक्षण व उत्पन्न वाढीसाठी शेतीच्या विविध योजना आखण्याचा आग्रह धरला. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या शिक्षित मुलांना कनिष्ठ नोकऱ्या देण्यासाठीही प्रयत्न केले.

महात्मा फुलेंनी केवळ स्त्रिया आणि दलितांच्या स्थितीत सुधारणा करण्याचाच प्रयत्न केलेला नाही तर त्यांनी शेतकरीवर्गाकडेसुद्धा लक्ष देऊन त्यांच्या स्थितीत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. शेतकरी हा समाजाचा घटक असून त्याच्या कष्टावरच समाजाची उपजीविका होते हे महात्मा फुलेंनी ओळखले होते. परंतु शेतकरी आर्थिकदृष्ट्या वाईट अवस्थेत जीवन जगत होता. तो सावकाराच्या कर्जात आणि समाजाच्या गुलामगिरीत अडकलेला होता. 'शेतकऱ्यांचा आसूड' नावाचा ग्रंथ लिहून महात्मा फुलेंनी त्यामध्ये शेतकऱ्यांच्या स्थितीचे वास्तव चित्रण केले. तसेच शेतकऱ्यांची गुलामगिरी, कर्जबाजारीपणा आणि त्यांच्या स्थितीत परिवर्तन घडवून

आणण्यासाठी काय उपाय करावे लागतील याचीही चर्चा प्रस्तुत ग्रंथात केली आहे. महात्मा फुल्यांनी स्त्रिया आणि दलिताप्रमाणे शेतकऱ्यांनाही शिक्षण देऊन त्यांना सज्ञान बनविले. त्यामुळे शेतकरी जागृत झाला आणि तो सामाजिक गुलामगिरी आणि सावकारांच्या कर्जाच्या मगरमिठीतून मुक्त होण्याचा प्रयत्न करू लागला. थोडक्यात शेतकऱ्यांसाठी त्यांच्या स्थितीत परिवर्तनासाठी कार्य करणारे महात्मा फुले हे पहिले समाजसुधारक होय.

### ५) कृष्णराव भालेकर व शेतकरी चळवळ :

कृष्णराव भालेकर हे महात्मा फुले यांचे जवळचे सहकारी होते. 'दिनमित्र' या वृत्तपत्रातून त्यांनी शेतकरीवर्गाच्या स्थितीवर लेख प्रसिद्ध केले व त्यांच्यात जागृती घडवून आणली. त्यांच्या मते शेतकरी व कारागीर हेच खरे देशाचे आधारस्तंभ आहेत. सावकार आणि सरकार हे दोघेही शेतकऱ्यांचे शोषण करीत असत. त्यांनी शेतकऱ्यांना विद्येची कास धरावी आणि आपल्या मुलांना शिक्षण द्यावे असे म्हटले आहे. ब्राह्मणाप्रमाणेच आपणही पारंपारिक व्यवसायाचा त्याग करावा असेही त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले. त्यांनी विदर्भातील करजगाव येथे 'द करजगाव इंडस्ट्रियल अँड कमर्शियल सोसायटी' स्थापन करण्याची योजना तयार केली होती. त्यासाठी शेअर्सची किंमत दहा रुपये ठेवली होती. पण ही योजना अंमलात येऊ शकली नाही.

### ६) विठ्ठल शिंदे व शेतकरी चळवळ :

विठ्ठल रामजी शिंदे यांनी इ.स. १९२७ मध्ये मुंबई कायदेमंडळात गृहमंत्र्याने मांहलेल्या तुकडेबंदी व सारावाढीसंबंधीच्या विधेयकास विरोध केला. २५ जुलै १९२८रोजी पुणे येथे मुंबई इलाखा शेतकरी परिषद भरली. या परिषदेचे अध्यक्ष वि.रा. शिंदे होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणातूनही या विधेयकास विरोध दर्शविला. या विधेयकामुळे शेतकरी लहान-लहान जमिनीच्या तुकड्यास मुकतील, त्यांच्याजवळ पैसा राहणार नाही. तसेच सारावाढीमुळे शेतकऱ्यावर अन्याय होईल असे त्यांनी म्हटले. त्यांनी खानदेश, अमरावती, नाशिक, पुणे, सातारा, नागपूर आणि नगर जिल्ह्यांत ग्रामी भागात शेतकऱ्यांच्या परिषदा घेतल्या. पुढील शेतकरी परिषदांचे त्यांनी अध्यक्षपद भुषविले.

१) संस्थांनी शेतकरी परिषद, तेरदल (दक्षिण कोकण) ३ जून
२) शेतकरी परिषद, बोरगाव ता. वाळवा, जि. सातारा, ६ जून १९३२
३) चांदवड तालुका शेतकरी परिषद, वडनेर १९ सप्टेंबर १९३१ या परिषदामधून त्यांनी पुढील विचार मांडले.
४) तालुकानिहाय शेतकरी व कामगार संघ काढावेत.
५) अमेरिकन शेतकरी, कुरबी, भांडवलदार व जमीनदार आहेत. त्यांचा आदर्श घ्यावा.
६) शेतकऱ्यांना अमेरिकन शेतकऱ्याप्रमाणे आपल्या शेतमालाची किंमत ठरविता आली पाहिजे. शेतीच्या मालासाठी योग्य किंमत मिळाली पाहिजे.

### ७) ब्राह्मणेतर पुढारी व शेतकरी चळवळ :

दिनकरराव जवळकर, श्रीपतरात शिंदे, भगवंतराव पाळेकर आणि मुकंदराव पाटील यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चिंतन करुन ते सोडविण्याचा प्रयत्न केला. दिनकरराव जवळकर

यांनी काढलेल्या तेज साप्ताहिकावर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे मुखपत्र असे मुद्रित केले होते. त्यांनी सावकार आणि जमिदांराकडून शेतकऱ्यांवर होणारा अन्याय, अत्याचार व शोषणाविरुध्द संघर्ष करण्यासाठी शेतकरी सैन्य उभारण्याची सूचना केली. श्रीपतराव शिंदे यांनी 'विजयी मराठा' या वृत्तपत्रात शेतकऱ्यांचे म्हणणे मांडले होते. त्यांनी शेकऱ्यांच्या संघटनांनी आवश्यकता प्रतिपादन केली. अमेरिका व स्वीडनप्रमाणे शेतकऱ्यांनी दहा -दहा व वीस - वीस शेतकऱ्यांचे संघ स्थापन करुन सहकारी पध्दतीने शेती केल्यास गरिबी हटेल असे त्यांचे मत होते. शिक्षणाचा अभाव असल्यानेच शेतकऱ्यांनी अधोगती झाल्याचेही त्यांनी म्हटले आहे. शेतकरी व सावकरांनी  गोरक्षणाला महत्त्व द्यावे अशीही त्यांनी सूचना केली. त्यांनी सावकारांकडून शेतकऱ्याचे होत असलेल्या शेषणावर अनेक लेख लिहून टीका केली.

भंगवतराव पाळेकर यांनी बडोदा येथून 'जागृती'वृत्तपत्र सुरु केले. मुंबई प्रांतात ब्राम्हण, मारवाडी व गुजर यांच्याकडे शेतजमिनीची मालकी होती. शेतकऱ्यांचे उज्ञान, चालीरीती, दारुबाजी व खर्चिक विवाह हे त्यास कारणीभूत असल्याचे पाळेकरांनी म्हटले आहे. त्यांनी जागृतीत लेख लिहून शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. मुकुदंराव पाटील यांनी ५७ वर्षे ' दीनमित्र' च्या प्रारंभीच्या ७ अंकात ( नोव्हेंबर - डिसेंबर १९११) शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती आणि ती दूर करण्याचे उपाय यावर लेखमाला चालविली. नवीन कृषी अवजारे, शेतीची प्रदर्शने, शेती पुस्तके, शेती शिक्षण शेती -बी - बियाणे, पतपेढया व विहिरी बांधणे हे उपायच योजून शेतीचे उत्पादन वाढविता येत असे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे शेतकरी सुखी असला पाहिजे असे त्यांचे मत होते. 'दीनमित्र ' मधून त्यांनी  सातत्याने प्रश्न मांडले. त्यामुळेच ते विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रवक्त्ते ठरतात.

### ८) सहकारी चळवळ :

इ.स. १९२२ ते इ.स. १८२८ या काळात मुंबई प्रांतातील शेतकरी सावकरांच्या जाळयात आडकले होते. शेतकरी सावकांराकडून कर्ज घेत व ते दीड ते दुप्पट व्याजाने परत करीत. धान्याच्या स्वरुपातही घेतलेले कर्ज दीड ते दुप्पट पध्दतीने परत केले जात असे, विदर्भातील कापूस उत्पादक शेतकरी दलाल व अडते यांच्याकडून पिळला जात होता. यावर उपाय म्हणजे सहकारी चळवळीची वाढ व शेतकऱ्यांतील साक्षरता  हाच असल्याने सरकारने सहकारी संस्थाच्या वाढीवर भर दिला होता. चळवळीत मुंबई प्रांत आघाडीवर होता. या प्रांतात इ.स. १९२९ मध्ये ही संख्या ५७३४ झाली. सहकारी पतसंस्था वाढल्यामुळे सावकरांचा गैरव्यवहार कमी झाला नाही. पण थकबाकीदार शेतकऱ्यांवर मात्र पतसंस्था कार्यावाही करत नसत.

### ९) साने गुरुजी व शेतकरी चळवळ :

साने गुरुजींनी खानदेशात शेतकऱ्यांचे संघटन केले. त्यासाठी सर्वत्र दौरा केला. इ.स. १९३९ मध्ये पूर्व खानदेशात अतिवृष्टी झाल्याने पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे साने गुरुजींनी शेतकऱ्यांचा शेतसारा माफ करवा अशी मागणी केली. त्यांनी जळगावच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा मोर्चा नेला. त्यांनी लिहिलेली स्फूर्तिदायक गीते शेतकऱ्यांनी मोर्चात म्हटली.

### १०) मुळशी सत्याग्रह :

सेनापती पांडुरंग महादेव बापट यांच्या नेतृत्वाखाली मुळशी सत्याग्रह झाला. टाटा कंपनीने मुळशी तालुक्यातील मुळा व निळा नदीचा संगम अडवून धरण बांधण्याचे ठरविले. त्यामध्ये ५४ गावे आणि शेती जात होती. कंपनीने शेतकऱ्यांवर पिस्तूल रोखले. २० व २१ मार्च१९२१ रोजी बारामती येथे परिषद भरली व त्यामध्ये शंकरराव देव, भुस्कुटे, केळकर व बापट यांनी शेतकऱ्यांसह सत्याग्रह केला. शेतकऱ्यांनी मजुरांना काम करु दिले नाही तेव्हा कंपनीने त्यांच्यावर गरम पाणी टाकले. २६एप्रिल १९२१ रोजी बापट स्वतः रुळावर आडवे झाले. शेवटी त्यांनाही कपंनीने काटयात फेकून दिले. कंपनीच्या लोकांना बापट यांनी खडसावल्याने ते घाबरले. कंपनीने मात्र बापट, फंड रानडे, शेरेकर, देवराव व पौडचे हिरवे यांच्यावर खटले भरले. २० आक्टोबर१९२१ रोजी ६महिने कैद व १०० रुं दंडाची शिक्षा ठोठावली व त्यांना येरवडा कारागृहात डांबले. २२ एप्रिल १९२२ रोजी त्यांची सुटका झाली. ११जून १९२२ रोजी डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषिकांची मुळशी परिषद भरली. या परिषदेत ठरल्याप्रमाणे २ सप्टेंबर १९२२ रोजी पुन्हा सत्याग्रह सुरु केला. त्यामुळे बापट यांना पुन्हा अटक केली. फेब्रुवारी १९२३ रोजी त्यांची येरवडा येथून सुटका झाली.

डिसेंबर १९२३ मध्ये शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई घेतल्याने मुळशी सत्याग्रह बंद पडला. त्यामुळे २४ एप्रिल १९२४ रोजी सत्याग्रह मंडळ बरखास्त झाले. १४ऑक्टोबर १९२४ रोजी बापट यांची कैदेतून सुटका झाली. आता बापट, धुंडिराव देव, आत्मारामपंत मोडक, बळवंत मोरे. विनायक वाभळे व कुकडे यांनी हैद्राबाद राज्यातून हत्यारे आणली व त्यांनी ९ डिसेंबर १९२४ रोजी पौडजवळून रेल्वेगाडी अडविली आणि त्यांच्यामधील मजुरांवर हल्ला केला. बापट यांनी ड्रायव्हरच्या पायावर गोळी मारली. शेवटी या सर्वांवर सरकारने खटले भरले. बापट यांना ७ वर्षे, धुंडीराज देव यांना ८वर्षे, गोरे यांना ५ वर्षे व वाभळे , कुकडे व मोडक यांना चार चार वर्षांची शिक्षा ठोठावली गेली. बापट यांना प्रथम येरवडा नंतर हैद्राबादच्या कारागृहात ठेवले. २४ में १९३२ रोजी त्यांची सुटका झाली. अशाप्रकारे मुळशी धरण होऊ नये म्हणून महाराष्ट्राने लढा दिला.

### ११) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा उठाव :

इ.स. १८६६ मध्ये रयतवारी व्यवस्थेच्या अंतर्गत मुंबई प्रांतात भूमी करात अधिक वाढ केली होती. अमेरीकेत यादवी युध्द सुरू झाल्यामुळे तेथून कापूस इंग्लडला येणे बंद झाले. त्यामुळे ब्रिटिशांनी भारतातून कापूस मायदेशी घेऊन जाण्यास सुरुवात केली. त्यामुळे कापसाला मागणी वाढली. अमेरीकेतील यादवी सुध्द संपल्यानंतर तेथून कापूस भरपूर प्रमाणात ब्रिटनला येऊ लागला. त्यामुळे भारतातील कापसाला मागणी न राहून त्याच्या किमती घसरल्या, अशा पस्थितीत शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी सावकाराकडून कर्ज घेणे भाग पडले. सावकाराचे कर्ज देणे शेतकऱ्यांना कठीण असल्यामुळे त्यांच्या जमीनी सावकाराच्या ताब्यात गेल्या. दिवाणी न्यायालयात सावकाराच्या बाजूनेच निर्णय लागला तर शेती सावकाराच्या ताब्यात गेल्यास शेतकऱ्यांना उदनिर्वाहाचे साधन राहत नव्हते. त्यामुळे त्यांनी सावकाराविरोधी उठाव केला. शेतकऱ्यांनी कराराचे दस्ताऐवज शेतकऱ्यांनी नष्ट केले. पुणे, अहमदनगर येथेही उठाव झाले. यांनतर सरकारने एका आयोगाची नियुक्ती केली. या आयोगाच्या शिफारशीवरुन इ.स.१८७९ मध्ये ॲग्रीकल्चरल रिलीफ ॲक्ट पास केला. या कायद्यानुसार एखाद्या शेतकऱ्यांने कर्ज फेडले

नाही तर त्याला जेलमधे बंद करता येणार नव्हते. शेतकऱ्यांचे कर्ज कमी करण्याचा हक्क या कायद्यानुसार न्यायालयास मिळाला होता.

## १२) महात्मा गांधीजी व शेतकरी चळवळ :

म. गांधीनी भारतीय राजकारणात प्रवेश केल्यानंतर केलेल्या अहिंसक सत्याग्रहात शेतकऱ्यांनासुध्दा समाविष्ट करुन घेतले होते. शेतकऱ्यांवर होत असणाऱ्या अत्याचारामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला होता. त्यामुळे शेतकरी आंदोलनाच्या पावित्र्यात होते. उत्तर बिहारमधील चंपारण्य जिल्हयातील नीळ उत्पादित करणारे भूस्वामी युरोपीय शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण करीत होते. गांधीनी बाबू रांजेद्र प्रसाद यांच्या साहाय्याने नीळ उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या स्थितीचे अवलोकन केले. इ.स. १९१७ मध्ये बिहारच्या सरकारने शेतकऱ्यांच्या स्थितीचे अवलोकन करण्यासाठी एक समिती नियुक्त केली. गांधीच्या नेतृत्वाखाली चंपारण्य येथील शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाचा हा परिणाम होता. पुढे 'चंपारण्य कृषी अधिनियम'पास करुन शेतकऱ्यांवरील शेतसारा कमी केला. इ.स.१९१८ मध्ये गुजरातमधील खेडा जिल्हयात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले तरीही सरकारने भूमी कर घेण्यास सुरुवात केली. तेव्हा गांधीनी तेथील शेतकऱ्यांना संघटित करुन सत्याग्रह केला. अनेक शेतकऱ्यांना तुरुंगात डांबण्यात आले. शेवटी ब्रिटीश सरकारने भूमी करात सूट देण्याची शेतकऱ्यांची मागणी मान्य केली. इ.स. १९२६ मध्ये खेडा जिल्हयातील बार्डोली या ठिकाणी शेतकऱ्यांनी उठाव केला. मुंबई सरकारने भूमी करात २२ प्रतिशत वाढ केली होती. सरदार पटेल यांनी शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व केले. यानंतर सरकारने एक आयोग नियुक्त केला. या आयोगाच्या शिफारशीनुसार भूमी करामध्ये २२ प्रतिशत केलेली वाढ रद्द करुन ६१ / ४ प्रतिशत करण्यात आली.

## १३) खेडा आंदोलन :

इ.स. १९६० पूर्वी गुजरात हा मुंबई प्रांताचा एक भाग होता. गुजरातमधील खेडा आणि बार्डोली येथे शेतकऱ्यांनी केलेले आंदोलन प्रसिध्द आहे. खेडा जिल्हयात शेतकऱ्यांकडून सक्तीने शेतसारा वसूल केला जात असे. या वसुलीविरुध्द इ.स.१९१६ -१७ मध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन केले. या आंदोलनाचे नेतृत्व म. गांधीनी केले. दुष्काळ स्थितीमुळे शेतसारा माफ करावा अशी शेतकऱ्यांनी मागणी केली होती. तर शेतसारा न भरण्याचा सल्ला महात्मा गांधीजीनीच शेतकऱ्यांना दिला होता. सरकारने आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर लाठीहल्ला केला, त्यांच्या घरादांराची जप्ती केली. तसेच त्यांना अटक करुन कारागृहात बंदिस्त केले, परंतु शेवटी सरकानेच माघार घेतली आणि शेतकऱ्यांना शेतसारा माफ केला.

## १४) बार्डोली आंदोलन ( १९२८ ) :

गुजरातमधील सुरत जिल्हयातील बार्डोली या ठिकाणी इ.स. १९२८ मध्ये शेतकऱ्यांनी सत्याग्रह यशस्वीपणे चालविला. बार्डोली या तालुक्यात १३७ गावे असून तेथील लोकसंख्या ८७,००० होती. या ठिकाणी इ.स. १९२२ पासून शेतकऱ्यांनी सत्याग्रह करण्यास सुरुवात केली होती. बार्डोली येथे कुंवरजी व कल्याणजी मेहता या स्थानिक नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली इ.स. १९०८ पासून किसानांनी प्रमुख जाती कंबी पाटीदार संघटित होण्यास सुरुवात झाली होती.

संघटनात्मक कार्य करण्यासाठी पाटीदार युवक मंडळ आणि पटेल बंधू नावाच्या पत्रिकाची प्रेरणा होती. पाटीदारांची शेती आदिवासी करत होते. ते परंपरेने ऋण दास होते. त्यांना कालीपराज (काळे लोक) म्हटले जात होते. कालीपराज लोकांनी स्तुती महादेव देसाई यांनी (गांधीजीचे सचिव) 'स्टोरी ऑफ बार्डोली' १९२९ या ग्रंथात 'अहिंसक 'निश्चल आणि कायदा मानणारे आहे अशी केली आहे. पाटीदा कालीपराज यांना अन्न व वस्त्र देत होते . अशा प्रकारे पाटीदार कालीपराज यांचे आर्थिक शोषण करीत होते.

इ.स. १९२७ मध्ये कापसाच्या किमती कमी झाल्यामुळे मुबंईच्या गव्हर्नरनेबार्डोली मध्ये महसुलामध्ये २२ प्रतिशत वाढ करण्याची घोषणा केली, तेव्हा मेहता बंधू आणि सरदार पटेल यांनी महसूल न भरण्यासाठी आंदोलन सुरु केले. हा लढा शांततापूर्ण मार्गाने केला तसेच कालीपराज लोकांनीसुध्दा सरकारच्या प्रलोभनास बळी न पडण्याचे निश्चित केले. सरदार पटेल व बार्डोली येथील स्थानिक नेते सामाजिक बहिष्काराबरोबरच धार्मिक भजनांचाही प्रयोग करत होते. दैनिक 'सत्याग्रह' या पत्रिकेमध्ये म्हटले होते की, शेतकरी व ग्रामीण श्रमिक हेच खऱ्या अर्थाने दौलतीचे निर्माते आहेत. शेतकरी व श्रमिक हे राज्याचे महत्त्वपूर्ण स्तंभ आहेत. बार्डोली येथील आंदोलनाची विचारधारा तत्कालीन मुबंईमध्ये कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या गिरणी कामगारांच्या हरताळापेक्षा निश्चित भिन्न होती, तरीही बार्डोलीचे आंदोलन व मुंबईतील गिरणी कामगार एकत्र होण्याची भीती मुंबईचे गव्हर्नर विल्सन व भारत सचिव केनहेड यांना होती. हे त्यांच्यात झालेल्या गुप्त पत्रव्यवहारावरुन दिसते. बार्डोली येथील आंदोलन पोलिस कारवाई करुन नष्ट करण्याचा विचार सरकारचा होता परंतु आपण तसे केल्यास कम्युनिस्ट बार्डोलीतील परिस्थितीचा फायदा घेऊन बी.बी.सी. आय. व जी. आय. पी. या रेल लाईनमध्ये हरताळ करतील म्हणून सरकारने बार्डोली येथील आंदोलनावर पोलिस कारवाई केली नाही. महाराष्ट्र व गुजरातमध्ये साराबंदीची चळवळ करण्याचा विचार सरदार पटेलचा असून त्यासाठी त्यांनी सुरुवात केली होती. त्यामुळे महसुलाचे पुनर्मूल्यांकन करण्याचे काम देशात संविधानात्मक सुधारणा होईपर्यत स्थगित केल्याची घोषणा मुंबईच्या गव्हर्नरने १६जुलै १९२९ रोजी केली. अशा रीतीने गुजरातमधील शेतकऱ्यांनी गांधीवादाच्या, राष्ट्रवादाच्या राष्ट्रवादाने प्रेरित होऊन सत्याग्रह यशस्वीपणे केला.

१२फेब्रुवारी १९२२ रोजी गांधीजी बार्डोली या ठिकाणी सामुदायिक सत्याग्रहाची तयारी करीत होते. पण चौराचौरी या ठिकाणी घडलेल्या हिंसक घटनेमुळे हा कार्यक्रम त्यानी तहकूब केला. ही चळवळ लांबणीवर टाकली असली तरी बार्डोली येथे सत्याग्रह सुरु झाला होता. सरदार पटेल यांनी अनेक ठिकाणी आश्रम स्थापन केले होते. हेच आश्रम शेतकऱ्यांच्या आंदोलनाची शिबिरे बनली गेली.

जमीन महसुलाच्या फेरतपासणीचे नाटक करुन शेतसारा हा प्रघात नेहमीचाच झाला होता. बार्डोली येथील शेतकऱ्यांना २५ टक्के शेतसारा वाढ केला. तेव्हा सरदार पटेल यांनी सारांबदीची चळवळ उभी केली. सरकारने ही चळवळ दडपण्यासाठी लाठीहल्ला,दंड, शिक्षा, हद्दपारी करण्याचे प्रयत्न केले, परंतु बार्डोली येथील शेतकऱ्यांपुढे सरकारला नमावे लागले. मुंबई सरकारने सारावाढीच्या चौकशीसाठी एक समिती नेमली. ज्यांची मालमत्ता जप्त केली होती. अशांची मालमत्ता परत केली. भारतीय स्वांतत्र्य आंदोलनाचा इतिहास बार्डोलीच्या शेतकऱ्यांच्या लढयाचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

### १५) तुकडेबंदी व सारावाढीचे विधेयक :

मुंबई कायदेमंडळात इ.स. १९२७ मध्ये मुंबई प्रांताच्या गृहमंत्र्याने तुकडेबंदी व सारावाढीचे ऐक विधेयक मांडले. हे विधेयक पास झाल्यास लहान शेतकऱ्यांना जमिनीस मुकावे लागत होते. तसेच शेतसाराही वाढणारा होता. त्यामुळे केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांनी शेतकऱ्यांच्या सभा घेऊन या विधेकाला विरोध केला. २५ जुलै १९२८ रोजी पुणे येथे त्यांनी मुंबई इलाखा शेतकरी परिषद घेतली. या परिषदेत ८००० शेतकरी हजर होते. तुकडेबंदी व सारावाढीचे विधेयक सरकारने पास करु नये असा ठराव या परिषदेत घेण्यात अरला. ब्राह्मणेतर चळवळीतील कार्यकर्त्यांनी ‘ मुबंई इलाखा ब्राहयणेतर शेतकरी संघ’ ही संघटना स्थापन केली. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणे आणि त्यांना जागृत करणे ही या संघटनेची उद्दिष्टे होती. मुंबई प्रांतात इ.स. १९२० ते इ.स. १९२९ च्या दरम्यान काँग्रेस व ब्राह्मणेतर चळवळीतील कार्यकर्त्यांनी शेतकरी चळवळी केल्या.

### १६) फैजपूर काँग्रेस आणि शेतकऱ्यांचे प्रश्न :

पंडित जवाहरलाल मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली जळगाव जिल्हयातील फैजपूर येथे डिसेंबर १९३६मध्ये झालेले काँग्रेसचे अधिवेशन हे पहिलेच ग्रामीण अधिवेशन होते. याच अधिवेशनात अखिल भारतीय किसान सभेचे दुसरे अधिवेशन घेण्यात आले. एन. जी. रंगा हे किसान सभेचे अध्यक्ष होते. मनमाडपासून फैजपूरपर्यंत २०० मैलांची पदयात्रा किसानांनी काढली होती. पंडित नेहरूंनी आपल्या अध्यक्षीय भाषणात वर्गसंघर्षाऐवजी समाजवादी तत्त्वप्रणालीवर श्रध्दा व्यक्त केली होती. या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या संदर्भात पुढील ठराव पास केले.

१) काँग्रेसअंतर्गत शेतकरी व मजुरांच्या संघटना स्थापन कराव्यात.
२) जमीन महसूल पन्नास टक्के कमी करावा.
३) जमिनीचा खंड पन्नास टक्के कमी करावा.
४) शेतकऱ्यांची कर्जवसुली थांबवावी.
५) शेतमजुरांना योग्य प्रमाणात वेतन द्यावे.
६) शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज द्यावे.
७) शेतकऱ्यांच्या विकासाचा सरकारने प्रयत्न करावा.
८) शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करावी.

### १७) शे. का. प. आणि शेतकरी चळवळ :

मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांचा कारभार शेतकरी व कामगार वर्गाच्या विरोधी आणि भांडवलशाहीधार्जिणा आहे असे शंकरराव मोरे आणि केशवराव जेधे यांना वाटत होते. इ.स. १९४६ मध्ये ते काँग्रेसमध्ये होते व बाळासाहेब खेर यांचे मंत्रिमंडळ व्यापाऱ्यांचे आहे असे ते म्हणत असत. इ. स. १९४६ मध्ये केशवराव जधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, के.डी. पाटील, नाना पाटील दत्ता देशमुख, यशवंतराव चव्हाण, पी. के सावंत, आचार्य प्र. के. अत्रे, रामभाऊ नलावडे, तुळशीदास जाधव, डॉ. केशवरावजी शंकरराव धोंडगे व गुरुनाथरावजी कुरुडे यांनी काँग्रेसअंतर्गत शेतकरी कामगार संघ स्थापन केला पण काँग्रेसअंतर्गत असे उपपक्ष

असू नये अशी भूमिका अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीने घेतल्यामुळे वरील मंडळीनी २६ एप्रिल १९४८ रोजी शेतकरी कामगार पक्ष स्थापन केला. या पक्षाचे पहिले अधिवेशन सोलापूर येथे झाले.

शंकरराव मोरे, नाना पाटील, तुळशीदास जाधव, केशवराव जेधे, डाँ केशवरावजी धोंडगे आणि गुरुनाथराव कुरुडे यांनी शेकापच्या विकासासाठी फार प्रयत्न केले.

जनसत्ता' हे साप्ताहिक या पक्षाचे मुखपत्र होते. इ.स. १९५० मध्ये नाशिक जिल्हयात दाभाडी येथे पक्षाचे दुसरे अधिवेशन भरले. या अधिवेशनात पक्षाने दाभाडी प्रबंध स्वीकारले. यात पक्षाचे ध्येयधोरण मांडले आहे पुढे पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यात वैचारिक मतभेद निर्माण झाले. परिणामी केशवराव मोरे, तुळशीदास जाधव आणि खाडिलकर हे पक्षातून बाहेर पडून काँग्रेसमध्ये गेले. काँग्रेसच्या खालोखाल शे.का.प. हा पक्ष लोकप्रिय होता. प्रारंभीच्या बारा वर्षाच्या काळात एक समर्थ विरोधी पक्ष म्हणून त्याची प्रसिध्दी होती. इ.स. १९५२ आणि १९५७ च्या निवणुकीत या पक्षाने चांगले यश मिळविले होते. या पक्षाने विधानसभा आणि बाहेरील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा सतत प्रयत्न केला. या पक्षाने लेव्ही पध्दत व धान्य नियंत्रण पध्दतीवर टीका करुन कुळांना संरक्षण देण्याची मागणी सरकारकडे केली. शेतीमालास योग्य भाव, रोजगार हमी योजना व कापूस एकाधिकार योजना याबाबातही या पक्षाने प्रयत्न केले. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणे व त्यांचे कल्याण करणे या पक्षाचे मुख्य काम होते. ते या पक्षाने करण्याचा प्रयत्न केला.

## १०.७ समारोप :

इंग्रजांनी आपल्या ताकदीच्या व राजकीय डावपेचांच्या भारतातील बहुतेक सर्व छोट्या-मोठ्या सत्ता निकालात काढल्या. मोगल आणि मराठ्यांचा नि:पात केल्यावर इंग्रजांना देशामध्ये आव्हान देणारी ताकद उरली नाही. देशातील सर्व राजवटी, संस्थाने मांडलिक म्हणून राहू दिली. या राजे-रजवाड्यांना आपण परतंत्र आहोत, इंग्रजांची सार्वभौमसत्ता आपण स्वीकारलेली आहे याची पूर्ण जाणीव होती. काही संस्थानिक आपल्याच लोकांचे काळ ठरले. उदाहरण- नागपूर, सातारा, कोल्हापूरच्या काही घडामोडी इ.स.१८५७ मध्ये घडल्या. त्यात राजकर्त्यांचाही हात होता. या देशातील राज्यकर्ते व लोक कसे आहेत? त्यांची मनोवृत्ती काय आहे? ते कितपत विश्वास ठेवण्यास लायक आहेत? याची कोष्टके इंग्रज राज्यकर्त्यांकडे तयार होती. देशी राज्यकर्त्यांच्या हालचालींवर इ.स. १८५७ च्या काळात इंग्रजांचे बारीक लक्ष होते.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची चळवळ ही ब्रिटीशांच्या आर्थिक निस:रण्याच्या सिद्धांत्याच्या विरोधी होती. ब्रिटीशांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक शोषण केले त्यामुळे येथील शेतकरी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण झाला. या असंतोषातून महाराष्ट्रात सर्वत्र शेतकरी चळवळ फोफावली. या चळवळीमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फुटली.

## १०.८ दिर्घोत्तरी प्रश्न :

१) ब्रिटीशांच्या विरोधात महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीच्या उठावाची कारणे विशद करा.
२) महाराष्ट्रातील विविध शेतकरी चळवळीची माहिती द्या.

३) ब्रिटीशा विरोधात उमाजी नाईकचे कार्य विशद करा.

४) महाराष्ट्रातील भिल्ल जमातीने ब्रिटीशा विरोधात केलेल्या उठावाचे वर्णन करा.

५) महाराष्ट्रातील विविध जमातीचा ब्रिटीश विरोधी उठावाचे थोडक्यात वर्णन करा.

## १०.९ संदर्भसूची :


१. महाराष्ट्राचा सर्वांगीण इतिहास – बी. व्ही. पाटील

२. विसाव्या शतकातील महाराष्ट - य. दी. फडके

३. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास – डॉ. अनिल कठारे

४. महाराष्ट्राचा सामाजिक सांस्कृतिक इतिहास – ह. श्री. शेणोलीकर, प्र. ल. देशपांडे.

५. महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास – प्रा. गणेश राऊत, प्रा. ज्योती राऊत

६. १९ व्या शतकातील महाराष्ट्र - डॉ. राजा दीक्षित


❖❖❖❖

# ११

# एकीकरण व पूनर्रचना
# अ) हैद्राबाद मुक्तीसंग्राम
# ब) संयुक्त महाराष्ट्र चळवळ

**घटक रचना :**

११.० उद्दिदष्टे
११.१ प्रस्तावना
११.२ हैद्राबादची संग्राम
११.३ हैद्राबाद मुक्ती संग्रामाची पार्श्वभूमी
११.४ महाराष्ट्र परिषद
११.५ हैद्राबाद स्टेट कॉग्रेसचे कार्य
११.६ सशस्त्र व घातपातीमार्गाचे आंदोलन
११.७ संयुक्त महाराष्ट्र चळवळ
११.८ महाराष्ट्र राज्याची स्थापना
११.९ सारांश
११.८ दिर्घोत्तरीप्रश्न
११.९ इतर संदर्भ साधने

## ११.० उद्दिष्ट्ये

- हैद्राबाद मुक्ती संग्रामाची पार्श्वभूमी अभ्यासणे.
- हैद्राबाद मुक्ती संग्रामात हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या कामगिरीचे मूल्यमापन करणे.
- संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळातील घडामोडीचा अभ्यास करणे.

## ११.१ प्रस्तावना

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाअंतर्गत अनेक गंभीर स्वरुपाचे प्रश्न, समस्या भारतासमोर होत्या त्यामध्ये संस्थानांचे विलिनिकरण ही अतिशय मोठी व जटील समस्या होती. ही समस्या सोडविण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी अतिशय कौशल्याने ही समस्या हाताळली, त्यापैकी हैद्राबाद संस्थानाच्या विलिनिकरणाची सविस्तर माहिती व या संस्थानाच्या पार्श्वभूमी विषयी सविस्तर या प्रकरणात दिलेली आहे.

## ११.२ हैद्राबाद मुक्ती संग्राम

'मध्ययुगीन कालखंडात प्रशासकीय व लष्करी सेवेच्या माध्यमातून कर्तबगार व्यक्तीला वतन अथवा जहागिरी मुख्य राजकीय साजेकडून मिळत असत. हळूहळू जहागिरीचे रुपांत संस्थानामध्ये होऊन स्वतंत्रपणे राज्यकारणार सुरु झाली. ब्रिटींश राजवटीमध्ये अनेक लहान-मोठे संस्थान नष्ट होऊन ब्रिटीशांचे प्रशासन स्वतंत्रपणे सुरु झाले तरीपण त्यांच्या कालखंडात भारतात जवळपास प्रहर देशी राज्य व संस्थाने होती. यामध्ये भौगोलिक क्षेत्रफळाच्या आकारानुसार हैद्राबाद संस्था दुसऱ्या क्रमांकाचे होते.

औरंगजेबच्या मृत्यूनंतर फरुखासियर बादशहा बनला त्याने गाझीउद्दीनला दख्खनचा सुभेदार बनवून हैद्राबादला पाठवले. मोगल बादशहाच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन हैद्राबाद येथे स्वतंत्र सत्ता स्थापन केली. गासीउद्दीन ऊर्फ मीर कमरनद्दीन ' आसफजाही' व 'निजाम –उल् - मुल्क' अश्या पदव्या घेतल्या त्याच्या घराण्यात आसफजाही म्हणून ओळखले गेले. निंजामाने १७२४ मध्ये स्थापन केलेल्या राज्यामध्ये मराठवाडा तेंलगण, कर्नाटक या प्रदेशाचा समावेश होत होता. निजाम व त्याचे सर्व उत्तराधिकारी यांनी फ्रेंच, इंग्रज यांच्या बरोबर मैत्रीचे संबंध ठेवून मराठयांबरोबर संघर्ष सुरु ठेवली. १८५७ च्या उठावाच्या वेळी निजामाने इंग्रजांना मदत केल्याने इंग्रजानी निजामाचे राज्य स्वतंत्र सुरशित ठेवले. भारताला स्वतंत्र मिळूनही निजामाचे राज्य स्वतंत्र होते. या राज्यात ८५% बिंदू ११% मुसलमान ४% इतर समाज होता. बहुसंख्य जनतेने भारतात विलिन होण्याची मागणी निजामाकडे केली त्यास नकार देऊन निजामाने स्वतंत्र राज्य म्हणून घोषीत केल्याने हैद्राबाद विलिनिकरणासाठी जनतेने आंदोलन, सत्याग्रह केले यालाच भारतीय हैद्राबाद मुक्ती संग्राम या नावाने ओखळले जाते.

## ११.३ हैद्राबादची मुक्ती संग्रामाची पार्श्वभूमी आणि आर्य समाजाचे योगदान

१८५८ ते १९४७ या कालखंडात भारतावर इंग्रजांची प्रभावीय एकसंघ सत्ता होती.या काळात निजाम ब्रिटिशांशी एकमिल वाटून स्वातंत्र्य चळवळी विरोधी, हिंदूविरोधी भूमिका घेत असत. भारताला स्वातंत्र मिळू नये अशी इच्छा निजामाची होती. त्यामुळे भारतीय स्वातंञ्यानंतरही विलिणिकरण्यात विरोध केल्याने लोकांनी त्यांच्याविरोधी आंदोलन सुरु केले. या आंदोलनासाठी समाज जागृतीचे कार्य आर्य समाजाने प्रभावीपणे केले.

### १) आर्य समाजाचे लोकजागृतीचे कार्य:-

स्वाती दयानंतर सरस्वती यांच्या प्रेरणेने मराठवाडयात १८८० मध्ये आर्य समाजाची शाखा स्थापन करण्यात आली. त्याचप्रमाणे औरंगाबादए लोहर उद्गगीर, हिंगोली, परभणी, उस्मानाबाद, बीड नालना, अहमदपूरया ठिकाणी शाखा स्थापन करण्यात आल्या. यासाठी भगवती प्रसादए वुंदन प्रसादजी, गोकुळ प्रसादजी, रामचंद्र भाईजी, माणिक प्रसादजी, बाबुराव बैद्य, बन्सीलालजी तिवारी येथे योगदान व कार्य महत्वाचे होते. भाई बन्सीलालजी ने वैदिक संदेश नावाचे वृत्तपत्र सोलापूरमधून प्रसिध्द केले तिथूनच आर्य समाजाचे मुखपत्र 'सुदर्शन' प्रसिध्द होत होते. हैद्राबाद येथून 'वैदिक आदर्श 'हे साप्तहिक पंडित नरेंद्र चालवित होते. या वर्तमान पत्राने समाज जागृतीचे कार्य करुन लोकांच्या ऐक्य घडवून संघटना वाढविण्याचा प्रयत्न केला.

आर्य समाजाने सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीना प्राधान्य देऊन समाज जागृतीचे कार्य केले. आर्य समाजाने अनेक ठिकाणी समाजमंदिर, व्यायामशाळा , वाचनालये सुरु केली. श्यामलाल, बन्सीलाल, शेपराव वाघमारे, दत्तात्रय प्रसाद, गोपाळराव शास्त्री यांनी हिंदूना एकत्र आणण्यासाठी गावोगावी प्रवास केला. सक्तीने धर्मांतर केलेल्या हिंदूना परत हिंदू धर्मात घेण्याची मोहिम हाती घेऊन १० हजार हिंदूना परत हिदू धर्मात घेतले. वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन, सर्वजातींना वेधध्यायनाचा व यज्ञोपविधी संस्काराचा अधिकार, विभक्त समाजाला संघटीत करणे, सामाजिक विषमत्ता नष्ट करणे, आंतरजातीय विवाह घडवून आणणे या सारखे महत्वपूर्ण कार्य आर्य समाजाने केल्याने समाजात ऐक्य व लोकजागृती घडून आली. निजामाच्या राजवटीला व अत्याचाराला सर्वप्रथम आर्य समाजाने विरोध केला . त्यामुळे निजामाने दडपशाहीचे धोरण स्विकारले.

## २) निजाम सरकारची दडपशाही :-

आर्य समाजाचे लोकजागृतीचे कार्याने लोकप्रियेत वाढत होती, तसेच निजाम राजवटीत सर्वप्रथम आर्य समाजाने विरोध केल्यामुळे निजामाने आर्य समाजाची चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न सुरु केला. सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय आर्य समाजाने कोणत्याही प्रकारचा प्रचार करु नये. मंदिरा बाहेर हवन करणे, सार्वजनिक ठिकाणी सभा घेण्यासबंदी घालून चळवळ दडपण्याचा प्रयत्न निजामाने केला. यासाठी सरकारकडून १२एप्रिल १९३४ रोजी परिपत्र काढून प्रचार व उपदेश करण्यास बंदी घातली. २३ जानेवारी व २९ जानेवारी १९३४ रोजी परिपत्रकाद्वारे हवन व सभा घेण्यास बंधने घातली. या विरोधी आर्य समाजाने हैद्राबाद येथे सत्याग्रह केला.

## ३) मुस्लिम संघटना – त्याची भूमिका :-

आर्य समाजाचा प्रभाव रोखण्याच्या हेतूने निजामाच्या आश्रर्याने खाकसार पार्टी, निजामसेना, रझाकार व पार्टी इत्यादी संघटनांचा उदय झाला. निजाम सातवा याच्या मार्गदर्शनाखाली मोहम्मद नवाजखान ऊर्फ नबाब बहादूर यार जंग याने १९२७ – २८ च्या सुमारास इलेहादूल पार्टी संघटना स्थापन केली. या संघटनेने राजकीय स्वरुप धारण करुन संस्थानामध्ये मुसलमानांचे वर्चस्व वाढविण्याचे प्रयान केले. अब्दूल हसन, सय्यद अली मजहर, अली कमित, कसिम विझली इ. या संघटनेचे अध्यक्ष होते.

हिंदूना बाटविणे व निजामाची सत्ता बळकट करणे हे या संघटनेचे उद्दीष्टे होती. धर्मप्रसारक हिंदूना जबरदस्तीले मुसलमान करीत होते. यासाठी निजामाने पगारी मौलवी नियुक्त केले. या संघटनेने गुप्त परिपत्रक काढून हरिजनांना मुसलमान बनविण्याचा प्रयत्न केला. इत्तेहादुल या संघटनेचा लष्करी विभाग म्हणजे रझाकार संघटना होती. यांच्या अनेक शाखा स्थापन करुन निजाम सरकारला मदत केली. या संघटनेच्या जोरावर निजामाने दहशत माजविण्याचा प्रयत्न केला. यांच्या मदतीच्या आधारेच निजामाने हैद्राबाद राज्य स्वतंत्र ठेवण्याची घोषणा केली.

## ४) निजाम सरकारच्या धोरणाला प्रखर विरोध : –

आर्यसमाजाच्या कार्याला मुस्लिम संघटनांनी विरोध केला. त्याचे आक्रमण होणार अशी बातमी आल्यास समाज मंदिरातील घंटा वाजवून लोकांना एकत्र केले जात. घंटयाचा आवाज

ऐकू येताच लोक हत्यारे घेऊनच एकत्र येत असत. आर्य समाजाचे बी व्यंकटस्वामी यांनी शुध्दीकरण मोहिम हाती घेऊन  अनेक बाटविण्यात आलेल्या लोंकाना परत हिंदूधर्मात घेतले. निजाम पोलिसांकडून होणाऱ्या त्रासातून अनेक हिंदू कुटुंबियांची आर्य समाजाने केली. हिंदू मंदिराच्या जागी उभारलेल्या मस्जिदीचा ओटा पाडण्यात आला. मंदिर पाडण्यासाठी आलेला पठाण, अरब लोकांना रामा माग यांनी धमकी देऊन अनेकांना ठार मारले. उमरी शाखेचे अध्यक्ष माणिकराव याना गुडांनी जखमी केले. त्यानंतर ते मरण पावले. त्यांचे प्रेत नातेवाईकांस देण्यास पोलिसांनी नकार दिल्याने त्याच्या विरोधात लक्षर्णीनह मिरवणूक काढली. यावेळी अनेकांना अटक करण्यात आली. परिणामी लक्षणामध्ये ऐक्य व संघटीत होण्यास प्रारंभ झाला

### ५) हैद्राबाद स्टुंडुंट्स युनियनचे कार्य:-

मराठवाडयातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सर्वच बाबीत सोलापूर सोयीचे असल्याने ते शेक्षणिक केंद्र बनले. दयानंद कॉलेजचे प्राचार्य श्रीराम शर्मा यांनी विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम व धर्मप्रेम जागृत करुन विद्यार्थ्यांच्या संघटना स्थापन केली. तीच हैद्राबाद स्टुंडंट्स युनियन होय. या संघटनेच्या माध्यमातून लोकजागृतीसाठी अनेक नेत्यांची भाषणे झाली. त्यामुळे विद्यार्थी स्वातंञ्यासाठी पेटून उठले. त्यांनी झेंडा सत्याग्रह, वंदेमातरम् चळवळ आणि गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या छोडो भारत चळवळीत विद्यार्थी मोठया संख्येने  सहभागी झाले. अनेक ठिकाणी शिबिरे येऊन ‘ आधी स्वराज्य मग शिक्षण ’ हे विद्यार्थामंध्ये रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### ६) आर्य समाजाच्याा नेतृत्वाखाली हैद्राबाद मुक्ती संग्रामास प्रारंभ :-

जनजागृजी        मोठया प्रमाणात घडू लागली. त्यामुळे निजामाने आर्य समाजाच्या विरोधी भूमिका घेऊन दडपशाहीचे धोरण स्विकारले. निंजामाने परिपत्रकाद्वारे सभा घेणे, हवन व यज्ञकुंड तसेच आर्य समाजाची वृत्तपत्रे यावर बंदी घातली. या दडपशाहीच्या धोरणा विरोधी उस्मानाबाद जिल्हयात स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली पहिला सत्याग्रह १९३७ मध्ये झाली. या सत्याग्रहात श्रीकृष्ण अर्याचित, धोटीकर, नरहर भूपकर व काटिउदासराव क्षासरकर यांना सहभाग घेतला. या प्रसंगी वंदेमातरम् बहिष्कार, चळवळीलाही पाठिंबा दिल्याने जनतेने स्वातंञ्य आंदोलनात महत्वांची भूमिका बजावली.

आर्य समाज, कॉंग्रेस नेते पंडित नरेंद्र व विनायकराव विद्यालंकार यांनी १९३८ मध्ये संस्थानात सत्याग्रहाला प्रारंभ केला. या सत्याग्रहास देशातून जनतेचा पांठिबा मिळविण्यासाठी माधवराव आणि यांच्या अध्यक्षेतेखाली सोंलापूर येथे परिषद घेण्यात आली. यावेळी हैद्राबाद निषेध दिन पाळण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. त्यासाठी विविध प्रदेशातून हजारो लोक हैद्राबाद संस्थानात आले. निजामाने चळवळ दडपून टाकण्यासाठी २०हजार लोकांना अटक केली इप्तेहादुलच्या गुंडांनी सत्याग्रहींना बेंदम मार दिला. त्यामुळे २३ सत्याग्रही तुरुगांतच मरण पावले.

आर्य समाजाच्या चळवळीला पायबंद घालण्यासाठी निजाम सरकारने आक्रमक धोरण स्विकारले. खोटे आरोप ठेवून अटक केली. हातपत्रांवर बंदी घातली. चळवळीला खोल बसावी हा उद्देश सरकारचा होता. परंतु या धोरणामुळे निजामा विरोधी सर्वत्र चळवळी सुरु झाल्या अनेक संघटना, संस्था हैद्राबाद मुक्तीच्या मागण्या करु लागल्या.

**आपली प्रगती तपासा :**

१) हैद्राबाद मुक्ती संग्रामातील आर्यसमाजाचे योगदान स्पष्टकरा.

## ११.४ महाराष्ट्र परिषद

आर्य समाजाने हैद्राबाद संस्थानामध्ये सामाजीक – धार्मिक जनजागृती सर्व प्रथम घडवून आणली. त्यामुळे शैक्षणिक प्रगतीची वाटचाल सुरु झाली. केसवराव कोरटेर व वामनराव नाईक यांनी १९१८ मध्ये पहिली सामाजिक परिषद आयोजित केली. त्यांनीच राजकीय जागृतीच्या हेतूनं हैद्राबाद राज्य सुधार संघटना, स्थापन केली.सरकारने त्यावर बंदी घातली. संस्थानातील तेंलगू, कन्नड, मराठी भाषेवर होकार आक्रमण रोखण्याच्या उद्देशाने केशवराव कोरटेर, वामनराव नाईक यांनी 'दक्षिण साहित्य संघ' स्थापन केला १९३७ मध्ये मराठी भाषिकांसाठी 'निजाम प्रांतीय मराठी साहित्य परिषद स्थापन करण्यात आली. अनंतराव कुलकर्णी व अनंतराव वाघमारे यांनी मराठवाडयात महाराष्ट्र संघ स्थापन केला. मराठवाडयाचे राजकीय नेतृत्व करण्यासाठी कायमस्वरुपाची राजकीय संघटनेची गरज होती. या गरजेतून १९३७ मध्ये रा. गो. परांजपे, केशवराव कोरटकार, काशिनाश वैद्य, एकनाथ कुलकर्णी अनंत भालेराव इ. 'महाराष्ट्र संघाची स्थापना केली. १९४१ नंतर नहाल विचार सरणीच्या स्वामी रामानंद तीर्थ यांनी नेतृत्व केले. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद मुक्ती संग्रामाची वाटचाल सुरु झाली.

## ११.५ हैद्राबाद स्टेंट काँग्रेसच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद लढयाची वाटचाल

स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैद्राबाद संस्थानातील जनतेचे राजकीय प्रश्न सोडविण्याच्या हेतून महाराष्ट्र परिषद, कर्नाटक परिषद आंध्र महासभा यांचे एकत्रिकरण करण्याचा प्रयत्न केला. यासाठी ते अंबाजागाई येथून हैद्राबादला मुक्कामी आले. परंतू त्यांना साथ मिळाली नाही. याच सुमारास हैद्राबादमधील नेत्यांनी एक बैठक घेऊन हैद्राबाद स्टेंट कॉग्रेसची स्थापना केली. या बैठकीय रामानंदतीर्थ यांना बोलविण्यात आले नाही. या बैठकीत भर्व मवाळवादी नेते व सरकारवर विश्वास असणारे लोक उपस्थित होते. निजाम सरकारने पल्लीक सेपन्टी रेग्युलेशन या कायदयानुसार बंदी घातली. पुढे ती उठविली त्यामुळे हैद्राबाद स्टेट कॉग्रेंसची स्थापना करण्यात आली. त्याचे पहिले अध्यक्ष गोंविंदराव नानल होते. कृतिसमितीने केलेल्या सत्याग्रहामुळे नानल यांना अटक करण्यात आली. सुटकेनंतर नानल आजारपडल्याने हैद्राबाद स्टेट कॉग्रेसचे अध्यक्षपद स्वामी रामानंद तीर्थ यांच्याकडे आले. त्यांच्या नेतृत्वाखाली आंद्योलन सुरु होऊन हैद्राबाद संस्थान मुक्त झाले. हैद्राबाद मुक्ती संग्राम अविंसात्मक व हिंसात्मक मार्गाने सुरु झाले.

## अ) गांधीवादी / अहिंसात्मक मार्गाने आंदोलन :-

१) हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने ७ ऑगस्ट १९४७ पासून अहिंसावादी मार्गाने आंदोलनाला प्रारंभ केला. संस्थानातील महाविद्यालयाच्या वस्तीगृहातील मुस्लिम विद्यार्थी नमाज पढत असत. त्याच प्रमाणाने हिंदू विद्यार्थ्यांनी प्रार्थना म्हणून वंदेमातरम् हे गीत म्हणावे. वंदेमातरम् हे गीत राजकीय असून मुस्लिम समाज्यात भावना दुखवल्या जात असल्याने त्यावर बंदी घालावी. अशी तक्रार कुलगुरु शिक्षणनेत्याकडे करण्यात आली. त्यामुळे वंदेमातरम् गीतावर सर्वाधिक बंदी घालण्यात आली या निर्णया विरोधी हैद्राबाद संस्थानातील विद्यार्थ्यांनी संघ घडवून आली. १२०० विद्यार्थ्यांना कॉलेजमधून काढून टाकले. त्यांना नागपूर विघापणात प्रवेश देण्यात आला. वंदेमातरम् चळवळीला कॉंग्रेसच्या अनेक नेत्यांनी पाठिंबा दिला.

### २) कॉंग्रेसबंदी विरोधी पहिला सत्याग्रह :-

निजाम सरकारने कॉंग्रेसवर घातलेली बंदी उठवादी तसेच लोकांना निजामाच्या सरंजामीच्या गुलामगिरीतून मुक्ती आणि राजकीय स्वातंत्र्याची प्राप्ती या हेतूने स्वामी रामानंद ने मोठी चळवळ उभारली. त्यासाठी सत्याग्रहींची कृती समिती स्थापना केली. कृती समितीने सत्याग्रह सुरु केले. हैद्राबादला गोंविदराव नानल यांनी पहिला अहिंसक प्रतिकाराला प्रारंभ केला. स्वामीनी सत्याग्रहाच्या दुसऱ्या तुकडीचे नेतृत्व केले. या आंदोलनात एकूण १८ तुकडयांनी सत्याग्रह केला. ३५० लोकांनी विविध ठिकाणी सत्याग्रह केला. सत्याग्रहींना अटक केल्याने निजाम विरोधी दिन चालण्यात आली. तर इत्तेहादूल मुसलमीन या संघटनेने काळे झेंडे दाखवून सत्याग्रहींचा निषेध केला.

### ३) १९४२ ची चळवळ :-

म. गांधीजीच्या आदेशानुसार संपूर्ण देंशात छोडोभारत चळवळ सुरु झाली. हैद्राबाद संस्थानामध्ये ही चळवळ सुरू होताच निजामाने जी दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. स्वामीजींनी ‘करा अथवा मरा’ असा आदेश हैद्राबाद संस्थानातिल जनतेला दिला. पोलिसानी स्वामीजींना अटक केले. सत्याग्रहासाठी प्रत्येक जिल्हयात सत्याग्रही केंद्र स्थापन करण्यात आले. अनेकांनी वकिली सोडून प्रचार कार्य केले. मराठवाडयात ५३० लोकांनी सत्याग्रह केला. त्यांना अटककरुन तुरुगांत पाठविले. या चळवळीत शाळा, कॉलेजमधील विद्यार्थी, शिक्षक सहभागी झाले होते. चळवळीची तीव्रता कमी झाल्यावर सर्वच सत्याग्रहींना सरकारने टप्प्या टप्प्याने सोडून दिले. या लढयात यश न मिळाल्याने स्वामीजीने जनतेला पून्हा आंदोलनासाठी तयार रहावे लागेल असे सांगितले.

### ४) कांयदेभंग चळवळ :-

११ जून १९४७ रोजी फर्मान – इ - मुबारक नावाचे फर्मान निजामाने काढून हैद्राबाद राज्य स्वतंत्र रहाणार असल्याची घोषणा केली. स्टेट कॉंग्रेसने संस्थानाच्या विलीनीकरणासाठी स्वामीजींच्या नेतृत्वाखाली कायदेभंग चळवळ सुरु करण्याचा निर्णय घेतला. स्वामीजीनी गांधी पंडित नेहरु यांचा सल्ला घेऊन कायदेभंग चळवळीचे जनतेला आवाहन केले. चळवळ यशस्वी करण्यासाठी जनतेला पुढील कार्यक्रमाची अमंलबजावणी करण्याचे आवाहन केले.

१) ७ ऑगस्ट १५ ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र्य दिन साजरा करावा.
२) शिंदी, ताड, मोह व सागाची झाडे तोडून जंगल सत्याग्रह करावा
३) सरकारला कर देऊ नये

४) लेखी कर देण्यास नकार द्यावा.

१०४६ गावात सामुदायिक झेंडावंदन १,२२,६०० झाडे तोडण्यात आली. ५५० गावांनी सरकारीकर व २७० खेडयांनी लेखी देण्यास नकार दिला या सत्याग्रहात ५,५८८ सत्याग्रहींना अटक करण्यात आली.

**५) झेंडा सत्याग्रह :-**

निजामाने आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे स्टेट कॉग्रेसने स्वामी रामानंद तीर्थाच्या नेतृत्वाखाली पून्हा स्वातंत्र्यलढयाला प्रारंभ केला, ७ ऑगस्ट हा दिवस संघराज्यात विलीन होण्याचा दिन व १५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविले. या दिवसी प्रत्येक घरावर तिरंगाध्वज फडकावून साजरा करण्याचे आवाहन स्वामीजींनी केले. १०४६ गावात तिरंगा फडकाविण्यात आला. त्यावेळी पोलिस, रझाकारांनी गोळीबार लाटीहल्ला, अन्याय व अत्याचार केला निजामाने स्थानिक नेत्यांना अटक केली. कृती समिंत्यानी मराठवाडयात अनेक ठिकाणी झेंडा सत्याग्रह केला.

**६) जंगल सत्याग्रह :-**

हैद्राबाद स्वातंत्र्यलढयाचा एक भाग म्हणून स्टेट काँग्रेस कृतिसमितीने जनतेला जंगल सत्याग्रहाचे आदेश दिले. १५सप्टेंबर १९४७ पासून जंगल सत्याग्रहाला सुरवात झाली. शिदीं व मोह यापातून सरकारला मोठया प्रमाणात म्हसूल मिळत असत. तो बंद होण्यासाठी चिंदीची झाडे तोडली.नांदेड जिल्हात डोरली, कोळी, पाटनूर, हेळकी इ.ठिकाणी जंगल सत्याग्रह करण्यात आले. यावेळी बारड लहान व नागेली ही भूमिगतांची केंद्र असून स्थानिक नेते भूमिगत राहून आंदोलनाचे कार्य करीत होते. आबासाहेब लहानकर व चिमणाजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली पाटनूर येथे ८००० लोकांनी साग तोडले त्याचप्रमाणे कंधार व हदगाव तालुक्यात सत्याग्रहाच्यावेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात चार व सहा लोक ठार झाले. मराठवाडयात साधारण २५ ठिकाणी सत्याग्रह करण्यात आला. शिदीं, मोह, ताड, साग यांची तोड मोठया प्रमाणात लोंकानी करुन जंगल सत्याग्रह यशस्वी करण्याचा प्रयत्न केला.

**७) असहकार चळवळ :-**

काँग्रेसने सुरु केलेल्या झेंडा व जंगल सत्याग्रहाचा एक भाग म्हणूनच असहकार चळवळ सुरु करण्यात आली. संस्थानाच्या बाहेर सोलापूर येथे स्वामीजींनी बैठक घेऊन स्वातंत्र लढयाची दिशा ठरविली. कार्यकारणीने असा ठराव पास केला ‘संकल्पित लढयाच्या दृष्टीने काही सद्दस्याने तुरुंगात जावे. काहीने स्वलढयाचे कार्य चालू ठेवावे. या लढयासाठी कृती समिति तयार करण्यात आली. संस्थानातील जनतेला स्वतंत्र्याच्या अखेरच्या लढयाचे आवाहन करुन असहकार चळवळीला प्रारंभ केला यासाठी ठराव जनते समोर ठेवले जनतेने चळवळीला मोठया संख्येने प्रतीसाद दिला. अनेकांनी सरकारी पदाचा राजीनामा दिला. वकिल विद्यार्थी यांनी बहिष्कार टाकला. पाटील कुलकर्णीनी सरकारी दप्तराची लेकी केली अनेक ठिकाणी बंदी हूकूम मोडून जाहिर सभा घेतल्या. स्वामीजींनी पुकारलेल्या असहकार चळवळीत पाठिंबा दिली.

## ११.६ सशस्त्र व घातपाती मार्गाचे आंदोलन :-

### १) सशस्त्र आंदोलन:-

स्वामी रामानंद तीर्थानी हैद्राबाद स्वातंत्र्यासाठी अहिंसात्मक लढा सुरु केला होता. परंतु निजामाने रझाकार, पठाण, अरब, पोलिस, लस्कराच्या मदतीने सत्याग्रहींवर मोठया प्रमाणात अत्याचार केला. त्यामुळे निजामाशी सशात्र लढा देण्याची गरज होती. स्टेट कॉंग्रेसने लष्करी कँपस उभारुन सशस्त्र आंदोलनाची सुरुवात केली. निजामाच्या पक्षातील व्यक्ती पोलिस अधिकार, पोलिस, वझाकार व रोहिम यांचे जवळपास १७०० लोक ठार झाले. कॉग्रेसचे १७ सैनिक धारातीर्थी पडले स्वातंत्र्य सैनिकानी सरकारी गोदामे, बँका लुटल्या त्यामुळे निजाम सरकाराला मोठा आर्थिक फटका बसला.

### २) घातपाती कृत्य :-

निजाम सरकारवर दबाव वाढविण्यासाठी जनतेने घातपाती कारवायांना सुरवात केली. वाहतूक – दळणवळणाऱ्या साधनांचे नुकसान करणे, हेलिफोनच्या तारा तोडले, रेल्वे रुळ उध्वस्त करणे, रेल्वे स्टेशन, सरकांरी कार्यालय, पोस्ट ऑफिस उध्वस्त करणे या पध्दतीच्या घातपाती कारवाया सुरु करण्यात आल्या. कृतिसमितीच्या आदेशानुसार पानगावकारेपूर दरम्यान रेल्वे रुळ उखडले. अनेक मार्गावरील बसेस जाळल्या. सरकारी अधिकांऱ्यावर सैन्य हल्ले केले. पोलिस स्टेशन व सरकारी कार्यालयात बॉंब स्फोट करण्यात आले.

### ३) महिलांचा सहभाग :-

हैद्राबाद स्वातंत्र सग्रांमात महीलांची राजकीय जागृती दिसून आली. झेंडा व जंगल सत्याग्रह महिलांनी मोठया संखेने सहभाग घेतला. यावेळी मोर्चा, तुंरुगवास, भूमिगत चळवळी सुरु असल्याने सहभागी झाल्या. सुशिलाबाई दिवाळ हिने सामाजिक कार्यासाठी महिलाविद्या मंदिर स्थापन केले. जंगल सत्याग्रहात १५०० महिंला सहभागी झाल्या होत्या. आशाताई वाघमारे यांनी गुलमंडीवर तिरंगा फडकवला. सत्याग्रहींच्या कुटुंबीयांची, काळजी , सत्याग्रहींची तुरुंगा काळजी, शस्त्रास्त्रांची मदत इ. कामे महिंलानी केली. महिलांनच्या सहभागामुळे स्वातंत्रलढयांची तिव्रता वाढली.

### निजामाच्या धोरणामुळे सैनिकी कारवाई व हैद्राबादचे विलिनीकरण :-

निजामाने हैद्राबाद हे स्वांतत्र राज्य राहिले आहे असे जाहिर केले. भारताची पर्वा न करता २० कोटी रु. कर्ज पाकिस्तानला दिले. सरदार पटेल यांनी स्वामीजींची सुटका व विलिनीकरणाची मागणी निजामाकडे केली. रझाकरांचा प्रमुख कासीम रिझवीला हाताशी धरुन निजामाने घोषणा केली की, भारताने सैनिकी कारवाई केल्यास पाकिस्तानचे लाखो पठाण भारतावर चढाई करतील. हैद्राबाद राज्यातील गंगापूर रेल्वे स्टेशनवर रझाकारांनी हल्ला केला, त्यात अनेक ठार व जखमी झाले. लुटमार, अत्याचार, बलात्कार, खुन, या घटना नेहमीच्या झाल्या. हैद्राबादची बिघडलेली परिस्थिती व सझाकांरचा अत्याचार रोखण्यासाठी भारत सरकारने सैनिकी कारवायांचा निर्णय घेतला, यांची जबाबदारी मेजर जनरल चौधरी यांच्याकडे सोपविली. या कारवाईला ऑपरेशन पोली हे नाव दिले. दोन दिवस संघर्ष होऊन १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबादच्या सैन्याने आत्मसमर्पण केले निजामाने हैद्राबाद भारतात विलिन करण्यास संमती दिली. त्यामुळे निजामाच्या मगरमिठीतून हैद्राबादची कायमची मुक्तता झाली.

## ११.७ संयुक्त महाराष्ट्र चळवळ

ब्रिटिशांनी आपल्या राज्यकारभाराच्या सोयीनुसार भारताची वेगवेगळया प्रांतात विभागणी केलेली होती. यासाठी कोणतेही तत्व स्विकारले नव्हते. त्यामुळे धर्म, भाषा, भूप्रदेश याचा विचार केलेला नाही. त्यामुळे भाषावर प्रांत रचनेची मागणी स्वातंञ्यपूर्व काळापासून रुजू लागली. महाराष्ट्राच्या जडणघडणी मध्ये अनेक स्थित्यंतर घडून आली. त्यामुळे १ में १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. या निर्मितीच्या प्रक्रियेत स्वातंञ्यापूर्व व स्वांतञ्योत्तर कालखंडात अनेक संघटना, सभा, नेते, विचारवंत यांचे योगदान अतिशय महत्वाचे होते.

### <u>स्वातंञ्यपूर्व काळातील प्रयत्न</u> :-

म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय कॉग्रेसने स्वातंञ्य चळवळीचा लढा सुरु केला होता. लो. टिळकानी दिलेल्या चतुःसुत्रातील अतिशय महत्वाचा भाग म्हणजे राष्ट्रीय शिक्षण असून जे शिक्षण मातृभाषेतून दिले पाहिजे असा आग्रह धरला. त्याचप्रमाणे ब्रिटिश सरकारने स्थानिक भाषेतून राज्यकारभार करावा लो. टिळकांनी मागणी केली. तसेच महाराष्ट्र हा स्वतंत्र प्रांत निर्माण व्हावा या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र निर्मितीची प्रक्रिया सुरु झाली. १९०५ पासून भाषावार प्रांतरचनेला लोकांचा पाठींबा मिळू लागला.

#### १) भाषावार प्रांत रचनेची मागणी :-

बिंहार, सिंध, आंध्रप्रांतामध्ये राष्ट्रीय कॉग्रेसने प्रातिंक कमिटया स्थापन केल्या. १९१३ पासून तेलगू लोकांनी आंध्रप्रदेशाची मागणी केली. १९१६ पासून स्वतंञ्य कर्नाटक राज्यांची मागणी सुरु झाली. या पार्श्वभुमीवर महाराष्ट्रीयन लोकांनी भाषेवार प्रांत रचनेचा आग्रह धरला त्यांस लो. टिळकांनी पाटिंबा दिला. १९१७ च्या कलकत्ता अधिवेशनात काँग्रेसने भाषावार प्रांत रचना या तत्वास मान्यता दिली. १९२८ मध्ये मोतिलाल नेहरु कमिशनने भाषावार प्रांत रचनेचा पुरस्कार केला. १९३७ च्या निवडणूकीमध्ये काँग्रेसला बहुमत मिळाले. रामराव देशमुख यांनी स्वतंत्र वऱ्हाड प्रांताच्या ठराव विधीमंडळा समोर मांडला. १९३८ मध्ये मुंबईत वि.दा. सावरकर यांच्या अध्यक्षेतेतेखाली भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात वऱ्हाडसह मराठी भाषकांचा स्वतंत्र प्रांत म्हणून महाराष्ट्र बनावा अशी मागणी करण्यात आली.

#### २) संयुक्त महाराष्ट्राची मागणी:-

म. गांधीजींनी भाषिक प्रांतरचनेला १९२४ मध्ये मान्यता दिली. त्यामुळे सर्व मराठी भाषिक प्रदेश एकत्र करुन महाराष्ट्र हे नवे राज्य निर्माण करावे या मागणीला 'संयुक्त महाराष्ट्राची मागणी' असे म्हटले जाते. मुंबई इलाका, मध्यप्रांत, वऱ्हाड, आणि हैद्राबादमधील मराठवाडयातील मराठी भाषीकांचा या प्रदेशात समावेश करावा अशी मागणी होती. विठ्ठल ताम्हणकर यांनी प्रथम मागणी केली. त्यानंतर आचार्य विनोद भावे,धनजंय गाडगीळ, प्रबोधकर ठाकरे, ग. ञ्यं. माडखोलकर, द.वा. पोतदार इत्यादी व्यक्तींनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची गरज असल्याचे प्रतिपादन केले. पंरतु स्वातंञ्य चळवळ तीव्र असल्याने या मागणीकडे दुर्लक्ष झाले.

**३) संयुक्त महाराष्ट्र सभा :-**

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरयांच्या अध्यक्षेतेखाली भरलेल्या १९३८ च्या मुंबई येथे मराठी साहित्य संमेलनामध्ये वऱ्हाड प्रातांसह महाराष्ट्राची एक भाषा प्रांत तत्वावर प्रांत निर्माण करावा अशी मागणी करण्यात आली. १९३९ मध्ये नगर येथील साहित्य संमेलनात मराठी भाषिक प्रदेशाच्या प्रांतास 'संयुक्त महाराष्ट्र ' हे नाव देण्याचा ठराव करण्यात आला. ठरावापेक्षा ठोस कार्यक्रमासाठी बॅरिस्ट रामराव देशमुख यांनी २८ जानेवारी १९४० रोजी मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना केली. २४ मे १९४० रोजी वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र एकीकरण परिषद भरली. १९४३ मध्ये डॉ. मुकंदराव जयकर यांच्या अध्यक्षतेखाली महाविदर्भ परिषदेचे अधिवेशन भरविण्यात आले. या अधिवेशनामध्ये महाराष्ट्र एकीकरणास मदत करण्याचे ठरविण्यात आले.

**४) संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापनाः-**

श्री गजानन त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली १२मे १९४६ रोजी बेळगाव येथे मराठी साहित्य संमेलन भरविण्यात आले. यावेळी मुंबई, मध्यप्रांत, वऱ्हाड, मराठवाडा, गोवा यांच्या प्रदेशातील मराठी भाषिक प्रदेश संयुक्त महाराष्ट्रात सामील करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. याचवेळी 'संयुक्त महाराष्ट्र परिषद' स्थापन करण्यात आली. प्रा. द. वा. पोतदार, शंकरदेव, केशवराव जेधे, श्री. श. नवरे आणि माडखोलकर हे सदस्य होते.

सरदार पटेल यांचा मुंबई महाराष्ट्रात सामील करण्यास विरोध होता. तर स्थांनिकांचा मुंबईसह महाराष्ट्र हा आग्रह होता. शंकररा देव यांच्या अध्यक्षतेखाली २८जुलै १९४६ रोजी मुंबईत अधिवेशन घेण्यात आले. यावेळी संयुक्त महाराष्ट्र परिषदेची घोषणा करण्यात आली. १७ जून १९४७ रोजी दार कमिशन नेमण्यात आले. पुढे १५ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. पंरतु महाराष्ट्र राज्य निर्माण न झाल्याने पुढे १३ वर्ष संघर्ष करावा लागला.

**स्वातंत्र्योत्तर काळातील प्रयत्न :**

**१) दार कमिशन :-**

भाषावर प्रांतरचनेच्या उपयुक्तेचा अभ्यास करण्यासाठी डाँ. राजेंद्र प्रसाद यांनी १९४७ मध्ये न्यायमूर्ती एस. के. धर यांच्या काध्यक्षेतेखाली आयोगाची नियुक्ती केली. आयोगाने एक प्रश्नावली तयार करुन विविध घटकांना पाठविली. ८ नोव्हेंबर १९४८ रोजी न्या. दार महाराष्ट्रात आले. केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी सल्लागार म्हणून हरिभाऊ पारसकर यांना मदतीसाठी पाठविले. धर कमिशन समोर मराठी भाषिकांच्या संयुक्त महाराष्ट्र मागणी व त्यावर विचार करण्यासाठी निवडक कार्यकर्त्यांची बैठक अकोला येथे ८ ऑगस्ट १९४७ रोजी घेण्यात आली. त्यामध्ये एका योजना तयार करण्यात आली. परंतू ही योजना आयोगा समोर मोडता आली नाही. आयोगासमोर डॉ. जयकर, विठ्ठलराव चंदावरकर, हुसेनभाई जाजली, वैकुंठभाई मेहता इ. मान्यवरांच्या साक्षी झाल्या. १० डिसेंबर १९४४ रोजी दार कमिशनचा अहवाल प्रसिध्द झाला. भाषिक प्रांताची मागणी संकुचित, प्रादेश्कितावादी व प्रतिगामी स्वरुपाची आहे.तिच्यामुळे लोंकवस्तीचे स्थलांतर घडले. रक्तपान व अत्याचार राजकीय देशाचे तुकडे होतील. त्यामुळे भाषिक राज्यांची कल्पना अयोग्य असल्याचे मत मोडले.

### २) जे.व्ही.पी. समिती / त्रिसदस्य समिती :-

धर समितीच्या अहवालावर सर्वच बाजूनी टिका झाल्याने काँग्रेसची कोडीं झाली. २९ डिसेंबर १९४२ रोजी पहले सितारामया यांच्या अध्यक्षतेखाली जयपूर अधिवेश भरले. भाषावर प्रांत रचनेचा पूनविचार करण्यासाठी जे.व्ही. पी. ही त्रिसट्स्ट समितीची स्थापना करण्यात आली. पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वसलभाई पटेल, सीतारामय्या हे सदृस्य होते. या समितीले महाराष्ट्र, कर्नाटकच्या मागणीला पांठिबा दिला नाही. मुंबई महाराष्ट्रात सहभागी करण्यात विरोध केला. कारण मुंबईमध्ये अनेक भाषिक, वर्ण, वंशाचे लोक आहेत. भाषावर प्रांतरचना संकुचित व राष्ट्रीय एकात्मतेला बंधक असण्याचा अहवाल समितीने दिला. त्यामुळे मराठी भाषिक लोंकाची नाराजी झाली. महाराष्ट्र - कर्नाटक भागात संयुक्त महाराष्ट्र चळवळ अधिक वाढत गेली.

### ३) नागपूर करार – २८ नोंव्हेबर १९५३ :-

जे.व्ही.पी. समितीच्या अहवालामुळे मराठी भाषिक प्रांतात नाराजी निर्माण झाली. १५में १९४९ रोजी कल्याण येथे ठाणे जिल्हयाची पहिली परिषद भरली. यावेळी भाऊसाहेब हिरे यांनी संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली. सेनापती बापट यांनी सत्याग्रहाच्या माध्यमातून चळवळीत नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न केला. १६ऑक्टोबंर १९४९ रोजी बेळगाव येथे साहित्य मंडळाचे अधिवेशन भाऊसाहेब हिरे यांच्या नेतृत्वाखाली भरले. कामगार नेते न.म. जोशी यांनी महाराष्ट्र लक्ष्यात उतरण्याचे आवाहन केले. आचार्य अत्रे व आर. डी. भंडारे यांनी २४ नोव्हेंबर १९४९ रोजी मुंबई महापालिकेत मुंबई राजधानी असण्याचा ठराव मांडला. याच वेळी ब्रिजलाल बिहारी यांना स्वतंत्र वऱ्हाडची मागणी केली.

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी विदर्भ, संयुक्त महाराष्ट्र मराठवाडया तीन भागातील प्रमुख नेते नागपूर येथे जमा झाले. २५ नोव्हेंबर १९५३ रोजी नो करार केला त्यास नागपूर करार म्हणतात. यामध्ये मराठी भाषिकांचे एक राज्य तयार करावे त्यास महाराष्ट्र नाव दयावे. त्याची राजधानी मुंबई असावी. राज्यकारभाराच्या सोईसाठी नागपूर मराठवाड व पश्चिम महाराष्ट्र अशी तीन विभाग करावेत.

### ४) राज्य पूनर्रचना आयोग(फजल अली कमिशन ) :-

पंडित जवाहरलाल नेहरु यांनी भापिक राज्याचा प्रश्न सोडविण्यासाठी डिसेंबर १९५३ रोजी न्यायाधीश फजल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पूर्नरचना आयोगाची स्थापना केली. संयुक्त महाराष्ट्राच्या वतीने एस. एम. जोशी धनजंय गाडगीळ यांनी आयोगासमोर आपली बाजू मोडली. १० ऑक्टोबंर १९५५ रोजी आयोगाचा अहवाल प्रसिध्द झाला. त्यामध्ये हैद्राबादसाठी एक भाषिक, तर मुंबईसाठी द्वैभाषिक तत्व होते. मुंबई प्रांतात गुजराती भाषिक सौराष्ट्र समाविष्ट करुन मराठी भाषिक विदर्भ, बेळगाव कारवार कर्नाटकला जोडण्यात आली.

### ५) अंतीम संघर्षाला प्रारंभ :-

फाजलअली आयोगाच्या निर्णयामुळे महाराष्ट्रात तीव्र असंतोष पसरला. अनेक कामगार संघटनांनी आपला निषेध नोंदविला. मुंबईचे मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाईनी संयुक्त महाराष्ट्राच्या भूमिकेला विरोध करुन त्रिराज्याचा ठराव मोडला. त्याच्या विरोधात सेनापती बापटने मोर्चा काढला. यावेळी ५०० लोकांना अटक केली. २० नोव्हेंबर रोजी चौपाटीवर

झालेल्या सभेत देसाई म्हणालेकी, ‘चंद्र –सूर्य असे पर्यंत महाराष्ट्राला मुंबई मिळणार नाही. त्यामुळे लोकांनी चप्पलांच्या व दगडांचा वर्षाव करुन सभा उधळून लावली याच वेळी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी त्रिराज्य ठराव मांडला. महाराष्ट्रापासून मुंबई तोडल्यामुळे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे हे आंदोलनाचे घोषवादय ठरले.

सयुंक्त महाराष्ट्र समितीने २१ नोव्हेंबरला संप पुकारला. ५ ते ६ लाख लोंकानी मोर्चा काढला. मोरारजीभाई देसाईच्या आदेशानुसार पोलिसांनी गोळीबार केला. यामध्ये १५ आंदोलक हुतात्मे झाले व ३०० जखमी झाले. या घटनेचा निषेध म्हणून पा. वा. गाडगीळांनी विधान परिषदेचा राजीनामा दिला. त्यामुळे अखेर त्रिराज्य ठरावा बारगळला. १६ जानेवारी १९५६ रोजी पंडित नेहरुनी घोषणा केली की मुंबई महाराष्ट्रात समाविष्ठ न करता केंद्र शासनाच्या ताब्यात राहिल. त्यामुळे अर्थमंत्री चिंतामणराव देंशमुखांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. मुंबईसह महाराष्ट्रात आंदोलन सुरु झाले यावेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारामुळे ९० जंणानी हौतात्म पत्करले. या आंदोलनाचे नेतृत्व एस. एम. जोशी, के. सी. ठाकरे, नाना पाटील के. एल. देसाई इ. अनेकांनी केले होते.

केंद्रिय मंत्रीमंडळात मोरारजी देसाई यांना स्थान मिळाल्याने मुंबईचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण झाले. १९५७ च्या झालेल्या द्वैभाषिक राज्य निवडणूकीत कॉग्रेसला मर्यादीत बहुमत मिळाले. मुंबई महापालिक निवडणूकीत कॉग्रेस पराभव होऊन संयुक्त महाराष्ट्र समितीला बहुमत मिळाले.

## ११.८ महाराष्ट्रराज्याची स्थापना

केंद्रसरकारने १ नोव्हेंबर १९५६ रोजी सौराष्ट्र, गुजरात, मराठवाडया, विदर्भ, मुंबई इलाख्याचे विशाल द्विभाषिक राज्य स्थापन केले. परंतु याला महाराष्ट्र व गुजरातमधून प्रचंड विरोध झाला. १९५९ मध्ये इंदिरा गांधी भारतीय कॅांग्रेसच्या अध्यक्षा बनल्या त्यांनी महाराष्ट्राचा दौरा करुन सत्य परिस्थिती समजावून घेतली. ९ लोकांची कमिटी स्थापन करुन द्विवभाषिक राज्य संपूष्टात आणण्याची शिफारत केली १९६० मध्ये बिल मांडून द्विभाषिक राज्य लोकसभा व राज्यसभेमध्ये मंजूर करण्यात आले.

गुजरात स्वतंत्र राज्य स्थापन करुन महाराष्ट्राने गुजरातला १० कोटी द्यावेत. डांग भाग गुजरातला द्यावा असे ठरले. एकूण ५० कोटींची रक्कम मुंबई महाराष्ट्रात राहिली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र व गुजरात ही दोन स्वतंत्र राज्य अस्तित्वात आली. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण झाले. या नव्या राज्याची रचनेमध्ये चार प्रमुख विभाग व २६ जिल्हे अशी महाराष्ट्राची व्याप्ती होती.

१. मुंबई विभाग :- बृहन्मुंबई ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, धुळे, जळगाव
२. पुणे विभाग :- पुणे, नगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर
३. नागपूर विभाग :- नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळा, अमरावती, बुलडाला,अकोला.
४. औरंगाबाद विभाग :- औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, उस्मानाबाद

**आपली प्रगती तपासा :**

१) महाराष्ट्र राज्यांची स्थापना कधी झाली ?

## ११.९ सारांश

लोकमान्य टिळकांनी मातृभाषेतून शिक्षणाचा पुरस्कार केल्याने मराठी भाषिक व ज्याच्या कल्पनेचा उदय झाला. याच काळात काँग्रेने ही विविध अधिवेशनामधून भाषिक तत्वाचा उपयोग करुन अनेक काँग्रेस समित्या स्थापन केल्या त्याचप्रमाणे भाषिक वाज्याच्या रचनेला मान्यता दिली. यासाठी आयोग स्थापन केले. मराठी भाषिक राज्य निर्मिण व्हावे यासाठी साहित्य परिषदेने अनेक अधिवेशनात ठराव पास केले. त्यातूनच संयुक्त महाराष्ट्र सभा व परिषदा स्थापन झाल्या. या परिषदेच्या माध्यमातून लढा तीव्र बनविण्यात आली. अखेर केंद्रशासनाने विविध आयोगाच्या माध्यमातून भाषावर प्रांत रचना करण्याचा प्रयत्न ही केला. शेवटी द्विभाषिक राज्यामधून महाराष्ट्र व गुजराथ ही दोन स्वतंत्र राज्य १मे १९६० रोजी निर्मिण करण्यात आली. तरीपण महाराष्ट्र - कर्नाटक सीमाप्रदेशातून अजूनही प्रश्न सुटलेला नाही.

## ११.१० दिर्घोत्तरी प्रश्न

१. हैद्राबाद मुक्ती संग्रामात आर्य समाजाचे योगदान स्पष्ट करा.
२. हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे कार्य सांगा.
३. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची वाटचाल व चळवळीचे फलित काय ? सविस्तर लिहा.

❖❖❖❖

# १२

# शिक्षण आणि संस्कृती - १

## अ) शिक्षण व वृत्तपत्रातील प्रगती

**घटक रचना :**

१२.० उद्दिष्ट्ये
१२.१ प्रस्तावना
१२.२ शैक्षणिक क्षेत्रातील मिशनरींचे कार्य
१२.३ शैक्षणिक क्षेत्राच्या प्रगतीतील शासनाचे कार्य
१२.४ शैक्षणिक क्षेत्राच्या प्रगतीतील विविध व्यक्तिंचे योगदान
१४.५ वृत्तपत्रातील प्रगती
१४.६ सारांश
१४.७ विद्यापीठीय स्वरुपाचे प्रश्न
१४.८ संदर्भग्रंथ

### १२.० उद्दिष्ट्ये :

- महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्राच्या प्रगतीचा अभ्यास करणे.
- शैक्षणिक क्षेत्रातील मिशनरींचे कार्य समजून घेणे.
- शैक्षणिक क्षेत्राच्या प्रगतीतील शासनाच्या कार्याचा आढावा घेणे.
- शैक्षणिक क्षेत्राच्या प्रगतीतील विविध व्यक्तिंच्या योगदानाचा आढावा घेणे.
- आद्यसमाजसुधारक महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य समजून घेणे.
- भारतामध्ये वृत्तपत्रांची सुरुवात कशी झाली ते अभ्यासणे.
- महाराष्ट्रात वृत्तपत्रे कशाप्रकारे सुरु झाली ते पाहणे.
- महाराष्ट्रात प्रमुख वृत्तपत्रांचा विकास कसा झाला ते जाणून घेणे.

### १२.१ प्रस्तावना :

भारतामध्ये इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यावर इंग्रजांनी प्रशासकीय क्षेत्रात मदत व्हावी म्हणून संपूर्ण भारतामध्ये शाळा सुरु केल्या. पारंपारिक शिक्षणव्यवस्था बदलून सर्वसमावेशक

शिक्षणपद्धतीचा अवलंब केला. त्यांनी समानतेच्या तत्त्वावर भर देऊन भारतातील शिक्षण नाकारलेल्या स्त्रिया व अस्पृश्यांनासुद्धा शिक्षण दिले. या कार्यासाठी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराबरोबर महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले. संपूर्ण महाराष्ट्रावर इंग्रजांनी आपली सत्ता प्रस्थापित केल्यानंतर शिक्षणक्षेत्राचासुद्धा विकास केला. त्यासाठी त्यांनी विविध प्रकारे प्रयत्न केले. पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या भारतीय सुशिक्षितांची फळी निर्माण झाल्यावर त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव असे योगदान दिले. आधुनिक महाराष्ट्रात अनेक व्यक्तिंनी खूप मेहनत घेऊन शिक्षणक्षेत्राचा व्यापक अशा स्वरुपात प्रसार केला. या व्यक्तिंमध्ये महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, भाऊसाहेब हिरे इत्यादींचा प्रामुख्याने समावेश होतो.

१८ व्या शतकाच्या शेवटी भारतामध्ये मुद्रणकलेचा प्रसार झाल्यानंतर वृत्तपत्रांना सुरुवात झाली. वृत्तपत्रे ही माहिती प्रसाराचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून १९ व्या शतकात त्याच्या मोठ्या प्रमाणात वापर सुरु झाला. भारतातील इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रात सुद्धा अनेक वृत्तपत्रे सुरु झाली. सुरुवातीच्या समाज प्रबोधनाचे व नंतरच्या काळात स्वातंत्र्य चळवळीचे एक प्रभावी माध्यम म्हणून महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. १८४८ ते १९६० या काळात महाराष्ट्रामध्ये अनेक वृत्तपत्रे एतद्देशीय समाजसुधारकांनी सुरु केली व राजकिय चळवळ सामाजिक व धार्मिक सुधारणा जनसामान्यापर्यंत पोहाचविण्यासाठी या माध्यमाचा वापर प्रभावीपणे केला.

## १२.२ शैक्षणिक क्षेत्रातील मिशनरींचे कार्य :

इ. स. १८१८ मध्ये तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धानंतर महाराष्ट्रामध्ये इंग्रजी राजवटीची सुरुवात झाली. भारताच्या इतर भागात ब्रिटिशांनी आपली सत्ता प्रस्थापित केली होती. सुरुवातीला त्यांनी फक्त साम्राज्यविस्ताराकडे लक्ष केंद्रित केले परंतू १८१३ च्या सनदी कायद्यानूसार त्यांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांना धर्मप्रसाराचे स्वातंत्र्य दिले. कारण धर्माच्या प्रसारासाठी भारतीय समाजाला सुशिक्षित करणे ख्रिश्चन मिशनऱ्यांना आवश्यक वाटत होते. आपल्या धार्मिक विचारसरणीचा प्रसार करण्यासाठी त्यांनी ख्रिश्चन धर्मावर आधारीत असलेली विचारसरणीचा अभ्यासक्रमात सहभाग करुन घेतला व त्यासाठी शैक्षणिक कार्य हाती घेतले.

भारतीय लोकांत शिक्षणाचा प्रसार व्हावा व ख्रिश्चन धर्माचा प्रसार व्हावा या हेतूने मिशनऱ्यांनी भारतामध्ये अनेक ठिकाणी प्राथमिक माध्यमिक शाळा स्थापन केल्या. अशा शाळांना 'चॅरिटी स्कूल्स' असे म्हटले जात होते. इ.स. १८१९ मध्ये अमेरिकन मिशनने कलकत्ता येथे पहिली शाळा काढली. शैक्षणिक क्षेत्रात काम करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीने अनेक मिशन स्थापन केली. त्यामध्ये अमेरिकन मिशन स्कॉटिश मिशन यांचा समावेश होतो.

### १२.२.१ मिशनऱ्यांचे महाराष्ट्रातील शैक्षणिक कार्य :

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला भारताच्या इतर सर्व भागात मिशनऱ्यांनी काम सुरु केले होते. पेशवाईचा शेवट झाल्यानंतर मिशनऱ्यांनी महाराष्ट्रात प्रवेश केला. महाराष्ट्रातील

शैक्षणिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समाजामध्ये त्यांनी धर्मप्रसार करण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रात ख्रिस्ती मिशनऱ्यांना चांगला प्रतिसाद मिळाला कारण महाराष्ट्रातील मोठा समाज हा अशिक्षित व सर्व दृष्टीने उपेक्षित होता. त्यामुळे मिशनऱ्यांनी महाराष्ट्राच्या खेडोपाडी शाळा सुरु केल्या व मोफत शिक्षण देण्यास सुरुवात केली. डॉ. जॉन विल्सन, गॉर्डन हॉल यांनी एलफिन्सटनने दिलेल्या सहकार्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. त्यांनी अनेक इंग्रजी पुस्तकाचे मराठीत भाषांतर केले ज्यामध्ये बायबलचाही समावेश होतो.

जेव्हा एलफिन्सटन मुंबई इलाख्याचा रेसीडेंट होता त्या काळात म्हणजेच १८१३ ते १८१८ दरम्यान गॉर्डन हॉल यांनी खेतवाडी व गिरगाव येथे मराठी शाळा सुरु केल्यानंतर इ.स. १९२४ पर्यंत महाराष्ट्रात मुंबई, पुणे इत्यादी ठिकाणी मिशनऱ्यांनी अनेक शाळा सुरु केल्या. मुंबईमध्ये मराठी शाळा सुरु करण्यासाठी मराठी भाषेची अडचण त्यांनी स्वतः शिकून दूर केली व महाराष्ट्रातील ज्या समाजाला पिढ्यानपिढ्या शिक्षण बंदी होती त्या समाजास मोफत शिक्षण उपलब्ध करुन दिले. मिशनऱ्यांनी पुणे येथे ३ शाळा सुरु केल्या. मुंबईत शाळा सुरु करण्याबाबत डॉ. जॉन विल्सन यांनी प्रयत्न केले व त्यांनी मुले, मुली आणि मुस्लिम समाजासाठी स्वतंत्र शाळा सुरु केल्या. त्यांनी मुंबई येथे १८३५ मध्ये सेंट्रल कॉलेज सुरु केले. पुढे या कॉलेजचे १८६१ मध्ये 'विल्सन कॉलेज' असे नामकरण करण्यात आले. शिक्षणाचा प्रसार शहराप्रमाणे ग्रामीण भागातही झाला व त्यामुळे महाराष्ट्रात एक उच्चशिक्षिताचा वर्ग उदयास आला.

पाश्चात्य शिक्षणाच्या धर्तीवर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मुंबई, पुणे व महाराष्ट्राच्या इतर ठिकाणी शाळा, व महाविद्यालये सुरु केली त्यामुळे शिक्षणाचा प्रसार होण्यास मदत झाली. एलफिन्सटन, विल्सन, हॉल, एरियाल यांच्या प्रयत्नांमुळे १८४६ मध्ये मुंबई येथे ग्रँट मेडिकल कॉलेज, १८४७ मध्ये मुंबई येथे लॉ कॉलेज, १८५४ मध्ये पुणा इंजिनीयरिंग कॉलेज सुरु झाले. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात या कॉलेजांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. त्यांनी या महाविद्यालयाबरोबरच अनेक ठिकाणी वसतीगृहे बांधली. त्यामुळे मुली व महिलांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली.

### १२.२.२ मिशनऱ्यांच्या शैक्षणिक कार्याचे महत्त्व :

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी शिक्षणप्रसाराचे खडतर कार्य खूप चांगल्याप्रकारे केले. त्यांनी धर्मप्रसाराबरोबर महाराष्ट्रात शिक्षण प्रसार केला त्यांच्या या कार्यामुळे अनेकांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला. प्रेरणादायक त्यांचे शैक्षणिक कार्य अनेक दृष्टीकोनातून महत्त्वाचे होते. त्यांनी समानतेच्या आधारावर शिक्षणाची संधी समाजातील सर्व स्तरांच्या लोकांना उपलब्ध करुन दिले. हिंदूधर्मव्यवस्थेने अस्पृश्य समाज व मुलींसाठी शिक्षणाचा अधिकार नाकारला होता तरीसुद्धा त्यांनी अस्पृश्यांसाठी व मुलींसाठी महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी शाळा सुरु केल्या त्यामुळे त्यांच्या प्रगतीची दारे उघडली गेली. मुली व अस्पृश्य जातीच्या मुलांनी शिक्षण घेऊन आपला उद्धार केला. समाजसुधारणेच्या दृष्टीने त्यांची ही कामगिरी खूप मोलाची समजली जाते.

महाराष्ट्रात शिक्षणाचा पाया विस्तृत करण्याचे श्रेय मिशनऱ्यांनाच द्यावे लागेल. त्यांनी शिक्षणाचा पाया विस्तृत केला त्यामुळे १९ व्या शतकात सुरु झालेली समाजसुधारणेची चळवळ अधिक गतिमान केली. पाश्चात्य विचारसरणीवर आधारीत असलेला व स्वातंत्र्य, समता, न्याय

व बंधुत्त्व या मूल्यांना महत्त्व देणारा एक सुशिक्षिताचा वर्ग उदयास आला. या वर्गाने पुढे सामाजिक सुधारणा व राजकीय चळवळीमध्ये सहभाग घेऊन आधुनिक महाराष्ट्र निर्माण केला.

**आपली प्रगती तपासा :**

१) मिशनऱ्यांच्या शैक्षणिक कार्याचे महत्त्व सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १२.३ शैक्षणिक क्षेत्राच्या प्रगतीतील शासनाचे कार्य :

इ. स. १८१८ पर्यंत इंग्रजांनी महाराष्ट्राव्यतिरिक्त भारताच्या अनेक भागात आपले वर्चस्व निर्माण केले होते. १८१३ च्या चार्टर ॲक्टनुसार इंग्रजांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांना धर्मप्रसार व शिक्षणप्रसार करण्याचे स्वातंत्र्य दिले होते. तसेच भारतीय लोकांना सुशिक्षित बनवून कारकून म्हणून प्रशासनात नेमणूक करणे व त्यांना कायमस्वरुपी इंग्रज सत्तेचे समर्थक बनवण्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी शाळा व महाविद्यालये काढली. इ. स. १८१३ मध्ये कंपनीने भारतीय लोकांना शिक्षण मिळावे यासाठी दरवर्षी एक लाख खर्च करण्याचे ठरविले. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या मदतीने महाराष्ट्रामध्ये आधुनिक शिक्षणाचा प्रारंभ केला.

महाराष्ट्रामध्ये इंग्रजी सत्तेची सुरुवात झाल्यानंतर इंग्रज सरकारने शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी अनेक ठिकाणी शाळा व महाविद्यालये सुरु केली. मुंबई इलाख्याचा पहिला गव्हर्नर म्हणून नेमण्यात आलेल्या माऊंटस्टुअर्ट एलफिन्सटनने शिक्षणाला उत्तेजन देऊन महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली व मुंबई येथे फोर्टमध्ये सेंट्रल स्कूल सुरु केली. गिरगाव, माझगाव, ठाणे, पनवेल, पुणे येथे त्याने शाळा व महाविद्यालये सुरु केली. एलफिन्सटनने शिक्षण क्षेत्रात स्वतः रस घेऊन शासनातर्फे या क्षेत्राचा विकास होण्यासाठी विविध उपक्रम राबविले.

इ. स. १८३५ मध्ये लॉर्ड मेकॉले यांनी भारतीय शिक्षणाविषयी सरकारला खलिता सादर केला. त्यानुसार भारतातील विविध राज्यात इंग्रजी शिक्षणास प्रारंभ झाला व महाराष्ट्रात व मुंबईत अनेक ठिकाणी इंग्रजी शाळा सुरु झाल्या. १८४० मध्ये शासनाने मुंबई येथे शिक्षण मंडळाची स्थापना केली. व शाळा तपासण्यासाठी मुंबई इलाख्याचे तीन भाग करुन प्रत्येक ठिकाणी अधिक्षक नेमला. याच काळात शासनाने दिलेल्या उत्तेजनामुळे अनेक समाजसुधारकांनी शाळा सुरु केल्या.

### १२.३.१ वुडचा खलिता (१८५४) :

शिक्षणाच्या क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी व शिक्षणव्यवस्थेची पुनर्रचना करण्यासाठी चार्ल्स वुड यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती १८५४ मध्ये लॉर्ड डलहौसीने स्थापन केली.

त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी भारताच्या शिक्षणव्यवस्थेचा अभ्यास करुन एक खलिता तयार केला ज्यामध्ये शिक्षणविषयक सुधारणेच्या अनेक शिफारशी होत्या. लॉर्ड डलहौसीने वुड यांच्या खलित्यावर आधारीत भारतीय शिक्षण पद्धतीची पद्धतशीर आखणी केली. त्यांनी अनेक शिक्षणविषयक सुधारणा केल्या. त्यांनी सर्वप्रथम स्वतंत्र शिक्षण विभाग करुन त्याअंतर्गत अनेक प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु केल्या. १८५७ मध्ये मुंबई, कलकत्ता व मद्रास येथे विद्यापीठे स्थापन केली. त्याने संस्थानांनाही शाळा काढण्यासाठी सरकारी अनुदान दिले. पुण्यात स्थापन करण्यात आलेल्या संस्कृत कॉलेजचा प्रमुख म्हणून कँडी यास पाठवण्यात आले. कँडी याने या कॉलेजचे नामकरण 'पुना कॉलेज' असे केले. डलहौसीने प्रत्येक प्रांतात शिक्षण संचालकांची नेमणूक केली. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी ट्रेनिंग कॉलेज पुण्याला सुरु केले. अशाप्रकारे वुडच्या खलित्याच्या आधारावर अनेक बदल भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये करण्यात आले त्यामुळे वुडच्या खलित्याला शिक्षणाचा 'मॅग्नाकार्टा' असे म्हटले जाते.

### १२.३.२ हंटर आयोग (१८८२) :

इ. स. १८८२ मध्ये व्हाईसरॉय लॉर्ड रिपन यांनी भारतीय शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेण्याकरिता आणि बदललेल्या परिस्थितीनुरुप काही बदल सुचविण्याकरिता सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. या आयोगामध्ये त्यांच्याबरोबर इतर २० सदस्य होते. या आयोगाने संपूर्ण भारतभर दौरे केले. अनेक शिक्षणसंस्थाना व शैक्षणिक क्षेत्रात कार्य केलेल्या तज्ञ व्यक्तिंना भेटी दिल्या. या आयोगापुढे अनेक महत्त्वपूर्ण व्यक्तिंनी व समाजसुधारकांनी आपली निवेदने सादर केली. महाराष्ट्राचे थोर समाजसुधारक महात्मा फुलेंनीसुद्धा निवेदन सादर करुन मुली व बहुजन समाजाच्या उद्धारासाठी शिक्षणाचे क्षेत्र खुले केले जावे, त्यांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करण्यात यावी व प्राथमिक शाळांकडे अधिक लक्ष द्यावे या शिफारशी केल्या.

हंटर आयोगाने १८८४ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला त्यामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या. त्यामध्ये प्रामुख्याने खाजगी शैक्षणिक संस्थांना उत्तेजन व त्यांना आर्थिक मदत, व त्यावर सरकारी नियंत्रण असावे, प्राथमिक शिक्षणाकडे सरकारने विशेष लक्ष द्यावे व अशा शाळांची तपासणी करण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांची नेमणूक करावी व शाळांच्या कार्यावर देखरेख करण्यासाठी सरकारी निरीक्षक नेमावेत, लोकशिक्षण व मुस्लिमांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष द्यावे व त्यांच्यासाठी खास शिष्यवृत्ती, फी माफी, त्यांच्या शाळांसाठी अनुदाने द्यावीत, उच्च शिक्षण सरकारने खाजगी संस्थेकडे द्यावे, विद्यापीठाने ऐच्छिक विषयाचे अभ्यासक्रम सुरु करावेत इत्यादी महत्त्वपूर्ण शिफारशींचा समावेश होतो.

आयोगाच्या शिफारशी लॉर्ड रिपनने मान्य करुन त्यांची अंमलबजावणी १८८४ पासून सुरु केली. या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळे प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून आले म्हणून या शिफारशी शैक्षणिक क्षेत्रात क्रांतिकारक ठरल्या.

### १२.३.३ लॉर्ड कर्झनच्या शिक्षणविषयक सुधारणा (१८९९-१९०५) :

लॉर्ड कर्झनने शिक्षणाच्या क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी शिमला येथे १९०१ मध्ये शिक्षणाशी संबंधित असलेल्या सर्व अधिकाऱ्यांची परिषद बोलाविली आणि त्यामध्ये भारतीय शिक्षणपद्धतीतील दोषांची चिकित्सा केली. भारतीय विद्यापीठातील शैक्षणिक परिस्थितीचा

आढावा घेण्यासाठी १९०२ मध्ये विद्यापीठ आयोगाची नेमणूक केली. १९०४ मध्ये आयोगाने आपला अहवाल सादर केला व त्यावर आधारीत भारतीय विद्यापीठ कायदा पास केला. या कायद्याने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल केले. या कायद्यामध्ये पुढील तरतुदी होत्या.

१) विद्यापीठाच्या व्यवस्थापकीय मंडळाची पुनर्रचना केली.

२) अधिसभेची (सिनेट) सदस्यसंख्या कमी केली व विद्यापीठांच्या सिंडीकेटला वैधानिक मान्यता दिली.

३) विद्यापीठामध्ये अध्यापन व संशोधन सुरु करण्यात आले व प्राध्यापकांच्या नियुक्तींचे अधिकार विद्यापीठांना दिले.

४) कॉलेजमधील संघटनेविषयक नियम अधिक कडक केले.

५) विद्यापीठांची गुणवत्ता वाढविण्याची जबाबदारी सिनेटवर टाकली.

६) पदवी परिक्षेचे अध्यापन महाविद्यालयांना दिले व त्यावर अधिक नियंत्रणे टाकली.

७) विद्यापीठाचे कुलगुरु सरकारकडून नियुक्त करण्याचे ठरविले.

८) विद्यापीठांचे अधिकार विस्तृत केले व त्यांचे कॉलेजविषयक धोरण कॉलेजची संलग्नता अथवा असंलग्नता यास सरकारी संमती आवश्यक केली.

९) निरनिराळ्या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोणते असावे हे ठरविण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल व त्यांच्या मंडळांना दिला.

अशाप्रकारे १९०४ च्या भारतीय विद्यापीठ कायद्यामुळे शिक्षणाच्या क्षेत्रात चांगले बदल झाले. या कायद्याची अंमलबजावणी महाराष्ट्राच्या विद्यापीठामध्ये केल्यामुळे महाराष्ट्राची शैक्षणिक प्रगती घडून आली.

### १२.३.४ स्वातंत्र्यानंतरच्या काळातील शासनाचे कार्य :

भारताच्या स्वातंत्र्यानंतर शैक्षणिक विकास करण्यासाठी भारत सरकारने अनेक उपाययोजना केल्या. सरकारने प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणात आमुलाग्र बदल घडवून आणले. 'शिक्षण' हा विषय राज्यसरकारकडे देण्यात आला व प्रत्येक राज्याचे स्वतंत्र शिक्षणखाते निर्माण करुन त्याची पूर्ण वेळ जबाबदारी शिक्षणमंत्र्याकडे देण्यात आली. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल करण्यात आले त्यामुळे मुंबई राज्याची प्रगती झपाट्याने होण्यास सुरुवात झाली. १९६० पर्यंत सर्व मुंबई राज्यात ६ ते ११ वयाच्या मुलांमुलींकरीता प्राथमिक शिक्षण मोफत सार्व त्रिक व सक्तीचे करण्यात आले. मुंबई, पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, औरंगाबाद इत्यादी ठिकाणी प्रशिक्षित शिक्षक तयार करण्यासाठी 'सेकंडरी ट्रेनींग कॉलेज'ची स्थापना मुंबई राज्य सरकारने केली. १९४७ ते १९६० या कालखंडात अनेक अकृषी विद्यापीठे निर्माण करण्यात आले. १९६० पर्यंत मुंबई विद्यापीठासह (१८५७) नागपूर विद्यापीठ (१९२५), पुणे विद्यापीठ (१९४९) एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ (१९५१), मराठवाडा विद्यापीठ (१९५८) अशा पाच प्रमुख विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. सध्या महाराष्ट्रात १५ अकृषी विद्यापीठे व ४ कृषी विद्यापीठे आहेत. महाराष्ट्राव्यतिरिक्त भारतातील इतर विद्यापीठांना अनुदान देण्यासाठी

विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना (UGC) करण्यात आली. अशाप्रकारे सुरुवातीला इंग्रज सरकारने व स्वातंत्र्यानंतर मुंबई राज्य सरकारने शिक्षणाची प्रगतीसाठी अनेक उपाययोजना केल्या व शिक्षणाच्या क्षेत्रात प्रगती घडवून आणली.

**आपली प्रगती तपासा :**

१) शिक्षणाच्या प्रगतीतील शासनाचे योगदान सांगा.

---

---

---

## १२.४ शैक्षणिक क्षेत्राच्या प्रगतीतील विविध व्यक्तिंचे योगदान :

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी व इंग्रज सरकारने १९ व्या शतकाच्या सुरुवातीला अनेक शाळा व महाविद्यालये सुरु केली. तसेच त्यांनी उच्च शिक्षणाचे क्षेत्र सर्वांसाठी खुले केले. १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. शिक्षणाच्या क्षेत्रात आमुलाग्र बदल झाल्यामुळे महाराष्ट्रात १९ व्या व २० व्या शतकात आधुनिक व पाश्चात्य शिक्षण घेतलेला एक उच्च शिक्षित वर्गाचा उदय झाला. या वर्गातूनच पुढे समाजसुधारकांची व राजकीय नेत्यांची फळी निर्माण झाली. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीसाठी व समाजसुधारणेसाठी एक पोषक वातावरण निर्माण व्हावे म्हणून शिक्षणाच्या प्रसाराकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. या काळातील अनेक व्यक्तिंनी महाराष्ट्रातील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. ज्यामध्ये प्रामुख्याने जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेठ, बाळ शास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख, डॉ. भाऊ दाजी लाड, सदाशिवपंत छत्रे, दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचा समावेश होतो. १८४८ पूर्वी महाराष्ट्रातील या थोर समाजसुधारकांनी शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. माऊंटस्टुअर्ट एलफिन्स्टनच्या शैक्षणिक कार्यात यांनी मोठ्या प्रमाणात मदत केली. नाना शंकरशेठ यांनी 'बॉम्बे नेटिव्ह एज्यूकेशन सोसायटी' स्थापन मुंबईत व मुंबई बाहेर अनेक शाळा सुरु केल्या. नाना शंकरशेठ यांनी मुंबईत एलफिन्सटन कॉलेज (१८३४), ग्रँट मेडिकल कॉलेज (१८४५), जे. जे. स्कूल ऑफ आर्ट व मुलींसाठी शाळा (१८४८) काढली व १८४५ मध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी स्थापन्यात आलेल्या 'स्टुडंट लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीस' विशेष सहकार्य केले. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी महाराष्ट्रातील लोकांचे अज्ञान दूर व्हावे, स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी १८४८ मध्ये 'ज्ञानप्रसारक' सभेची स्थापना केली.

१८४८ ते १९६० या काळात महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारकांनी शिक्षणप्रसाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यातील काही समाजसुधारकांच्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे :

### १२.४.१ महात्मा जोतीराव फुले :

महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्राचा विकास करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे कृतीशील समाजक्रांतीकारक म्हणजे महात्मा जोतीराव फुले होय. सामाजिक, आर्थिक,

राजकीय व धार्मिक गुलामगिरीतून बहुजन समाजाला मुक्त करण्यासाठी शिक्षणप्रसाराचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणप्रसार हे एक महत्त्वाचे साधन मानून त्यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शाळा सुरु केल्या. त्यांच्या या कामामध्ये त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी त्यांना शेवटपर्यंत मदत केली.

महात्मा फुलेंनी भारतीय समाज व्यवस्थेचा अभ्यास करुन येथील समाज व्यवस्थेतील दुर्लक्षित घटक ज्यांना पिढ्यानपिढ्या शिक्षण उपलब्ध झाले नाही अशा घटकांना त्यांनी शिक्षण देण्याचे ठरविले. त्यामुळे त्यांनी मुली व अस्पृश्य यांना धर्मव्यवस्थेने व समाजव्यवस्थेने या दोन गटांना नेहमीच उपेक्षित ठेवले त्यामुळे महात्मा फुलेंनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात स्त्रीशिक्षणाने केली.

महात्मा जोतीराव फुलेंनी पुण्यात स्त्री शिक्षणास सनातन्यांचा विरोध असतानाही ऑगस्ट १८४८ मध्ये बुधवारपेठेत भिडेवाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणाची बंदी होती. त्यांना त्यांची प्रगती साधता येत नव्हती. अशा वेळेस त्यांच्यासाठी फुलेंनी शाळा सुरु करणे ही खूप उल्लेखनीय बाब मानली जाते परंतु त्यांच्या या कार्यास तत्कालीन समाजव्यवस्थेने व उच्चवर्णियांनी प्रखर विरोध केला. त्यांच्यावर अनेक बंधने लादण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी आपले कार्य नेटाने चालू ठेवले. काही कारणांनी भिडेवाड्यातील मुलींची पहिली शाळा बंद पाडल्यावर ३ जुलै १८५१ रोजी फुलेंनी बुधवारपेठेतच चिपळूणकरांच्या वाड्यात ही शाळा पुन्हा सुरु केली. यानंतर त्यांनी मुलींसाठी अनेक शाळा सुरु केल्या. त्यांनी रास्तापेठेत १८५२ मध्ये मुलींची दुसरी व वेताळपेठेत तिसरी शाळा काढली. तसेच प्रौढ स्त्री-पुरुषांच्या शिक्षणासाठी फुलेंनी १८५५ मध्ये रात्रशाळा सुरु केली.

स्त्रीशिक्षणाबरोबर महात्मा फुलेंनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. अस्पृश्यांना आपल्या हक्काची जाणीव व्हावी व त्यांनी आपला आत्मोद्धार शिक्षणाद्वारे करावा या हेतूने महात्मा फुलेंनी शिक्षणाचे सर्वप्रथम दरवाजे उघडून देण्याचे महान कार्य केले. १८५१ मध्ये पुण्यात फुलेंनी नानापेठेत अस्पृश्यांसाठी पहिली शाळा सुरु केली. या शाळेस तत्कालीन सनातन्यांनी प्रचंड विरोध केला व ही शाळा बंद पाडली. परंतु महात्मा फुलेंनी आपले काम बंद केले नाही. त्यांनी १८५२ मध्ये वेताळपेठेत गोवंडे यांच्या वाड्यात अस्पृश्यांसाठी पुन्हा शाळा सुरु केली. त्यांनी त्यांच्यासाठी पहिल्यांदा वाचनालय सुरु केले. १८५३ साली आपल्या होतकरू मित्रांच्या साहाय्याने महार, मांग इ. लोकांस विद्या शिकविण्याकरीता मंडळी या नावाची संस्था काढली व अस्पृश्यांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. अत्यंत कठीण परिस्थितीत या सर्व शाळा चालू ठेवल्या.

शिक्षणाच्या क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी नेमण्यात आलेल्या हंटर आयोगासमोर (१८८२) महात्मा फुलेंनी साक्ष देऊन प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक बदल सुचविले. शिक्षणाचा प्रसार संपूर्ण बहुजन समाजापर्यंत करण्याचे निवेदन त्यांनी दिले. महात्मा फुलेंच्या शैक्षणिक कार्यास सनातन्यांचा प्रखर विरोध असतानाही त्यांनी आपले हे कार्य नेटाने चालू ठेवले. त्यांच्या या कार्याबद्दल १६ नोव्हें.१८८२ मध्ये स्त्रीशिक्षणाचे आद्यजनक म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांचा गौरव केला. त्यांच्या या कार्यामुळे लोकांनी त्यांना 'महात्मा' ही पदवी दिली. व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना आपले गुरु मानले.

### १२.४.२ सावित्रीबाई फुले :

सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुलें यांच्या शैक्षणिक कार्यास मदत करुन आपला स्वतःचा वेगळा ठसा उमटवलेला दिसून येतो. सावित्रीबाई फुले यांची शैक्षणिक कामगिरी अतुलयनीय आहे. देशांतील पहिल्या स्त्री-शिक्षिका व मुख्याध्यापिका म्हणून त्यांचा गौरव केला जातो. हिंदू धर्मव्यवस्थेने स्त्रिया व अस्पृश्यांना शिक्षणाचा अधिकार नाकारला होता. त्यामुळे त्यांचा कोणत्याही प्रकारे विकास होऊ शकला नव्हता म्हणून महात्मा फुलेंनी या दोन वर्गास शिक्षित करण्याचे ठरविले. सनातन्यांचा प्रखर विरोध असतानाही महात्मा फुल्यांनी १८४८ मध्ये भिडेवाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु करुन स्त्रीशिक्षणाची मूहुतमेढ रोवली. या शाळेत शिक्षक मिळत नव्हते. त्यामुळे या महात्मा फुलेंनी सर्वप्रथम सावित्रीबाईस शिक्षित करुन त्यांनी या शाळेत मुलींची शिक्षिका म्हणून नियुक्त केले. ज्या काळात मुलींना शिक्षण घेण्यासाठी व्यवस्थेने परवानगी नाकारली होती त्यावेळेस एक स्त्री शिक्षिका म्हणून सावित्रीबाई फुलेंची नेमणूक सनातन्यांना अजिबात आवडले नाही त्यामुळे फुले दांम्पत्याच्या या शैक्षणिक कार्यास विरोध करायला सुरुवात केली.

सनातन्यांच्या दबावामुळे महात्मा फुल्यांच्या वडिलांनी म्हणजेच गोविंदरावांनी त्यांना घराच्या बाहेर काढले. तरीसुद्धा त्यांनी शैक्षणिक कार्य चालू ठेवले. या कार्यास विरोध म्हणून त्यांनी सावित्रीबाई फुलेंस त्रास द्यायला सुरुवात केली. सावित्रीबाई शाळेत जात-येत असताना सनातनी लोक व स्त्रिया रस्त्याच्या बाजूला उभे राहून सावित्रीबाईंना उद्देशून अपमानास्पद शिवराळ भाषेत त्यांची निंदानालस्ती करीत, त्यांच्या अंगावर खडे मारत व चिखलशेण फेकत परंतु इतकी अवहेलना व विटंबना होऊनही सावित्रीबाईंनी या कार्यात माघार घेतली नाही. याउलट महात्मा फुलेंच्या मदतीने त्या या कार्यात अधिक सक्रिय झाल्या. महात्मा फुलेंच्या निधनानंतर त्यांच्या सर्व शाळांची जबाबदारी त्यांनी स्वतःकडे घेतली व शिक्षणप्रसाराचे महान कार्य त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत करत राहिल्या. त्यांच्या या कार्यामुळेच मुली, महिला व अस्पृश्य शिक्षित झाले व त्यांना आत्मसन्मान मिळाला. म्हणून सावित्रीबाई फुले या खरोखरच 'ज्ञानज्योती' आहेत. त्यांनी स्वतः जळत आपल्या शिक्षणप्रसाराचा प्रकाश समाजांतील सर्व स्तरापर्यंत पोहोचविला.

### १२.४.३ गोपाळ गणेश आगरकर :

गोपाळ गणेश आगरकर व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अनेक शाळा व महाविद्यालये स्थापन केली. आगरकर हे बुद्धिप्रामाण्यवादी असल्यामुळे त्यांनी सर्वांना समान शिक्षण व स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. त्यांनी १८८० मध्ये मुंबई येथे विष्णू शास्त्री चिपळूणकर आणि बाळ गंगाधर टिळक यांच्या सहकार्याने न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. त्यांनी प्राथमिक शिक्षणावर अधिक भर दिला व ते देण्याची जबाबदारी सरकारची आहे असे प्रतिपादन केले. न्यू इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून आगरकरांनी त्यांच्या इतर सहकाऱ्यांच्या माध्यमातून अनेक शाळा मुंबई, पुणे व इतर ठिकाणी स्थापन केल्या.

महाराष्ट्रात उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठी वरील सर्व नेत्यांनी एकत्र येऊन 'डेक्कन एज्युकेशन सोसायटीची' स्थापना १८८४ मध्ये केली या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात अनेक महाविद्यालये सुरु केली. २ जाने. १८८५ रोजी या संस्थेने 'फर्ग्युसन

महाविद्यालय' सुरु केले. अशाप्रकारे आगरकर, चिपळूणकर, टिळक, गोखले यांनी शिक्षणप्रसारे कार्य केले व महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्राचा विकास केला.

### १२.४.४ महर्षी धोंडो केशव कर्वे :

२० व्या शतकातील अग्रणीचे समाजसुधारक म्हणून महर्षी कर्वे यांना मानण्यात येते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी वाहून घेतले. महर्षी कर्वेनी विधवांच्या पुनर्विवाह घडवून आणणे व स्त्रीशिक्षणाचा प्रसार करणे यासाठी अतोनात मेहनत घेतली. महर्षी कर्वे यांनी स्त्रियांना शिक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून १९०७ मध्ये हिंगणे येथे महिला विद्यालय सुरु केले. स्त्रियांसाठी स्वतंत्र विद्यापीठ निर्माण व्हावे या हेतूने त्यांनी ३ जून १९१६ रोजी महिला विद्यापीठाची स्थापना केली. या विद्यापीठाच्या माध्यमातून त्यांनी अनेक महाविद्यालये सुरु केली. महाविद्यालयामध्ये शिकविण्यासाठी शिक्षक तयार व्हावेत. यासाठी त्यांनी १९१७ मध्ये अध्यापिका विद्यालय सुरु केले. शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांची तळमळ बघून अनेकांनी त्यांना आर्थिक मदत केली. १९२० मध्ये सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी २० लाख रुपयांची देणगी दिल्याने त्यांच्या आईचे नाव या महिला विद्यापीठाला नंतर देण्यात आले. आता या विद्यापीठाचे नाव श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (SNDT) असे आहे. त्यांच्या या कार्यामुळे या स्त्रीशिक्षण व स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीची चळवळ गतीमान झाली. महर्षी कर्वेच्या सामाजिक कार्यामुळे विशेषतः स्त्रीशिक्षणामुळे त्यांना १९५८ मध्ये देशाचा सर्वोच्च सन्मान 'भारतरत्न' देऊन गौरविण्यात आले.

### १२.४.५ पंडिता रमाबाई :

पंडिता रमाबाई यांचे स्त्रीशिक्षणाचे कार्य मोलाचे आहे. त्यांनी १८८९ मध्ये मुंबईत शिक्षणाच्या प्रसारासाठी व स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी 'शारदासदन' नावाची संस्था सुरु केली. पुढे या संस्थेला पुण्यास हलविण्यात आले. पुण्यात या संस्थेने अनाथ गरीब व विधवा स्त्रियांना शिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पंडिता रमाबाईंनी केले. त्यांच्या या कार्यावर सनातन्यांनी अनेक आक्षेप घेतले व टिका केली परंतु त्यांनी आपले शैक्षणिक कार्य चालू ठेवले.

### १२.४.६ राजर्षी शाहू महाराज :

महात्मा फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा वारसा राजर्षी शाहू महाराज यांच्याकडे जातो कारण त्यांनी महात्मा फुलेंप्रमाणे बहुजन समाजासाठी व त्यांच्या उद्धारासाठी अनेक लोकोपयोगी उपक्रम हाती घेतले. महाराष्ट्राच्या इतिहासातील अग्रगण्य व्यक्ति म्हणून शाहू महाराजांना ओळखले जाते. त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात शिक्षणप्रसाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले. बहुजन समाजाला शिक्षण दिल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही व ते आपली सुटका धार्मिक गुलामगिरीतून करु शकणार नाहीत, हे महाराजांनी जाणले होते. शिक्षण हे एक क्रांतीचे साधन मानून त्यांनी प्राथमिक शिक्षणावर भर दिला आणि त्यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक मोफत आणि सक्तीचे करण्याचा कायदा १९१६ मध्ये पास केला. अशाप्रकारचा कायदा करणारे कोल्हापूर संस्थान हे भारतातील पहिले संस्थान होते.

प्राथमिक शिक्षणाबरोबर शाहू महाराजांनी माध्यमिक उच्च व तंत्रशिक्षणाला महत्त्व दिले. १८५१ मध्ये सुरु झालेल्या इंग्रजी शाळेचे रुपांतर त्यांनी १८८१ मध्ये राजाराम महाविद्यालयात केले. त्यांनी तंत्रशिक्षणाला महत्त्व देऊन 'जयसिंगराव घाटगे तांत्रिक संस्था' सुरु करुन लष्करी शिक्षणासाठी 'इन्फॅन्ट्री स्कूल' सुरु केले.

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील कारभार व्यवस्थित चालविण्यासाठी प्रशिक्षित तलाठी व पाटील निर्माण करण्यासाठी 'प्रशासकीय शाळा' सुरु केल्या. हुशार व प्रशिक्षित शिक्षकांची भरती शाळेंमध्ये करण्यासाठी त्यांनी त्यांच्यासाठी प्रशिक्षण केंद्रे सुरु केली. त्यांनी आपल्या संस्थानात बहुजन समाजातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी अनेक प्रकारे मदत केली. त्यांना राहण्यासाठी वस्तीगृहे शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या व परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या जाहीर केल्या.

शाहू महाराजांनी माध्यमिक व उच्च शिक्षणाचा लाभ तळागाळातील लोकांना मिळावा यासाठी त्यांनी वसतीगृहे स्थापन करुन बहुजन समाजातील मुलांच्या राहण्याचा व जेवणाच्या प्रश्नाची सोडवणूक केली. त्यासाठी त्यांनी कोल्हापूर येथे सर्व जाती धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी एकच वसतीगृह सुरु केले. या वसतीगृहाचा लाभ प्रामुख्याने ब्राह्मण विद्यार्थ्यांना झाल्याने शाहू महाराजांनी जातीवार वसतीगृहे स्थापण्याचा निर्णय घेतला. १९०१ मध्ये महाराजांनी मराठा जातीच्या विद्यार्थ्यांसाठी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग' सुरु केली तसेच लिंगायत, वैश्य, चांभार, शिंपी, ठोर इत्यादी जातीच्या विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्र वस्तीगृहे स्थापन केली. शाहू महाराजांनी स्त्रीशिक्षणाकडे अधिक लक्ष दिले. यासाठी त्यांनी मुलींसाठी शाळा सुरु केल्या व शाळा व महाविद्यालयातील मुलींना मोफत शिक्षण दिले. त्यांनी समाजामध्ये कोणत्याही प्रकारे भेदभाव न करता बहुजन समाजातील म्हणजेच ब्राह्मणेत्तर मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. त्यांनी या मुलांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी त्यांनीच शिष्यवृत्ती देऊन आपल्या चळवळीचा वारसा त्यांना दिला. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणप्रसाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

### १२.४.७ कर्मवीर भाऊराव पाटील :

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजात शिक्षणप्रसार करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहून दिले. यामागे महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराजांची प्रेरणा होती. कर्मवीरांनी दुधगाव येथे 'दुधगाव विद्या प्रसारक मंडळ' या संस्थेची स्थापना करुन त्यांनी वस्तीगृह सुरु केले. १९१९ मध्ये त्यांनी सातारा येथे 'रयत शिक्षण संस्थेची' स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात अनेक प्राथमिक, माध्यमिक शाळा व महाविद्यालये सुरु केली व वसतीगृहे बांधली. या शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कर्मवीरांनी 'कमवा व शिका' हा संदेश दिल्यामुळे अनेक विद्यार्थी गरीबीच्या परिस्थितीतही शिकले. १९२४ मध्ये या संस्थेच्या वतीने सातारा येथे 'छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' सुरु केले तसेच १९३५ मध्ये प्राथमिक शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी 'ट्रेनिंग कॉलेज' सुरु केले. १९४७ मध्ये संस्थेने सातारा येथे 'छत्रपती शिवाजी कॉलेज' सुरु केले. अशाप्रकारे १९५० पर्यंत संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, १०१ माध्यमिक शाळा व अनेक महाविद्यालये व वसतीगृहे संपूर्ण महाराष्ट्रात सुरु करुन कर्मवीर भाऊराव पाटीलांनी शिक्षणाचा प्रसार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे उल्लेखनीय कार्य केले व महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्राचा विकास केला.

### १२.४.८ डॉ. पंजाबराव देशमुख :

कर्मवीर भाऊराव पाटीलांच्या पश्चिम महाराष्ट्रातील शिक्षणप्रसाराच्या कार्याप्रमाणे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी विदर्भात हे कार्य खूप चांगल्या पद्धतीने केले. त्यांनी महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराजांचा वारसा पुढे चालविला व तळागाळातील लोकांसाठी शिक्षणप्रसाराचे

महत्त्वपूर्ण कार्य केले. १९२६ मध्ये त्यांनी अमरावती येथे 'श्रद्धानंद छात्रालय' सुरु केले. अमरावती येथे जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष असताना पंजाबरावांनी प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी सक्तीचे केले व अनेक शिक्षणकेंद्रे सुरु केली.

डॉ. पंजाबराव देशमुख प्रांतिक सरकारमध्ये शिक्षणमंत्री असताना ग्रामीण भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून अनेक सवलती उपलब्ध करुन दिल्या. १९३२ मध्ये त्यांनी अमरावती येथे 'श्री शिवाजी शिक्षण संस्थेची' स्थापना करुन संपूर्ण विदर्भात अनेक शाळा, महाविद्यालये व वसतीगृहे सुरु केली. अशाप्रकारे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शिक्षणप्रसाराचे कार्य केले व महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीत मोलाची भूमिका बजावली.

### १२.४.९ डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे' असे मानून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला खूप महत्त्व दिले. शिक्षणामूळेच अस्पृश्य समाजाचा विकास होईल, त्यांना त्यांच्यावर हजारो वर्षे होत असलेल्या अन्यायाची जाणीव होईल व तो या अन्यायाविरुद्ध बंड करुन उठेल व आपली मुक्ति करुन होईल, असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. बाबासाहेबांनी स्वतः अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून आपले संपूर्ण शिक्षण पूर्ण केले त्यामुळे त्यांनी तळागाळातील लोकांना शिक्षण देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले.

१९२४ मध्ये स्थापन केलेल्या 'बहिष्कृत हितकारिणी सभेच्या' माध्यमातून त्यांनी बहुजन समाजाला 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' हा संदेश दिला. त्यांनी या संस्थेच्या माध्यमातून अनेक प्राथमिक, माध्यमिक शाळा, वसतीगृहे व वाचनालये सुरु केली. ते स्वतः उच्चशिक्षित असल्यामुळे त्यांनी अनुसूचित जाती, जमाती व स्त्रियांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढावे यासाठी ८ जुलै १९४५ रोजी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. बाबासाहेबांनी या सोसायटीच्या माध्यमातून मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालय (१९४६), विधी महाविद्यालय, औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय (१९५०), मुंबई येथे सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महा. (१९५३) सुरु केले. सोसायटीने संपूर्ण महाराष्ट्रात अनेक शाळा व महाविद्यालये सुरु केली. तसेच बाबासाहेबांनी राज्यघटनेमध्येसुद्धा अस्पृश्यांसाठी अनेक विशेष तरतुदी केल्या. अशाप्रकारे बाबासाहेबांनी तळागाळातील लोकांसाठी उल्लेखनीय असे शैक्षणिक कार्य केले.

### १२.४.१० भाऊसाहेब हिरे :

महाराष्ट्रात शैक्षणिक विकास करण्याकरिता भाऊसाहेब हिरे यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. त्यांनी महाराष्ट्रात साक्षरता परिषदेची स्थापना केली व साक्षरतेच्या प्रसारास सुरुवात केली. भाऊसाहेब हिरेंनी ठाणे, जव्हार, औरंगाबाद, नाशिक, धुळे, अहमदनगर, धरमपूर, डांग इत्यादी ठिकाणी जवळजवळ १५०० प्राथमिक शाळा सुरु केल्या. १९५० मध्ये हिरे यांनी मालेगावला न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली तसेच कळवण व सुरगाणे येथे कन्या छात्रालये स्थापन केली. १९५१ मध्ये त्यांनी त्र्यंबकेश्वर येथे नूतन मराठी विद्यालय स्थापन केले.

अशाप्रकारे महाराष्ट्रातील अनेक थोर समाजसुधारकांनी व नेत्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात भरीव असे योगदान दिले. त्यांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रात आधुनिक शिक्षणाचा पाया भक्कम

झाला व आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती झाली. आजही या व इतर अनेक नेत्यांनी स्थापन केलेल्या संस्था महाराष्ट्राच्या जडणघडणीत उल्लेखनीय कार्य करीत आहेत

**आपली प्रगती तपासा :**

१) महात्मा जोतीराव फुलेंचे शिक्षण क्षेत्रातील योगदान सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १२.५ वृत्तपत्रांचा विकास

एकोणिसाव्या शतकात वृत्तपत्रांचा उदय महाराष्ट्रामध्ये झाला व वृत्तपत्रांचा प्रसार महाराष्ट्रातील शिक्षणाच्या प्रमाणामुळे मोठ्या प्रमाणात झाला. समाजप्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम म्हणून समाजसुधारकांनी वृत्तपत्रांचा वापर केला. महाराष्ट्र ही समाजसुधारणेची भूमी मानली जाते. त्यामुळे वृत्तपत्राचा प्रसार येथे झपाट्याने झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रामध्ये अनेक वृत्तपत्रे एतद्देशीय समाजसुधारकांनी व स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांनी सुरु केले. त्यापैकी काही वृत्तपत्रांचा अभ्यास आपण या घटकांमध्ये करणार आहोत. त्यापूर्वी भारतामध्ये वृत्तपत्रांचा उदय कसा झाला ते पाहूया :

### १२.५.१ भारतीय वृत्तपत्रांची सुरुवात :

मुद्रणकलेचा शोध युरोपमध्ये १५ व्या शतकात लागल्यामुळे वृत्तपत्रे व ग्रंथनिर्मितीस चालना मिळाली. मुद्रणकलेचा प्रवेश भारतामध्ये १६ व्या शतकात झाला. परंतु या काळात वृत्तपत्रांचा उदय झाला नव्हता. भारतात मुद्रणाची सुरुवात सर्वप्रथम गोव्यात झाली, भारतात मुद्रणकलेचा प्रसार ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केला. देशी व विदेशी विचारांचा प्रसार करणे विविध हालचालींची व घडामोडींची माहिती देणे व समाजजागृती करण्यासाठी भारतात पहिली वृत्तपत्रे सुरु करण्यात कंपनीच्या प्रशासकिय अधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला. २९ जाने १७८० रोजी भारतातील पहिले वृत्तपत्र 'बेंगाल गॅझेट' या नावाने जेम्स ऑगस्टस हिकीने इंग्रजी साप्ताहिक बंगालमध्ये सुरु केले. यानंतर बंगालमध्ये इंग्रजानी व त्यानंतर इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांनी अनेक साप्ताहिके व मासिके सुरु केली. हळूहळू वृत्तपत्रांचा प्रसार भारतातील इतर प्रांतामध्येही झाला. सुरुवातीला इंग्रजी राजवटी संबंधीत बातम्या व त्यानंतर समाजप्रबोधना विषयीची माहिती या काळातील वृत्तपत्रातून छापली जात असे.

### १२.५.२ महाराष्ट्रात वृत्तपत्रांची सुरुवात :

मुद्रणकलेचा प्रसार संपूर्ण भारतामध्ये झाल्यामुळे वृत्तपत्र व ग्रंथनिर्मितीस गती मिळाली. १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट झाल्यावर संपूर्ण महाराष्ट्रावर मुंबई प्रांताची निर्मिती करुन आपला अंमल सुरु केला. मुंबई प्रांतात इंग्रजाच्या प्रत्यक्ष अंमलापूर्वी वृत्तपत्रांचा उदय झाला होता. १८४८ पूर्वी महाराष्ट्रामध्ये अनेक इंग्रजी व मराठी वृत्तपत्रांची सुरुवात झाली होती. महाराष्ट्रात वृत्तपत्राचा प्रांरभ 'बॉम्बे हेरॉल्ड' (१७८९) या इंग्रजी साप्ताहिकापासून झाला. पुढे 'बॉम्बे

कुरिअर' (१७९०), 'बॉम्बे गॅझेट' (१७९१) व 'बॉम्बे टाईम्स' (१८३२) या वृत्तपत्रांचा उदय झाला. रॉबर्ट नाईट यांनी बॉम्बे टाईम्स, स्टँटर्ड व टेलीग्राफ या तीन वृत्तपत्रांचे एकत्रीकरण करुन 'टाईम्स ऑफ इंडिया' हे वृत्तपत्र सुरु केले.

मुंबई प्रांतात पहिले देशी वृत्तपत्र फर्दुनजी मर्झबान यांनी 'मुंबई समाचार' या नावाने १८२२ मध्ये सुरु केले. १८३० पर्यंत 'मुंबई वर्तमान', मुंबई दुर्बिण, चित्रज्ञान दर्पण, रास्त गोफतार अशी अनेक गुजराती वृत्तपत्रे सुरु झाली.

### १२.५.३ मराठी वृत्तपत्रांचा उदय व विकस :

मराठी वृत्तपत्रांचा उदय सर्वप्रथम मुंबईत झाला. कारण मुंबईमध्ये मुद्रणाच्या सोयी होत्या व साक्षर वाचकवर्ग होता. मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' या नावाने बाळशास्त्री जांभेकरांनी ६ जानेवारी १८३२ रोजी सुरु केले. हे वृत्तपत्र मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत होते. हे वृत्तपत्र १८४० मध्ये बंद पडले. त्यामुळे जांभेकरांनी १८४० मध्ये 'दिग्दर्शन' हे मराठीतील पहिले मासिक सुरु केले. मराठीतील ही दोन्ही वृत्तपत्रे सुरु करण्याचा मान बाळशास्त्री जांभेकरांना जातो त्यामुळेच त्यांना 'मराठी वृत्तपत्राचे जनक' मानले जाते.

दर्पण हे वृत्तपत्र द्विभाषिक असल्यामुळे त्यांस निखळ मराठी पत्र म्हणता येणार नाही. संपूर्ण मराठी वृत्तपत्र म्हणून 'मुंबई अखबार' या वृत्तपत्रास मानले जाते. हे वृत्तपत्र ४ जुलै १८४० पासून सुरु झाले. गोंविद विठ्ठल उर्फ भाऊ महाजन यांनी पाश्चात्य शिक्षणातील नवीन विचारांचा प्रसार करण्यासाठी व ज्ञानसंपन्न समाजनिर्मितीसाठी अनेक वृत्तपत्रे व साप्ताहिक सुरु केली. त्यांनी १८४० मध्ये 'प्रभाकर' हे साप्ताहिक सुरु केले. सुधारणेचे परखडपणे पुरस्कार करणारे एक बाणेदार साप्ताहिक म्हणून पुण्याचे लोकहितवादी आपले लेख म्हणजेच 'शतपत्रे' प्रभाकरमधून प्रकाशित केले. भाऊ महाजनने आपल्या वृत्तपत्रांतून स्वधर्म, स्वभाषा व भारतीय संस्कृतीचा पुरस्कार केला. अशाप्रकारे १८४८ पर्यंत समाजप्रबोधनाच्या कार्यासाठी अनेक वृत्तपत्रे महाराष्ट्रात सुरु झाली. परंतु खऱ्या अर्थाने १८४८ च्या नंतर मराठी वृत्तपत्राचा विकास झाल्याचे दिसून येते. १९६० पर्यंत अनेक वृत्तपत्रे महाराष्ट्रात सुरु झाली. त्यांनी महाराष्ट्रात समाजप्रबोधन केले व राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ मजबूत केली. त्यातील काही महत्त्वपूर्ण वृत्तपत्रांचा आढावा पुढीलप्रमाणे.

### १) ज्ञानप्रकाश (१८४९) :

'ज्ञानप्रकाश' हे मराठीतील पहिले दैनिक होते. या पत्राची सुरुवात कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनी १८४९ मध्ये साप्ताहिकाच्या स्वरुपात पुण्यात केली. १९०४ पासून या साप्ताहिकाचे रुपांतर दैनिकात झाले. या वृत्तपत्राने देशातील जनतेला अनेक प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली. १८९५ च्या अखेरीस पुण्यात काँग्रेसचे अधिवेशन भरले होते त्याची माहिती 'राष्ट्रसभा समाचार' या मथळ्याखाली जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या पत्राने केले. नेमस्त राजकारणाचे मुखपत्र म्हणून ज्ञानप्रकाश या वृत्तपत्राने मवाळवादी कालखंडात महत्त्वाची भूमिका बजावली. या पत्राने सुशिक्षातातील मद्यपानाची सवय, वेश्यागमन व्यभिचारावर टीका केली.

## २) विचारलहरी (१८५२) :

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी 'ज्ञानोदय' (१८४१) व ज्ञानसिंधू (१८४२) या वृत्तपत्रातून हिंदू धर्मातील चालीरीती अंधश्रद्धा व अनिष्ठ रुढी-परंपरांवर टिका केली व युरोपियन संस्कृतीचा समाजात प्रसार करण्याचा प्रयत्न केला की जेणेकरुन ख्रिश्चन धर्माचा प्रसार करता येईल. त्यामुळे पुण्यातील काही विद्वानांनी एकत्र येऊन मिशनऱ्यांच्या प्रचाराला शह देण्यासाठी 'विचारलहरी' नावाचे मासिक जुलै १८५२ मध्ये सुरु केले. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या हिंदू धर्मावरील टीकेला उत्तर देण्यासाठी व ख्रिस्ती मतांचे खंडण करण्यासाठी हे पत्र सुरु करण्यात आले. हे वृत्तपत्र फार अल्पकाळ टिकले परंतु त्यांचा प्रतिहल्ला खूप परिणामकारक होता. कृष्णशास्त्री चिपळूणकर सारख्या विद्वानांच्या हाती संपादनाची सूत्रे असल्याने प्रतिहल्ला प्रभावी होऊ शकला.

## ३) धूमकेतू व ज्ञानदर्शन (१८५३) :

भाऊ महाजनांनी १८५३ मध्ये धुमकेतू हे साप्ताहिक व ज्ञानदर्शन हे त्रैमासिक सुरु केले. 'प्रभाकर' तील उदार धोरण महाजनांनी धुमकेतून चालू ठेवले. धर्मविषयक विचाराबाबत धुमकेतून उदार धोरण बाळगले. भाऊ महाजन यांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रबोधन समाज जागृती व सुधारणा घडवून आणण्यासाठी या दोन्ही वृत्तपत्रांचा उपयोग केला. भारताचे इंग्रजाकडून होणारे शोषण त्यांनी या पत्रातून मांडले.

## ४) निबंधमाला (१८५४) :

विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी १८५४ मध्ये 'निबंधमाला' हे मासिक पुण्यातून सुरु केले. त्यांनी या वृत्तपत्रातून स्वदेशी, स्वधर्म व स्वभाषेचा जोरदार पुरस्कार केला. त्यांना पाश्चात्य विचार सरणीवर आधारित समाजसुधारणा आणि पुरोगामी विचार मान्य नव्हते त्यामूळे त्यांनी निंबधमालेतून महात्मा फुल्यांच्या सामाजिक कार्यावर व विचारावर जोरदार टिका केली.

## ५) इंदुप्रकाश (१८६२) :

इ.स. १८६२ मध्ये विष्णूशास्त्री पंडित यांनी द्विभाषी 'इंदुप्रकाश' हे वृत्तपत्र सुरु केले. मुंबईमध्ये समाजप्रबोधनाची चळवळ जनसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी या वृत्तपत्राचा उपयोग झाला. या वृत्तपत्राने विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण व सामाजिक सुधारणेचा जोरदार पुरस्कार केला. हे वृत्तपत्र सुमारे ६२ वर्ष टिकले. या वृत्तपत्रातून मामा परमानंद, रानडे, तेलंग, न. र. फाटक, चंदावरकर यांनी आपले विचार मांडले व समाजाला दिशा देण्याचे कार्य केले. इंदूप्रकाश हे वृत्तपत्र १८६७ साली स्थापन झालेल्या प्रार्थना समाजाचे विचारपीठ बनले.

## ६) नेटिव्ह ओपिनियन (१८६४) :

विश्वनाथ नारायण मांडलिक यांनी १८६४ साली 'नेटिव्ह ओपिनियन' हे वृत्तपत्र समाजप्रबोधनासाठी सुरु केले. मामा परमानंद हे या वृत्तपत्राचे पहिले संपादक होते. हे वृत्तपत्र दिर्घकाळ म्हणजेच १९०८ पर्यंत चालू होते. राजकीय, सामाजिक व नैतिक विषयांवर नेटिव्हाची स्वतंत्र मते प्रसिद्ध करुन हिंदी लोकमत निर्माण करुन सरकारच्या कानापर्यंत पोहोचविण्यासाठी

या वृत्तपत्रांचा वापर झाला. या वृत्तपत्राने सनातनी विचारसरणी पाठिंबा दिला परंतु स्वातंत्र्य चळवळीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

### ७) अरुणोदय (१८६६) :

'अरुणोदय' हे ठाणे जिल्ह्यातील पहिले वृत्तपत्र होय. या वृत्तपत्राची सुरुवात १८६६ साली काशिनाथ विष्णू फडके यांनी केली. या वृत्तपत्राने ब्रिटिश सरकारला विरोध करीत सामाजिक व राजकीय प्रश्न सोडविण्यावर अधिक भर दिला. या वृत्तपत्राव्यतिरिक्त सुयोदय (१८६७) व हिंदुपंच (१८७२) हे वृत्तपत्र या काळात ठाण्यातून सुरु झाले व त्यांनीसुद्धा समाजप्रबोधनाचे कार्य चालू ठेवले.

### ८) सुबोधपत्रिका (१८७३) :

'सुबोधपत्रिका' हे वृत्तपत्र ४ मे १८७३ पासून सुरु झाले. हे वृत्तपत्र प्रार्थनासमाजाचे मुखपत्र होते व मामा परमानंद, द्वारकानाथ गोंविद वैदल यांनी या पत्राचे संपादक म्हणून काम पाहिले. या वृत्तपत्रातून अनेक समाजसुधारकांनी आपली मते निर्भिडपणे मांडली. धर्मकारण समाजकारण स्त्री शिक्षण, नीतीविषयक चर्चा, राजकिय चळवळ अशा विविध विषयावर स्पष्ट विचार मांडण्यात आल्याचे आढळते. भांडारकर व रानडे यांनी आपले उदारमतवादी विचार या वृत्तपत्रातून मांडल्याचे दिसून येते.

### ९) दीनबंधू (१८७७) :

महात्मा जोतीराव फुले यांचे सत्यशोधक चळवळीतील प्रमुख सहकारी कृष्णराव भालेकर यांनी पुण्यातून बहुजन समाजाचे पहिले वृत्तपत्र 'दीनबंधू' इ.स. १८७७ पासून सुरु केले. पुढे नारायण मेधाजी लोखंडे व रामजी संतुजी आवटे यांनी या वृत्तपत्रांचे संपादन केले व हे वृत्तपत्र चालू ठेवले. या वृत्तपत्रातून महात्मा फुलेंचे विचार व सत्यशोधक चळवळीचा प्रसार करण्यत आला. 'दीनबंधू' पूर्वीचे सर्व वृत्तपत्रे बहूजन समाजापर्यंत पोहोचू शकले नव्हते. परंतु दीनबंधूने सामान्य लोकांचे व उपेक्षित समाजाचे प्रश्न मांडले. तसेच या वृत्तपत्राने शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह, दलित समाजाचा उद्धार कामगार चळवळ व सावकारशाहीवर प्रकाश टाकला. म्हणूनच या वृत्तपत्राचे कार्य ऐतिहासिक मानले जाते.

### १०) केसरी व मराठा (१८८१) :

गोपाळ गणेश आगरकर व बाळ गंगाधर टिळक यांनी एकत्र येऊन महाराष्ट्रातील लोकांमध्ये राजकिय व सामाजिक जागृती घडवून आणण्यासाठी 'केसरी' हे मराठीतून व 'मराठा' हे इंग्रजी वृत्तपत्र १८८१ पासून सुरु केले. आगरकरांनी केसरीचे व टिळकांनी 'मराठा' या वृत्तपत्रांचे संपादन केले. आगरकरांनी टिळकांशी मतभेद झाल्यानंतर केसरीच्या संपादकपदाचा राजीनामा दिला त्यानंतर टिळकांनी १९२० पर्यंत केसरी व मराठा या दोन्ही वृत्तपत्राचे संपादन केले. या वृत्तपत्रांनी राजकिय, सामाजिक, धार्मिक विषयांची मिमांसा करुन लोकजागृतीचे कार्य केले. ब्रिटिश सरकारवर उघडपणे टिका करण्याचे कार्य टिळकांनी आपल्या अग्रलेखातून केली तर आगरकरांनी सामाजिक सुधारणेकडे अधिक लक्ष दिले. अशाप्रकारे स्वातंत्रचळवळी मध्ये या दोन्ही वृत्तपत्रांनी महत्त्वाची कामगिरी बजावलेली दिसून येते.

## ११) सुधारक (१८८८) :

गोपाळ गणेश आगरकर, यांचे बाळकृष्ण गंगाधर टिळक यांच्याशी मतभेद झाल्याने १८८७ मध्ये केसरी या वृत्तपत्राच्या संपादक पदाचा राजीनामा दिला व समाजसुधारणेविषयीचे आपले विचार परखडपणे मांडण्यासाठी सुधारक हे नवीन वृत्तपत्र १८८८ मध्ये सुरु केले. त्यांनी व्यक्ती स्वातंत्र्य आणि बुद्धी प्रमाण्यावर भर दिला. महाराष्ट्रातील समाजसुधारणेविषयी आपले विचार या पत्रातून मांडले. त्यांनी या वृत्तपत्रातून स्त्रीविषयक सुधारणा, विधवा पुनर्विवाह संमतीवय कायदा, शिक्षणपद्धती, स्त्रीशिक्षण, सामाजिक सुधारणा कि राजकिय सुधारणा, याविषयी जनसामान्यांपर्यंत आपले विचार पोहोचवून आधुनिक महाराष्ट्र घडविण्यात हातभार लावला.

## १२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रे :

भारतीय समाजातील मोठा उपेक्षित गट यांचे प्रश्न जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व आपली चळवळ लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक वृत्तपत्रे चालविली व अस्पृश्याच्या आत्मोद्धारांची चळवळ त्यांच्यापर्यंत पोहाचविली. तत्कालिन वृत्तपत्रांमध्ये बाबासाहेबांची मते व त्यांचे चळवळीबद्दलचे कार्य छापले जात नसत. त्यामुळे त्यांनी अस्पृश्य वर्गावर होणारे अन्याय, अत्याचार समाजासमोर मांडून, त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 'वृत्तपत्र' या प्रभावी माध्यमाचा उपयोग करण्याचा ठरविले. (त्यांनी वृत्तपत्राचे महत्त्व विषद करताना असे म्हटले आहे, "ज्या चळवळीकडे आपले स्वतःचे वर्तमानपत्र नसते, त्या चळवळीची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे असते." म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या स्त्रियांच्या व भारतीय समाजाच्या सर्वांगिण विकासाकरिता व आपली चळवळ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याकरीता अनेक वृत्तपत्रे सुरु केली.) राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक मदतीने बाबासाहेबांनी 'मुकनायक' हे वृत्तपत्र ३१ जानेवारी १९२० पासून सुरु केले. पुढे काही कारणांनी हे वर्तमानपत्र बंद पडले. बाबासाहेबांनी आपली चळवळ भारतातील लाखो बहिष्कृत लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व पुढे महाडच्या चवदार तळाच्या सत्याग्रहाच्या वेळी स्पृश्य वर्गाच्या टिकेला उत्तर देण्यासाठी १९२७ पासून 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरु केले. मुख्य प्रवाहापासून बहिष्कृत करण्यात आलेल्या लोकांचे हे मुखपत्र बनले. याच वृत्तपत्रातून समाजसुधारणेविषयी आपले विचार परखडपणे मांडणाऱ्या लोकहितवादींची 'शतपत्रे' पुन्हा प्रकाशित करण्यात आली. १९३० मध्ये हे वृत्तपत्र बंद पडले.

बहिष्कृत भारत बंद पडल्यावर डॉ. आंबेडकरांनी आपले राजकिय विचार व त्यांचे चळवळीतील कार्य पोहोचविण्यासाठी १९३० साली 'जनता' हे नवीन वर्तमानपत्र सुरु केले. जनतेपर्यत हे वृत्तपत्र १९५३ पर्यंत सुरु होते. या कालखंडात त्यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान व राजकिय, सामाजिक व धार्मिक व आर्थिक बाबींविषयीचे विचार समजण्यास मदत होते. कालांतराने त्यांनी भारत बौद्धमय करण्याचे हेतूने 'प्रबुद्ध भारत' हे वर्तमानपत्र सुरु केले. अशा प्रकारे बाबासाहेबांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून आपली चळवळ जनसामान्यापर्यंत पोहोचविली. त्यांनी आपल्या कारकिर्दित अनेक विषय हाताळले व राष्ट्र उभारणीत भरीव असे योगदान दिले.

### १३) नवयुग व मराठा :

प्रल्हाद केशव अत्रे उर्फ आचार्य अत्रे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सुरुवातीला नवयुग व नंतर मराठा हे वृत्तपत्र सुरु केले. आचार्य अत्रे यांनी या दोन्ही वृत्तपत्राच्या अग्रलेखातून चळवळीविषयी आपले विचार परखडपणे मांडले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा यासाठी अत्र्यांबरोंबरच इतर नेत्यानीही आपली मते या पत्रातून मांडली. या वृत्तपत्रांचे प्रमूख वैशिष्ट्य म्हणजे चळवळीविषयीची व्यंगचित्रे या वृत्तपत्रांनी कॉंग्रेस नेतृत्त्वावर प्रखर टिका केली व ही चळवळ घराघरात पोहोचविली. याच वृत्तपत्रातून अनेक लेखक, कवी व शाहीरांनी आपली मते व काव्ये लोकांपर्यंत पोहोचविली. यांच्या संयुक्त प्रयत्नामुळे १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्रांची स्थापना झाली.

### १२.५.४ मराठी वृत्तपत्रांवरील सरकारचे निर्बंध :

भारतीय वृत्तपत्रांना स्वातंत्र्य द्यावे की नाही याबाबत इंग्रजामध्ये एकमत नव्हते. भारतीय वृत्तपत्रांना जर स्वातंत्र्य दिले तर ते आपला धोरणावर टिका करतील तसेच लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करतील. अशी भिती इंग्रजांना वाटत होती त्यामुळे देशी वृत्तपत्रांवर त्यांनी १८१८ ते १८३५ च्या दरम्यान अनेक बंधने घातली. पुढे विल्यम बेंटिक व चार्ल्स मेटकॉफ यांसारख्या उदारमतवादी गव्हर्नर जनरलसमूळे ही बंधने शिथिल करण्यात आली व १८३६ ते १८५६ या काळात वृत्तपत्रांना स्वातंत्र्य देण्यात आले.

१८५७ च्या उठावामुळे इंग्रजांनी देशी वृत्तपत्रांवर पुन्हा बंधने घातली व राणीच्या जाहीरनाम्याने १८५८ नंतर ती बंधने दूर केली. शासनाच्या धोरणावर टीका करणाऱ्या वृत्तपत्रांकडे ब्रिटिशाची करडी नजर होती. लॉर्ड लिटन यांनी १८७८ मध्ये देशी वृत्तपत्र नियंत्रण कायदा जारी करुन मुद्रण स्वातंत्र्यावर अनेक बंधने लादली. पुढे १८८२ मध्ये लॉर्ड रिपनने या कायद्यातील काही निर्बंध दूर केले. अशा प्रकारच्या बंधनामुळे भारतीय वृत्तपत्रांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालण्यात आला व अनेक पुढाऱ्यांना व समाजसुधारकांना आक्षेपार्ह मजकुरांमुळे व सरकारी धोरणावर केलेल्या टिकेमुळे शिक्षा ठोठावण्यात आल्या. १९०५ मध्ये झालेल्या बंगालच्या फाळणीमुळे मुद्रण स्वातंत्र्यावर पुन्हा बंधने घालण्यात आली. अशाप्रकारे १९४७ पर्यंत भारतीय वृत्तपत्रांवर सरकारने अनेक निर्बंध लादले. ही बंधने केवळ भारतीय वृत्तपत्रावरच होती तर अँग्लो इंडियन वृत्तपत्रावर ही बंधने नव्हती. यावरुन इंग्रजाचे दुटप्पी धोरण स्पष्ट होते. स्वातंत्र्यानंतर मुंबई सरकारने वृत्तपत्रांना स्वातंत्र्य बहाल केले व सर्व प्रकारची बंधने उठविली.

### १२.५.५ मराठी वृत्तपत्रांची कामगिरी :

महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासामध्ये मराठी वृत्तपत्रांनी खूप महत्त्वाची कामगिरी केल्याचे दिसून येते. प्रारंभीच्या मराठी वृत्तपत्रांनी सामाजिक प्रश्नांना अधिक महत्त्व देत समाजप्रबोधनाची चळवळ मजबूत करण्याचा प्रयत्न केला तर नंतरच्या वृत्तपत्रांनी स्वातंत्र्य चळवळ मजबूत केली व ती यशस्वी केली. समाजप्रबोधन चळवळीच्या काळात लोकांना शिक्षणाचे महत्त्व स्त्रिविषयक सुधारणा, सामाजिक सुधारणा, हिंदू धर्मातील अनिष्ठ चालीरिती व परंपरांवर टिका इत्यादी विषयांना हाताळले. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात भारतियांमध्ये राष्ट्रप्रेम, स्वदेशी, स्वभाषा, स्वराज्य स्वसंस्कृती, राष्ट्रवादाची भावना, अस्पृश्यता निवारण, स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाची

जाणीव एतद्देशीय वृत्तपत्रांनी निर्माण केली. वृत्तपत्रातील लिखाणामुळे भारतीय जनता ब्रिटिशांविरुद्ध एकत्र आली त्यामुळे स्वातंत्र्य चळवळ यशस्वी झाली असे आपणांस म्हणता येईल. मराठी वृत्तपत्रांनी मराठी भाषेच्या विकासालाही हातभार लावला. म्हणूनच महादेव गोविंद रानडे यांनी 'महाराष्ट्रातील समाजविचार' या आपल्या ग्रंथात वरील वृत्तपत्रांना 'सार्वजनिक शाळा' असे म्हटले आहे. यावरुन मराठी वृत्तपत्रांचे उल्लेखनीय कार्य लक्षात येते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या वृत्तपत्राचा थोडक्यात परामर्श करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १२.६ सारांश

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये शिक्षण व वृत्तपत्राने मोलाची भूमिका बजावलेली आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक व्यक्तिनी महत्त्वाची भूमिका पार पाडली व शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. वृत्तपत्रांनी समाजप्रबोधनाचे उल्लेखनीय कार्य केल्याचे दिसून येते. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत वृत्रपत्राचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. वृत्तपत्रांनी सामाजिक चालीरीतीवर आघात करुन स्वातंत्र्य चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहोचवीली, त्यामुळे लोकांमध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला. विविध चळवळी यशस्वी करण्याकरिता वृत्तपत्रांचा वापर झाला, त्यामुळे १९६० मध्ये आधुनिक व समृद्ध महाराष्ट्राची निर्मिती झाली.

## १२.७ विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

प्र. १ महाराष्ट्रच्या शैक्षणिक प्रगतीतील शासनाच्या प्रयत्नाचे वर्णन करा.

प्र. २ महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घ्या.

प्र. ३ महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगतीतील समाजसुधारकांच्या योगदानाची चर्चा करा.

प्र. ४ महाराष्ट्रातील वृत्तपत्रांच्या विकासाचा आढावा घ्या.

प्र. ५ महाराष्ट्रतील वृत्तपत्रांनी बजावलेली कामगिरी स्पष्ट करा.

प्र. ६ टिपा लिहा.

- अ) राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य
- ब) महर्षी कर्वे यांचे शैक्षणिक कार्य
- क) मराठी वृत्तपत्रांची कामगिरी
- ड) केसरी व मराठा
- इ) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रे.

❖❖❖❖

# १३

## शिक्षण आणि संस्कती

## ब) मुबंईतील नाटक, चित्रपट व स्थापत्याचा विकास

**घटक रचना :**

१३.० उद्दिष्ट्ये
१३.१ प्रस्तावना
१३.२ मुंबईतील नाट्यक्षेत्राचा विकास
१३.३ मुंबईतील चित्रपटक्षेत्राचा विकास
१३.४ मुंबईतील स्थापत्याचा विकास
१३.५ सारांश
१३.६ विद्यापीठीय स्वरुपाचे प्रश्न
१३.७ संदर्भसूची

### १३.० उद्दिष्ट्ये

१. मुंबईमध्ये नाट्यक्षेत्राचा विकास कसा झाला हे अभ्यासणे.
२. मुंबईतील चित्रपटक्षेत्राच्या विकासाच्या आढावा घेणे.
३. मुंबईतील स्थापत्याचा विकास अशाप्रकारे झाला हे जाणून घेणे.
४. मुंबईतील स्थापत्याचा उत्कृष्ठ नमून्यांचा अभ्यास करणे.
५. मुंबईच्या सांस्कृतिक वैभवाचे महत्त्व जाणून घेणे.

### १३.१ प्रस्तावना

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासामध्ये मुंबईने मोलाची भूमिका बजावली आहे. मुंबईतील नाट्यक्षेत्र, चित्रपटक्षेत्र व स्थापत्याने महाराष्ट्राचा नव्हे तर संपूर्ण भारताचे आकर्षण स्थान बनले आहे. मुंबईमध्येच भारतीय नाट्यक्षेत्र व चित्रपटाचा पाया रोवला गेला. येथूनच आजही अनेक नाटके व चित्रपट तयार होतात व संपूर्ण जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचतात.

मुंबई हे संपूर्ण भारताचे आकर्षण बनले आहे, ते येथील वास्तुसौंदर्याने. मुंबईमध्ये कलाकृतींचे उत्कृष्ठ नमूने आढळतात. येथील इमारती, लेणी व शासकीय बिल्डिंगमूळे मुंबईच्या सांस्कृतिक सौंदर्यामध्ये वाढ झालेली दिसून येते. आजही मुंबईच्या या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घेण्यासाठी संपूर्ण भारतातूनच नव्हे तर जगातून हजारो पर्यटक मुंबईत येतात. खरोखरच मुंबईचे हे सांस्कृतिक वैभव अद्वितीय आहे. या सांस्कृतिक घटकांचा अभ्यास या पाठामध्ये आपण करणार आहोत.

## १३.२ मुंबईतील नाट्यक्षेत्राचा विकास

१८ व्या शतकात मुंबईमध्ये नाट्यकलेचा उगम झाला. ब्रिटिशांची सत्ता मुंबईत पूर्णपणे स्थापन झाल्यानंतर त्यांनी राज्यकारभाराबरोबर आपल्या मनोरंजनाच्या दृष्टिकोनातून अनेक कार्यक्रम घ्यायला सुरवात केली. यासाठी ते मेजवानी नाच आणि नाट्य वगैरेचे कार्यक्रम घेत असत. अशाप्रकारच्या कार्यक्रमाची ओढ मुंबईकरांनाही लागली. देशीय मुंबईकरांनीही गायन, संगीत आणि नृत्य ह्या विशेष रस घेऊन ब्रिटिशांच्या करमणुकीच्या कार्यक्रमांना हजेरी लावून त्याची प्रशंसा केली.

मुंबईतील टाऊन हॉलमध्ये युरोपियन लोकांच्या करमणुकीसाठी संगीताचे व नृत्याचे अनेक कार्यक्रम त्यांच्या क्लबमार्फत होत असत. यानंतरच्या काळात मुंबईमध्ये अनेक नाट्यगृहे सुरु करण्यात आली व मुंबईमध्ये नाटकांचे प्रयोग सुरु झाले. मुंबईसह महाराष्ट्रातील अनेक मराठी कलावंत नाट्यक्षेत्राकडे वळले यातुनच मराठी नाट्यक्षेत्राचा प्रवास सुरु झाला. १९६० पर्यंत अनेक नाटके मराठी रंगभूमीवर अवतरली व महाराष्ट्राच्या भूमीने नाट्यक्षेत्रात उठावदार कामगिरी केली.

**मुंबईतील पहिले नाट्यगृह :-**

मुंबईतून मराठी नाट्यक्षेत्राची सुरुवात झाली व याचा प्रसार संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पुढच्या काळात झाला. इ.स. १७७६ मध्ये मुंबईत पहिले नाट्यगृह बॉम्बे थिएटर टाऊन हॉलच्या समोरील एलफिस्टन सर्कल जवळ सुरु झाले. या ठिकाणी मनोरंजनाचे कार्यक्रम, सभा व इतर अनेक समारंभ इंग्रज लोकांसाठी भरविले जात असत. माऊंटस्टुअर्ट एलफिस्टनने १८१९ साली या नाट्यगृहाचे नूतनीकरण केले. पुढे या नाट्यगृहाचा लिलाव करण्यात आला.

**ग्रँट रोड थिएटरची स्थापना :-**

एलफिस्टन सर्कल येथील नाट्यगृहाचे लिलाव करण्यात आल्यामुळे मुंबईमध्ये दुसरे एखादे नाट्यगृह निर्माण करण्याच्या हेतूने नाना शंकरशेठ आणि मुंबईतील इतर नामवंत मंडळीनी प्रयत्न सुरु केले. त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळे नाट्यगृहाच्या लिलावातून आलेल्या रक्कमेतून, फेब्रुवारी १८४६ मध्ये "ग्रँट रोड थिएटर" बांधण्यात आले. हे नाट्यगृह बांधण्यासाठी नाना शंकरशेठनी आपली स्वतःची जमीन देणगी म्हणून दिली. सरुवातीच्या काळात या नाट्यगृहात फक्त इंग्रजी नाटके होत असत परंतु या नाटकांस युरोपियनांबरोबरच मुंबईकरांनीही उत्तम असा प्रतिसाद दिला. रात्री ८ ते ९ च्या दरम्यान इथले खेळ सुरु होत असत. पुढे ह्या नाट्यगृहाचे बेकरीत रुपांतर झाले.

पुढे १९ व्या शतकाच्या मध्याला ग्रँट रोड थिएटरच्या मागोमाग या परिसरात अनेक नाट्यगृहे उभी राहिली. फिरत्या इंग्लिश कंपन्या येथे आपला खेळ लावीत असत. हा भाग "प्ले हाऊस" म्हणून प्रसिध्दीस आला. पंरतु भारतीयांनी यास "पिला हाऊस" म्हणून संबोधिले. ह्या भागात अनेक वेश्यागृहे असल्यामुळे या भागात चांगली माणसे फिरकेनाशी झाली आणि हा भाग बदनाम झाल्यामुळे येथील नाट्यगृह बंद झाली.

## हिंदु नाटक मंडळीचे मुंबईतील नाट्यप्रयोग :-

१८६३ साली महाराष्ट्राचे आद्यनाटककार विष्णुदास भावे आपल्या हिंदु नाटक मंडळीसह मुंबईला आले त्यांनी मुंबईत अनेक नाटके केली व मराठी रंगभूमी समृध्द केली. यापूर्वी १८४३ ते १८६३ पर्यंत ते आपली पौराणिक नाटके सांगलीमध्ये करीत असत. त्यांच्या नाटकांची भूरळ सांगली व पुण्यातील लोकांवर पडली होती. मुंबईत आल्यावर त्यांनी आपली नाटके गिरगावात सुरु केली. त्यांच्या या नाटकांना प्रतिसाद पाहून भाऊ दाजी लाड, जगन्नाथ शंकरशेट आणि जमशेटजी जीजीभाई यांनी विष्णुदासांना ग्रँटरोड थिएटरमध्ये नाटके करण्यास सांगितले विष्णुदासांनासुध्दा या नाट्यगृहाचे प्रेक्षागृह, बैठकीची व्यवस्था आवडल्यामुळे त्यांची नाटके येथे सुरु झाली. या नाट्यगृहाचे भाडे विष्णुदासांच्या आवाक्याबाहेरचे असल्यामुळे त्यांना भाऊ दाजी लाड आणि नाना शंकरशेठ यांनी आर्थिक सहकार्य केले. विष्णुदास भावे हे खऱ्या अर्थाने मुंबईमध्ये नावारुपाला आले. त्यांनी आपली नाटके मुंबईतील या प्रसिध्द नाट्यगृहात सुरु केली या नाटकास मुंबईतील पारशी, युरोपीयन आणि इतर प्रतिष्ठित मंडळीनी खूप चांगला प्रतिसाद दिला.

## गेईटी व नॉव्हेल्टी नाट्यगृहाची स्थापना :-

ग्रँट रोडच्या नाट्यगृहामध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय एतदेशीय प्रेक्षक वर्ग जाऊ लागल्यावर युरोपीय समाजाने खास त्यांच्यासाठी गेईटी नावाचे नाट्यगृह १८७९ साली सुरु केले. येथे फक्त इंग्रजी नाटके त्यांच्यासाठी होत असत. ह्या नाट्यगृहाचे पुढे कॅपिटल सिनेमागृहामध्ये रुपांतर झाले. याच दरम्यान नॉव्हेल्टी नाट्यगृहाची स्थापना झाली. ह्या नाट्यगृहातील रंगमंच तत्कालिन नाट्यगृहामध्ये सर्वात मोठा होता. या नाट्यगृहामध्ये जवळजवळ १४०० पेक्षा अधिक प्रेक्षक बसत असत. या नाट्यगृहाचे सुध्दा रुपातंर न्यू एकसेलसियर थिएटरमध्ये करण्यात आले. अशाप्रकारे मुंबईमध्ये नाटके व चित्रपट दोन्ही एकाच कालखंडात प्रसिध्दिस आले होते. या नाट्यगृहामध्ये अनेक नाटके गाजली व या नाटकांस मुंबईतील जनतेने उत्तमरितीने प्रतिसाद दिला. यामुळे मराठी व इंग्रजी रंगभूमी भरभराटीस आली.

## पारशी नाटक मंडळी :-

इंगजी व मराठी नाटक मंडळी बरोबरच मुंबईमध्ये अनेक हौशी कलामंडळे अस्तित्वात आली. दादाभाई नौरोजी, भाऊ दाजी लाड आणि मुंबईतील इतर नामवंत मंडळीनी एकत्र येऊन "पारशी थिएट्रिकल कमिटी" ची स्थापना केली. या नाटक मंडळीने ऑक्टोबर १८५३ मध्ये "रुस्तम झाबूली आणि सोहराब" नावाच्या नाटकाचा प्रयोग ग्रँट रोड थिएटरमध्ये केला.

पारशी नाटक मंडळीबरोबर इतर अनेक भाषेतील मंडळीनींही मुंबईमध्ये नाटके करायला सुरुवात केली. त्यांची नाटके मराठी हिंदी गुजराती व बंगाली भाषेमध्ये होती. १८८०

च्या दशकात ग्रँड रोड भागात नाटकांचे खेळ दाखविणारी जवळजवळ चार नाटकगृहे अस्तित्वात होता. डाह्याभाई ढोलसाठी यांनी प्रिन्सेस थिएटरमध्ये एक देशी नाटकशाळा सुरु केली. देशी नाटकाबरोबरच ग्रँट रोड नाटकगृहामध्ये परदेशी नाटकाचेसुध्दा खेळ दाखविले जात असत. १८६० मध्ये इटलीतील एका ऑपेरा कंपनीने दाखविलेल्या खेळाची मुंबईतील लोकांनी भरपूर प्रशंसा केली. याच काळात मुंबईत आलेल्या "बंगाली बाबू" या विनोदी नाटकाने रंगभूमी बरीच गाजविली. यानंतर विनोदी व हास्यप्रधान नाटकांचा काळ सुरु झाला.

**एलफिन्स्टन नाट्यपथक :-**

मुंबईतील एलफिन्स्टन महाविद्यालयातील अनेक पारशी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन एलफिन्स्टन नाट्यपथकाची स्थापना केली. या पथकातील हिरजी खंबाटा या कलाकारने केलेल्या शेक्सपियरच्या नाटकांच्या प्रयोगाने मुंबईतील प्रेक्षक भारावून गेले होते. त्याच्याबरोबर "डॅजी खाइस्ट" नावाच्या प्रसिध्द पारशी नटाने पारशी आणि गुजराती रंगभूमी आपल्या अभिनयाने गाजविली होती.

**नाटक उत्तेजक मंडळीची स्थापना :-**

मराठी, हिंदी नाटकाबरोबरच या काळात गुजराती नाटके प्रसिध्दिस आली. गुजराती रंगभूमीला विशेष स्थान प्राप्त करून देण्यात के. एन. काबरा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने गुजराती भाषेत अनेक नाटके करून गुजराती रंगभूमी समृध्द केली. त्यासाठी त्यानी १८७५ साली "नाटक उत्तेजक मंडळी" या नावाची संस्था स्थापन केली. या नाटक मंडळीतील रणछोडभाई उदयराम या लेखकाने "हरिश्चंद्र" हे नाटक रंगभूमीवर आणले. ह्या नाटकाचे जवळजवळ ११०० प्रयोग मुंबईत झाले यामुळे मुंबईमधील रंगभूमी भरभराटीस आली.

"हरिश्चंद्र" या नाटकाच्या भरघोस यशामुळे दादासाहेब फाळके यांनी आपल्या पहिल्या बोलपटासाठी हा विषय निवडला व त्यांनी "राजा हरिश्चंद्र" या भारतातील पहिल्या बोलपटाची निर्मिती केली. येथूनच मुंबईत नाटकक्षेत्रावर गदा आणणारे चलचित्रपटांचे पर्व सुरु झाले व मुंबईतील नाट्यक्षेत्राला उतरती कळा आली. "राजा हरिश्चंद्रच्या" यशामुळे मुंबईमध्ये चित्रपट युगाची सुरुवात झाली व पुढे मुंबईतील अनेक नाट्यगृहाचे रुपांतर सिनेमागृहामध्ये करण्यात आले. १९४२ पर्यंत मुंबईतील बहुतेक नाट्यगृहे संपुष्टात आली आणि या नाट्यगृहाची जागा चित्रपटगृहांनी घेतली.

**विसाव्या शतकातील नाटककार :**

यापुढील काळात म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर, राम गणेश गडकरी, वासुदेवशास्त्री खरे, माधवराव पाटणकर यांसारखे नाटककार मराठीत होऊन गेले होते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी 'वीरतनय', 'मूकनायक', 'वधूपरीक्षा', 'मतीविकार', 'प्रेमशोधन' अशी काही नाटके लिहिली; परंतु त्यांची नाटके अल्पजीवी ठरली किर्लोस्कर व देवल यांची सुगम व प्रसन्न भाषाशैली कोल्हटकरांकडे नव्हती. तसेच त्यांच्या नाटकात कल्पनारम्यतेवर जास्त भर होता; त्यामुळे काही काळ ती लोकप्रिय ठरली तरी वाङ्मयीनदृष्ट्या त्यांना फारसे महत्त्व दिले गेले नाही.

कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांनी मात्र किर्लोस्कर व देवल यांच्याप्रमाणे मराठी नाट्यसृष्टीत आपलेही स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांची 'कांचनगडची मोहना', 'सवाई माधवरावाचा मृत्यु', 'कीचकवध', 'भाऊबंदकी', 'मानापमान', 'विद्याहरण', 'स्वयंवर' ही नाटके रंगभूमीवर खूपच गाजली. खाडीलकरांप्रमाणेच राम गणेश गडकरी यांनीही नाटकाच्या क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले. त्यांची 'प्रेमसंन्यास', 'पुण्यप्रभाव', 'भावबंधन', 'एकच प्याला' ही नाटके खूप लोकप्रिय झाली. गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' ने तर मराठी नाट्यसृष्टीत वेगळा इतिहास घडविला.

इ.स. १९२० नंतर पुढे आलेल्या नाटककारांमध्ये भार्गवराम विठ्ठल वरेरकर, माधव नारायण जोशी, सदाशिव अनंत शुक्ल, गणेश कृष्णशास्त्री फाटक, वि.सी. गुर्जर, वि.चि. बेडेकर, इत्यादींचा समावेश होतो. भा.वि.तथा मामा वरेराकर यांनी 'कुंजविहारी', 'हाच मुलाचा बाप', 'संन्याशाचा संसार', 'सत्तेचे गुलाम', 'तुरुंगाच्या दारात', 'सोन्याचा कळस', अशी बरीच नाटके लिहिली. त्यापैकी काही नाटके लोकप्रिय झाली. वरेराकरांनी आपल्या नाटकांतून सामाजिक विषय हाताळले. स.अ. शुक्ल यांनी 'सौभाग्यलक्ष्मी', 'लोकसिंहासन', 'तुलसीदास' इत्यादी नाटके लिहिली. वि.चिं. बेडेकर यांनी लिहिलेली 'ब्रम्हकुमारी', नरो वा कुंजरो वा, वाजे पाऊल आपुले, ही नाटके बरीच वैशिष्ट्यपूर्ण ठरली. वि.स.खांडेकर व ना. सी. फडके या साहित्यकांनीही काही नाटके लिहिली होती; परंतु ती म्हणावी तितकी गाजली नाहीत.

**प्रल्हाद केशव अत्रे यांचे नाट्यभूमीस योगदान :**

या सुमारास देशात चित्रपटाचे युग सुरु झाले. भारतीय चित्रपटसृष्टीची सुरुवात महाराष्ट्रात झाली; त्यामुळे चित्रपटाचे समाजजीवनावरील परिणाम प्रथमतः येथेच जाणवू लागले. लोकांना या नव्या व अनोख्या माध्यमाचे खूपच आकर्षण वाटले. मराठी नाटकांचा प्रेक्षकवर्ग चित्रपटाकडे वळला; त्यामुळे मराठी नाटकांना उतरती कळा लागली. मराठी नाट्यसृष्टी फार मोठ्या संकटात सापडली. या अडचणीच्या परिस्थितीतून तिला बाहेर काढण्याचे कार्य आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी केले. त्यांनी लिहिलेले 'साष्टांग नमस्कार', हे पहिलेच नाटक अत्यंत लोकप्रिय ठरले त्यानंतर त्यांनी 'भ्रमाचा भोपळा', 'लग्नाची बेडी', 'पापाचा कावळा', 'पाणिग्रहण', 'कवडीचुंबक', 'घराबाहेर', 'उद्याचा संसार', 'जग काय म्हणले?' अशी एकापाठोपाठ एक नाटके लिहीली. यांतील बहुतेक सर्व नाटके रंगभूमीवर चांगलीच यशस्वी ठरली. अशा प्रकारे मराठी रंगभूमी गाजविल्यानंतर अत्रे स्वेच्छेने नाट्यक्षेत्रापासून दूर झाले. आणि ते इतर क्षेत्रांत कर्तृत्व गाजवू लागले. बऱ्याच वर्षाच्या कालावधीनंतर त्यांनी 'तो मी नव्हेच' या नाटकाद्वारे मराठी रंगभूमीवर पुन्हा एकदा दणक्यात पुनरागमन केले. त्यानंतर त्यांनी 'बुवा तेथे बाया', 'मी मंत्री झालो' इत्यादी नाटके लिहीली.

स्वातंत्र्य काळात अत्र्यांपाठोपाठ मराठी रगंभूमी गाजविणारे आणखी एक नाटककार मोतीराम गजानन रांगणेकर हे होत. त्यांनी 'आशीर्वाद', 'कुलवधू', 'नंदनवन', 'कन्यादान', 'अलंकार', 'माझे घर', 'वहिनी', 'माहेर' इत्यादी नाटके लिहून आपल्या नाट्यनिकेतन या संस्थेमार्फत ती रंगभूमीवर आणली. अनंत काणेकर यांनीही काही नाटके लिहिली होती. अशाप्रकारे मुंबईची संस्कृती समृद्ध करण्यात नाट्यक्षेत्राने मोलाची कामगिरी केली.

**आपली प्रगती तपासा :**

**प्र.** मुंबईतील नाट्यक्षेत्राचा विकास थोडक्यात सांगा.

---

---

---

## १३.३ मुंबईतील चित्रपट क्षेत्राचा विकास

### मुंबईतील चित्रपटांची पार्श्वभूमी :

भारतातील पहिला परदेशी चित्रपट मुंबईत जुलै १८९६ साली वॅटसन हॉटेलात प्रदर्शित करण्यात आला. या चित्रपटातून प्रेरणा घेऊन मुंबईतील अनेक लोक चित्रपटक्षेत्राकडे वळले. मुंबईत पहिला मराठी लघुचित्रपट हरिभाऊ भाटवडेकर यांनी एका कुस्तीच्या सामन्यावर बनविला. भारतातील पहिला कथा-चित्रपट मराठीत दादासाहेब तोरणे यांनी बनवला. भारतीय चित्रपटसृष्टीचे पितामह दादासाहेब फाळके यांनी आपला पहिला बोलपट "राजा हरिश्चंद्र" प्रदर्शित केला. त्यांनी हा चित्रपट बैलगाडीत प्रोजेक्टर घालून खेड्यापर्यंत पोहोचविला. हा चित्रपट मुंबईतील प्रिन्सेस स्ट्रीटवर कॉरोनेशन सिनेमाटोग्राफ थिएटर या ठिकाणी दाखवला जात होता. या चित्रपटाने मुंबईकरांना चित्रपट पाहण्याची सवय लावली आणि मुंबईपासून चित्रपट युग सुरु झाले. या चित्रपटाच्या लोकप्रियतेमुळे नाट्यक्षेत्रास उतरती कळा आली आणि अनेक नाट्यगृहाची चित्रपटगृहे झाली.

महाराष्ट्रात मुंबईमध्ये चित्रपट व्यवसायाची सुरुवात झाली. "हरिश्चंद्र" या पौराणिक नाटकाच्या कथेवर आधारित दादासाहेब फाळके यांनी "राजा हरिश्चंद्र" हा पहिला बोलपट निर्मित केला. येथून पुढे मुंबईत नाट्यक्षेत्राच्या ऐवजी बोलपट व चित्रपटांना लोकांनी पसंती दिली. "राजा हरिश्चंद्र" या नाटकापासून भारतामध्ये चलचित्रपटांचे नवे पर्व सुरु झाले. यानंतर चित्रपटक्षेत्राचा विकास झपाट्याने होत गेला. मुंबईमुळे चित्रपटव्यवसाय खऱ्या अर्थाने नावारुपाला आला. पुढच्या काळात मराठीसह हिंदी भाषेमध्ये अनेक चित्रपट आले व या चित्रपटांमुळे मुंबई ही चित्रपटमय सृष्टि बनून गेली. नाट्यगृहाची जागा चित्रपटगृहांनी घेतली. १९४२ पर्यंत मुंबईतील बहुतेक नाट्यगृहे संपुष्टात आली. हिंदी चित्रपटसृष्टीमुळे मुंबई भरभराटीस आली. चित्रपटामूळे अनेकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे या व्यवसायात रोजगार मिळाला. व त्यामुळे मुंबईचा विकास झाला.

चित्रपटसृष्टीत मुंबई नेहमीच आघाडीवर राहिली. हिंदी भाषेतील सुमारे ऐंशी टक्के चित्रपट मुंबईतच निर्माण केले जातात. मुंबईमध्ये हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर पसरलेला होता असे दिसून येते. १९६० पर्यंत मुंबईमध्ये अनेक मराठी, हिंदी, गुजराती, पंजाबी, बंगाली इ. भाषेतील चित्रपट प्रदर्शित झाले. यामुळेच भारतीय चित्रपटसृष्टी समृध्द करण्यात मुंबईने खूप मोठे योगदान दिले आहे.

मुंबईत चित्रपटयुग आणण्याचे श्रेय दादासाहेब फाळके यांनाच जाते त्यामुळे भारत सरकारने त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी भारतीय चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च मानाचा पुरस्कार "दादासाहेब फाळके पारितोषिके" या नावाने चित्रपट क्षेत्रात अतुलनीय आणि भरीव असे कार्य करणाऱ्या व्यक्तीस दिले जाते.

**दादासाहेब उर्फ धुंडिराज गोविंद फाळके :**

चित्रपटकलेत महाराष्ट्राच्या कलाकारांनी आपली छाप पाडली आहे. भारतीय चित्रपटसृष्टीची पायाभरणी महाराष्ट्रातच झाली. दादासाहेब उर्फ धुंडिराज गोविंद फाळके हे भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक मानले जातात. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पाश्चात्य चित्रपट भारतात येऊ लागले. इ.स. १९११ मध्ये दादासाहेबांच्या पाहण्यात 'दि लाईफ ऑफ ख्राईस्ट' या नावाच्या मूकपट आला. त्यावरुन प्रेरणा घेऊन त्यांनी स्वतःचा चित्रपट व्यवसाय सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्याची पूर्वतयारी म्हणून त्यांनी प्रथम त्यासंबंधीची आवश्यक तो अभ्यास केला. त्याकरिता लागणारे चित्रपटविषयक वाङ्मय त्यांनी परदेशातून मागवून घेतले. त्यानंतर लवकरच इंग्लंडला जाऊन चित्रपटनिर्मितीसाठी लागणारी यंत्रसामग्री आणि अन्य साहित्य यांची खरेदी करुन ते भारतात वापरले.

**भारतातील पहिला चित्रपट : राजा हरिश्चंद्र :**

दादासाहेब फाळकेंनी इ.स. १९१२ मध्ये प्रथम 'रोपट्यांची वाढ' हा लघुपट तयार केला. त्यानंतर ते मोठ्या चित्रपटनिर्मितीकडे वळले. त्यांनी तयार केलेला पहिला चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' हा होता. इ.स. १९१३ मध्ये तो मुंबईच्या कोरोनेशन हॉलमध्ये प्रदर्शित केला गेला. हाच भारतात तयार झालेला पहिला चित्रपट होय. या नावीन्यपूर्ण कलाप्रकाराचे लोकांना कुतूहल व आकर्षण वाटणे स्वाभाविक होते. परिणामी फाळकेंच्या पहिल्या चित्रपटाला मोठी लोकप्रियता मिळाली. त्यानंतर त्यांनी मोहिनी-भस्मासूर, सत्यवान-सावित्री, लंकादहन, श्रीकृष्ण जन्म, कालियामर्दन इत्यादी चित्रपट काढले.

**बाबुराव पेंटर :**

चित्रपटसृष्टीत दादासाहेब फाळके यांच्याइतकेच मोठे कर्तृत्व गाजविलेले दुसरे महाराष्ट्रीय कलावंत बाबुराव पेंटर हे होते. त्यांनी इ.स. १९१९ मध्ये कोल्हापूर येथे महाराष्ट्र फिल्म कंपनी या नावाची चित्रपटनिर्मिती संस्था स्थापन केली. 'सैरंध्री' हा कंपनीचा पहिला चित्रपट होय. त्यानंतर आणखी काही पौराणिक चित्रपट त्यांनी काढले. इ.स. १९२८ मध्ये त्यांनी 'सावकारी पाश' या नावाचा सामाजिक चित्रपटही काढला आणि चित्रपटाद्वारे समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.

**भारतातील बोलपटाची सुरुवात :**

सुरुवातीच्या काळातील हे सर्व चित्रपट अर्थातच मूकपट होते. ही कला त्यावेळी प्राथमिक अस्वस्थेतच होती; परंतु एकदा चित्रपटनिर्मितीचे तंत्रज्ञान अवगत झाल्यावर मूकपट ते बोलपट अशा प्रगतीला फार वेळ लागला नाही. 'आलमआरा' हा भारतात तयार झालेला पहिला बोलपट होय; परंतु तो हिंदी भाषेत काढण्यात आला होता. मराठीतील पहिला बोलपट 'अयोध्येचा राजा' हा होय. प्रभात कंपनीने काढलेला हा बोलपट इ.स. १९३२ मध्य मुंबईचा मॅजेस्टिक

थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. प्रभात कंपनीची स्थापना व्ही. शांताराम, केशवराव धायबर, विष्णुपंत दामले व एस. फत्तेलाल या मराठी कलाकारांनी केली होती. लवकरच तिची ख्याती संपूर्ण भारतभर पसरली. प्रभात कंपनीने त्यानंतर 'धर्मात्मा', 'अमर ज्योति', 'संत तुकाराम', 'कुंकु', 'माणुस', 'शेजारी' असे एकापेक्षा एक सरस चित्रपट काढले.

चित्रपटसृष्टीच्या सुरुवातीच्या काळात आणखीही अनेक मराठी कलाकारांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. त्यामध्ये भालजी पेंढारकर, बाबुराव पेंटर, मास्टर विनायक, आचार्य अत्रे यांचा उल्लेख करता येईल. पडद्यावरील कलाकारांपैकी बाबुराव पेंढारकर, विष्णुपंत पागनीस, केशवराव दाते, शाहू मोडक, दामूअण्णा मालवणकर, गजानन जहागिरदार, शांता आपटे, शांता हुबळीकर, मीनाक्षी यांनी आपला विशेष प्रभाव पाडला होता. या काळात हिंदुस्थान सिनेमा फिल्म कंपनी, महाराष्ट्र फिल्म कंपनी, प्रभात फिल्म कंपनी, हंस चित्र, नवयुग फिल्म कंपनी, प्रभाकर पिक्चर्स, सरस्वती सिनेटोन, अत्रे पिक्चर्स इत्यादी चित्रपटनिर्मिती संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या. या काळातील गाजलेले आणखी काही मराठी चित्रपट पुढीलप्रमाणे - 'छाया', 'देवता', 'सुखाचा शोध', 'ब्रम्हचारी', 'ब्रँडीची बाटली', 'अर्धांगी', 'रामशास्त्री', 'रामराज्य', 'पायाची दासी' इत्यादी.

**मुंबईतील चित्रपटगृहे :**

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मुंबईमध्ये अनेक चित्रपटगृहांचा उदय झाला. मराठी व हिंदी चित्रपटांच्या लोकप्रियतेमुळे या काळात अनेक चित्रपटगृहे बांधण्यात आली. मुंबईतील ग्रँटरोड हा भाग चित्रपटगृहांसाठी प्रसिध्द होता. या भागात मुंबईतील सर्वात जास्त सिनेमागृहे बांधण्यात आली. ऑपेरा हाऊस ते बेलासिस रोड हा भाग मनोरंजन नगरी म्हणून प्रसिध्द झाला. ऑपेरा हाऊस हे सिनेमागृह १९१० मध्ये बांधण्यात आले. ह्या वास्तुची रचना ग्रीक शैलीची असून वरचा घुमट आणि आतील प्रेक्षागार यांच्या सजावटीसाठी उत्तम कारागिरांना पाचारण करण्यात आले होते. ह्या सिनेमागृहाच्या भिंतीवर तत्कालीन युरोपीय कवी, लेखक आणि संगीतकार यांच्या तसबिरी रंगविलेल्या होत्या. ह्या सिनेमागृहाच्या सुशोभिकरणासाठी १९१५ मध्ये जवळजवळ पाच लाख रुपये खर्च करण्यात आले यावरुनच त्या काळातसुध्दा चित्रपटगृहाचे महत्व किती होते ते स्पष्ट होते.

चित्रपटयुग मुंबईत सुरु झाल्यामुळे मुंबईतील अनेक नाट्यगृहांचे रुपांतर सिनेमागृहात (थिएटर) मध्ये करण्यात आले.चित्रपटांची लोकप्रियता मुंबईत दिवसेंदिवस वाढत होती. इ.स.१८७९ बांधण्यात आलेला गेइटी नावाच्या नाट्यगृहाचे रुपांतर सिनेमागृह होय. पुढे नॉव्हेल्टी या नाट्यगृहाचे रुपांतर एक्सेलसियर थिएटरमध्ये करण्यात आले याठिकाणी जवळजवळ १४०० प्रेक्षक बसत असत. अशाप्रकारे १९४२ पर्यंत मुंबईतील बहुतेक नाट्यगृहे संपुष्टात आली. यावरुनच या काळातील मराठी व हिंदी चित्रपटांची किती लोकप्रियता असेल याची प्रचिती येते.

**भारतीय चित्रपटसृष्टीचे केंद्र मुंबई :**

भारतीय चलचित्रपटांच्या इतिहासात मुंबई हे हिंदी चित्रपट निर्मितीचे केंद्र बनले. या ठिकाणी मराठी, हिंदी व इतर अनेक भाषेमध्ये चित्रपट प्रदर्शित झाले. कलकत्ता व मद्रास ही शहरे प्रादेशिक चित्रपटनिर्मितीची केंद्रे बनली. मुंबईकडे आकृष्ट होऊन अनेक लोक संपूर्ण

भारतातून येथे आले व त्यांनी आपली नशीब आजमावले म्हणूनच मुंबईच्या चित्रपटसृष्टीला "सपनोंका सौदागर" संबोधिले जाते. "मायानगरी" "स्वप्ननगरी" ह्या स्वप्ननगरीमध्ये अनेकांना पैसा, प्रसिध्दी व नाव मिळते. या चित्रपटव्यवसायामध्ये अनेकांना विविध पध्दतीमध्ये रोजगार उपलब्ध होतो यामध्ये कलाकार, संगीतकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञानाशी संबंधित व्यक्ती आणि इतरांचा समावेश होतो. मुंबईतील चित्रपटसृष्टीत सर्वात जास्त पैसा आणि प्रसिध्दी मिळते म्हणूनच मुंबईची चित्रपटसृष्टी ही भारताची बॉलिवुड मानली जाते.

**आपली प्रगती तपासा :**

**प्र.** मुंबईतील चित्रपटक्षेत्राचा विकास सांगा.

---

---

---

## १३.४ मुंबईतील स्थापत्याचा विकास

मुंबईच्या संस्कृतीतील प्रमुख घटक म्हणजे मुंबईचे वास्तुवैभव. मुंबईमध्ये कला व स्थापत्यक्षेत्राचा उदय मोठ्या प्रमाणात झाल्याचे तेथील विविध प्रकारच्या वास्तूंमुळे दिसून येते. मुंबईमध्ये विविध प्रकारच्या शैलीचे उत्कृष्ट नमुने आपणांस पहावयास मिळतात त्यामुळे मुंबई ही विविध वास्तूंनी नटलेली दिसते. मुंबईमध्ये ब्रिटिश कालखंडापासून ते आधुनिक कालखंडापर्यंतच्या असंख्य इमारती आढळतात. या इमारतींनी मुंबईला मुंबईपण दिले आहे असे मत यशवंत रायकर व्यक्त करतात. महाराष्ट्राच्या संस्कृतीला अधिक समृध्द करण्याचे श्रेय मुंबईतील स्थापत्याला जाते. या ठिकाणी अनेक प्रकारच्या व विविध शैलींच्या इमारती, किल्ले, मंदिरे, लेण्या विहारे धर्मस्थळे, ग्रंथालये, हॉटेल्स, वस्तुसंग्रहालये शासकीय व खाजगी इमारती इत्यादी सांस्कृतिक वारसा सापडतो.

मुंबईमध्ये वसाहतकालीन वास्तुशैली बरोबरच भारतीय आधुनिक वास्तुशास्त्राचे अप्रतिम नमुने बघायला मिळतात. मुंबईमधील स्थापत्याचा विकास कशाप्रकारे झाला ते आपण पाहुया.

### १८४८ च्या पूर्वीचे मुंबईतील स्थापत्य :

एकोणिसाव्या शतकाच्या पुर्वार्धात मुंबईमध्ये अनेक प्रेक्षणीय इमारतींचे बांधकाम झाले त्यामध्ये सरकारी टाकसाळ आणि टाऊन हॉल या दोन प्रमुख वास्तूंचा समावेश होतो. या इमारतींचे बांधकाम पुनरुज्जीवीत ग्रीक-रोमन शैलीत म्हणजेच निओ-क्लासिकल शैलीत करण्यात आले. या शैलीची वैशिष्ट्ये म्हणजे संगमरवरी बांधकाम ठसठसीत स्तंभ बेताची शिल्पे, मनोऱ्यांचा अभाव इत्यादी होत. या इमारती उदात्त भव्य प्रमाणबध्द व शांत भासतात. इंग्रजी राज्य हा संदेश घोषित करण्यासाठी सोयीस्कर म्हणून या शैलींची निवड झाली. अशाप्रकारच्या बांधकामामुळे भारतीय इंग्रजांचे चाहते बनले.

टाऊन हॉलचे बांधकाम १८२० मध्ये झाले आणि १८३३ मध्ये ही वास्तू पूर्ण तयार झाली. इंग्रजांच्या इमारती म्हणजे त्यांच्या साम्राज्यांची प्रतिके होती. दोनशे साठ फूट लांब व १०० फूट रुंद अशी ही दुमजली इमारत नव्या साम्राज्याचे प्रतिक होती. ही इमारत त्यांचे सामर्थ्य शांतता व सुव्यवस्थेचा संदेश देत होती. तीस पायऱ्यांचा भव्य सोपान व आठ स्तंभाचा आकर्षक मुखडा धारण करणारी इतकी भव्य उदात्त इमारत आजही मुंबईत दुसरी नाही. आधुनिक मुंबई घडविण्यात तिने फार मोठी भूमिका बजावली हे तिच्या वापरावरुन दिसून येते.

सुरुवातीपासून मुंबईच्या सार्वजनिक हितासाठी व गरजांसाठी टाऊन हॉलचा वापर होत होता. ही जागा पुढे रॉयल एशियाटिक सोसायटीने मिळविली. या हॉलचा वापर एलफिन्स्टन कॉलेजने, मुंबई विद्यापीठाने, मुंबई कायदेमंडळाने व मुंबई नगरपालिकेने विविध लोकोपयोगी कामासाठी केल्याचे दिसून येते.

आज या ठिकाणी एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई आणि सेन्ट्रल लायब्ररी आहे. आजही येथील दरबार हॉल व एशियाटिक सोसायटीची लायब्ररी प्रशस्त अशा स्वरुपाची आहे. टाऊन हॉलची इमारत मुंबईतील वास्तूकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखला जातो.

**मुंबईतील गॉथिक शैलीचे स्थापत्य :**

१८५७ नंतर मुंबईसह संपूर्ण भारतावर इंग्रजांनी आपला प्रत्यक्ष अंमल सुरु केला. त्यांनी १८५८ नंतर मुंबईसाठी इंग्लिश राष्ट्रीय गॉथिक वास्तूशैलीचा स्विकार केला. युरोपातील गॉथिक शैलीचा वापर मुंबईसाठी सोयीस्कर ठरला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुंबईत गॉथिक शैलीच्या अनेक इमारती उभ्या राहिल्या. या शैलीच्या इमारतीवर व्हिक्टोरियन युगाचा प्रभाव ठळकपणे दिसून येतो. १८८० ते १९०० या कालखंडात मुंबईमध्ये अनेक प्रशस्त अशा वेनेशियन गोथिक शैलीच्या इमारती बांधलेल्या दिसून येतात ज्यामुळे आधुनिक मुंबईच्या स्थापत्यामध्ये भर पडलेली दिसून येते. अमेरीकन यादवी युध्दामुळे (१८६०-१८६५) झालेल्या कापसाच्या व्यापारातील वाढीमुळे मुंबईची आर्थिक भरभराट झाली. मुंबईमध्ये एक श्रीमंताचा वर्ग उदयास आला आणि त्यामुळे मुंबईतील बांधकाम व्यवसायाला गती मिळाली. या काळात अनेक व्यापारिक आणि प्रशासकीय इमारती बांधण्यात आल्या, ज्या मुंबईच्या स्थापत्यशैलीचे उत्कृष्ट नमुने म्हणून ओळखले जातात.

मुंबईमधील गॉथिक शैलीच्या अनेक वास्तू आहेत. या शैलींची वैशिष्ट्ये टोकदार कमानी, बारीक उंच मनोरे, नाजूक स्तंभ पातळ भिंती, अरुंद उंच तावदानांच्या भरपूर खिडक्या वास्तूच्या मध्यवर्ती भागावर उंच उतरते छप्पर किंवा घुमट, दगडी कोरीव शिल्पांची विपुलता ओतीव लोखंडी नक्षीकाम, ऐसपैस रुंद व्हरांडे इत्यादी. ही शैली मुंबईसाठी उपयोगी ठरली कारण इटालियन मार्बलच्या जागी स्थानिक बांधकाम सामग्रीच्या उपयोग झाल्याने गॉथिक इमारती ग्रीक रोमन वास्तुपेक्षा स्वस्त पडल्या. यामुळे मुंबईमध्ये या शैलीच्या अनेक वास्तू दिसतात.

मुंबईत गॉथिक शैलीच्या इमारती बांधताना वास्तुविशारदांनी अनेक प्रयोग केल्याचे दिसून येते त्यामुळे प्रत्येक इमारतीचे वेगळेपण जाणवते. आरंभीच्या काळात बांधलेल्या इमारतीमध्ये क्रॉफर्ड मार्केट (१८६९) जुने सेक्रेटरिएट (१८६७-१८७४) सेंट्रल टेलिग्राफ ऑफिस (१८३९-१८७२), पी. डब्लू. डी बिल्डिंग (१८६९-१८७२) रॉयल अल्फेड सेलर्स होम पोलिस मुख्यालय (१८७२-७६) व हायकोर्ट (१८७१-७९) यांचा समावेश होतो.

**मुंबईतील स्थापत्याचे उत्कृष्ट नमुने :-**

मुंबईमध्ये विविध प्रकारच्या शैलीचे उत्कृष्ट नमुने पहायला मिळतात त्यातील काही पुढीलप्रमाणे -

**१) मुंबई विद्यापीठातील इमारती :**

१९ व्या शतकातील उत्कृष्ट कलाकृतीमध्ये मुंबई विद्यापीठ व तेथील विविध वास्तूंचा समावेश होतो. श्रेष्ठ वास्तुविशारद सर गिल्बर्ट स्कॉट यांनी मुंबई विद्यापीठाचे ग्रंथालय राजाबाई टॉवर व कॉन्वोकेशन हॉल (दिक्षांत सभागृह) यांचे आराखडे तयार केले. ते भारतात कधीच आले नाहीत तरीसुध्दा इंग्लंडमध्ये बसून त्यांनी आराखडे तयार केले. राजाबाई टॉवर हे मुंबईतील त्या काळची सर्वात उंच इमारत होती. या विद्यापिठातील टॉवरसाठी प्रेमचंद रॉयचंद यांनी आर्थिक सहकार्य दिल्यामुळे त्यांच्या आईचे म्हणजेच राजाबाईंचे नाव या टॉवरला देण्यात आले. विद्यापीठातील या तिन्ही इमारती फ्रेंच ख्रिस्ती गॉथिक शैलीनुसार १८७४ ते १८७८ या काळात बांधण्यात आल्या.

**२) व्हिक्टोरिया टर्मिनस (आताचे छत्रपती शिवाजी टर्मिनस):-**

व्हिक्टोरिया टर्मिनस म्हणजे आजचे छत्रपती शिवाजी टर्मिनस ही वास्तू ब्रिटिश सत्तेचा कळस दर्शविते. ही वास्तू म्हणजे मुंबई वैभव होय. फ्रेड्रिक विल्यम स्टीव्हन्स यांनी तिचा आराखडा तयार केला. या वास्तुचे १८७८ मध्ये बांधकामास सुरवात होऊन १८८७ साली विक्टोरिया राणीच्या ज्युबिली वर्षात पूर्ण झाले. या वास्तुची लांबी १५०० फूट आणि उंची १६० फूट असून नक्षीकाम, शिल्पे यांची विपुलता तसेच काचा, दगड व टाईल्सद्वारे साधलेली रंगसंगतीमुळे ही वास्तू उठावदार दिसते.

या वास्तूचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे घुमट असलेली मुंबईतील ही पहिली गॉथिक इमारत होय. या घुमटावर प्रगतीच्या देवतेची १४ फूट उंच मूर्ती आहे. जगातील सर्वोत्तम रेल्वे स्थानकामध्ये त्या टर्मिनसची गणना केली जाते. या वास्तुच्या वैभवामुळे या वास्तूस युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केले आहे.

**३) GPO (जनरल पोस्ट ऑफिस) :**

मुंबई हे ब्रिटिश साम्राज्याचे प्रमुख बंदर असल्यामुळे मुंबई मधील GPO हे देशाचे सर्वात मोठे टपाल केंद्र बनले होते. येथील इमारत ही इंडो-सारासेनिक शैलीची असून यावर भारतीय इस्लामी शैलीचा प्रभाव दिसून येतो. कुर्ला व धरणगड येथील दगड वापरून ही प्रशस्त अशी इमारत बांधण्यात आली आहे. या इमारतीतील मध्यवर्ती हॉल घुमटाएवढा मोठा आहे. येथील भल्य घुमट भारतीय स्थापत्यशैलीचा उत्कृष्ट नमुना आहे. या इमारतीवर हुमायूनची कबर व विजापूरचा घोलघुमट यांचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे मुंबईमध्ये ख्रिस्त भारतीय शैली निर्माण झालेली होती. या शैलीतील इमारतीचा आराखडा प्रसिध्द स्थापत्य शास्त्रज्ञ जॉर्ज ब्रिटेट यांनी रेखाटला आहे. त्यांनीच प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम (छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय) आणि गेट वे ऑफ इंडियाचे रेखाटन केलेले आहे.

**४) मुंबई महानगर पालिकेची इमारत :-**

मुंबईतील वास्तुवैभवामध्ये मुंबई महानगरपालिकेची इमारत अत्यंत उत्कृष्ट मानली जाते कारण या इमारतीमध्ये आपल्याला इटालियन गॉथिक व भारतीय इस्लामी शैलीचा संगम आढळतो. या इमारतीचा आराखडा स्टिव्हनसन यांनी तयार केला. ही इमारत १८८३ ते १८९३

या काळात बांधलेली आहे. या इमारतीचे वैशिष्ट्य म्हणजे येथील दरबार हॉल, इमारतीच्या बाहेरच्या बाजूवरील भारतीय प्राण्यांची आणि पक्ष्यांची अप्रतिम शिल्पे. आणि इमारतीचे उत्कृष्ट घुमट. ही संपूर्ण इमारत जवळजवळ २३५ फुटाच्या उत्कृष्ट घुमटाने सुंदर झालेली आहे.

**५) ताजमहल हॉटेलची इमारत :**

ताजमहल हॉटेलची इमारत म्हणजे मुंबईच्या वास्तुकलेचा उत्कृष्ठ नमुना होय. ही इमारत म्हणजे मुंबईच्या अभिमानाचे स्थान आहे. विल्यम चेंबर्स या आर्किटेकने या वास्तूचा आराखडा बनवला. ही इमारत १९०३ मध्ये पूर्ण झाली. हे हॉटेल जमशेटजी टाटा यांनी बांधून घेतले होते. ब्रिटीशांची स्थापत्यशैली वापरुनच टाटा यांनी हे हॉटेल बांधले. मुंबईत प्रवेश केल्यावर गेट वे ऑफ इंडियाच्या बाजूला हे हॉटेल दिमाख्यात उभे आहे. या हॉटेलास ताज मासिकात स्थान मिळाल्याने या वास्तूस अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे.

**६) गेटवे ऑफ इंडिया :-**

मुंबईच्या वास्तुवैभवामध्ये गेट वे ऑफ इंडियाचे खूप महत्त्वपूर्ण स्थान आहे. या वास्तूची उभारणी अपोलो बंदर या ठिकाणी केली आहे. मुंबईचा आंतरराष्ट्रीय व्यापार येथूनचे होत असे. या समुद्राच्या मार्गाने मुंबईचा व्यापार होत असे. तसेच अनेक सैनिक व व्यापारी येथूनच परदेशी जात असत जेव्हा १९११ मध्ये इंग्लडचा राजा पंचम जॉर्ज भारतभेटीस आला त्यावेळेस त्याच्या स्वागतासाठी याच ठिकाणी मंगोल शैलीतील मोठा शामियाना उभारण्यात आला होता. ते इंग्लंडला परत गेल्यावर त्यांची भेटीची आठवण रहावी यासाठी याच ठिकाणी गेटवे ऑफ इंडियाची इमारत बांधण्यात आली. या इमारतीचे डिझाइन मुंबई सरकारमधील प्रमुख स्थापत्य विशारद जॉर्ज विटेट यांनी तयार केले. या वास्तूचे बांधकाम १९२७ मध्ये पूर्ण झाले. या वास्तुची शैली पूर्णपणे भारतीय होती. १६ व्या शतकातील गुजरातमधील स्थापत्यशैलीच्या आधारावर या ठिकाणी पिवळ्या बेसॉल्ट खडकाचा उपयोग करून उत्कृष्टरित्या येथील घुमटाची निर्मिती करण्यात आली. गुजरातच्या मिश्र इस्लामी शैलीच्या निवडीमुळे ही वास्तु सुरेख दिसते त्यात इस्लामी कमानी, घुमट व देवळांची शिकरे यांचा संगम आढळतो. आजही अनेक पर्यटक ही वास्तु बघण्यास आवर्जून येतात. मुंबईच्या इतिहासाची साक्ष जणू ही इमारत आपल्याला देते.

**७) पश्चिम रेल्वेच्या मुख्यालयाची इमारत :-**

बी. ॲन्ड सी. आय. म्हणजेच पश्चिम रेल्वेच्या मुख्यालयाची इमारत गॉथिक शैलीत बांधण्यात आली. या इमारतीचा आराखडा फेड्रिक विल्यम स्टीव्हन्सन यांनी तयार केला. ताजमहालसारख्या घुमटाची व मनोरेवजा छत्र्यांची रेलचेल तसेच गॉथिक व रोमन कमानींची गर्दी यामुळे शैलींची एक खिचडी येथे तयार झाली. यानंतर गॉथिक शैली मागे पडली. या इमारतीचे बांधकाम १८९६ मध्ये झाले.

**८) प्रिन्स ऑफ वेल्स वस्तुसंग्रहालय (आताचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय):-**

प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम म्हणजेच आताचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय होय. या इमारतीचा आराखडा प्रसिध्द स्थापत्यविशारद जॉर्ज विटेट यांनी तयार केला. हे म्युझियम विजापूरच्या धर्तीवर बांधले गेले. या इमारतीचा वापर सुरवातीला पहिल्या महायुध्दाच्या

काळात शस्त्रागार व इंग्रजाचे लष्करी केंद्र म्हणून करण्यात आले होते. युध्दानंतर या इमारतीचे रुपांतर वस्तुसंग्रहालयामध्ये करण्यात आले. ही वास्तू खूप देखणी आहे. येथील घुमट हा विजापूरच्या गोलघुमटासारखाच दिसतो. म्हणूनच या मुंबईतील या इमारतीमध्ये विजापूरच्या शैलीचे प्रतिबिंब दिसते.

**९) व्हिक्टोरिया ॲन्ड अल्बर्ट म्युझियम (आताचे डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियम) :**

व्हिक्टोरिया ॲन्ड अल्बर्ट म्युझियम हे मुंबईतील सर्वात पहिले म्युझियम आहे. आता या म्युझियमचे नाव डॉ. भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहालय असे आहे. ही वास्तू इटालियन शैलीत आहे. मुंबईचे तत्कालिन गव्हर्नर लॉर्ड एलफिन्सटनच्या काळात गव्हर्नमेंट सेंट्रल म्युझियमची स्थापना झाली व डॉ. ब्युस्ट यांची कयुरेटर म्हणून नेमणूक करण्यात आली. व्हिक्टोरिया राणीच्या सन्मानार्थ म्युझियम उभारण्यासाठी मुंबईतील अनेकांनी पुढाकार घेतला. त्यामध्ये नाना शंकरशेठ व भाऊ दाजी लाड अग्रेसर होते. त्यांच्या अथक प्रयत्नामुळे व आर्थिक सहकार्यामुळे या म्युझियमचे काम १८६२ साली सुरु झाले व १८७२ साली उद्घाटन झाले. या काळात जॉर्ज बर्डवुड हे कयुरेटर होते. विल्यम ट्रसी यांनी म्युझियमचे डिझाईन तयार केले. सुरुवातीला ही इमारत १८० × ८० फूट इटालियन शैलीची होती परंतु नंतर तिच्यात व्हिक्टोरियन गॉथिक पध्दतीचे बदल करण्यात आले.

या वस्तुसंग्रहालयात त्या काळातील मुंबइचे नकाशे, मुंबईतील विविध जाती जमातीचे वर्णन वत्याचे व्यवसाय त्यांनी तयार केलेल्या वस्तू इत्यादींचा समावेश होता. १९८५ साली या वस्तु संग्रहालयाचे नाव डॉ. भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहालय असे करण्यात आले कारण त्यांनी या वस्तु संग्रहालयाच्या स्थापनेत विशेष रस घेऊन पुढाकार घेतला होता. मुंबईतील पहिले म्युझियम म्हणून या वस्तु संग्रहालयाचा लौकिक आहे. आज या वस्तु संग्रहालयाचे इन्टॅक बि.एम.सी. आणि जमनालाल बजाज फाउंडेशनच्या मदतीने अत्याधुनिक पध्दती वापरून पूर्णपणे कायापालट करण्यात आलेला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

**प्र.** मुंबईतील स्थापत्याच्या उत्कृष्ट नमुन्यापैकी कोणतेही दोन थोडक्यात सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १३.५ सारांश

मुंबईच्या सांस्कृतिक वैभवातील महत्त्वाचे घटक आपण जाणून घेतले. मुंबईच्या सांस्कृतिक व आर्थिक विकासामध्ये नाटके, चित्रपट व स्थापत्याने विशेष योगदान दिले आहे. आजही मुंबईतून दरवर्षी हजारो नाटके व चित्रपट प्रदर्शित केले जातात. वरील विवेचनावरुन मुंबईची संस्कृती व तिचे विविध घटक समजण्यास मदत होते.

## १३.६ विद्यापीठीय स्वरुपाचे प्रश्न

१. मुंबईमध्ये नाट्यक्षेत्राचा विकास कशाप्रकारे झाला त्याचा आढावा घ्या.

२. मुंबईतील चित्रपट क्षेत्राचा विकासाचा मागोवा घ्या.

३. मुंबईतील स्थापत्याचे उत्कृष्ठ नमूने कोणते आहेत ते स्पष्ट करा.

४. टीपा लिहा.

अ) आचार्य अत्रे

ब) दादासाहेब फाळके

क) मुंबईतील गॉथिक शैलीच्या इमारती

❖❖❖❖

**F.Y.B.A. - History Paper I**
**Modern Maharashtra (1848-1960)**

**I - SEMESTER**

**Module I :** Maharashtra on the Eve of 1848

**Unit - I**
a) Historical Background of Maharashtra
b) Historical Background of Mumbai

**Module II :** Emergence and growth of Mumbai as a Port City

**Unit - III**
a) Cotton and Opium Trade
b) Modes of Transportation

**Module III :** Trends in Reform Movements

**Unit - IV**
a) Prathana Samaj and Satyashodhak Samaj
b) Indian Social Conference and Efforts Towards Emancipation of Women

**Module IV :** Origin and Growth of National Movement in Maharashtra

**Unit - V**
a) Foundation of Indian National Congress and its growth till 1919.

**Unit - VI**
b) Militant Nationalism and Gandhi Era

**Module V :** Mumbai the Financial Capital

**Unit VII** a) Textile Mills, Stock Market and Banking
**Unit VIII** b) Labour Movements

**Module VI :** Rise of New Forces

**Unit IX** a) Dr. B.R. Ambedker and Dalit Movement
**Unit X** b) Tribal Uprisings and Peasants Movements

**Module VII :** Integration and Reorganization

**Unit XI**
a) Hydrabad Mukti - Sangram
b) Sanyukta Maharashtra Movement

**Module VIII :** Education and Culture

**Unit XII**
a) Progress in Education and Press
b) Development in Theatre and Cinema, Architectural development in Mumbai

❖❖❖❖

# प्रथम वर्ष कला

# इतिहास अभ्यासपत्रिका क्र. १

# आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास

# (१८४८-१९६०)

**(Under Distance Education Council Grant)**

© UNIVERSITY OF MUMBAI


**डॉ. राजन वेळूकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
प्राध्यापक-नि-संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.



**प्रकल्प समन्वयक आणि संपादक** : **श्री. अनिल बनकर**
सहाय्यक प्राध्यापक नि सहाय्यक संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **श्री. बी. डी. शिंदे,** इतिहास विभाग,
रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय,पनवेल, जि. रायगड

: **प्रा. टी. पी. मोकल,** विभागप्रमुख, इतिहास विभाग,
डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व
सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय,
रोहा, जिल्हा रायगड - ४०२ १०९

: **डॉ. संदेश माधवराव वाघ**
प्रभारी विभागप्रमुख, पदव्युत्तर इतिहास विभाग,
अण्णासाहेब वर्तक कला महाविद्यालय, वसई रोड,
वसई, जिल्हा- ठाणे - ४०१ २०२

: **श्री. एस. के. भदरगे** ,विभागप्रमुख, इतिहासविभाग,
बी.एन.एन. महाविद्यालय, भिवंडी.

: **श्री. जितेंद्र भामरे**
कोकण ज्ञानपिठ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
कर्जत, जिल्हा रायगड

: **श्री. प्रदिप वाघमारे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
रामनारायण रुईया महाविद्यालय, माटुंगा, मुंबई



**नोव्हेंबर, २०११ प्रथम वर्ष कला, इतिहास अभ्यासपत्रिका क्र. १, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८४८-१९६०)**

**प्रकाशक :** प्राध्यापक-नि-संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था,मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई-९८.

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**मुद्रण** :

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | १८४८ पूर्वीचा महाराष्ट्र<br>अ) महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी | ०१ |
| २. | १८४८ पूर्वीचा महाराष्ट्र<br>अ) मुंबईची ऐतिहासिक पार्श्वभूमी | १६ |
| ३. | मुंबईचा एक बंदर म्हणून उदय व विकास | ३० |
| ४. | सुधारणा चळवळीचे प्रवाह | ४४ |
| ५. | राष्ट्रीय चळवळीचा उदय व विकास | ५७ |
| ६. | क्रांतीकारी व गांधीयुग राष्ट्रवाद | ७१ |
| ७. | मुंबई आर्थिक राजधानी<br>अ) कापड गिरण्या, बँकिगसेवा व शेअर बाजार | ८३ |
| ८. | कामगार चळवळ | ९६ |
| ९. | नवीन चळवळीचा उदय<br>अ) डॉ. बी.आर. आंबेडकर आणि दलित चळवळ | १०३ |
| १०. | आदिवासींचे उठाव आणि शेतकरी चळवळ | ११४ |
| ११. | एकीकरण व पूर्नरचना<br>अ) हैद्राबाद मुक्ती सग्रांम<br>ब) संयुक्त महाराष्ट्र चळवळ | १३५ |
| १२. | शिक्षण आणि संस्कृती<br>अ) शिक्षण व वृत्तपत्रातील प्रगती | १४८ |
| १३. | शिक्षण आणि संस्कृती<br>ब) मुंबईतील नाटक, चित्रपट व स्थापत्याचा विकास | १६७ |


❖❖❖❖